
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. २४६






# श्री सोमनाथ तीर्थ

REFBK-0010793

गौतमबुवा पाठक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५५४८ वि: ५- प्रकाश
क्रमांक २४६ नों: दि: २५।१०।५८



# श्रीसोमनाथ तीर्थ

( प्रतिष्ठापनेचा इतिहास )

REFBK-0010793

त्र्यंबक रघुनाथ (गौतमबुवा) पाठक

आषाढी एकादशी शके १८८१
७८
१९५९

ग्रंथ संग्रहालय ठाणे
किंमत पांच रुपये
वा. क्र. १०७९३
ठाणे

प्रकाशक—
त्र्यंबक रघुनाथ (गौतमबुवा) पाठक
पिंपळनेरकर.
श्रीयशवंतराव महाराज मंदिर, नाशिक.

सर्व भाषेंतील हक्क लेखकाचे स्वाधीन.

( C )

त्र्यं र. (गीतमबुवा) पाठक

प्रथमावृत्ति — जुलै १९५९

मुद्रक—
रामचंद्र गणेश गिजरे
श्रीगजानन छापखाना
कराड (जि. सातारा)

# अर्पण-

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।

गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

पितामह- ती. भीमाशंकर बाळकृष्ण पाठक (तात्या)

पितामही- सौ. पार्वतीबाई पाठक (आजी)

आणि

**माता, पिता व गुरुदेव-**

या सर्वांच्या चरणीं

## आशीर्वाद १

गु. पू. शंकरानंद भारती स्वामी–
( पूर्वाश्रमींचे वेदांतवागीश श्रीधरशास्त्री पाठक, धुळें )

ॐ

आनन्द मठे ब्रम्हावर्ते
पौ० कृ० ६ मन्दे– १८७९

संतोषस्य परांकोटिमध्यारोहति चेतः श्री सोमनाथतीर्थ पुस्तकं श्रुतवतो मे मन्येऽनुग्रहोऽयं प्रणेतृ महोदयानां भारतीयेषु देशान्तरजेषु जिज्ञासुषु । यतोऽत्र पुस्तके विविधाः शास्त्रीया ऐतिहासिकाश्च विषया मंत्रब्राह्मणगता अपि । भूधरभूजानि कृपयायं ग्रंथस्य प्रणेता सर्वाङ्गीणं भव्यं लभतामिति शम् ॥

सर्वेषां विधेयः
शंकरानंद भारती

## आशीर्वाद २

परमपूज्य भगवान् श्रीधरस्वामी
श्री सज्जनगड ( श्रीधरकुटि )

यद्यपि समग्रग्रंथावलोकनं शक्यं नाभूत् कार्यकलापेन । तदपि सूचिश्रवणमात्रेणैव श्रीसोमनाथस्यैतिहासिक महत्त्वोद्घाटनात्मकोऽयं ग्रंथो वैदिकनिजकीर्तिकुसुमामोदेन प्रपूर्यतां जगदिदं स्वामृतरसेनच तर्पयतु रसिकजिज्ञासुभृंगानां विमलपिपासुहृदयानीति मम हृद्गताशिषा वर्हिर्निगताः विमलप्रकाशेन ।

शंकरस्य च ग्रंथोऽयं शं तनोतु सदैव नः ।
जगद्व्यापि प्रकाशेन जगत्तिमिरनाशयन् ॥
सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु माकश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥

इति शम् ।

माघ कृष्ण १२ भृगुवासरे १८७९ श्रीधरस्वामी

# अ नु क्र म

मराठी ... ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22880 दि. प्र-प्रवास
क्रमांक 276 नों: दि: 26/10/

अ र्प ण
आ शी र्वा द
प्रा क्क थ न
पु र स्का र

| | | | |
|---|---|---|---|
| कला | १ ली | प्रास्ताविक | १ – ३ |
| कला | २ री | शिवदर्शन | ४ – २० |
| कला | ३ री | प्रभास तीर्थ | २१ – ३३ |
| कला | ४ थी | सोमकथा | ३४ – ३९ |
| कला | ५ वी | आख्यायिका | ४० – ५३ |
| कला | ६ वी | ऐतिहासिक | ५४ – ५६ |
| कला | ७ वी | वैभवशाली देवस्थान | ५७ – ६२ |
| कला | ८ वी | आपत्काल | ६३ – ६६ |
| कला | ९ वी | संहार | ६६ – ७४ |
| कला | १० वी | मध्यंतर | ७४ – ८० |
| कला | ११ वी | जगत्रय धन्या अहिल्यादेवी | ८१ – ८३ |
| कला | १२ वी | औदासिन्य | ८५ – ९२ |
| कला | १३ वी | स्वराज्यांतील जागृति | ९३ – ९८ |
| कला | १४ वी | प्राणप्रतिष्ठेची योजना | ९९ – १०१ |
| कला | १५ वी | समारंभ | १०१ – १०९ |
| कला | १६ वी | समारोप | ११० – १२३ |

प रि शि ष्टें

| | | |
|---|---|---|
| १ | लेख व परिचय | १२४ – १३२ |
| २ | शिवस्तोत्रें | १३३ – १५४ |
| ३ | अभिप्राय | १५५ – १६१ |
| ४ | सविस्तर अनुक्रम | १६२ – १६६ |
| ५ | देणगीदारांचीं नांवें | १६७ – १६९ |

## शि व स्तो त्रें


| | | |
|---|---|---|
| १ | शिवनामावल्यष्टकम् | १३३ |
| २ | प्रदोषस्तोत्राष्टकम् | १३३ |
| ३ | शिवरक्षास्तोत्रम् | १३४ |
| ४ | महामृत्युंजयस्तोत्रम् | १३५ |
| ५ | शिवाष्टोत्तरनामशतकम् | १३६ |
| ६ | अपराधभंजनस्तोत्रम् | १३७ |
| ७ | निर्वाणषट्कम्स्तोत्रम् | १३८ |
| ८ | दारिद्र्यदहनशिवस्तोत्रम् | १३९ |
| ९ | शिवमहिम्नस्तोत्रम् | १४० |
| १० | शिवमानसपूजा | १४३ |
| ११ | शिवापराधक्षमापनस्तोत्रम् | १४४ |
| १२ | शिवपंचाक्षरस्तोत्रम् | १४५ |
| १३ | शिवषडाक्षरस्तोत्रम् | १४५ |
| १४ | द्वादशज्योतिर्लिंगस्तोत्रम् | १४६ |
| १५ | शिवाष्टकम् | १४७ |
| १६ | दक्षिणामूर्तिस्तोत्रम् | १४७ |
| १७ | शिवकवचम् | १४९ |
| १८ | प्रभास क्षेत्र महिमा | १५३ |
| १९ | ' शिवोऽहम् ' स्तोत्रम् | १५३ |


## चि त्र सू चि


| | |
|---|---|
| हिमलिंग—श्रीअमरनाथ | ८ |
| श्रीसोमनाथ | २२ |
| मंदिराचें बांधकाम | ९४ |
| श्रीसोमनाथ प्रतिष्ठेचा नकाशा | १०० |
| प्राणप्रतिष्ठा | १०६ |
| प.प.गु.नारायणशास्त्री मराठे (प.प.केवलानंद सरस्वतिस्वामी) | १२६ |
| नवी बांधणी ( इ. स. १९५८ ) | १३२ |
| प्रभासपट्टणला जाण्याचे मार्ग | १५४ |

मुखपृष्ठावरील–डॉ. राजेंद्रप्रसादांची सोमनाथाची पहिली पूजा
शेवटचें – सोमनाथ देवस्थानचें जुनें शिल्प

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम २८८४८ वि: ५
क्रमांक २४६ नों: दि: ३



# प्राक्कथन

फोडिलें भांडार । धन्याचा हा माल । मी तंव हमाल । भारवाही ।।

गुरुदेवांच्या आणि मातापित्यांच्या आशीर्वादानें, तसेंच सन्मित्रांच्या सहाय्यानें माझ्या जीवनांत क्रांति होऊन मला कीर्तनरूपानें व ग्रंथरूपानें जनताजनार्दनाचीं सेवा करण्याचा सुयोग प्राप्त झाला त्या सर्वत्रांना माझें अभिवादन.

किशोर प्रकाशनद्वारां सद्ग्रंथमालेचें पहिलें प्रकाशन श्री संत ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचें चरित्र प्रसिद्ध झालें. श्री. गु. ह. भ. प. मामा दांडेकर यांनीं आणि थोर सज्जनांनीं, सुहृदांनीं माझी ही अल्पकृति गोड मानून घेतली. थोरांचा स्वभावच तो.

परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यम् । निजहृदि विकसन्तः ........
अशी संतांची वृत्ति–त्या वृत्तीनें मला प्रोत्साहन मिळालें. आणि ' श्रीसोमनाथतीर्थ ' या ग्रंथाला पुन्हां मी निमित्तमात्र झालों.

इ. स. १९५१ सालीं नाशिक वसंत व्याख्यानमालेचा चिटणीस असतांना ' जय सोमनाथ ' या विषयावर मालेंत पुष्प गुंफिलें. त्याची जाणीव मालेचे अध्यक्ष श्री. पु. रा. बुरकुले वकील यांनीं अर्चा समारंभास जाण्यापूर्वींच करून दिली होती. समारंभास हजर राहण्याचा सहज सुयोग प्राप्त झाल्यामुळें प्रारंभापासूनच त्याची दक्षता मला घ्यावी लागली. श्री यशवंतराव महाराजांच्या प्रशस्त पटांगणावर हजारोंनीं उपस्थित श्रोते ' सोमनाथ ' शांतपणें ऐकत होते. व्याख्यान उत्कृष्ट झालें. आणि तेव्हांपासून कीर्तनाला जाईन तेथें सोमनाथ दर्शन जनतेला होऊं लागलें. व्याख्यानाला अनुपस्थित श्रोत्यांना वृत्तांत कळल्यावर त्याला आपण मुकलों म्हणून हळहळ वाटली असें सर्वत्र होत गेलें.

याच विषयावर पिंपळनेर, मनमाड, कोल्हापूर, सांगली, मिरज, रोहें, तळोदें, नंदुरबार, कुडाळ, वेंगुर्लें, चोपडें, पंढरपूर, विटें, खटाव, कराड, कोपरगांव, अडूर वगैरे ठिकाणीं असलेल्या हायस्कूल, कॉलेज, विद्यापीठ, नगरवाचन मंदिर व व्याख्यानमाला वगैरे संस्थांतून व्याख्यानें झालीं. कराडच्या व्याख्यानानंतर अध्यक्ष श्री. भय्याशास्त्री वाटवे यांनीं या विषयावर पुस्तक प्रसिद्ध करण्याची इच्छा प्रकट केली. पण –

'उत्पद्यन्ते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः' ।

असें असल्यानें जरी लिहिलें तरी प्रसिद्ध कसें होणार ? अशी शंका आली. धाडस करून लिखाण लिहिलें. श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी आणि श्री. काकासाहेब गाडगीळ यांना दाखविलें. त्यांनीं पसंतीचा शिक्का मारिला. उत्साह वाटला. आणखी माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. प्राज्ञ पाठशाळा ग्रंथालय, कलकत्ता राष्ट्रीय ग्रंथालय यांचा बराच उपयोग झाला. त्यांत राहिलेला अपुरेपणा माझ्या मुंबईच्या 'चातुर्मास्य' वास्तव्यांत माझे स्नेही पत्रपंडित श्री. श्री. रा. टिकेकर यांनीं अनेक इंग्रजी ग्रंथांतून विविध माहितीची भर घालून, ग्रंथ सर्वांगसुंदर करून मला कायमचें ऋणी करून ठेविलें. माझेकरितां त्यांनीं अमोल वेळ खर्च करून त्रासहि सोसला. त्याची स्मृति सदैव राहील.

नंतर श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. शिवाजीराव भावे, श्री. नानासाहेब चापेकर, श्री. बाबुराव गोखले, श्री. नानासाहेब ठकार, श्री. बाळासाहेब भारदे, श्री. म. म. पा. द. वा. पोतदार, श्री. पंडित सातवळेकर, ह. भ. प. सोनोपंत दांडेकर वगैरे सज्जनांना लिखाण दाखविलें. त्यांनीं ग्रंथाचा गौरव करून मान्यता दिली. पण छापण्याचें कसें ? हा प्रश्न होताच. श्री. काकासाहेब गाडगीळांनीं सोमनाथ विश्वस्तांकडून पांचशें रुपयांचीं पुस्तकें घेण्याचें आश्वासन दिलें. कलकत्ता महाराष्ट्र समाजानें कीर्तनांत ग्रंथाला देणग्या दिल्या. अनेक थोरांकडून छापण्यासाठीं मदत मिळाली. आणखी कांहीं सज्जनांची बरीच हस्तें परहस्तें मदत झाली आहे. त्यांचा नामनिर्देश करणें त्यांना बरें वाटत नाहीं. तरीपण त्यांचें ऋण माझेवर सदैव आहे तें विसरतां येणार नाहीं. तसेंच माझ्या मुंबईच्या वास्तव्यांत श्री. मामासाहेब फडणीस, श्री. माधवराव जोशी, श्री. नानाराव जोशी वैद्य, श्री. काका जोगळेकर, श्री. कृ. के. कानिटकर वैद्य, वे. पांडुरंगशास्त्री आठवले, श्री. काकासाहेब केतकर (दादर), कऱ्हाडचे श्री. रघुनाथशेट वांकर (धर्मप्रेमी), श्री. विनायकराव उमराणी, श्री. ना. दा. पालकर, श्री दातार, श्री. ना. बा. मराठे आणि मुंबईच्या सौ. स्नेहलताबाई देशपांडे व कांहीं भगिनी यांनीं ग्रंथाबाबत बरेंच सहाय्य केलें. त्यांच्याच सहाय्यानें हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

पुस्तक सजविण्याचें कामीं टाइम्स् ऑफ् इंडियाचें चित्रखातें, श्री. रेगे ब्लॉकमेकर, श्री. दिवाडकर, स्टुडियो एंजल यांनीं मदत केली तीबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्या चित्रामुळें पुस्तकाचें महत्त्व वाढलें. त्याचें श्रेय या तिघांना आहे. आणि न्यू जॅक प्रिंटिंग प्रेसचे मॅनेजर श्री. प्र. का. साठे यांनीं मुखपृष्ठाचें चित्र आणि आंतील चित्रें वेळेवर आस्थापूर्वक उत्कृष्ट छापून दिलीं.

या ग्रंथाच्या आणखी दोन तीन भाषेंत आवृत्त्या निघाव्या असें कांहीं मित्रांनीं सुचवून त्याप्रमाणें त्यांनीं भाषांतराचें सहाय्यहि देण्याचें अभिवचन दिलें आहे. व त्याकरितां आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दाखविली आहे. त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें.

मागील ग्रंथाप्रमाणेंच याहि ग्रंथ छपाईचें काम कराडचे माझे स्नेही गजानन छापखान्याचे मालक श्री. रा. ग. गिजरे व त्यांचे सहाय्यक यांनीं अनेक अडचणी सोसून उत्कृष्ट प्रकारें केलें. जरा विलंब लागला खरा पण आत्मीयतेनें काम करून दिल्याबद्दल त्यांना माझे धन्यवाद आहेत.

त्याचप्रमाणें श्री. ललित ब्रदर्स (व्होरा बझार—बोरीबंदर) या कागदाच्या कंपनीचे मालक श्री. छोटालालभाई शहा यांनीं या ग्रंथा–साठीं आर्ट पेपर देऊन फोटोच्या छपाईचीही मदत केली. श्री. छोटा–लाल नांवानें छोटे असले तरी धार्मिक बाबतींत फार मोठे आहेत. त्यांनीं अनेक धर्मग्रंथांना मदत केली आहे. धार्मिक कार्याचा गौरव करण्यांत त्यांना फार समाधान वाटतें. असे थोर निष्ठावान, सात्त्विक वृत्तीचे गृहस्थ आहेत.

तसेच फेवरिट् बुक क्लॉथ अँड पेपर मार्ट ( मिर्झा स्ट्रीट ) कंपनीचे मालक श्री. हतीमभाई यांनीं कागदाच्या अत्यंत दुर्मिळ व कठीण परिस्थितींत सवलतीनें उत्कृष्ट कागद देऊन उपकृत केलें .यामुळें या ग्रंथाचें प्रकाशन होत आहे.

पुन्हां एकवार त्या दयाघन परमात्म्याजवळ ‘ माझ्याकडून अशीच सेवा करून घेण्याचें सामर्थ्य दे ’ अशी प्रार्थना करून हें निवेदन संपवितों.

काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलीं ।।
करविली तैसी केली कटकट । वांकडे कीं नीट देव जाणे ।।

संतसेवक—**गौतमबुवा पाठक**

# पुरस्कार १

**श्री. माननीय न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ**

राज्यपाल पंजाब

श्री गौतमबुवा पाठक यांनीं 'श्री सोमनाथतीर्थ' हें उत्कृष्ट पुस्तक लिहून एक चांगली कामगिरी केली आहे. वैदिककालापासून अगदीं आधुनिक कालापर्यंत सोमनाथ तीर्थ कोणकोणत्या दिव्यांतून गेलें याचा इतिहास त्यांनीं दिला आहे. त्याचप्रमाणें ह्या तीर्थाची कशी उपेक्षा झाली याचीहि करुण कथा त्यांनीं दिली आहे. बारा ज्योतिर्लिगांसंबंधीं माहिती देऊन सोमनाथाचा पुन्हां उद्धार कोणत्या परिस्थितींत झाला हेंहि सांगितलें आहे.

इ. स. १९४७ च्या कार्तिक महिन्यांतील शुद्ध प्रतिपदेला मी व सरदार वल्लभभाई जुनागडला गेलों. व तेथून प्रभास पट्टणला आलों. पडकें देऊळ पाहिलें. कांहीं विचार मनांत आले. ते समुद्रकाठावर फिरत असतांना सरदार वल्लभभाईंना बोलून दाखविले. त्यांच्याहि मनांत तसेच विचार आले असले पाहिजेत. आणि म्हणून त्यांनीं सोमनाथाचे जीर्णोद्धाराची घोषणा करण्यास मान्यता दिली. मिनिटा दोन मिनिटाचे आंत आम्ही भग्न मंदिराजवळ आलों. आणि त्याच्या पडक्या दरवाज्याजवळ उभा राहून मीं घोषणा केली कीं हें मंदिर पुन्हां निर्माण करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. आणि लोकांना कळवूं इच्छितों कीं, हें राज्य निर्माण करण्यासाठीं आलें आहे. विनाशासाठीं नव्हे. टाळ्यांचा कडकडाट झाला. व श्री. जामसाहेबांनीं रु. एक लाख देणगी जाहीर केली. तसेंच श्री. सामळदास गांधी यांनीं रु. पन्नास हजारांची देणगी जाहीर केली. अहिल्याबाईंच्या मंदिराजवळ भरलेल्या सभेंत श्री. वल्लभभाईंनीं जाहीर केलें कीं, मंदिर बांधलें जाईल व सर्व व्यवस्था होईल. आज तें मंदिर जवळ जवळ पूर्ण होत आलें आहे. दि. ११ मे १९५१ च्या सुप्रभातीं प्राणप्रतिष्ठेचा समारंभ पार पडला. ह्या समारंभास अेक अपूर्वता आली होती. धार्मिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या त्याचें वर्णन श्री. पाठक यांनीं केलें आहे.

अशा तऱ्हेनें ऐतिहासिक माहिती देऊन हिंदु धर्माभिमानी वाचकांना उपकृत करून ठेवलें आहे.

**न. वि. गाडगीळ**

( मराठी )
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नों. दि. ...

# पुरस्कार २

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी – पिंपळनेरकर
अध्यक्ष– प्रा. पा. शाळा, वांई

श्री. गौतमबुवा पाठक यांनीं परिश्रमपूर्वक 'सोमनाथ तीर्थ' हें पुस्तक लिहिलें आहे. विविध प्रकारची माहिती या पुस्तकांत दिली आहे. शिवदैवतावरील सर्वांगीण माहितीनें भरलेल्या या पुस्तकाचा उपयोग केवळ धार्मिक श्रद्धावानालाच होईल असें नसून शिवदैवताच्या अभ्यासकालाहि होईल. मराठींतील शैववाङ्मयांत या पुस्तकानें चांगली भर टाकली आहे.

'सोमनाथ' ही शिवाची संज्ञा वैदिक व अवैदिक अशा दोन्ही परंपरेचा समन्वय करणाऱ्या दैवताची सूचक आहे. सोमयाग ही वैदिक संस्थेंतील वरिष्ठ संस्था आहे. सोमाचा नाथ किंवा स्वामी अग्नि व यज्ञ होय. सोमनाथ हें पहिलें ज्योतिर्लिंग मानलें जातें. ज्या स्थानीं सोमयाग होतात त्या स्थानांस पवित्र स्थान म्हणून मानण्याची वैदिक-संस्कृतीची परंपरा आहे. किंबहुना भूमि पवित्र व वस्तीस योग्य करण्याचें मुख्य साधन यज्ञ होय, असें वेदांत अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. हिंदूंचें सर्वांत पवित्र व प्राचीन तीर्थस्थान प्रयाग होय. प्रयाग म्हणजे ज्या स्थानीं पुष्कळ व मोठे यज्ञयाग झाले असें स्थान होय. 'तीर्थ' शब्द प्रथम यज्ञभूमीस धार्मिक अर्थानें लावीत. मूळ 'तीर्थ' शब्दाचा व्युत्पत्यर्थ तरण्याचें स्थान असा आहे. नदीला ज्या ठिकाणीं उतार असतो, किंवा ज्या ठिकाणीं नौकेसारखी तरून जाण्याचीं साधनें असतात, घाट किंवा पूल असतो, त्यास व्युत्पत्यर्थानें तीर्थ म्हणतात. पाप तरून जाण्याचें साधन यज्ञ होय, म्हणून यज्ञ वा यज्ञभूमि तीर्थ-संज्ञेस पात्र झाली. दर्शनानें किंवा स्पर्शनानें पापनाश करणारें तीर्थ होय, असा त्याचा रूढार्थ नंतर झाला. सोमयाग संपल्यानंतर त्या पवित्रस्थानीं कायमचें पावित्र्यदर्शक लक्षण म्हणून शिवदेवतेची स्थापना यादवांच्या कालीं किंवा तत्पूर्वी झाली असावी, असें अनुमान करतां येतें. यज्ञाच्या ज्योतीचें प्रतीक म्हणजे ज्योतिर्लिंग असा अर्थ ज्योतिर्लिंग या शब्दाचा असण्याची खूप शक्यता आहे.

श्रीसोमनाथ तीर्थाचा सर्व उपलब्ध प्राचीन इतिहास प्रथम देऊन नंतर नव्या सोमनाथाच्या स्थापनेचा इतिहास ह. भ. प. कीर्तनभूषण गौतमबुवा यांनीं या पुस्तकांत दिला आहे. माझा व्यक्तिशः या स्थापनेंत आचार्य म्हणून मुख्य भाग होता. म्हणून त्यांतील एक महत्त्वाची हकीकत येथें नमूद करून ठेवतों. नव्या सोमनाथाच्या स्थापनेचें आचार्यत्व माझ्याकडे आलें, तेव्हां मीं ' हें माझ्याकडे कसें आलें ' या संबंधीं खोलांत जाऊन तपास केला. माझ्या लक्षांत आलें कीं कांहीं तीर्थस्थ सुप्रसिद्ध संस्कृत पंडितांना व शंकराचार्य पीठस्थ आचार्यांना हें आचार्यत्व स्वीकारण्यास माझ्या अगोदर विनंती केली होती. परंतु त्यांनीं ती नाकारली. याचें कारण श्री सोमनाथ विश्वस्त निधी संस्थेच्या सनदेंत हें मंदिर अस्पृश्यांना पूजेस व अहिंदूंना देव दर्शनास मोकळें राहील असा नियम नमूद केला आहे. "ती काढून टाकल्यास आम्ही आचार्यत्व करूं" अशी अट श्री सोमनाथ विश्वस्तांना नाशिक, काशी, द्वारका येथील पंडितांनीं व आचार्यांनीं घातली. परंतु मी स्वतः अशी अट घालणार नाहीं, अशा विश्वासानें श्री सोमनाथ विश्वस्तांनीं इतरांचा नाद सोडून मला आचार्यत्व स्वीकारण्याची प्रार्थना केली; मी सनदेंतील नियमास हरकत न घेतां ती प्रार्थना मान्य केली.

देव प्रतिष्ठेचा विधि फार गुंतागुंतीचा असतो. त्यांतील याज्ञिक कर्मकांड वैचित्र्ययुक्त व सूक्ष्म असतें; गुरुवर्य ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांनीं त्या संबंधांत संपूर्ण मार्गदर्शन करण्याचें आश्वासन मला दिल्यामुळेंच मी ही आचार्यत्वाची जोखीम अंगावर घेऊं शकलों गुरुवर्य स्वामीजी मुख्यतः उत्तर मीमांसेचे म्हणजे वेदांताचे पंडित होते. परंतु नंतर उत्तर वयांत संन्यासाश्रमांत त्यांनीं वैदिक कर्मकांड व पूर्वमीमांसा यांचा अगाध व्यासंग केला. पूर्वमीमांसा सूत्रांची चिकित्सापूर्ण आवृत्ति काढली; मीमांसा कोशासारखा अत्यंत पांडित्यपूर्ण असा महाकोश रचला. त्यांच्या इतकाच पूर्वमीमांसेचा पंडित साऱ्या भारतांत कोणी दिसत नाहीं. त्यांनींच नव्या सोमनाथाची अर्चा यथासांग पार पाडली. मी त्यांतील बाह्य व्यवस्था व व्यवहार यांची बाजू मात्र नीट संभाळली. स्वामीजी कडक शिस्तीचे भोक्ते होते. सेकंद व मिनिटें संभाळणारी माझी बिनबोभाट व बिनचूक व्यवस्था आणि कडेकोट बंदोबस्त पाहून स्वामींना अत्यंत समाधान झालें.

श्री. गौतमबुवा पाठक ह्यांनीं हा प्रतिष्ठा समारंभाचा इतिहास श्रद्धापूर्वक लिहून त्याचें पुस्तक काढलें; त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. या प्रतिष्ठा समारंभाच्या इतिहासास त्यांनीं शैव दैवतांची माहितीहि जोडली, त्यामुळें या पुस्तकाचें महत्त्वहि वाढलें. ही माहिती देतांना कित्येक ठिकाणीं न कळत चुकाहि झालेल्या आढळतील. परंतु त्यांचा निरास पुढील आवृत्तींत होऊन जाईल.

लक्ष्मणशास्त्री जोशी
१२।३।१९५९

## – संदर्भ ग्रंथ –


१ ऋग्वेद खिलसूक्तम् ( १२ ) २ शिवपुराण शतरुद्र संहिता. ३ कोटिरुद्र संहिता. ४ महाभारत शल्यपर्व, वनपर्व. ५ श्रीमद्भागवत दशमस्कंध अ. ४५. ६ योगीश्वर याज्ञवल्क्य चरित्र. ७ स्कंद पुराण ( ९ व्या शतकांतील. ) ८ मध्ययुगीन भारत (सोमनाथवर स्वारी) श्री. चिंतामणराव वैद्य. (इलियटचें वर्णन)–(तवारिख इब्न असीरनें केलेलें वर्णन. ) ९ श्री. ना. गो. चापेकर यांचा लेख. १० मूर्ति विज्ञान. ११ स्वामी श्रद्धानंदांचा ' हिंदु संघटन ' ग्रंथ ( मराठी भाषांतर ) १२ श्री वि. ब. आठवले ( नाशिक ) यांचीं ऐतिहासिक टाचणें १३ दि श्राइन इटर्नल ( सोमनाथाचें चिरंतन देवालय- मुनशीकृत ) १४ सिंहाला शह, श्री. रा. टिकेकर.

## कलकत्ता राष्ट्रीय ग्रंथालय– ग्रंथ यादी.

१५ एन्सायक्लोपीडिया ऑफ् रिलीजन अॅण्ड् एटीक्स्. १६ कोर्ट यार्ड ऑफ् दी आग्रा फोर्ट. १७ हिंदी विश्वकोश. १८ सुलभविश्वकोश १९ इंपिरीयल् गॅझीटियर् ऑफ् इंडिया, २० दि एन्सायक्लोपीडिया अमेरिकाना. २१ प्राचीन व मध्यकालीन भारत १५२६ तक डॉ. पी.सरन १९५६ पृ. ३१९. २२ दिल्ली सलतनत – आशीर्वादलाल श्रीवास्तव १९५२ पृष्ठ ५५. २३ भारतका बृहत् इतिहास द्वितीय भाग. २४ मध्यकालीन भारत, प्रथम खंड, श्रीनेत्र पांडेय. २५ मुसलमानी रियासत श्री. गो. स. सरदेसाई. २६ इतिहास संशोधन ( गुजराथ साहित्य परिषद् ग्रंथावली पु. १ लें. २७ सोमनाथ ( गुजराथ साहित्य सभा प्रकाशन, अमदाबाद. ले. श्री. रत्नमाणिकराव भीमराव बी. ए. ) २८ म. म. घुलेशास्त्री (नागपूर) यांचा लेखसंग्रह महादेवाचें मूळ स्वरूप– यांतील वेंचक भाग-प्रथम खंड वैदिक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५२५८ वि:
क्रमांक २४६ नों: दि: २५/१०/

# सोमनाथ तीर्थ



तव तत्वं न जानामि कीदृशोऽसि महेश्वर ।
यादृशोऽसि महादेव तादृशाय नमोऽस्तु ते ॥

**सोमनाथ प्रभातीर्थे** ग्रंथगोमुखधारया ।
बाह्यागत्य जगत्सर्वं तीर्थरूपं करोत्विदम् ॥

प. पू. **श्रीधरस्वामी**

याच ग्रंथकाराचें प्रथम प्रकाशन– ( सद्ग्रंथमाला )

**श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचें चरित्र आणि कीर्तनकमलिनी**

**प्रस्तावना** – श्रीसंत पाचलेगांवकर महाराज

**अभिप्राय** – ह. भ. प. सोनोपंत दांडेकर. श्री. तात्यासाहेब करंदीकर आदि थोरांचे व केसरी, सकाळ, प्रसाद, लोकमान्य, लोकसत्ता इत्यादि वृत्तपत्रें व मासिकांचे उत्कृष्ट अभिप्राय.

## आगामी प्रकाशनें

१ आदर्श गुरुदेव
(माझ्या जीवनाशीं संबद्ध थोर व्यक्ति विशेष–परिचय)

२ भक्तिमार्ग प्रबोध

३ चैतन्य महाप्रभु (ओवीबद्ध चरित्र)

४ विविध लेखमाला

५ योगीश्वर याज्ञवल्क्य (कीर्तनरूपानें)

६ मानवी जीवन आणि यज्ञ
(गीतारहस्याधारें उद्बोधक विवेचन)

---

**चुकीची दुरुस्ती**—पान ८६ ओळ ८--सन १९२१ ऐवजीं सन १९०२ वाचावें.

मराठी
अनुक्रम
क्रमांक ... दि.

कला पहिलीं

# प्रा स्ता वि क

**भारतांतील** पवित्र स्थानें म्हणजे आमच्या संस्कृतीचा इतिहास होय. तीर्थस्नान, क्षेत्रदर्शन होतांच गतकाळच्या इतिहासाचें स्मरण होतें; वेदकाळापासूनची परंपरा आठवते. यामुळें अंत:करणांतील निरनिराळे भाव प्रकट होतात. कांहीं मनाला आल्हाद देणारीं तर कित्येक दु:ख देणारीं स्थलें आम्ही पहातों. श्रीकाशीविश्वनाथ मंदिराच्या जागीं आज मशीद दिसते ती आमच्या दुबळेपणाची निदर्शक आहे. अन्यधर्मीय श्रद्धास्थानांबद्दल अत्यंत आदर आम्ही बाळगितों. पण आमचें श्रद्धास्थान नाहींसें करणारांचा योग्य बंदोबस्त आम्ही करीत नाहीं. ईश्वरनिर्मित वा मनुष्यकृत कलाकृति टिकविणें किंवा प्राण धोक्यांत घालूनहि तिचें रक्षण करणें, ही भावना जनतेंत तितकीशी तीव्र नसल्यानें असलें विदारक दृश्य पहाण्याचे वा अनुभवण्याचे प्रसंग येतात.

आमच्या या अफाट देशांत तीर्थयात्रेच्या निमित्तानें बंगाली माणूस मद्रासला जातो; मद्रासी काशी, नाशिक क्षेत्रीं जातो; गुजराथी, जगन्नाथपुरीला जातो; तर मराठा द्वारकेची, हरिद्वारची यात्रा करितो. काशीची गंगा कोणी रामेश्वरला नेतो, तर रामेश्वरचा सेतु काशीस समर्पण होतो. अनेक भाषा-भेद, आचार-भेद, पोशाख-भेद, असतांना भिन्न भिन्न ठिकाणचे भिन्न भाषीय वा प्रांतीय लोक या तीर्थक्षेत्रांच्या निमित्तानें एकत्र येतात. पंढरीचे वारकरी एकत्र जमतात तेव्हां

त्यांच्यांतली आत्मीयता व प्रेम पाहिलें म्हणजे अंतःकरण भरून येतें. फारा दिवसांनीं आपल्या घरीं आलेल्या आप्ताची भेट झाल्याप्रमाणें त्यांची वृत्ति होते. यांतच धर्मभावनेचा खरा विकास आहे. तीर्थ-क्षेत्रांचें एक मुख्य कार्य तें हेंच. आचार व भाषा-भेद असूनहि तीर्थ-क्षेत्रांमुळेंच परस्परांना एकत्र येतां येतें. आमच्या संस्कृतीची एकतेंतील विविधता अशानें व्यक्त होते.

वैदिक सनातन धर्माची ध्वजा भारतभर फडकविणाऱ्या **आद्य-जगद्गुरु श्रीमत् शंकराचार्यांनीं** आपल्या मठांची स्थापना करितांना सुद्धां एकत्वाच्या भावनेचेंच धोरण ठेवून (श्रीबद्रीकेदार, शृंगेरी, द्वारका, जगन्नाथपुरी) चार दिशांना चार मठ स्थापिले; अनेक शाखोप-शाखाद्वारां धर्मप्रचार चालविला. धर्मप्रचार सर्वत्र सुलभ व्हावा व सगळ्या भाषिकांचे वा प्रांतीयांचे वा पंथीयांचे संबंध येऊन परस्परांत आत्मीयता वाढावी ही श्रीपूज्यपाद आचार्यांची योजना सफल झाली.

आत्मा, ईश्वर, पुनर्जन्म, परलोक, अध्यात्म, प्रारब्धकर्म, क्रियमाण, संचित इत्यादींवर आमचा दृढ विश्वास आहे. वृत्ति, पंथ, आचार, विचार, आहार बदलले तरी ही परंपरा चालू राहिली. म्हणून आम्हांस धर्माविषयीं थोडी तरी आस्था वाटते; अध्यात्म हा आमच्या संस्कृतीचा आत्मा. मोक्ष किंवा मुक्ति मिळावी म्हणून प्रत्येकाची सारखी धडपड असते. त्या मोक्षप्राप्तीसाठीं चित्तशुद्धि आवश्यक आहे. प्रपंचांत गढून गेलेल्या संसारी त्रस्त जीवाला उपासनेद्वारां चित्तशुद्धि साधण्याचा साधुसंतांचा आदेश आहे. संसारांतील गोष्टींचा कांहीं काळ विसर पडण्यासाठीं तीर्थक्षेत्रांची उपयुक्तता आहे. क्षेत्रदर्शनानें व तीर्थ-स्नानानें चित्तशुद्धि होते; कांहीं काळ मनुष्य आपल्या प्रपंचांतील कटकटी विसरतो.

**गंगा गंगेति यो ब्रूयात् योजनानां शतैरपि।**
**मुच्यते सर्व पापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति ॥**

हा स्नानाचे वेळीं म्हणण्याचा मंत्र अर्थवादात्मक आहे. शेकडों योजनें दूर असलेली गंगा केवळ तिचें स्मरण केल्यानें आपणाला पवित्र

करीत असेल तर प्रत्यक्ष गंगास्नानाचें कांहींच प्रयोजन नाहीं ! पण त्याचा असा श्लेष काढावयाचा नाहीं. गंगा ही आमची पवित्र व श्रेष्ठ नदी. स्नानाचे वेळीं शेंकडों मैल दूर असलों तरी तिचें स्मरण केल्यानें प्रत्यक्ष गंगास्नानाची भावना होते. तीर्थक्षेत्रांत कांहीं काळ तरी पवित्र वातावरणांत मोठ्या आनंदानें जातो. हा मोठा लाभ तीर्थक्षेत्रांच्या यात्रेनें होतो. हरिद्वारचें सौंदर्य, बद्रीनारायणाची प्रशांत वाटचाल, हिमालयाचा निसर्गसुंदर बर्फाच्छादित प्रदेश, हृषीकेशचें पवित्र वातावरण व गंभीर शांतता, लक्ष्मण झूल्यावरून दिसणारी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व निर्मळ गंगामाई, चित्रकूट पर्वता-वरील श्रीरामनिवासस्थान देखावा, त्र्यंबकेश्वरच्या ब्रम्हगिरीची निसर्गरम्यता, माहुरगडचें रौद्र स्वरूप वगैरे अनंत देखावे पाहून मनाला एक प्रकारचा उत्साह वाटतो. काश्मीरसारख्या रमणीय प्रदेशांतलें अमरनाथचें निसर्गसुंदर महादेवाचें स्थान व तेथील पिंडीचा शुक्ल कृष्ण पक्षांत होणारा उदय अस्त, बर्फावर पडलेलीं बालसूर्याचीं सुवर्ण किरणें, त्यामुळें दिसणारीं रजत व सुवर्ण दृश्यें, यामुळें आस्तिक भावना बळावते, निसर्गापुढें मस्तक नम्र होतें. अशीं किती तरी ठिकाणें या भारतवर्षांत आहेत. तीर्थक्षेत्रांचें अस्तित्व सुद्धां मनावर उत्कृष्ट संस्कार करितें, या दृष्टीनें तीर्थक्षेत्रें हीं भारतांतील संस्कार केंद्रेंच होत.

भावनाप्रधान, भोळेभाबडे यात्रेकरू असोत, बुद्धिवादी चिकित्सक संशोधक असोत, अध्यातम प्रवृत्तीचे एकांतवासप्रिय विरक्त योगी, मुनि, ज्ञानी, वेदांती, संसार थाटणारे प्रपंची वा संसाराला विटणारे त्यागी असोत, त्या प्रत्येकाची आकांक्षा आमच्या तीर्थक्षेत्र–दर्शनानें पुरी होते.

अशा तीर्थक्षेत्रांपैकीं प्रभासपट्टणमधील प्रसिद्ध ज्योतिर्लिंग सोरटी सोमनाथ हें देवस्थान आहे. त्या प्रभास क्षेत्राचा प्राचीन इतिहास प्रथम सांगून नंतर इ. स. १९५१ च्या मे महिन्यांत सोमनाथ प्राण–प्रतिष्ठा समारंभ मोठ्या थाटानें पार पडला, त्याचें वर्णन करावयाचें आहे.

★ ★ ★

# शि व द र्श न

आमच्या भारतवर्षांत अनेक देव असतां श्री शंकराची लोकप्रियता आहे इतकी कोणत्याहि देवाची दिसत नाहीं. रामकथेचा प्रसार आद्यकवींनीं म्हटल्याप्रमाणें--

**यावत्स्थास्यन्ति गिरयः सरितश्च महीतले ।**

झाला असला, किंवा लोकांमध्यें रामनामाचा पुष्कळ प्रसार असला तरी राममंदिरें त्या मानानें कमी भरतील. किंबहुना असें म्हणतां येतें कीं, शिवमंदिराखेरीज कोणतीहि वसति परिपूर्ण ठरत नाहीं.

शिव स्मशानस्थ खरा, त्याची भस्मचर्चित काया किंवा रुंडमाला अथवा नागभूषा यांचा कितीहि तिरस्कार वाटला तरी शंकराचें शिवमय स्वरूप कधींहि कमी झालेलें नाहीं. अथवा त्याला कोणी अमंगल मानलेलें नाहीं.

**अमंगल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलम् ।**
**तथापि स्मर्तॄणां वरद परमं मंगलमसि ॥**

उलट विघ्नहर्त्या गजाननाचे तीर्थरूप, ते सवाई मंगलकारक आहेत, अशाच भावनेनें भाविक जनता शंकराकडे पहात आली आहे. म्हणून शंकराची लोकप्रियता इतकी वाढलेली दिसते.

दशावतारामुळें विष्णूचीं मंदिरें अनेक व्हावीं किंवा त्यांचीं विविध शिल्पें आढळावीं यांत कांहीं नवल नाहीं. परंतु शंकराच्या विविध मूर्ति आणि त्यांचा एकंदर व्याप पहातां, त्याच्या लोकप्रियतेची खात्री पटते. दशावतारी विष्णूचे दहा जन्म झाले असें म्हणतां येतें. तसें शंकराचे मुळींच नाहींत. म्हणून एकावतारी शंकराची लोकप्रियता विविध रूपें आणि त्यांचें चिरंतनत्व आणि जागतिक पसारा यांचें वैशिष्ट्य निराळें आहे.

ग्रं. क्र. १०७९३

# व्यापक स्वरूप

शंकराची पूजा निरनिराळ्या मूर्तींची करितात. त्यांना निर-निराळीं नांवें आहेत. लिंगस्वरूप एकच असलें तरी तें अनेक कथांशीं निगडित झाल्यामुळें वेगवेगळ्या स्वरूपांत पूजनीय ठरतें. या लिंगपूजेचा थोडासा इतिहास पहाणें आवश्यक आहे. शिवमाहात्म्य यथार्थतेनें कळ-ण्यास तिचा उपयोग होईल. शिवाय लिंग बनविण्याचे प्रकार, त्यांच्या स्थापनेविषयींचा शास्त्रार्थ आणि एकंदर शिवमूर्तिविज्ञानशास्त्र यांचा दाक्षिणात्य व औत्तरीय विस्तार, यांचाहि थोडक्यांत परामर्ष घेणें इष्ट आहे.

रुद्रदेवता वैदिक असून तिच्यासारखी दुसरी पशुपतिसम सिंधू-संस्कृतींत प्रचलित असावी असा तर्क आहे. वैदिक रुद्र हा विविध स्वरूपी किंवा विविध देवतांशीं संलग्न असा असावा. अथवा सर्वांतहि सामा-वलेला पण वेगळें व्यक्तित्व असलेला असाहि असावा. रुद्राचें सर्वव्यापी स्वरूप यजुर्वेदांतर्गत रुद्राध्यायावरून कळतें. इतक्या व्यापक स्वरूपाची देवता जगाच्या कुठल्याहि धार्मिक वाङ्मयांत नसावी. कारण रुद्राला '**स्तेनानां पतये नमः तस्कराणां पतये नमः ।**' ( भक्तांच्या अखिल विषयजातांचें हरण करणारा तो स्तेनानां पति ) असें म्हटलें आहे. रुद्राध्यायांतील शंकराचीं इतर विशेषणें पाहिलीं म्हणजे 'स्थिरचर व्यापुनी तो परमात्मा दशांगुळें उरला' या वचनाची आठवण होते.

रुद्राध्यायांतील दुसरा भाग जो आहे,ज्याला '**चमक**' म्हणतात, त्यावरूनहि शंकराच्या व्यापकतेची कल्पना येते. आजच्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतहि जी मागणी अत्यंत अनुरूप ठरावी अशी इच्छा त्यांत व्यक्त केली आहे.

त्यावरून एवढेंच दिसतें कीं, शंकर नुसतेच लोकप्रिय नव्हते तर लोक कल्याणकारी, इष्टवस्तुप्रदाते, कल्पतरुसारखेहि होते. शिवाय, शिव-तराय, मयस्कराय इतक्या व्यापक स्वरूपाच्या शंकराला उमापति शंकराचें संकुचित स्वरूप कां व कसें प्राप्त झालें ? हा संशोधनाचा भाग होईल. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, शंकर स्मशानस्थ असो, रुंडमालाधर असो, पन्नगभूषित असो, नीलकंठ असो किंवा आणखीहि कांहीं असो, त्याच्याइतका शक्तिमुक्तिप्रद, कल्याणकारी आणि सर्वांगीण हितकर्ता

दुसरा देव नाहीं, अशी अनेक शतकें बहुजनसमाजाची भावना होती, तीच टिकून आहे. शंकराचा राग म्हणून म्हटलें, तिसऱ्या डोळ्याची भीति घातली, दशमुख रावणाला अंगुष्ठमात्रेंकरून दडपल्याची कथा ऐकिली, अंधकासुर, त्रिपुरासुर किंवा गजासुर यांच्या वधाची कहाणी ऐकिली, तरी शंकराच्या कृपाळूपणाची, त्यांच्या वत्सलतेची आणि भक्तकामकल्पद्रुम या पदवीची महति कमी झाली नाहीं, हें शंकराचें वैभव अद्वितीय होय.

महाराष्ट्रांत विशेषत: नर्मदा आणि कृष्णा यांच्या दुआबांत तसेंच औत्तरीय प्रदेशांतहि शिवमंदिर हें लिंगस्वरूप असतें. त्या लिंगांत **स्थललिंग, जललिंग, वायुलिंग, ज्योतिर्लिंग** असे प्रकार आहेत. पण मुख्यत: **चललिंग** आणि **अचललिंग** हे त्याचे खरे भेद आहेत. चललिंगाचे **मृण्मय, लोहज, रत्नज, दारुज, शैलज** आणि **क्षणिक** असे प्रकार वर्णिले आहेत. लोहज लिंगांत अष्टधातु किंवा पंचधातु मिसळलेले असतात. रत्नज लिंगांत मोती, वैडूर्य, पुष्पराग, पाचू किंवा नीलमणी, सूर्यकांत, चंद्रकांत, स्फटिक अशांचा उपयोग होतो. शिवाय हैम, राजत, आरकूट, कांस्य, प्रवाल यांचींहि लिंगें असतात. दारुज लिंगासाठीं शमी, मधुक, कर्णिकार, मंडुक, तिंडुक, अर्जुन, पिप्पल किंवा उदुंबर वृक्षाचें लाकूड वापरतात. खदीर, चंदन, शाल किंवा बिल्व, बहर, देवदारु अशांचाहि कित्येक ठिकाणीं दारुज लिंगासाठीं उपयोग वर्णिला आहे. चललिंगापैकीं शैलज म्हणून जो प्रकार आहे तो म्हणजे वीरशैवांचा-गळ्यांत किंवा दंडावर बांधण्यासाठीं.

पार्थिव पूजेचें व्रत घेतलेल्या भक्तांना रोजच्या रोज लिंगें करून त्यांचें विसर्जन करावें लागतें. वाळू, तांदूळ माती, लोणी, चंदन, गूळ, पुष्प, गोधूम, गंध, शर्करा, गोमय, गव्यघृत, लवण अशा अनेक पदार्थांचीं ही क्षणिक लिंगें करितात.

भिन्न भिन्न कामनामुळें शिवलिंगाचें विधान पृथक् पृथक् असतें. यव, गोधूम, सीताखंड, लवण, हरिताळ, त्रिकुट यांचीं लिंगें ऐश्वर्य पुत्रादि कामप्रद होत. गव्य, घृत, लोणी यांचें लिंग वृद्धिवर्धक होय.

**पार्थिव लिंग** सर्वकामप्रद होय. धार्मिक समजूत अशी कीं, सुवर्ण लिंग-पूजा करणारास धन मिळतें, तांदळाचें लिंग करून पूजा करणाऱ्यास विभव लाभतें, नदी किनाऱ्याच्या **मृत्तिका लिंगा**मुळें घरदारादि वैभव मिळतें, **गोमय लिंगा**मुळें रोग हरण होतें. **नवनीत लिंगा**मुळें आनंदी स्वभाव वाढतो. आणि **चंदन लिंगा**मुळें सौभाग्य लाभतें. **पुष्प लिंगा**मुळें आयुर्मान वाढतें. आणि **गूळ लिंगा**मुळें इच्छित कामना तृप्त होतात अशी भाविकांची समजूत आहे.

पार्थिव पूजेसाठीं ब्राह्मणादि वर्णाच्या अनुक्रमानें शुक्ल, पीत, रक्त, कृष्णवर्ण अशा मृत्तिकेचें लिंग तयार केलें पाहिजे. एक तोळाभार मातीचें अंगुष्ठपर्व परिमाणाचें लिंग करावें लागतें.

**अचल** किंवा **स्थावर लिंगें** आहेत, त्यांचे नऊ प्रकार कल्पिले आहेत. ते स्वयंभु, पूर्वदैवत, गाणपत्य, असुर, सुर, आर्ष, राक्षस, मानुष आणि बाण लिंग. या नऊपैकीं पहिला प्रकार हा उत्तमोत्तम समजतात.

बारा ज्योतिर्लिंगें आपणांकडे प्रसिद्ध आहेत. ह्या ज्योतिर्लिंगा-संबंधीं अनेक विद्वानांनीं वेगवेगळ्या उपपत्त्या सुचविल्या आहेत.

ज्योतींची लिंग म्हणून पूजा करण्याची प्रथा पडली याचें कारण अग्नि आणि रुद्र यांचें सारूप्य आहे कीं काय ? आणि भूगर्भांतून वर येणारी ही ज्योत पूर्वकालीन ज्वालामुखींची खूण आहे कीं काय ? ज्योतींची पूजा करण्याची चाल अद्यापहि हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थान-बाहेर हिंदूंची म्हणून रूढ आहे. कांगडा पहाडींत धरमसाल्यापासून ३२ मैलांवर ज्वालामुखी येथें डोंगरांतून नैसर्गिक ज्योत बाहेर येते, तिचें धार्मिक स्वरूप विशेष मानतात. काबूलची नगरदेवता **आसमायी** म्हणून आहे. त्या देवळांत अजूनहि नुसता नंदादीप तेवत ठेवितात. रशियांतील बाकू येथील तेलखाणीच्या आसपास भूगर्भांतून ज्योति येत आहेत, त्यास हिंदूंचीं **अग्निदेवळें** अशीं नांवें त्या लोकांनीं अनेक वर्षे दिलेलीं आहेत. अशीच **ज्योतिर्लिंगें** इतरत्र होतीं काय ? हा प्रश्न आहे. कित्येक शास्त्रज्ञांच्या मतें महाराष्ट्रांतील विशेषतः सह्यपर्वतांतील आणि


हिमालयाच्या ठिकाणीं सुद्धां अशीच ज्योति निघत असावी. कोल्हापूर जवळ **ज्योतिबाचा** डोंगर, ज्योतीचा असावा.

**जललिंगें** म्हणजे भूगर्भांतून वहाणारें पाणी. पण हा काय प्रकार आहे ? म्हणजे त्या ठिकाणीं शाळुंका कोणती ? आणि लिंग कोणतें ? हें कांहीं समजत नाहीं. परंतु त्या स्थानास लिंगाचें महत्त्व परंपरागत प्राप्त झालें असल्यानें तेथें पूजा अर्चा होते आणि यात्रा भरत असतात. अशीं **जललिंगें** आमच्या पहाण्यांत आहेत तीं (१) श्रीरंगम् किंवा त्रिचनापल्ली शेजारीं **जंबुकेश्वर**; (२) **भुवनेश्वर** या ठिकाणींहि सध्यां जललिंगच दाखवितात. काश्मिरांतील **अमरनाथ** हें बर्फाचें लिंग असल्या-कारणानें याला स्वयंभु म्हटलेलें अधिक सोईचें होईल.

आपोआप उद्भवलेलीं किंवा अनादिकालापासून चालत आलेलीं **लिंगें** तीं **स्वयंभु** समजतात. या स्वयंभु लिंगांचें वैशिष्टय असें कीं त्यांचा जीर्णोद्धार कधींहि होत नाहीं. तुरुष्कांनीं भ्रष्ट केलेल्या लिंगांचा देखील जीर्णोद्धार करूं नये, असा उल्लेख एका आगम ग्रंथांत आहे. त्यामुळें त्या स्थानाचें महत्त्व तेथें लिंग असो नसो, चिरंतन असतें. असलीं स्वयंभु लिंगें चौसष्ट आहेत. आणि त्यांची यादी निगमाज्ञानदेव यानें आपल्या जीर्णोद्धार दशकांत दिली आहे. यांतील कांहीं गांवें मात्र ओळखींचीं वाटत नाहींत.


१ वाराणसी (महादेव), २ प्रयाग (महेश्वर), ३ नैमिष (देवदेवेश), ४ गया (प्रपितामह), ५ कुरुक्षेत्र (स्थाणु), ६ प्रभास (शशिभूषण), ७ पुष्कर (अजोगंध), ८ विमलेश्वर (विश्व.), ९ अट्टहास (महानाद), १० महेंद्र (महाव्रत), ११ उज्जयिनी (महाकाल), १२ महाकोट (महोत्कट), १३ शंकूकर्ण (महातेजस्), १४ गोकर्ण (महाबल), १५ रुद्रकोटि (महायोगी), १६ महालिंग स्थळ (ईश्वर), १७ विश्व-मध्य (माहेश्वर), १८ केदार (ईशान), १९ हिमालय (रुद्ररुद्र), २० स्वर्णाक्ष (सहस्त्राक्ष), २१ विश्वेश (वृषभध्वज), २२ भद्रवट (भद्र), २३ भैरव (भैरव), २४ कनखळ (रुद्र), २५ भद्रकर्ण (सदा-शिव) २६ देवदारुवन (दंडि), २७ कुरुजांगल (चंडेश), २८ त्रिसंधि

श्री अमरनाथ (काश्मीर)



हिमलिंग

श्री सोमनाथ मंदिर



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

(ऊर्ध्वरेतस्), २९ जांगल (कपर्दी), ३० एकग्राम (कृत्तिवासा), ३१ मृतकेश्वर (सूक्ष्म), ३२ कालंजर (नीलकंठ), ३३ विमलेश्वर (श्रीकंठ) ३४ सिद्धेश्वर (ध्वनि), ३५ मृतकेश्वर (गायत्री), ३६ काश्मीर (विजय), ३७ मकुटेश्वर (जयंत), ३८ कृतेश्वर (भस्मकाय) ३९ कैलासाचर (किरात), ४० वृषस्थान (यर्मालिंग), ४१ करवीर (कृतलिंग), ४२ त्रिसंधि (त्र्यंबक), ४३ विरजा (त्रिलोचन), ४४ दीप्त (महेश्वर), ४५ नेपाळ (पशुपति), ४६ कारोहण (लकुलि), ४७ अंबिका (उमापति), ४८ गंगासागर (अमर), ४९ हरिश्चंद्र (हर), ५० महेश्वर (ओंकार), ५१ कुरुचंद्र (शंकर), ५२ वामेश्वर (जटिल), ५३ मकुटेश्वर (सौश्रुति), ५४ सप्तगोदावर (भीम), ५५ नगरेश्वर (स्वयंभु), ५६ जलेश्वर (त्रिशूलि), ५७ कैलास (त्रिपुरांतक), ५८ कर्णिकार (गजाध्यक्ष), ५९ कैलास (गणाधिप), ६० हेमकूट (विरूपाक्ष), ६१ गंधमादन (भूर्भुव), ६२ हिमस्थान (गंगाधर), ६३ वाडवामुख (अनल,) ६४ विंध्य पर्वत (वराह,) ६५ कोटितीर्थ (उग्र), ६६ इष्टिकापूर (वरिष्ट), ६७ पाताळ (हाटकेश्वर), ६८ लिंगेश्वर (वरद), ६९ गजप्रिय (जर्लालिंग)

गाणप लिंगें आहेत, तीं गणांनीं बसविलेलीं असून त्यांचा आकार काकडी, महाळुंग, कवठ किंवा नारळ, ताड अशा फळासारखा असतो. ऋषींनीं पूजेसाठीं बसविलेलीं आर्ष लिंगें तीं गोल असतात. आणि वर निमुळतीं होत जातात.

बहुतेक अचलर्लिगें हीं मानुषलिंगापैकींच होत. आणि तीं शास्त्रीय पद्धतीनें बनविलेलीं असतात. त्यांचे दहा प्रकार आहेत. त्यांच्या देवळाचा दरवाजा किंवा त्याची लांबी, रुंदी आणि उंची ही एकच असतात. मानुषलिंगांत एकंदर तीन भाग असतात. ब्रह्मभाग, विष्णुभाग आणि रुद्रभाग. रुद्रभागाला पूजाभागहि म्हणतात. नेहमीं वर दिसतो तो रुद्रभाग, मधला अष्टकोणी असतो तो विष्णुभाग आणि तळचा चौकोनी असतो तो ब्रह्मभाग. या तिन्ही भागांचें परस्पर प्रमाण जसें असेल त्यामानानें त्या लिंगाचा वर्ग ठरवितात. उदाहरणार्थ—सर्व सम-लिंग किंवा सर्वतोभद्र याचा अर्थ असा कीं रुद्रभाग, विष्णुभाग, आणि ब्रह्मभाग हे एकाच लांबीचे आहेत. वर्धमान लिंगांत हें प्रमाण (१) चार,

पांच, सहा; (२) पांच, सहा, सात किंवा असेंच चढतें–वाढतें असतें. यापैकीं चार, पांच, सहा हें जें प्रमाण आहे हें ब्राह्मणांसाठीं आणि बाकींचीं तीन इतर वर्णांसाठीं आहेत. शैवाधिक लिंगाचें प्रमाण ७-७-८; ५-५-६; किंवा ४-४-५ असें असतें. यांतील पहिला प्रकार ब्राह्मणांसाठीं आणि बाकीचे इतर वर्णीयांसाठीं.

ब्रह्मभाग २, विष्णुभाग ३, रुद्रभाग ४ या प्रमाणांत असतें त्याला अनाढ्य लिंग म्हणतात. त्रैराशिक लिंगाला त्रैभा असें म्हणतात. याच्या लांबीचें प्रमाण वेगळेंच असतें. लिंगाची उंची नऊ समभागांत विभागून ब्रह्मभागाचा घेर आठ हिस्से, विष्णुभागाचा सात व रुद्र-भागाचा सहा हिस्से असावा. लांबी, रुंदी, घेर इत्यादि मापांबद्दल निरनिराळीं मतें व्यक्त झालीं असल्या कारणानें आणि या सूक्ष्म भेदा-वरून त्यांत फरक पडत असल्यामुळें त्यांचा विचार लांबवावा तितका लांबवितां येईल. इतर लिंगांचे भेद–नगरलिंग, आढ्यलिंग, द्रविडलिंग, जयदलिंग, पौष्टिकलिंग.

याखेरीज लिंगांचा रुद्रभाग जो वर दिसतो ( कारण बाकीचे पिंडींत लुप्त होत असल्यानें ) त्यावर मानुषमुख काढण्याचा एक प्रकार आहे. यास मुखलिंग म्हणतात. हीं मुखें एक, दोन, तीन अगर चार असतात. पंचमुख लिंगास सदाशिव असें नांव आहे.

या मुखलिंगांत चार मुखें कोणाचीं असावीं, तीन मुखांना नांवें काय असावीं इत्यादि प्रकारांवरून पोटभेद उद्भवतात. जावामध्यें सांपडलेल्या एका मुखलिंगास ब्रह्मा, विष्णु, रुद्र, सूर्य अशीं चार मुखें आहेत. * सारांश काय, लिंगभेद हे आकृतीवरून, त्यांच्या प्रमाणावरून आणि रचनापद्धतीवरून भिन्न भिन्न कल्पिलेले आहेत. त्यांच्या रचनेचें एक वेगळें शास्त्रच दिसतें. आणि त्यांत सर्व बाबींबद्दल पूर्वीं विचार झालेला दिसतो.

लिंगोद्भव म्हणूनहि लिंगाचा एक प्रकार आहे. त्यांत लिंगाच्या एका बाजूस मूर्ति कोरतात. कल्पना अशी कीं लिंगाचा उभा छेद घेत-ल्यास त्यांतून ती दिसावी. यास लिंगोद्भवमूर्ति म्हणतात. त्या मूर्तीवरून लिंगोद्भव मूर्तीचेही अनेक प्रकार संभवतात. सर्वांत जुनी लिंगोद्भवमूर्ति

* ( ग. ह. खरेकृत मूर्तिविज्ञान पृ. ९१ )

२२८४८ २४६ ५-त्र ११ २५/१०

उपलब्ध आहे ती रेनीगुंटा स्टेशनपासून सहा मैलांवर असलेल्या गुडी-मल्लम देवळांतील होय. फार प्राचीन काळापासून तिला परशुरामेश्वर असें म्हणतात. यांतील मूर्ति फार सुंदर असून तिचे अलंकार प्रेक्षणीय आहेत. तिच्या हातांतील कलश आणि मेष स्पष्ट दिसतात, आणि परशु डाव्या खांद्यावर टांगलेला असावा असें वाटतें. ही शिवमूर्ति अपस्मार पुरुषाच्या खांद्यावर उभी आहेसें वाटतें. अलंकार, आभरणें आणि मूर्तिविज्ञान या दृष्टीनीं या मूर्तीचा अधिक अभ्यास होत आहे. लिंग बसविण्यासाठीं शाळुंकेच्या ( पिंडिकेच्या ) मध्यभागीं लिंगाचा विष्णुभाग आणि ब्रह्मभाग नीट भक्कम बसावा म्हणून योजना असते. लिंगाचा मध्यभाग, विष्णुभाग, पिंडिकेच्या वरच्या भागांत नीट बसावा, आणि ब्रह्मभाग पिंडीच्या खालच्या भागांत नीट बसावा म्हणून व्यवस्था असते. पिंडिकेच्या खालच्या भागाचा मध्य चतुष्कोनी (लिंगाच्या ब्रह्मभागाशीं जुळता) आणि वरच्या भागाचा मध्य अष्टकोनी लिंगाच्या विष्णुभागाशीं जुळता असा असतो, यामुळें लिंग भक्कम बसतें. तें हालत नाहीं. पिंडीशीं सल्लग्न झाल्याप्रमाणें रहातें. पिंडीचे दोन भाग आणि लिंग अगदीं एकजीव झाल्याप्रमाणें अचल रहातात.

लिंग रचनेचें तंत्र असें कीं, शाळुंकेचें दोन भाग असावयाचे. खालचा ब्रह्मभाग हा चौकोनी, विष्णुभाग अष्टकोनी, असा त्या शाळुंकेंत बसल्यावर तो हलण्याची शक्यता नाहीं. आडवी किंवा उभी हालचाल त्या लिंगाची होणें दुरापास्त होते. या लिंगरचनेचा विचार इतका सविस्तर केला, कारण मूर्तिभंजकांना हें लिंगभंजन सोपें झालें नाहीं. इतकें प्रचंड आणि मजबूत, पीठांत बसविलेलें लिंग सहसा हालत नाहीं, आणि तोडतां पण येत नाहीं.

पीठाच्या आकारावरूनहि लिंगाचे भेद पडतात. भद्रपीठ, वज्रपीठ, श्रीकरपीठ, आणि पीठपद्म असें मुख्य भेद असले तरी महांबुज, सौम्यक, चक्र इत्यादि पीठें कशीं करावीं, त्यांचें प्रमाण काय असावें, इत्यादि वर्णन निरनिराळ्या आगम ग्रंथांत दिलेलें आहे. पीठाचा वरील पूजाभाग असतो, त्याचें प्रमाण काय असावें, नालीचें प्रमाण काय असावें, इत्यादि निर्बंध आगम ग्रंथांत आहेत. आणि त्यांनुसार मूर्तिकार आपलें कार्य करीत असतात.

सहस्रलिंग आणि धारालिंग म्हणूनहि लिंगाचे प्रकार आहेत. लिंग नुसते गरगरीत गोल न ठेवितां त्यावर सत्तावीस अगर अठ्ठावीस सारख्या धारा दिसतील अशी रचना केल्यास तें धारालिंग, आणि या धारालिंगांना सारखीं वलयें पाडून प्रत्येक धारेचीं अनेक लिंगें दिसतील अशी कारागिरी केल्यास, त्या लिंगांच्या संख्येनुसार त्यास अष्टोत्तर शतलिंग किंवा सहस्रलिंग असें म्हणतात.

## श्री शंकराच्या विविध मूर्ति

१ अघोरमूर्ति— ही मूर्ति चतुर्मुख आणि अष्टभुजा असते. कुठार, वेद, पाश, अंकुश, डमरु, माला, त्रिशूळ, कपाल इतक्या वस्तु धारण केलेल्या आहेत. या मूर्तीचे दांत भयंकर दिसतात. १२ व ३२ भुजांची ही अघोर मूर्ति असते.

२ अर्धनारी नटेश्वर— या मूर्तीची डावी बाजू पार्वतीची, उजवी बाजू शिवाची असते. क्वचित् हा क्रम बदललेलाहि असतो. मूर्ति उभी किंवा बसलेली असते. बहुधा दोन हात असतात. शंकराच्या बहुतेक मूर्तींत कर्णभूषणें दोन प्रकारचीं आढळतात. एका कानांत पुरुषी व दुसऱ्यांत बायकी असतात. नटराज मूर्तींत हें विशेषेकरून दिसतें.

३ उमासहित (सोमास्कंद)— ही मूर्ति सुखासन अशी आहे. या मूर्तींत बैठ्या किंवा उभ्या शंकराजवळ उमा ही असते. स्कंद बरोबर असल्यास ‘ सोमास्कंद ’ मूर्ति होते. सुखासन मूर्तींत उमेस शंकरांनीं जवळ घेतलेलें दिसतें.

४ कल्याणसुंदर (वैवाहिक)— ही कल्पना मोठी रम्य आहे. शंकरपार्वतीचा विवाह होण्याच्या वेळची ही मूर्ति असून त्या दोघांखेरीज विष्णु, लक्ष्मी, इतर देव व गण हजर असतात. निदान विष्णु किंवा क्वचित् प्रसंगीं हिमालय पिता ‘ कन्यादान ’ करण्याच्या आविर्भावानें उभा असतो. शिवपार्वतीचें सलज्ज वदन, त्यांची उभी रहाण्याची रीत, विष्णूची पाठीराखी वृत्ति—यामुळें हें चित्र (शिल्प) फारच बहारीचें वाटतें. मदुरा मीनाक्षी मंदिरांत या प्रसंगाचें रंगित (तैल) चित्रहि लावलेलें आहे. द्राविडी भाषांत कल्याण म्हणजे विवाह. त्यावेळचें सुंदर स्वरूप दर्शविणारी मूर्ति ती कल्याणसुंदर. यांत शंकराच्या रुद्रावताराची छटाहि दिसत नाहीं.

५ कामारि– ही कामदहनापूर्वीची मूर्ति आहे. ही मूर्ति चतुर्भुजधारी आहे. अभयमुद्रा, वरदमुद्रा, हरिण, डमरु असें स्वरूप असून ती कमलासनस्थ उग्र स्वरूपी अशी आहे.

६ किरातार्जुनीय मूर्ति– अर्जुनाला पाशुपतास्त्र देण्याच्या प्रसंगाची ही मूर्ति असून पार्वती व गण यांसह आहे.

७ कंकाळमूर्ति– सुंदर स्त्रियांसमवेत ही मूर्ति असून चतुर्भुजा, मोरपिसें, कंकाल, डमरु असें हिचें स्वरूप आहे. ( पहा-भिक्षाटन मूर्ति. )

८ गजहामूर्ति– गजासुराला मारणारा शिव असें याचें स्वरूप असून चार अथवा आठ हात असतात. हत्तीचे चारी पाय शिल्पाच्या भोंवतीं दिसतात. शिल्प हत्तीच्या पोटांत कोरल्याप्रमाणें वाटतें.

९ गंगाधर– गंगावतरणाचें रविवर्म्याचें चित्र आहे. त्यांतील कथेप्रमाणें तें आहे. भगीरथ हात जोडून उभा आहे. शंकरांनीं आपल्या मस्तकावर गंगेचा प्रवाह उतरविला आहे. आणि भक्ताची मनकामना पुरी करण्याचा डौल आहे. क्वचित् गंगा स्त्रीरूपानें उभी असते.

१० चंडेशानुग्रह– चंडेश्वर– ही मूर्ति उमासहित खरी, पण शिवचरणाजवळ ‘ चंडेश ’ बसविलेला दाखवितात. या मूर्तीला दोन, क्वचित् चार हात असतात.

११ चंद्रशेखर– चंद्राला (चंद्रकलेला) महत्त्व असलेली ही मूर्ति. पार्वती बरोबर असल्यास उमासहित चंद्रशेखर मूर्ति असते.

१२ त्रिपुरारि– त्रिपुरांतक– त्रिपुरासुराचा वध करणारा शिव हें शिल्प एकटद्या शिवाचें किंवा रथारूढहि असतें. या युद्धांत ‘ ब्रह्मा महेश्वराचा सारथी ’ झाला होता. ती कथा या मूर्तीचे ठिकाणीं दाखवितात. महिम्नस्तोत्रांत यासंबंधीं वर्णन आहे–

रथः क्षोणी यंता शतधृतिरगेंद्रो धनुरथो।
रथांगे चंद्रार्कौ रथचरणपाणिः शर इति।
दिधक्षोस्ते कोऽयं त्रिपुरतृणमाडंबरविधिः।
विधेयैः क्रीडन्त्यो न खलु परतंत्राः प्रभुधियः॥

१३ त्रिमूर्ति– ब्रह्मा, विष्णु, महेश ही त्रिमूर्ति आहे असें समजतात. पण तिन्ही मूर्ति शंकराच्याच शांत, संहारक व वामदेव

अशा स्वरूपाच्या दाखवितात. एकपाद म्हणून, त्रिमूर्ति म्हणून जें शिल्प आढळतें, त्यांत एका पायावर एकाच शरीरांतून निघालेलीं तीन शिरें उभीं दाखवितात. घारापुरी लेण्यांत ‘ त्रिमूर्तीचें ’ नुसतें ‘ धड ’ आहे. वक्षस्थलाखालचा भाग त्यांत नाहीं.

१४ दक्षिणामूर्ति–धर्मव्याख्यानमूर्ति– शंकराच्या लीलामूर्ति पंचवीस असल्या तरी ही अधिक महत्त्वाची मूर्ति आहे. चोलकालीन शिवमंदिरांतल्या दक्षिणेकडील भिंतीवर हिची स्थापना असे. दक्षानें अवमानिलेला शिव संतापून, वैतागून अरण्यांत निघून गेला व तपश्चर्या करूं लागला. त्यानंतर त्याच्या भोंवतीं ऋषींचा समुदाय जमला व त्यांच्या समाधानासाठीं त्यानें ‘धर्मव्याख्यान’ दिलें ती ही मूर्ति. म्हणून उजवा पाय खालीं सोडून डावा उजव्या मांडीवर टेकलेला, बसलेली चार हाताची असते. नारद, जमदग्नि, वशिष्ठ भृगु त्याच्या पायाजवळ उजवीकडे, तर भारद्वाज, शौनक, अगस्त्य, भार्गव डावीकडे श्रवणोत्सुक बसलेले असतात. ‘अपस्मारा’ वर शिवाचा उजवा पाय टेकलेला असतो. उजव्या बाजूचे हातांपैकीं एक ज्ञानमुद्रेचा, दुसरा रुद्राक्षमालाधर; डाव्या हातांपैकीं एक वरद मुद्रेचा ( किंवा पोथी घेतलेला ) दुसरा अग्नि, डमरु किंवा हरिण यांपैकीं एक धरलेला असतो. वीणाधरमूर्ति, योगमूर्ति, योगदक्षिणामूर्ति, ज्ञानमूर्ति असे आणखी प्रकार दक्षिणामूर्तीचे आहेत.

१५ नटराज–सभापति– चिदंबरम् येथील सभामंडपांत देव-ऋषींच्या समुदायांत हा नृत्यसमारंभ झाला. म्हणून नटराजाला सभापति असेंहि म्हणतात. हा आनंद तांडवनृत्य प्रकार असून अनेक ऋषींना आपल्या सामर्थ्यानें चकित केल्याचें समाधानी स्मित शंकराच्या चर्येवर झळकत आहे. उजवा एक हात अभय मुद्रेचा, तर दुसरा डमरु घेतलेला. डावा हात उजवीकडे ‘ गजहस्त ’ मुद्रेचा तर दुसऱ्यांत ‘ अग्नि ’ असलेला. डावा पाय, क्वचित् उजवा पाय उचललेला आणि एक पाय अपस्माराला तुडवीत असलेला असा असतो. जटांचे ( ७-९-११ ) पेड प्रत्येक बाजूस पसरलेले , माथ्यावर चंद्र, गंगा; एका कानांत पुरुषी तर दुसऱ्यांत बायकी कुंडलें; नेहमींप्रमाणें नागाचा विळखा, उपवस्त्र वाऱ्यानें फडफडत असलेलें असतें, तर व्याघ्रपाद व पतंजलि जवळ उभे, असें शिल्प आहे.

तांडवाचे प्रकार आठ आहेत. १ आनंद २ संध्या ३ उमा ४ गौरी ५ कालिका ६ त्रिपुर ७ संहार ८ ऊर्ध्व.

कैलासावर तांडवनृत्य केलें तो प्रसंग वेरुळच्या लेण्यांत दाखविला आहे. मोरोपंतांनीं ' संशय रत्नमालेंत ' त्याचा निर्देश आणला आहे.

**अथवा येतां झाला तन्मय शिव-तांडवांत कैलासीं ।**
**केला असेल गरुडें गर्व पुनः काय त्याच कैलासी ? ॥**

ऊर्ध्व तांडव नृत्यप्रकारांत एक अगर दुसरा पाय उचललेला असतो. उजवा किंवा डावा, डोक्यापर्यंत वर उचलणें हा ऊर्ध्व तांडवाचा मुख्य प्रकार आहे. पण एका हातावर सर्व शरीर तोलून दोन्ही पाय वर केलेलीहि नटराजाची मूर्ति आढळते. या प्रत्येक मूर्तीची–मूर्तीच्या प्रकाराची मनोरंजक कहाणी असते. त्यांनें ' शिवलीलामृत ' फार जाडजूड होईल.

१६ नीलकंठ-श्रीकंठ– हिला विषापहारमूर्ति असेंहि म्हणतात. सागर मंथनाचे वेळीं कालकूट विष निघालें, तें शंकरानें पिऊन टाकल्यामुळें तो नीलकंठ झाला. नेहमींच्या चतुर्भुजी मूर्तीच्या जवळ भयभीत उमा उभी असते. शंकराच्या उजव्या हातांत विषाचा पेला, असें स्वरूप आहे. याविषयीं मोरोपंतांची आर्याः–

**तत्काळाचे करुणार्णव देववतंसी कृतें दुकळ नळला ।**
**तें विश्वप्राणहर व्यसन विलोकूनि फार कळवळला ॥**
**जग जगदीश्वरि, वाचो, त्वदधर मधुसेंचि सेवितो विष मी ।**
**तो आत्मोत्तम, कामा ये जो धावोनि अवसरी विषमीं ॥**

१७ पाशुपत मूर्ति– किरातार्जुन मूर्तीचा हा एक भाग नव्हे. यांत अर्जुनाचा संबंध नसून पाशुपत पंथीयांच्या उग्र मूर्तीचा संबंध येतो. या मूर्तीला दहा भुजा असतात. ती पंचमुखी, त्रिनेत्री, त्रिशूलधारी असते. गळ्यांत सर्पाचें यज्ञोपवीत असून उग्र दांत बाहेर आलेले तोंड, त्यामुळें अधिक भीषण. क्वचित् चार हातांचीहि मूर्ति असते.

१८ भिक्षाटनमूर्ति- ब्रह्मदेवाच्या पांच मुखापैकीं एक तोडल्यामुळें शंकराला ब्रह्महत्येचें पातक भोंवलें. तन्निवारणार्थ ' दिगंबर ' होऊन शिव भिक्षा मागत हिंडू लागले. तेव्हांची ही मूर्ति अशी कथा आहे.

पण दुसरी रूढ आहे ती अशी:-- दारुकवनांतील ऋषि पत्न्यांची परीक्षा पहाण्यासाठीं शिवानें सुंदर स्वरूप धारण केलें. आणि कौपीनधारी'युवा' भिक्षा मागण्यासाठीं ( साध्वींना भुलविण्यासाठीं ) हिंडूं लागला. त्याला ऋषिपत्न्या भाळल्या कीं नाहीं तें कळत नाहीं पण विष्णूनें रूप घेतलेली मोहिनी मात्र भाळली ! तिजपासून झालेला हरिहरपुत्र, अर्धवस्त्रा मोहिनी, अशा दोन शिल्पासह ही भिक्षाटन मूर्ति आढळते.

१९ भैरव-- या भयंकर मूर्तीचे अनेक प्रकार असले तरी पूजनीय असें आठच आहेत. १ पंचमुखी भैरव २ गोविंद भैरव ३ संहार भैरव असेहि आणखी प्रकार आढळतात. कालभैरव हा अधिक लोकप्रिय. लठ्ठ पोटाचा, उग्र नाकातोंडांचा, नररुंड माला धारण करणारा, सर्प भूषणें ल्यालेला हा भैरव पाहून भयचकित झालेली पार्वती जवळ उभी असते. चार, आठ, दहा, बारा हात त्याला असतात, खड्ग, त्रिशूळ, डमरु, कपाल, रक्त गळत असलेलें नररुंड, असें रौद्र स्वरूप त्याचें असतें. नररुंडापासून गळत असलेलें रक्त चाटणारीं कुत्रीं ही क्वचित् शिल्पांत दाखवितात.

२० लिंगोद्भव-- ब्रह्मा, विष्णू यामध्यें स्पर्धा चालू होती. तिचा निर्णय लावण्याचें काम शंकराकडे आलें. " माझ्या लिंगाचा पत्ता लावील तो श्रेष्ठ. " असें शंकरांनीं सांगितलें. म्हणून ब्रह्मदेव हंसावर स्वार होऊन वर आकाशांत उडाला आणि विष्णू वराहरूपानें पृथ्वी खणूं लागला. तरी उभयतांना त्या लिंगाचा थांगपत्ता सांपडेना, ही कथा लिंगोद्भवांत दिसते. उभ्या पिंडींतून डोकावणाऱ्या कांहीं मूर्ति आढळतात, तर कांहीं ठिकाणीं लिंगाच्या बाहेर मूर्ति चिकटविल्यासारख्या दिसतात. एकमुखी चतुर्मुखी लिंगोद्भवमूर्ति असतात.

२१ वीरभद्र--उग्ररूपाची आणखी एक मूर्ति. दक्ष-यज्ञ-प्रसंगाशीं संबद्ध कथा आहे. तिला चार किंवा आठ हात असतात. क्रूर स्वरूप, नररुंडमाला, प्रखर शस्त्रें हातांत असलेली, असें उग्र स्वरूप असतें.

२२ वृषारूढ-- नंदीवर सहकुटुंब सहपरिवार बसलेले शिव. बैलाच्या तोंडाकडे तोंड न करितां बाजूस तोंड करून बसलेलें हें कुटुंब सुखी दिसतें. गोपुरावर हीं शिल्पें उजवी डावीकडे बैलाचीं तोंडें असलेलीं पुष्कळ आढळतात.

२३ शरभमूर्ति– नरसिंहाचें उग्र स्वरूप आटोपण्यासाठीं सवाई नरसिंह बनून त्याचा संहार करणारी ही विशेष उग्रमूर्ति दाखवितात. ती आठ पायांची, त्रिनेत्री, लांब-तीक्ष्ण नखांची, दोन हातांची, पण अग्नी-प्रमाणें झगझगणाऱ्या शरिराची असते. नरसिंहाला फाडून टाकणारी ही शिवमूर्ति दाखवितात.

२४ सदाशिव– ही मूर्ति दहा हात, पांच मुखें, पद्मासनस्थ, प्रत्येक मुखावर त्रिनेत्र अशी असते. (महासदाशिव मूर्तीला २५ मुखें ७५ डोळे असतात ! ! )

याशिवाय कालारि, रावणानुग्रह, सुखासन, हरिहर, महेशमूर्ति, तांडव, उमामहेश्वर, चतुर्मुखलिंग, पंचमुखलिंग, विरूपाक्ष, प्रदोषमूर्ति, किरातार्जुनमूर्ति, विघ्नेशानुग्रहमूर्ति, अष्टमूर्ति, कंकाळमूर्ति, शिवसादाख्य, अमूर्तसादाख्य, मूर्तसादाख्य, कर्तृसादाख्य, एकादशरुद्र इत्यादि शिवमूर्तींचे विविध प्रकार आहेत. साग्र माहिती देण्यांत विस्तारभय आहे.

अमरकोशांतील श्लोक––

शंभुरीशः पशुपतिः शिवः शूलीमहेश्वरः ।
ईश्वरः शर्व ईशानः शंकरश्चंद्रशेखरः ॥
भूतेशः खंडपरशुर्गिरीशो गिरीशोमृडः ।
मृत्युंजयः कृत्तिवासाः पिनाकी प्रमथाधिपः ॥
उग्रः कपर्दी श्रीकण्ठः शितिकंठः कपालभृत् ।
वामदेवो महादेवो विरूपाक्षस्त्रिलोचनः ॥
कृशानुरेताः सर्वज्ञो धूर्जटिर्नीललोहितः ।
हरः स्मरहरो भर्गस्त्र्यंबकस्त्रिपुरांतकः ॥
गंगाधरोऽधकरिपुः क्रतुध्वंसी वृषध्वजः ।
व्योमकेशो भवोभीमः स्थाणूरुद्र उमापतिः ॥

श्री. म. म. पंडित घुलेशास्त्री, नागपूर यांचा लेख संग्रह.

लेख—**महादेवाचें मूळ स्वरूप.**

आर्यांच्या धर्मग्रंथांत ज्या देवतांच्या अनेक चमत्कारिक कथा व चरित्रें आहेत. त्यापैकीं बहुतेक रूपकमय आहेत याविषयीं अनेक विद्वा-

नांचें एकमत आहे. हीं रूपकें उकलण्यासाठीं फार प्राचीन कालापासून ब्राह्मण, निरुक्त वगैरे प्राचीन ग्रंथावरून विद्वानांचे प्रयत्न चालू आहेत. कांहीं रूपकें इतकीं बेमालूम झालीं आहेत कीं, तीं मूळचीं रूपकें असतील अशी कोणाला कल्पना देखील येणार नाहीं. अशाच पैकीं महादेवासंबंधींचें रूपक होय. हें रूपक कशावर बसविलें आहे, हें जाणण्याचा अलिकडे पुष्कळ विद्वानांनीं प्रयत्न केला आहे. पाश्चात्य विद्वानांच्या मतें महादेवाची मूळ कल्पना अग्नीपासूनच निघालेली आहे.

इ. स. १८८४ सालीं लाहोर येथील पंडितानें 'आर्य' मासिकांत महादेव म्हणजे भारतांतला हिमालय पर्वत आहे, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. इ. स. १८८९ मध्यें कै. राजारामशास्त्री भागवत यांनीं हेमंत व्याख्यानमालेंत 'ब्राह्मण व ब्राह्मणीधर्म' याविषयावर व्याख्यान दिलें असतांना ते म्हणाले– 'बुद्धाच्या व जिनाच्यापूर्वीं जे ब्राह्मणधर्मी नव्हते, ते प्रायः शैव होते. शिव हें मूळचें सूर्याचें स्वरूप होय. जगताचें कल्याण करणारा म्हणून सूर्यास 'शिव' हें नांव मिळालें. योगी शिवास आद्यगुरु समजतात. शिवलिंग म्हणजे सूर्य व पिंडी म्हणजे आकाश होय. आकाशांत जसा सूर्य तसें पिंडींत लिंग ठेवण्याचा संप्रदाय पडला. यांत अश्लीलतेचा संबंध नाहीं. ज्ञान व ध्यान हीं ईश्वरप्राप्तीचीं साधनें मूळचीं शैवांचीं होत. 'याज्ञवल्क्य सूर्यास शरण गेले यांत सूर्य आणि शिव यांचा अभेद आहे.' वगैरे.

इ. स. १८९३ सालीं लो. टिळक यांनीं आपल्या 'ओरायन' पुस्तकांत लिहीलें आहे 'आकाशगंगेच्या अगदीं खालीं व्याध नांवाचा तारा आहे तोच रुद्र होय, असें समजलें म्हणजे रुद्राच्या जटेंत गंगा असणें, स्मशान प्रियता, किरातरूप वगैरे कथांची उपपत्ति लागते.'

त्यानंतर इ. स. १९०० सालीं सरदार माधवराव किबे यांनीं 'वेदविषयक चर्चा' या लेखांत महादेवाच्या स्वरूपाचा तर्क केला. ते म्हणतात 'शंकराची उपासना निसर्गापासून सुचली असावी. शंकराच्या व हिमालयाच्या स्वरूपांत फारच साम्य दिसतें. शंकर मस्तकीं गंगा तर हिमालयाच्या शिखरापासून गंगेचा उगम, शंकराची अर्धांगी पार्वती तर हिमालयाच्या पृष्ठभागावर पार्वती म्हणजे पर्वताची वनशोभा, शंकराच्या गळ्यांत सर्प, नररुंड माला तर हिमालयांत सर्प व इतस्ततः विखुरलेलीं

मानवांचीं मस्तकें. शंकर महादेव तर हिमालय महापर्वत ' याप्रमाणें दोघांत साम्य दाखविलें आहे.

बिझांटबाईनीं इ. स. १८९३ सालीं आपल्या श्रोत्यांना सांगितलें, सामान्य लोकांच्या दृष्टीला महादेव म्हणजे आकाश, नंदी म्हणजे जगत्, व नंदीचे चार पाय म्हणजे अग्नि, वायु, सूर्य व दिशा होत. जाणणाऱ्या कांहीं लोकांच्या दृष्टीला महादेव म्हणजे मन, नंदीचे चार पाय म्हणजे शरीराच्या ठिकाणीं असलेले वाचा, श्वास, दर्शन आणि श्रवण 'होय. परमार्थाचे वरचे अधिकारी असलेल्यांना महादेव म्हणजे ब्रम्ह, बैलाचे पाय म्हणजे जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति, तुरीया या अवस्था होत. ' वगैरे वाटतें. इ. स. १९०१ सालीं कलकत्ता येथील पंडित केदारनाथ विद्या विनोद यांनीं प्रो. मॅक्स् मुल्लर यांनीं दुर्गेसंबंधीं केलेल्या विधानाचें खंडनपर पुस्तक प्रसिद्ध केलें, त्यांत–' महादेव म्हणजे अग्नि व सूर्य असून दुर्गा ही यज्ञवेदी होय ' असें म्हटलें आहे. पंडित सातवळेकर यांनीं इ.स. १९०८ व १९०९ सालीं ' महादेवाची कल्पना ' या विषयावर विविध ज्ञान विस्तारांत लेख लिहून त्यांत–महादेवाचा संबंध उत्तर ध्रुवाकडील वर्फमय पर्वत व रात्र ह्यांच्याशींच असला पाहिजे असा सिद्धांत काढिला आहे. अशी अनेकांचीं अनेक आणखीहि मतें प्रसिद्ध झालेलीं आहेत.

(या ठिकाणीं लो. टिळकांच्या खेरीज श्री. सातवळेकर यांच्यापर्यंत साऱ्यांचीं मतें लेखकांनीं साधार व विस्तारानें खोडून काढलीं आहेत. तें विस्तारभयास्तव देतां येत नाहीं. )

पण वस्तुस्थिति अशी आहे कीं लिंगमूर्ति महादेव हा अग्नि आणि विग्रहमूर्ति महादेव म्हणजे मेरुपर्वत व शरद ऋतूंतील अंधःकारमय प्रदेश होय. यानें महादेवाच्या चरित्रांतील साऱ्या गोष्टींचा उलगडा होतो.

टीप–उत्तरध्रुव हाच मेरुपर्वत याविषयीं सर्व जुन्यानव्या संशोधकांचें एकमत आहे. तेथेंच देव राहतात. वगैरे.

लिंगमूर्ति शंकर हें अग्नीचें स्वरूप आहे. याच्या पुष्टीकरितां आणखी विस्तार करतां येईल. शंकरालाच रुद्र म्हणतात. वेदांत रुद्राला अग्नि म्हटलें आहे. ब्राह्मण, पुराण वगैरे ग्रंथांत रुद्राचें आणि अग्नीचें ऐक्य दाखवून, महादेव पार्वतीचें अग्नीस्वरूप वर्णन केलें आहे. शंकराचीं सारीं नांवें अग्नीची आहेत. त्र्यंबक हें नांव अग्नीचें आहे. (तै. संहिता)

शर्व, भव, पशुपति, रुद्र ही अग्नीचींच नांवें आहेत. (शतपथ ब्राह्मण) यावरून महादेवाचें पौराणिक स्वरूप, वेदांतील अग्नीच्या सूक्ष्म स्वरूपाचा विस्तार होय हें समजेल. म्हणजे वेदकालीन अग्नि तोच हल्लींचा महादेव ही गोष्ट अनेक ग्रंथांतून अनेक वचनांनीं सिद्ध झालेली आहे. महाभारतांत रुद्र हें अग्नीचें नांव आहे. अग्नीच्याच घोर मूर्तीला रुद्र म्हटलें आहे. यजुर्वेदांतील रुद्राध्याय 'नमस्ते रुद्र मन्यवे' इत्यादि अग्नीच्याच स्तुतिपर आहे म्हणून अग्नि हा वस्तुतः रुद्रच आहे. मेरु पर्वत म्हणजेच उत्तर ध्रुवावर राहणारा रुद्र किंवा अग्नि म्हणजे सूर्य होय. सूर्य हा अग्नीचें मूर्त्यन्तर आहे असें वेदांत आहेच आणि सायनाचार्यहि तेंच म्हणतात.

"योऽसौ रुद्रो मण्डलस्थादित्यरूपः"

म्हणजे रुद्र हा सूर्य होय. यावरून रुद्र हा अग्नि किंवा सूर्य आहे हें सिद्ध झालें. उग्र, अशनि, भव, महादेव, ईशान, शर्व, पशुपति, रुद्र हीं आठ नांवें अग्नीचीं आहेत. महिम्नांत त्यांचा उल्लेख आहे.

भवः शर्वो रुद्रः पशुपतिरथोग्रः सहमहान् ।
तथा भीमेशानाविति यदभिधानाष्टकमिदम् ॥

हींच शंकराचीं नांवें आहेत.

तसेंच भूतेश, शिव, शंभु, पिनाकी, कृत्तिवासा, शूली, वामदेव, व्रात्य, त्र्यंबक, विश्वतोमुख, चतुर्मुख, त्रिमुख, त्रिमूर्धा, अहिर्बुध्न्य हीं सारीं नांवें अग्नि, सूर्य आणि शंकराचीं आहेत.

यावरून शंकर हें अग्नीचें स्वरूप होय, रुद्र हें उग्र स्वरूप व अग्नि हें शांत स्वरूप आहे, यावरून असें स्पष्ट होतें. शिवलिंग हें सूर्याचें लिंग म्हणजे सूचक आणि पिंडी म्हणजे आकाश होय, त्याचप्रमाणें शिवलिंग म्हणजे अग्नि आणि शाळुंका किंवा पिंडी म्हणजे यज्ञवेदी. तिलाच योनीहि म्हणतात. याचे अनेक उल्लेख वेदादि ग्रंथांत आहेत. यावरून (शिव) लिंग पूजा ही अनार्यांची नाहीं. तींत स्त्रीपुरुष योनीलिंगात्मक अश्लीलता नाहीं. आणि ही शिवपूजा म्हणजेच अग्निपूजा आर्यांची अनादि काळापासून चाललेली आहे हें निश्चित. यावरून शिवलिंगपूजा किती व्यापक प्रमाणांत होती हें कळून येईल.

श्री. पंडित घुलेशास्त्री यांचा लेख जवळ जवळ दीडशें पानांचा आहे. पण त्या लेखांतून या ग्रंथांत आवश्यक तेवढा भाग मी आपल्या

शब्दांत मांडला आहे. मूळचा लेख वाचण्यासारखा असून सप्रमाण, साधार आहे. मी त्या लेखाची वरवर कल्पना माझ्या शब्दांत मांडली आहे.

## आगम ग्रंथांची यादी

दि हिस्ट्री ऑफ् इंडियन फिलासफी, खंड पांचवा

( सुरेंद्रनाथ दासगुप्ता. )

१ कामिक, २ योगज, ३ चिंत्य, ४ कारण, ५ दीप्त, ६ सूक्ष्म, ७ साहस्रक, ८ अंशुमान, ९ सुप्रभेद, १० विजय, ११ निश्वास, १२ स्वायंभुव, १३ अनिल, १४ वीर, १५ रौरव, १६ मकुट, १७ विमल, १८ चंद्रहास, १९ बिंब, २० उद्गीत (प्रोद्गीत), २१ लालित, २२ सिद्ध, २३ संतान, २४ नारसिंह, २५ परमेश्वर, २६ किरण, २७ वातुल, २८ अजित.

## शैव सिद्धांत शास्त्र, शैव ज्ञानबोध व शिव ज्ञानसिद्धि.

१ हिमसंहिता, २ चिंत्य विश्व, ३ शिवधर्मोत्तर पुराण, ४ पोष्कर ५ सिद्धतंत्र, ६ सर्वमतोपन्यास, ७ परा, ८ रत्नत्रय, ९ निवास, १० मृगेंद्र, ११ ज्ञानकारिका, १२ नादकारिका, १३ कालोत्तर, १४ विश्वसारोत्तर, १५ वायव्य, १६ मातंग, १७ शुद्ध, १८ सर्वज्ञानोत्तर, २९ सिद्धांत रहस्य, २० ज्ञानरत्नावलि, २१ मेरुतंत्र, २२ स्वच्छंद, २३ देविकालोत्तर,

असे शेंकडो ग्रंथ शिव तत्वज्ञानावर आहेत.

★ ★ ★

कला तिसरी

# प्र भा स ती र्थ

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैल्ये मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकाल मोंकारममलेश्वरम् ॥ १ ॥
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।
सेतुबंधेतु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमी तटे ।
हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये ॥ ३ ॥

बृहस्तोत्र रत्नाकर

**बारा ज्योतिर्लिंगें**– १ सोमनाथ – सौराष्ट्र. २ मल्लिकार्जुन-श्रीशैल पर्वत. ३ श्रीमहाकाल – उज्जयनी. ४ श्रीओंकारेश्वर अथवा ममलेश्वर किंवा अमरेश्वर–नर्मदा तटाकीं मांधाता पर्वत, मध्यप्रदेश. ५ श्रीवैजनाथ- परळी, मराठवाडा (वैद्यनाथ - संथाळपरगणा. ?) ६ श्री भीमाशंकर – सह्याद्रि, भीमातट पुणें जिल्हा. ७ श्रीरामेश्वर – सेतुबंध मद्रास. ८ श्रीऔंढचा नागनाथ-नागेश्वर– मराठवाडा (द्वारकेजवळ ?) ९ श्रीविश्वेश्वर – काशी, उत्तर प्रदेश. १० श्रीत्र्यंबकेश्वर – गोदावरी उगमाजवळ, नाशिक जिल्हा. ११ श्रीकेदारेश्वर – हिमालय. १२ श्री घृष्णेश्वर – वेरुळ जवळ मराठवाडा. अशीं बारा ज्योतिर्लिंगें आहेत.


बारा ज्योतिर्लिंगें आणि चार धामें यांना आम्ही फार पवित्र मानतों. हीं पवित्र व वंदनीय श्रद्धास्थानें आहेत. आयुष्यांत एकदांतरी तीर्थ-क्षेत्राचा लाभ घडावा, असें प्रत्येकास वाटतें. शिवाय जन्ममृत्युच्या फेऱ्यांतून कायम सुटण्याचा तो एक मार्ग आहे, अशीहि भावना असते.

श्री काशीक्षेत्रांत मृत्यु आल्यास मुक्ति लाभते. अशी अगणित क्षेत्रें भारतवर्षांत असून गंगा, यमुना, गोदावरी, चंद्रभागा, भीमा, नर्मदा, तापी, कावेरी, पंचगंगा, गोमती, कृष्णा, वेणा, महानदी, भगवति, वाग्मति, शीघ्रवरदा, हिरण्या, क्षिप्रा, गंडकी, पांझरा (पार्वती), शरयु, तुंगभद्रा, साबरमती वगैरे अनेक पवित्र नद्यांनीं हा भारतवर्ष भूषविला आहे. या सर्व नद्या पवित्र तीर्थस्थानें म्हणून भारतीय जनता ओळखते.

## नद्यांचें पावित्र्य

भारतांतील कांहीं नद्यांना विशेष पवित्र मानून त्या ठिकाणीं पवित्र तीर्थ किंवा क्षेत्र बनलें याला कांहीं सिद्धांत ठरलेले आहेत. नद्यांचें विशेष पावित्र्य ठरण्याचें कारण नदीचा ज्या दिशेनें प्रवाह सामान्यपणें जातो, त्याच्या उलट दिशेला जेथें प्रवाह फिरतो, तेथें पवित्र तीर्थ मानलें जातें. अशी पौराणिक परंपरा आहे.

उत्तर वाहिनी–गंगा (हरिद्वार) तशीच नर्मदा म्हणून पवित्र. पश्चिम वाहिनी–यमुना (अलाहाबाद) आणि पायोष्णी-तापी-(प्रकाशे) म्हणून क्षेत्र. तसेंच कावेरी–पश्चिम वाहिनी म्हणून पवित्र. पूर्व वाहिनी–सरस्वति आणि कृष्णा (कराड) म्हणून पवित्र आणि दक्षिण वाहिनी–



श्री सोमनाथ

गोदावरी (नाशिक) म्हणून तीं तीं ठिकाणें पवित्र क्षेत्रें होत. शिवाय असंख्य पर्वत श्रेणींत अशीं कांहीं अवघड स्थानें आहेत कीं, तेथें जाणें म्हणजे मृत्यूशीं झगडणें होय. पण अशाहि स्थितींत या पवित्र पुण्यप्रद श्रद्धास्थानांची यात्रा केल्यावर लोक स्वतःस कृतकृत्य समजतात, म्हणूनच भारतभू आमची पुण्यभूमि आहे. अशा पवित्र व पुण्यस्थलांपैकीं बारा ज्योतिर्लिंगांचा थोडा विस्तारपूर्वक विचार करावयाचा आहे.

## ज्योतिर्लिंगें

यांच्या मूळ स्वरूप व उत्पत्तिसंबंधीं निरनिराळ्या दिव्य किंवा प्राकृत कल्पना व आख्यायिका रूढ आहेत. कोठें कोठें ज्योतिर्लिंग म्हणजे व्यापक ब्रह्मात्मलिंग किंवा व्यापक प्रकाश असा अर्थ करितात. महेश्वराच्या शक्तीच्या अद्भुत तेजस्वरूपांत प्रादुर्भूत झालेलें तें ज्योतिर्लिंग असें केनोपनिषदांत म्हटलें आहे.

**महेश्वर शक्तिमायोपात्तेनात्यन्तादद्भुतेन**
**प्रादुर्भूतं किल केनचिद्रूपविशेषेण**

कित्येक शिवलिंगाचे बारा खंड म्हणजे बारा ज्योतिर्लिंगें समजतात. ज्वालामुखी पर्वताचे उद्रेक अशीहि इतरत्र कल्पना आहे. बारा महिन्यांचे बारा आदित्य ही बारा ज्योतिर्लिंगें होत असाहि कोठें उल्लेख आहे. याशिवाय ब्रह्म, माया, जीव, मन, बुद्धि, चित्त, अहंकार, आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी हीं बारा ज्योतिर्लिंगें होत असें तैत्तिरीयोपनिषदांत म्हटलें आहे. शिवपुराणांतहि ज्योतिः स्वरूप बारा तत्वें मानिलीं आहेत. पण आपणास आरंभी दिलेल्या प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांचाच विचार करावयाचा आहे. यांच्या कथा संक्षेपानें देत आहे.

१ श्री सोमनाथ–(सौराष्ट्र) या ज्योतिर्लिंगासंबंधीं प्रामुख्यानें ह्या ग्रंथांत विचार करावयाचा असल्यानें त्यासंबंधींची विस्तृत कथा पुढें येणार आहे.

२ श्री मल्लिकार्जुन–हें ठिकाण दक्षिणेंत मद्रास प्रांतांत कृष्णा जिल्ह्यांतील शैलपर्वतावर आहे. शैलपर्वताला दक्षिण कैलास म्हणतात. या स्थानाचा महिमा महाभारत, शिवपुराण, पद्मपुराण यांत विशेषत्वानें वर्णन केला आहे. या पर्वताजवळ प्राचीनकालीं चंद्रगुप्त राजाची राज-

धानी होती. त्याची कन्या संकटांतून मुक्त होण्याकरितां राजवाड्यांतून न कळत बाहेर पडली व या पर्वताच्या आश्रयाला असलेल्या एका गौळीवाड्यांत गुप्तपणें राहिली. पुढें ती कंदमुळें खाऊन, दूध पिऊन ईश्वराराधना करूं लागली. तिच्याजवळ सुंदर कपिला गाय होती. तिचें दूध नित्य कोणीतरी काढतें, असें तिच्या प्रत्ययाला आलें. तिनें गायीवर लक्ष्य ठेविलें. तों तिला एके ठिकाणीं गाईच्या चारी सडांतून दुधाच्या धारा लागलेल्या दिसल्या. आश्चर्य वाटलें. पाहते तों तेथें एक सुंदर शिवलिंग होतें. भक्तिभावप्रधान तिचें अंतःकरण द्रवलें. तिच्या हृदयांत शिवभक्तिचा प्रकाश पडला. कांहीं काळानें त्या स्थानीं तिनें सुंदर, भव्य शिवमंदिर बांधिलें. तेंच हें मल्लिकार्जुन होय. (कल्याण शिवांक ५५०) याच ठिकाणीं कार्तिकेय आपल्या आई-बापावर रुसून येऊन राहिले होते. म्हणून येथें कार्तिकेयाच्या समजुतीकरितां श्रीशिव पार्वतीसह ज्योतिर्लिंग रूपानें राहिले.

३ श्री महाकालेश्वर–(उज्जयनी,माळवाप्रांत, क्षिप्रा नदीतीरीं, मध्यप्रदेश ) उज्जयिनींत चंद्रसेन हा शिवभक्त राजा राज्य करीत होता. त्या नगरींत एका गरीब गवळ्याचा पांच वर्षाचा मुलगा श्रीकर भक्तिभावानें शिवपूजा करीत असे. गांवाबाहेर ओसाड खोपटांत दगडाचें शिवलिंग करून तो त्याची पूजा जंगलांतील बेलाफुलांनीं करी. बालभावानें भजन करीत असतां तो ध्यानमग्न होई. कित्येक वेळीं बेलफूल नच मिळालें तर मृत्तिकेचेच उपचार समर्पण करी. शुद्ध भावानें ध्यान करीत असतां त्याचें देहभान हरपे. एकदां असाच ध्यानमग्न असतां त्याची आई त्यास जेवणासाठीं बोलावूं लागली. हा कांहीं भानावर नव्हता. तें त्या मातेला कळेना. शेवटीं शिवमय झालेल्या श्रीकराला छांदिष्ट समजून तिनें त्याची शिवपूजा रागारागानें उधळून दिली आणि ती घरीं परतली. श्रीकर भानावर आला. पाहतो तों पूजा भंगलेली ! त्याला वाईट वाटलें. बालभक्त रडूं लागला. भंगलेली पूजा पहाण्याचें टाळण्यासाठीं त्यानें डोळे मिटले. भगवान शंकराला तो आळवूं लागला. शंकर लांब थोडेच होते ? लगेच भक्ताची दया येऊन शंकर प्रकटले व प्रसन्न झाले. आणि त्यांनी चमत्कार दाखविला. झोपडीचें मंदिर झालें. हिऱ्यामाणकाचे स्तंभ व सोन्याचा कळस असलेलें शिवमंदिर आणि त्यांत राजोपचार पूजा साहित्य निर्माण केलें. बाळानें डोळे उघडले.

आनंदानें तो नाचूं लागला. शंकरांनीं त्याला प्रेमानें आलिंगन दिलें. प्रेमाशीर्वाद देऊन ते अंतर्धान पावले. भक्ताचें दुःख नाहींसें झालें.

हा शुद्ध शिवभक्तीचा महिमा राजाला कळला. तो आश्चर्यानें थक्क झाला. त्यानें पुढें तें शिवमंदिर अधिक विस्तीर्ण केलें. तेंच हें श्री महाकालेश्वर ज्योतिर्लिंग होय. याच श्रीकराच्या असामान्य पुण्याईनें त्याच्या आठव्या पिढींत भगवान् श्रीकृष्ण जन्माला आले.

याच ठिकाणीं एक शिवभक्त अग्निहोत्री राहात होता. त्याचा दूषण नामक मूर्तिभंजक असुरानें छळ चालविला. तेव्हां तेथें सांब प्रकट होऊन हुंकारानें त्यांनीं असुराचा नाश केला. अशीहि एक आख्यायिका आहे.

४ श्री ओंकारेश्वर- श्रीअमलेश्वर- किंवा अमरेश्वर- (नर्मदा-किनारीं ओंकारमांधाता खांडवा, इंदूर मार्गावर मोरटक्का स्टेशना-पासून ७ मैल. )

सुप्रसिद्ध भक्त अंबरीष व मुचकुंद यांचा पिता मांधाता यानें येथें घोर तपश्चर्या केली; आणि श्री शंकर प्रसन्न झाले.

## ‘ शिवो भूत्वा शिवं यजेत् ’

असा त्याला अधिकार प्राप्त झाला होता. तो आत्मा शिवरूप मानून स्वस्वरूपीं ध्यानमग्न होई, म्हणून त्यास ‘ मामधाता ’ म्हणजे मांधाता हें नांव पडलें. याचा पिता युवनाश्व राजा यानें पुत्रप्राप्तीसाठीं मंत्रसिद्ध केलेलें जल आपणच चुकीनें प्राशन केलें. त्याच्या पोटीं हा मांधाता जन्माला आला त्याला इंद्रानें ‘ मां धास्यति ’ असें म्हणून आपली तिर्जनी चोखण्यास दिली, अशी लाक्षणिक कथा आहे. विंध्य पर्वतानें शिवाच्या पार्थिव लिंगार्चनासहित तपश्चर्या केली यास्तव शिव ओंकाररूपी व पार्थिव लिंगरूपी प्रकट झाले. तेंच हें ओंकार मांधाता ( ज्योतिर्लिंग ) होय.

५ श्री केदारनाथ– हिमालय शिखर

ही नर नारायणांची तपोभूमि आहे.

६ श्री भीमाशंकर– पुणे जिल्हा, सह्याद्रीचें पठार, भीमा-नदीच्या उगमाजवळ–

श्रीशंकरांनीं त्रिपुरासुराला मारल्यावर या स्थानीं विश्रांती घेतली. त्यावेळीं येथें भीमक हा सूर्यवंशी राजा तपश्चर्या करीत होता. त्यावर प्रसन्न होऊन शिवानें त्यास दर्शन दिलें. तेव्हांपासून भीमाशंकर हें ज्योतिर्लिंग प्रसिद्ध झालें.

दुसरी कथा अशी- आसाम प्रांतांत कामरूपेश्वर हा प्रतापी शिवभक्त राजा होता. भीम राक्षसानें त्याचा फार छळ केला. तेव्हां शंकरांनीं प्रकट होऊन त्या दैत्याचा नाश केला. त्यावेळीं तेथील देव ऋषींच्या प्रार्थनेवरून पार्थिव लिंगांत शिव तेथेंच कायम राहिले. तें हें भीमाशंकर ज्योतिर्लिंग होय.

७ श्री विश्वेश्वर– (काशी, उत्तर प्रदेश.)

श्रीक्षेत्र काशी ही पुण्यभूमि प्रलयकाळांतही लोप पावत नाहीं. ही आदि सृष्टिस्थळी आहे. त्या नगरीचें हें विश्वनाथ दैवत. काशीला मृत्यु म्हणजे मुक्ति. पुनर्जन्म संपला अशी हिंदुधर्मीयांची पवित्र भावना आहे. श्री विष्णु, अगस्ति, वशिष्ठ, विश्वामित्र इत्यादिकांनीं शिवाची अर्चा केली येथील शिवलिंगाची स्थापना भ० पूज्यपाद् श्रीमत् आद्य-शंकराचार्यांनीं केली असें म्हणतात.

८ श्री त्र्यंबकेश्वर– नाशिक जिल्हा. गोदावरी ( गौतमी ) उगमस्थानीं.

गौतम ऋषींच्या घोर तपश्चर्येवर प्रसन्न होऊन शंकरांनीं या क्षेत्रीं वास केला. येथें पिंडो नाहीं. लहानसा खळगा असून त्यांत तीन बारीक लिंगें आहेत. तीं ब्रम्हा, विष्णु, महेश यांचीं प्रतिकें मानितात. गाईची हत्या घडल्यामुळें गौतम ऋषींनीं केलेल्या कठोर तपस्येनें शंकर संतुष्ट झाले व त्यांनीं आपल्या जटेंतील गंगा गौतमांना दिली. त्यायोगें गाईचा उद्धार होऊन जगाचा उद्धार करणाऱ्या गंगेचा लाभ जनतेला झाला. तें हें त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग जागृत स्थान आहे.

९ वैजनाथ–परळी, मराठवाडा–

दक्षयज्ञांत शंकराचा अपमान झाल्यामुळें दक्षकन्या सतीनें आपला देह योगाग्नीनें जाळून घेतला. अवशेष भाग राहिला, तो शवरूपभाग शंकर खांद्यावर घेऊन फिरत असतां त्या शवाचा हृत्पिंड या ठिकाणीं पडला. त्याचा दहन संस्कार येथें झाला. म्हणून तिला चिताभूमि हें नांव पडलें. तेंच हें वैजनाथ ज्योतिर्लिंग होय.

शिवाय संताळ परगण्यांत ई. आय. रेल्वेवरील जसीडी स्टेशन-पासून तीन मैलावर ह्याच नांवाचें स्थान आहे. त्याला वैद्यनाथ म्हणतात. तेंही ज्योतिर्लिंग मानितात.

१० श्री नागेश्वर- औंढ्या नागनाथ, मराठवाडा, पूर्णा हिंगोली फाटयावरील चौंडी पासून १२ मैल औंढ्या गांव आहे.–

सुप्रिय मोठा शिवभक्त होता. त्याला दारुक राक्षसानें कारा-गृहांत टाकलें. तेथें प्रसन्न होऊन शिवांनीं त्याला दर्शन दिलें. आणि राक्षसाचा नाश केला. तें स्थान दारुकावनांतील नागनाथाचें ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध झालें.

टीप- द्वारका ( सौराष्ट्र ) आणि अलमोडा ( नैनितालजवळ ) येथेंही नागेश्वराचीं स्थानें असल्याचा उल्लेख आहे.

११ श्रीरामेश्वर– (मद्रास), सेतुबंधाजवळ, भारताचें दक्षिण टोंक.

हें शिवलिंग प्रभु रामचंद्रांनीं लंकेंत जाण्यापूर्वी शंकराचा आशीर्वाद मिळावा म्हणून स्थापन केलें.

दुसरी कथा अशी कीं– रावण कुळाचा नाश केल्यामुळें ब्रह्महत्येचें पाप लागलें त्या पापक्षालनार्थ त्यांनीं या शिवलिंगाची स्थापना केली. हें ज्योतिर्लिंग समुद्रकाठीं असलें तरी मंदिराच्या आवारांतल्या विहिरीचें पाणी मात्र गोड आणि त्याबाहेरील विहिरीचें पाणी खारें आहे.

१२ घुसृणेश्वर- श्री घृष्णेश्वर, वेरुळ जवळ मराठवाडा.

सुधर्मा ब्राह्मण व त्याची परम साध्वी स्त्री घुष्मा हे दोघे महान शिवभक्त होते घुष्माची वडील बहीण हीच तिची सवत होती. तिनें सवती मत्सरानें घुष्मेच्या मुलाची हत्त्या करून त्याचें प्रेत सरोवरांत

टाकलें. पण तो-शंकराच्या कृपेनें जिवंत होऊन सरोवराबाहेर आला. या सवतीच्या पापाचें शासन व्हावें असें घुष्मेनें न मागतां उलट तिच्यासाठीं क्षमा याचना केली. ही घुष्मेची निर्वैरवृत्ति व परम शिव-भक्ति पाहून शिव प्रसन्न झाले आणि तिच्या प्रार्थनेवरून येथेंच ज्योतिर्लिंग रूपांत राहिले तें हें धृष्णेश्वर वा घुश्मेश्वर ज्योतिर्लिंग होय.

अशा बारा ज्योतिर्लिंगांच्या कथा आहेत.

प्रभास पट्टणांतील सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाविषयीं विचार करण्यापूर्वीं प्रभासतीर्थाचा इतिहास पाहूं.

## प्रभास पट्टण

काठेवाडांतींल पांच रत्नें--

**सौराष्ट्रे पंचरत्नानि नदी नारी तुरंगमः ।**
**चतुर्थं सोमनाथश्च पंचमं हरिदर्शनम् ॥** सुभाषितकार

सौराष्ट्रांतील पांच रत्नांत सोमनाथ हें मोठें प्रसिद्ध रत्न आहे. सोरटी सोमनाथ हें पहिलें प्रसिद्ध ज्योतिर्लिंग होय. तें सौराष्ट्रांतील प्रभास पट्टणांत आहे. प्रभास पट्टणचा हजारों वर्षांचा इतिहास उपलब्ध आहे. सौराष्ट्राचा उल्लेख अनेक ग्रंथांत आहे. सौराष्ट्राचें प्राचीन नांव कुशव्रत होते. द्वारका वसविली त्या स्थानाचें नांव कुशस्थली. या कुशस्थलींत वास्तव्य करणारे फिनिशियन्स् असावे. कारण ते आपणांस कुशाचे पुत्र म्हणवीत असत. सौराष्ट्र द्वीपकल्पाचें नांव कुशव्रतानंतर सुरथ पडलें. पाणिनींचा गणपाठ यांत 'सुराष्ट्र' नांव आलेलें आहे. रुद्रदाम, स्कंदगुप्त यांच्या व इ. स. २५ पूर्वींच्या पुलुमायीच्या शिलालेखांत सुराष्ट्राचें प्राकृत रूप 'सुरठ' असें आहे. परदेशीय प्रवाशांनींही सुराष्ट्राला 'सुरठ' सोरठ असें म्हटलें आहे. या सोरठला 'काठियावाड' असेंही म्हणतात. सुरथ, सुराष्ट्र, सौराष्ट्र, सोरठ अशीं नांवें बदलत गेलीं. गुजराथ आणि काठेवाड मिळून असणाऱ्या आनर्त देशाचा सौराष्ट्र हा अत्यंत समृद्ध प्रांत.

## प्रभासची पौराणिक प्राचीनता

प्रभास हें पुराण प्रसिद्ध प्राचीन क्षेत्र आहे. याला पुराणकालीं आनर्तसार किंवा आनर्तपुरी असेंहि म्हणत. ही एकावेळची प्रसिद्ध नगरी

व राजधानी. प्रभासला अनेक नांवें आहेत. सिंधच्या दक्षिण किनाऱ्याला पाताळ नांवाचें बंदर होतें. हें नगर पाताळांतील केंद्र होतें. नागजातीचे समुद्र भ्रमण या स्थानाहून होत असे. वडवामुख प्रभास क्षेत्रांत असून तेथें श्रीमुख नांवाचें पाताळ विवर आहे. या प्रभास क्षेत्रीं अगस्त्याश्रम होता. समुद्रप्राशन अगस्तींनीं याच ठिकाणीं केलें, अगस्तींनीं मागून घेतलें कीं, या प्रभास क्षेत्रांत हाटकेश्वराच्या पाताळलिंगाचें नित्य पूजन व्हावें.

प्रभास खंडांत प्रभास क्षेत्रें पांच असल्याचा उल्लेख आहे. आद्यप्रभास, वृद्धप्रभास ( दक्षिणेंत ), जलप्रभास, कृतस्मरप्रभास, (दक्षिणेंत) महाप्रभास. प्रभास क्षेत्रांत तीन नद्यांचा संगम असल्यानें स्नानासाठीं तें पुण्यतीर्थ आहे. हिरण्या, कपिला, सरस्वति या तीन नद्यांचा संगम तेथें असला तरी पण सरस्वतीला प्रभास क्षेत्रांजवळ आणखी चार नद्या मिळाल्या म्हणून सरस्वतीला 'पंचस्रोता' असें म्हटलें आहे. हिरण्या, कपिला, नंक्यु, वृजनी, सरस्वति या नद्या होत. या पवित्र नद्यांमुळें पूर्वींपासून प्रभास हें शैवतीर्थ, अग्नितीर्थ, सूर्यतीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे. इतकेंच नव्हे तर प्रभास हें प्रत्येक संप्रदायाचें एकाकाळीं तीर्थ बनलें होतें.

## प्रभास तीर्थाचें वैशिष्ट्य

भगवान् श्रीकृष्ण अंतकाळीं प्रभासला आले. हाच या तीर्थाचा मोठेपणा आणि पवित्रता होय. हें प्रभास क्षेत्र ब्रम्हतत्व, विष्णुतत्व, रुद्रतत्व यांनीं युक्त आहे. हीं तीन तत्वें अन्य ठिकाणीं एकत्र सांपडत नाहींत. ब्रम्हा २४ तत्वांनीं, विष्णू २५ तत्वांनीं व रुद्र २६ तत्वांनीं या क्षेत्रांत राहिले आहेत. कृष्णांनीं देहत्यागाला हीच भूमि योग्य ठरविली. ब्राह्मणांचा धर्म, इतर संप्रदायांचा योग, आणि शैवांचें वर्चस्व असलेलें हें तीर्थ होय. या तीर्थांत या कारणांनीं म्लेंछांनीं प्राणत्याग केला तरी मोक्ष आहे, असें प्रभास माहात्म्यांत वर्णन आहे. आद्य कल्पांत प्रभासचें नांव प्रमोद होते, नंतरच्या कल्पांत नंदन, शिव, उग्रभद्रिक, संमिधन, कामद, वैद्यरूप, श्रीपद्मनाभ, मोक्षमार्ग, सुदर्शन आणि नंतर पापाचा नाश करणारे म्हणून प्रभास नांव पडलें. पाताळ विवर श्रीमुखाजवळच बळराम स्वरूपस्थ झाले. ते ठिकाण येथेंच आहे. समुद्र मंथनांतून उत्पन्न

झालेल्या चंद्रानें वरदान मागितलें कीं या जागीं भैरवनाथ नांवाचें जें लिंग आहे, तें माझ्या सोम या नांवानें पुढें अखिल ब्रह्मांडांत सोमनाथ ज्योतिर्लिंग म्हणून ख्यात व्हावें. यावरून प्रभास क्षेत्रांत तें भैरवलिंग, कालाग्निरुद्र म्हणून प्रसिद्ध होतें, असें दिसतें. याचेंच नांव सोमनाथ पडलें.

## प्रभास पट्टण-प्राचीन व्यापारी केंद्र

प्रभास पट्टण किंवा सोमनाथ पाटण हें संमृद्ध आणि व्यापारी बंदर म्हणून प्रसिद्ध होतें. परदेशी व्यापारी आपलीं जहाजें 'मांगरोळ' बंदराला आणीत. 'मांगरोळ' व 'प्रभास' बंदरें पूर्वीपासून प्रख्यात होतीं. सध्यां त्या बंदरांचें ऐश्वर्य संपलें असून वेरावळ हें बंदर झालें आहे. आणि प्रभास पट्टण केवळ तीर्थस्थान राहिलें आहे.

## प्रभासचा मार्ग

सौराष्ट्रांतील जुनागडच्या नैऋत्य कोपऱ्यांत प्रभास पट्टण आहे. अमदाबादेहून सोमनाथ मेल म्हणून काठेवाडांत जाणारी गाडी आहे, त्या गाडीनें विरमगाम, राजकोट, जामनगर, जुनागड केशोद, वेरावळ असें जावें. वेरावळ पासून प्रभास पट्टण चार मैल आहे, स्टेशन व गांव यामध्यें वेरावळ बंदर. ( दीड मैल ) व तेथून सोमनाथ पाटण-प्रभास पट्टण अडीच मैल वेरावळच्या पश्चिमेला आहे. वेरावळ हें सुरतेच्या आधीं प्रसिद्ध बंदर होतें, येथें मालाच्या मोठमोठ्या वखारी, पेढ्या होत्या.

फार प्राचीन काळीं वेरावळ व्यापारासाठीं अंतरराष्ट्रीय संबंधाचें केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. अनेक देशोदेशींचे व्यापारी येथें उतरून प्रभासला येत व श्रद्धेनें सोमनाथ दर्शन घेत. सौराष्ट्राच्या दक्षिण किनाऱ्याला असलेल्या प्रभास पट्टणला प्राचीन नांव देवपट्टण असें होतें. व वेरावळ बंदराला देव बंदर म्हणत. इ. स. १९५१ सालीं श्री सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा झाली. त्या अर्चेकरितां मुद्दाम प्राचीरोड हें खास स्टेशन उभारलें होतें. सागर तीरीं प्रभास पट्टण त्रिकोणाकृति आहे. सागर आपल्या लाटांनीं सोमनाथाचें पूजन नित्य करीत असे.

प्रभास पट्टणची लोकसंख्या तेरा हजार आहे. त्यांत मुसलमान पांच हजार. गांवाभोंवतीं जुना, उंच, प्रशस्त तट आणि चार वेशी आहेत. किल्ल्याचे कांहीं अवशेष शिल्लक आहेत.

सोमनाथ मंदिर गांवाच्या दक्षिणेस, पूर्व पश्चिम पट्टा आहे, तेथें पूर्वेकडे दक्षिण वेशीच्या बाहेर, अर्धा फर्लांगावर समुद्रकांठीं वसलें आहे. एक देवालय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या थोर साध्वीनें बांधलें. पण ते नवीन प्राणप्रतिष्ठा केलेल्या ( पूर्वींच्या जुन्या ) स्थानापासून दीड फर्लांगावर आहे. नुकत्याच प्राण प्रतिष्ठा केलेल्या मंदिराचें स्थान हें मात्र पूर्वींच्या जुन्या ठिकाणीं आहे. प्रभास म्हणजे अतिशय प्रकाशस्थान. यालाच भास्कर तीर्थ म्हणतात. प्रभास या पवित्रतम क्षेत्राचें महत्त्व असें कीं, समुद्र तीरीं असूनहि सरस्वति, हिरण्या या मुख्य नद्या, वृजनी, नंक्यु, कपिला या उपनद्या आहेत.

## ' प्रभासे यादव श्रेष्ठ पंचस्रोता सरस्वति '

त्याचप्रमाणें सोमनाथ मंदिरानजीक पाऊण मैलावर हिरण्या, कपिला व सरस्वति या तीन नद्यांचा संगम असून तेथें सरस्वति गुप्त आहे.

या नद्यांचे संगमावर एक सूर्य मंदिर आहे. चंद्र अमावास्येला स्नान करण्यास व शिव पूजा करण्यास येतो म्हणून तो पर्वकाळ असे. इंद्र व सूर्य यांचें हें आवडतें स्थान समजलें जातें. प्रभास हा गांव संपन्न असून येथें ब्राह्मणांचीं दोनशें कुटुंबें आहेत. हे सारे माध्यंदिन शाखेचे शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण. येथील ब्राह्मणांस सोमपुरा म्हणतात. हे आपल्या नांवामागें जानी ( याज्ञिक ) असा शब्द लावितात. ( उदा. जानी उमाशंकर, जानी गिरजाशंकर, रमाशंकर वगैरे. )

सध्यां व्यापार मात्र पूर्वींसारखा राहिला नाहीं. खेड्यांतील लोक व्यापाराची देवघेव उंटावरून करीत असतात. येथील व्यवहारांत काठेवाडी, गुजराथी किंवा हिंदी या भाषा चालतात. गांव हा जुन्या वळणाचा, त्यांत शहरी वातावरण नाहीं. शांत आणि निरामय असा गांव वाटतो. तेथील लोकांचा स्वभाव निरुपद्रवी, मितभाषी, आपापल्या विचार तंद्रींत असलेला, साधा असा आहे. पण एकंदर प्रांत समृद्ध आहे. सौराष्ट्रांत गाईंची पैदास अधिक. काठेवाडांत गाईचें दूध दुभतें भरपूर मिळतें. म्हशीचें प्रमाण थोडें आहे. तेथील गाई ह्या म्हशीप्रमाणें दूध देणाऱ्या, पुष्ट आहेत ' जेथें गव्य तेथें आरोग्य भव्य ' यामुळें या प्रांतांत रोगाचा

संभव कमी असावा. लोक शरीरानें धिप्पाड व उंच आहेत. तो कदाचित् आहार व हवापाण्याचा गुण असावा. या भागांत चहाचा खप कमी दिसतो. आहारांत तेलातुपाचें प्रमाण अधिक. तळलेले पदार्थ व मिठाईचा भरपूर प्रमाणांत खप असल्यानें त्याचींच दुकानें सर्वत्र पहावयास मिळतात. सौराष्ट्रांत गोपाळ कृष्णाच्या वास्तव्याचीं अनेक महत्वाचीं स्थानें आहेत १) द्वारका, २) देहोत्सर्ग ३) भल्लाक तीर्थ ( भालक तीर्थ ) इत्यादि. भारत सम्राट जनमेजय व परिक्षित या दोघांनीं सोमनाथाला भेट दिली असा कांहीं ठिकाणीं उल्लेख आढळतो. वडवानल ज्या विवरांतून वर आला तें वडवामुख विवर प्रभास क्षेत्राजवळ होतें असा पुराणांत उल्लेख आहे. हा वडवानल कालाग्नि सरस्वतीनें आणला.

पाताळ हे खंबायत, सिंध, उत्तर गुजराथ यांच्या जवळपास असावें. बळराम शेष रूपानें येथूनच पाताळांत गेले, असें म्हणतात. पाताळ, वडवानळ, सोमनाथ यामुळें प्रभासशीं नागांचा संबंध असावा. शंकराच्या आशिर्वादानें वा स्फूर्तीनें नाग लोकांनीं भाराशिव व काटक या उत्तरेकडील लोकांचा मोड केला.

## सोमनाथ प्राणप्रतिष्ठेचें महत्त्व

निधर्मी राज्याचे प्रमुख पुरस्कर्ते असतांना जीर्णोद्धाराच्या कल्पनेला चालना श्री. वल्लभभाईंनीं दिली.

मोठमोठ्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं शेंकडों देवळें अत्यंत विपरीत अवस्थेंत असतांना सोमनाथाबद्दल येवढी दक्षता बाळगून भारतीय जनतेच्या हृदयांत खोलवर गेलेली जखम जीर्णोद्धारानें अंशतः भरून काढण्याचें श्रेय जें या थोर थोर व्यक्तींनीं मिळविलें. त्याचें प्रमुख कारण सोरटी सोमनाथामागें असलेला वेदकाळपासूनचा धार्मिक व सांस्कृतिक इतिहास आणि ऐतिहासिक काळांत सोमनाथाला आलेलें जागतिक महत्व हें होय.

भारताच्या चारी दिशेला जीं पवित्र तीर्थ क्षेत्रें आहेत, त्यांत उत्तरेस हिमालयांत बद्रिनारायण व काशी, पूर्वेस जगन्नाथपुरी, दक्षिणेंत रामेश्वर, पश्चिमेस द्वारका हीं प्रमुख आहेत. द्वारकेच्या बरोबरीचें दुसरें क्षेत्र प्रभासपट्टण होय. हें स्थान शिव व विष्णु उभय उपासकांस

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक २८८७८ दि: ५-५-७
क्रमांक २४६ नों: दि: ... २३ २५



अत्यंत महत्वाचें वाटतें. कारण श्रीकृष्णाची देहोत्सर्ग भूमि येथें आहे. तसेंच शंकराचेंहि स्थान आहे, शिवाय जैनांचेंहि प्रभास पट्टण हें तीर्थ आहे. ऐतिहासिक महत्वाचा भाग पुढें येईलच. म्हणून प्रभासला धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक अशा सर्व प्रकारचें महत्त्व आलेलें आहे.

या महत्वामुळें सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा व जीर्णोद्धार होणें. आवश्यकच होतें. सोमनाथाचा इतिहास हा अत्यंत हृदयविदारक आहे. '**कृष्णस्तु भगवान् स्वयम्**' अशी भागवतकारांनीं श्रीकृष्णाची महति गायली. ज्या गोपालकृष्णांना आम्ही अत्यंत पूज्य मानतो. ज्या गोपाल-कृष्णांनीं भगवत् गीतेच्याद्वारां साऱ्या जगाला दिव्य संदेश दिला. त्या यादवेंद्राच्या पायाला ( हरिण समजून ) कुणीतरी बाण मारला, आणि अशा अवस्थेंत त्यांना आपला देह विसर्जन करावा लागला. तो विपरीत प्रसंग येथेंच प्रभासपट्टणला घडला. तें स्थान प्रभासजवळच दीड मैलावर वेरावळच्या ईशान्य दिशेला आहे. पूर्णावतारी श्रीकृष्णाची शिकार व्हावी ना ? हरहर ! त्याचप्रमाणें यादवांच्या उन्मत्तपणामुळें यादवांचा जेथें संहार झाला तेंहि स्थान येथून सोळा मैलांवर आहे. आणि यानंतर 'यादवी' हा शब्द रूढ झाला.

प्रभास क्षेत्रांत अनेक देवस्थानें कांहीं प्रगट कांहीं गुप्त आहेत. भालकतीर्थ, देहोत्सर्ग, नद्यांचे संगम, त्रिवेणी घाट, देहोत्सर्गाचें उत्तरेस नरसिंह मंदिर, शितलादेवीचें मंदिर, शशिभूषणमहादेवाचें स्थान, भीडभंजन गणपति मंदिर, यालाच भिडिया नांवानें ओळखतात. या जागेवर शापनिवारणार्थ सोमानें यज्ञ केला. आणि याच जागेवरून जरा पारध्यानें कृष्णाला बाण मारला, असें सांगतात. भालकतीर्थांत कार्तिकी-पौर्णिमेचें ( त्रिपुरी ) महत्त्व विशेष. त्यावेळीं मेळा भरतो. तसेच भट्टारक, सूर्यक्षेत्र, स्पर्शलिंग, गंधर्वेश्वर, विमलेश्वर, अग्नितीर्थ, पद्मतीर्थ, रुद्रेश्वर, आदित्येश्वर, रत्नेश्वर, नवग्रहेश्वर, सिद्धेश्वर, कपिलेश्वर, वर्कलिंग, वरुणेश्वर, भैरवेश्वर, नारदेश्वर वगैरे असंख्य तीर्थें व शिवस्थानें आहेत.

★ ★ ★

कला चौथी –

# सो म क था

## वेदकालापासूनच्या प्रभास क्षेत्राच्या आख्यायिका व उल्लेख

१ **वेदकाल**– प्रभास आणि सोमनाथचा वेद व पुराणकालांतील उल्लेख पुढीलप्रमाणें–

**यत्र गंगा च यमुना यत्र प्राची सरस्वति ॥**
**यत्र सोमेश्वरो देवस्तत्र मामृतंकृधीन्द्रायेन्द्रो परिस्रव ॥**

( खिलसूक्तम् २० ऋ. परिशिष्टानि २०१५ मंडल ९)

२ **पुराणकाल** – प्रभास खंड ७ अ. ३ मध्यें प्रभास व सोमनाथ यासबंधीं उल्लेख आहे तो-

**प्रभासमिति विख्यातं क्षेत्रं त्रैलोक्यवंदितम् ॥**
**तत्क्षेत्रं नैव जानन्ति मम माया विमोहिताः ॥ १२६ ॥**

महाघोर अशा कलियुगांत वादहेतु धरून बडबड करणारे, पाखंडी, सारे मिथ्या मानणारे, क्षेत्र कसले, कसला देव आणि त्याचा प्रभाव, कशाच्या देवता, हें सारें खोटें आहे, असें म्हणणाऱ्या व हांसणाऱ्या मूर्खांना, नास्तिकांना, निंदकांना त्यांचें दुःख नाहींसें करण्याकरितां हें तीर्थ प्रकट झालें आहे. या तीर्थांत स्नान करणारांना सिद्धि प्राप्त होईल, असा त्या तीर्थाचा महिमा आहे.

**सरस्वती समुद्रश्च सोमः सोमग्रहस्तथा ॥**
**दर्शनं सोमनाथस्य सकारा पंचदुर्लभाः ॥**

सोम–उमेसहित सोम. सोमग्रह–चंद्रग्रहण.

प्रभास क्षेत्रांत सोमवति आमावास्येचें महत्त्व फार. स्नानानें, दर्शनानें व्रतानें यज्ञाचें पुण्य मिळतें अशी भावना.

**अमा सोमेन संयुक्ता कदाचिद्यदि लभ्यते ।**
**तस्यां सोमेश्वरं दृष्ट्वा कोटियज्ञफलं लभेत् ॥**

आमावास्या, चंद्रग्रहण अशावेळीं सोमनाथ दर्शन हा एकत्र योग महत्-पुण्यप्रद होय. सोमनाथाला 'ज्योतिर्मयं कलावतंसम्' असेंहि म्हणतात. अग्नि, सूर्य, सोम हें सोमनाथाचे नेत्र आहेत.

कामः क्रोधस्तथा लोभो दंभस्तंभो विमत्सरः ।
निद्रा तंद्रा तथाऽऽलस्यं पैशुन्यमिति ते दश ।
एते रक्षन्ति सततं सोमेशं तीर्थनायकम् ॥
यत्किंचिदशुभं कर्मकृतं मानुषबुद्धिना ।
तत्सर्वं विलयं याति श्रीसोमेश्वर पूजनात् ॥

स्कंद पुराणांत असें अनेक श्लोक दिलेले असून पुढें सोमेश्वर महात्म्य वर्णन केलें आहे. यांत तीनशेंपर्यंत अध्याय आहेत. शिवपुराण शतरुद्रसंहिता अ. ४२ यांत, तसेंच कोटिरुद्र संहितेंत सोमनाथ माहात्म्य वर्णन केलें आहे.

सौराष्ट्रे सोमनाथश्च श्रीशैले मल्लिकार्जुनः ॥
उज्जयिन्यां महांकाल ओंकारे चामरेश्वरः ॥१॥
केदारे हिमवत् पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरः ॥
वाराणस्यां तु विश्वेशः त्र्यंबको गौतमीतटे ॥२॥
वैद्यनाथ चिताभूमौ नागेशो दारुकावने ॥
सेतुबंधे च रामेशो घृश्मेशश्च शिवालये ॥३॥
अवतार द्वादशकमेतच्छंभोः परात्मनः ॥
सर्वानंदकरं पुसां दर्शनात् स्पर्शनान्मुने ॥४॥
तत्राद्यः सोमनाथो हि चंद्रदुःख क्षयंकरः ॥
क्षयकुष्टादि रोगाणां नाशकः पूजनान्मुने ॥५॥
शिवावतारः सोमेशो लिंगरूपेण संस्थितः ॥
सौराष्ट्रे शुभदेशेच शशिना पूजितः पुरा ॥६॥
चंद्रकुंड च तत्रैव सर्व पापविनाशकम् ॥
तत्र स्नात्वा नरो धीमान् सर्व रोगैः प्रमुच्यते ॥७॥
सोमेश्वरं महालिंगं शिवस्य परमात्मकम् ॥
दृष्ट्वा प्रमुच्यते पापात् भुक्तिं मुक्तिं च विंदति ॥८॥

अशा तऱ्हेचें हें अष्टक शिवपुराणांत आलेलें असून त्यांत सोमनाथ सौराष्ट्र याचें उल्लेख आहेत. ' चंद्रदुःख क्षयंकरः ' ' क्षय-कुष्टादि रोगाणां नाशकः ' ही वेदकालीन कथा कोटिरुद्र संहितेंत प्रारंभीं दिलेल्या अष्टकाप्रमाणेंच अष्टक असून त्यांत नांवांत थोडा फरक केलेला आहे. पुढें दिलेली आख्यायिका ही ऋग्वेदांत व शिवपुराणांत आली असून, भारत शल्यपर्वांतहि आहे.

**भारत कालः—**

प्रभास माहात्म्य वर्णन करितांना पुढील श्लोक आहेत.

**पूर्वं महाराज यदुप्रवीर । ऋत्विग्सुहृद्विप्रगणैश्च सार्धम् ॥**
**पुण्यं प्रभासं समुपाजगाम । यत्रोडुराड् यक्ष्मणा क्लिश्यमानः॥४१॥**
**विमुक्तशापः पुनराप्यतेजः । सर्वं जगद्भासयते नरेंद्र ॥**
**एवं तु तीर्थप्रवरं पृथिव्यां । प्रभासनात्तस्य ततः प्रभासः ॥४२॥**

भा. श. प. अ. ३५

भारत-वनपर्व अ. ८२ श्लोक ५८ तें ६३ यांतहि प्रभास माहा-त्म्याचीं वर्णनें आहेत.

**प्रभासं चोदधौ तीर्थं त्रिषु लोकेषु विश्रुतम् ।**

प्रभास खंडांत वर्णन असें आहे कीं, प्रभास क्षेत्रांत व्रत नियमांनीं युक्त ' महामृत्युंजय ' मंत्राचा जप ( संपुटित ) आणि कालाग्निरुद्राच्या सान्निध्यांत दक्षिणेकडे बसून शतरुद्र पाठ जपला तर सहा महिन्यांत सिद्धि प्राप्त होते

वडवानलाची उत्पत्ति प्रभास क्षेत्रीं सरस्वतीच्या ठिकाणीं झाली. प्रभास हें अग्नितीर्थ आहे.

**प्रभया दीप्यते नित्यमग्निवत् भरतर्षभ ।**
**प्रभासते यथा सोमः सोऽश्वमेधं च विंदति ॥**

अशा तऱ्हेनें प्रभास क्षेत्रांत सोमेश्वर पूजनानें व सोमतीर्थांत स्नान करून विमुक्तशाप झालेल्या सोमाची कथा आहे ती अशी—

## सोमराजा – कथा

मनु जसे अनेक, तसे ब्रह्मा व चंद्रहि अनेक होऊन गेले. प्रत्येक ब्रह्माचे वेळीं सोमनाथाला निरनिराळीं नांवें होतीं. त्यांत मृत्युंजय, कालाग्निरुद्र, अनामय, कृत्तिवासा याप्रमाणें- हेमगर्भ ब्रह्माचें वेळीं सोमनाथ हे भैरवनाथ होते. आणि सातव्या शतानंद ब्रह्माचें वेळीं सोमनाथ नांव प्रसिद्ध झालें. यावेळीं असणारा चंद्र अत्रिय नांवानें प्रसिद्ध होता. तोच सोमराजा. त्याची कथा अशी-दक्षप्रजापति ब्रह्मदेवाचा मानस पुत्र होय. त्याला सत्तावीस मुली होत्या.

**दक्षस्य तनयास्तात प्रादुरासन्विशांपते।**
**सप्तविंशतिं कन्यां दक्षः सोमाय वै ददौ ॥ ७१ ॥**

भा. श. प. अ. ३५

या मुलींचें परस्परांवर अत्यंत प्रेम होतें. यामुळें विवाह झाल्यावरहि आपण एकत्र असावें अशी त्यांची अपेक्षा असल्यानें, त्यांनीं पित्याला तशी विनंति केली. दक्षानें मुलींची आकांक्षा ओळखून त्यांचा विवाह सोमराजाशीं लावून दिला. त्या राजाचें रोहिणीवर अत्यंत प्रेम होतें. इतर मुलींना या गोष्टीचें वैषम्य वाटून सर्वत्रांना सारखी वागणूक मिळावी म्हणून त्यांनीं अनेक वेळां प्रयत्न केला. पण सोमानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. म्हणून मुलींनीं पित्याकडे तक्रार केली. दक्षानें आपल्या जामाताला सर्व मुलींना सारखें वागविण्याबद्दल परोपरीनें सांगितलें. पण व्यर्थ. तेव्हां रागावून दक्षानें सोमराजाला शाप दिला. दक्ष रागाच्या भरांत म्हणाला. ‘ तुला क्षय लागेल. ’ शापामुळें सोम निस्तेज होऊं लागला. ही गोष्ट देवांच्या निदर्शनाला आल्यावर ते सोमासह दक्षाकडे गेले. आपल्या शापानें जगांतील साऱ्या औषधी वनस्पति निस्तेज होऊं लागल्या आहेत. सोमास दिलेला शाप पर्यायानें आमचें व जगाचें अकल्याण करणारा असल्यानें सोमराजावर आपण दया करावी, अशी देवांनीं विनवणी केली. दक्ष म्हणाला- ‘ ठीक आहे. यानें प्रभास तीर्थांत स्नान करून सोमनाथाचें आराधन करावें, म्हणजे हा अंशतः शापमुक्त होईल.’

**समुद्रं पश्चिमं गत्वा सरस्वत्यब्धि संगमम् ।**
**आराधयितु देवेसं ततः कान्तिमवाप्स्यति ॥** श. प. अ. ३५

'या प्रमाणें सोमनाथ आराधन, पूजन केलें म्हणजे कांति प्राप्त होईल. परंतु पंधरा दिवस क्षय आणि पंधरा दिवस वृद्धि अशी अवस्था राहील.'

**मासार्धं च क्षयं सोमो नित्यमेव गमिष्यति ।**
**मासार्धं तु सदावृद्धिं सत्यमेतत् वचोमम ।। ७६ ।।**

या प्रमाणें दक्षानें सांगितल्यावर पश्चातापदग्ध सोमाला आनंद झाला.

**सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः ।**

या उक्तीप्रमाणें अर्ध्या शापमुक्त झालेल्या सोमानें शापाचा परिहार होण्यासाठीं प्रभास क्षेत्रांत गमन केलें. संगमांत स्नान केलें. व भगवान सोमनाथाची आराधना केली.

**सरस्वतीं ततः सोमः सजगामर्षि शासनात् ।।**
**प्रभासं प्रथमं तीर्थं सरस्वत्या जगाम ह ।। ७८ ।।**

याप्रमाणें प्रभास क्षेत्रीं सोमनाथाची आराधना आणि यज्ञ केल्यावर आशुतोष भगवान् शंकर प्रसन्न झाले. व त्यांनीं दक्ष वचनाप्रमाणें सोमाला शापमुक्त केलें. सोमानें शंकराला विनंति केली कीं, मी पूजन केलेल्या शिवलिंगांत आपण पूर्णांशानें राहावें.' श्री शंकरांनीं सोमाची विनंति मान्य केली. तेव्हांपासून सोमनाथ हें नांव रूढ झालें. असाहि कथेचा एक पर्याय आहे.

आजहि प्रभास पट्टणची हवा क्षय रोग्यांना अत्यंत अनुकूल आहे. तशा तऱ्हेनें सोमराजा अर्धा शापमुक्त होऊन वृद्धि आणि क्षय अशा दोन्ही अवस्था त्याच्या मागें लागल्या. त्यानें त्या शंकराचें स्थानावर सुवर्णमंदिर बांधून प्रथम जीर्णोद्धार केला. असा हा हजारों वर्षांचा इतिहास आहे.

कथा २ री--

प्रभास क्षेत्राला भास्कर क्षेत्रहि म्हणतात.

**एतत् प्रकाशते तीर्थं प्रभासं भास्करद्युति ॥**
**इंद्रस्य दयितं पुण्यं पवित्रं पापनाशनम् ॥**

म. भा. व. प. अ. ८२

सूर्य या क्षेत्रांत स्वतःच्या पुऱ्या कलांनीं प्रकाशित होता. तो प्रकाश इतका असह्य होता कीं, त्याची स्त्री छाया सूर्याच्या सन्निध जाऊं शकत नसे. म्हणून सूर्यानें सोळा कलांपैकीं बारा कला सूर्यमंदिरांत ठेविल्या व चार स्वतःच्या जवळ ठेविल्या. यावरूनच पूर्वीच्या कालापासून सूर्यपूजा प्रभासांत प्रचलित आहे. काठेवाडांत सूर्यपूजेचा फार प्रचार होता. त्याचे अवशेष अजून तेथें उपलब्ध आहेत. प्रभास क्षेत्रांत व इतरत्र बरीच सूर्यमंदिरें आढळतात. पण तो सूर्यपूजेचा प्रघात सध्यां बराच कमी झाला आहे. प्रभास तीर्थाला शैवतीर्थ म्हणूनहि समजलें जातें.

सोमानें सुवर्णमंदिर बांधिलें त्यावेळची कथा अशी कीं,–सोमानें ज्यावेळीं सोमनाथ मंदिर बांधावयाचें ठरविलें, त्यावेळीं त्यानें चंद्रलोकावरून ब्राह्मण बोलावले. त्यांत पाठपूजा करणारे कर्मकांडी, हा एक वर्ग आणि दुसरा शिल्पी वर्ग. त्यांनीं शिल्प शास्त्रानुसार मंदिर बांधलें. क्रिया करणारांना शंकरांनीं प्रभासमध्यें यज्ञयाग, धर्मक्रिया करण्याचा अधिकार आणि यजमान वृत्तीवर निर्वाह करण्यास सांगितलें. दुसऱ्या वर्गाला पाथरवट इत्यादि कामें करण्यास सांगितलें. तेव्हांपासून सोमपुरा ब्राह्मणजातीनें उत्तम शिल्पी दिले आहेत. त्यांचेजवळ शास्त्रीयज्ञान परंपरागत आहे. सोमपुरा शिल्पी म्हणून त्यांना म्हणतात. नुकत्याच प्राणप्रतिष्ठा झालेल्या नवीन सोमनाथ मंदिराचें शिल्पकाम सारे या सोमपुरा शिल्पींनीं केलें. कळस चढविणाराहि सोमपुरा ब्राह्मणच होता.

( आधार–गुजराथ साहित्य परिषद ग्रंथ ‘ सोमनाथ ’ )

★ ★ ★

कला पांचवी

# आ ख्या यि का

## भारत काल–

### १ प्रभास व सांदिपनी आणि श्रीकृष्ण.

**उज्जयनी** येथें महांकालेश्वर ज्योतिर्लिंग आहे. गांवालगत क्षिप्रा नदी वाहते. पाणी नेहमीं मुबलक असतें. क्षिप्रेंत कांसवें फार मोठीं असतात. या उज्जयनी क्षेत्रांत सांदिपनी ऋषींचा आश्रम होता. या आश्रमांत दूरदूरचे विद्यार्थी विद्या शिकावयास येत असत. यामुळें सांदिपनींच्या आश्रमाला विद्यापीठाचें स्वरूप आलेलें होतें. म्हणून सांदिपनींना कुलपती म्हणत. याच आश्रमांत विद्या शिकण्यासाठीं पोरबंदरचा सुदामा व श्रीकृष्ण-बलरामाची जोडी गेली होती. वयाच्या सोळाव्या वर्षीं अवघ्या दोन महिन्यांत धनुर्वेद व इतर विद्यांचें शिक्षण गोपालकृष्ण व बलरामांनीं आत्मसात केलें. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आश्रमांतून जातेवेळीं कृष्णांनी गुरुजींना नमस्कार करून नम्रपणानें विचारलें, ‘ गुरुजी ! गुरुदक्षिणा काय देऊं ? आपला मनोदय असेल त्याप्रमाणें सेवा करीन.’

सांदिपनी म्हणाले–‘ कृष्णा ! तुझ्यासारखा शिष्य लाभला यांतच सारी गुरुदक्षिणा मला मिळाली. मला कांहीं नको, माझे मनोरथ सफल झाले ! ’ हें निस्पृहपणाचें गुरुवचन ऐकल्यावर कृष्णांनीं आपल्या गुरुपत्नींना विचारलें,– ‘ आई ! आपणास कांहींतरी मला द्यावेसें वाटतें. काय देऊं ? मला मोकळेपणानें सांगा ! ’ गुरुपत्नींचें कृष्णावर अत्यंत प्रेम होतें. गुरुगृहीं प्रत्यक्ष मुसळधार पावसांत कोरडी लाकडें वाहून आणण्यासारखीं कामें करणाऱ्या कृष्णावर कां प्रेम असूं नये ? गुरुपत्नीच्या नेत्रांना अश्रु आलेले चाणाक्ष कृष्णाच्या लक्षांत आलें. कृष्णानें मातेला दुःखाचें कारण विचारलें. पण त्या माऊली सांगेनात. तेव्हां कृष्णानें आग्रहच धरला. नंतर गुरुपत्नींनीं आपल्या प्रभास क्षेत्रांत गेलेल्या एकुलत्या एक मुलाचा वृत्तांत सांगितला. ‘ तुला द्यावयाचेंच असेल तर माझा मुलगा परत आणून दे. ’ असें त्या माऊलीनें सुचविलें.

एकदां सांदिपनी चातुर्मास्याकरितां प्रभास क्षेत्रांत शिष्यगणासह आले. येथें त्यांचा एकुलता एक मुलगा पंचजन-असुरानें किमिमाशाचें रूप घेऊन गिळला. ( मोठ्या समुद्रांत असणारा, मोठे दांत असलेला मासा. ) त्या मुलाला पंचजन असुरानें होडींतून पळविल्याचीहि आख्यायिका आहे. त्या असुरानें तो मुलगा दीव बेटांत विकला. मुलाचा शोध न लागल्यामुळें तो मृत झाला असाच समज झाला. मुनींना अत्यंत दु:ख झालें. ते त्यानंतर आपल्या आश्रमाला परतले.

कृष्णाला हा वृत्तांत गुरुपत्नीकडून कळला. तेव्हां मुलगा परत आणून देण्याचें वचन देऊन गोपालकृष्ण प्रभासला गेले. कृष्णांनीं तेथें पुष्कळ तपास केला परंतु मुलाचा तपास लागेना. शेवटीं समुद्रावरील होडीवाल्यांचेकडे सुगावा लागला. म्हणून त्यांनीं पंचजन असुराला शिक्षा करण्याचा धाक दाखविला. तो असुर शरण आला, पण मुलगा विकल्याचें त्यानें सांगितलें. नंतर ज्याचेकडे मुलगा होता त्याचेकडून तो परत मिळविला. आणि नंतर कृष्णांनीं तो आपल्या गुरुजींना नेऊन दिला. कांहीं ठिकाणीं किमिमाशानें गिळलेला मुलगा त्याचें पोट फोडून आणला अशीहि दंतकथा आहे. होडीवर असणारा ध्वज हें त्या पंचजनाचें स्मारक आहे असें म्हणतात. कृष्णांनीं असुरावर दया दाखविल्यामुळें त्यांनीं भेट म्हणून 'पांचजन्य' शंख कृष्णाला अर्पण केला.

श्रीमद्भागवतांतील कथेचें स्वरूप थोडें निराळें आहे. दशम स्कंधांत अ. ४५ यांत अशी कथा आहे–

सांदिपनींनीं कृष्णाला सहा शास्त्रें, सहा अंगें, उपनिषदें, वेद व मंत्र आणि देवतासह धनुर्वेद शिकविला.

**प्रोवाच वेदान् अखिलान् सांगोपनिषदो गुरुः ॥**
**सरहस्यं धनुर्वेदं धर्मान् न्यायपथांस्तथा ॥ ३४ ॥**

त्याचप्रमाणें मनुस्मृति, राजधर्म, धर्मशास्त्रें, मीमांसा वगैरे षड्विध राजनीति–शिक्षण दिलें.

**तथा चान्वीक्षिकीं विद्यां राजनीतिं च षड्विधाम् ।**
**कुसान्निगदमात्रेण तौ संजगृहतुर्नृप ॥३६॥** भा. द. स्कं. अ. ४५

या विषयांच्याबरोबर चौसष्ट कलाहि शिकविल्या. एकदां पाठ दिला कीं पुरें. कृतविद्य होऊन परत जातेवेळीं श्रीकृष्णांनीं गुरुंना

गुरुदक्षिणेबद्दल विचारलें. त्यांनीं 'प्रभास क्षेत्रांत समुद्रांत बुडालेला मुलगा आणून दे.' म्हणून सांगितलें. श्रीकृष्ण प्रभास क्षेत्रीं समुद्रकांठीं बसले. मनुष्यरूप धारण करून समुद्र प्रकट झाला. व कृष्णांना ईश्वर समजून त्यांची पूजा केली. आणि 'कशाकरितां आला तें सांगा' म्हणून प्रश्न केला.

कृष्ण म्हणाले:–'लाटेबरोबर तूं गुरुपुत्र बुडविलास तो मला परत आणून दे.' समुद्र म्हणतो–

**नैवाहार्षमहं देव दैत्यः पंचजनो महान् ॥**
**अंतर्जलचरः कृष्ण शंखरूपधरोऽसुरः ॥ ४० ॥**

मुलगा मी बुडविला नाहीं. शंखाचें रूप घेणाऱ्या असुरानें तो नेला आहे. हें कळतांच कृष्णांनीं सागरांत प्रवेश केला.

**जलमाविश्य तं हत्वा नापश्यदुदरेऽर्भकम् ॥ ४१ ॥**

असुरास हुडकून त्याचा वध केला. व त्याचें पोट फोडून पाहिलें. त्यांत तो आढळला नाहीं. नंतर असुराच्या देहापासून सिद्ध झालेला पांचजन्य शंख घेऊन श्रीकृष्ण रथारूढ झाले. यमाच्या संयमनी नगरींत त्यांनीं प्रवेश केला. पांचजन्य शंख वाजविला व यमधर्मास सूचना दिली.

**ततः संयमनी नाम यमस्य दयितां पुरीम् ॥**
**गत्वा जनार्दनः शखं प्रदध्मौ स हलायुधः ॥ ४२ ॥**

त्यावेळीं बलरामहि बरोबर होते. यम लगबगीनें सामोरा आला. त्यानें कृष्णाची पूजा केली व विचारलें-'भगवंता ! तुझी काय आज्ञा आहे?'

श्रीकृष्ण म्हणाले– 'तुझ्या दूतांनीं गुरुपुत्र आणला आहे. तो आमच्या स्वाधीन कर.'

**गुरुपुत्रमिहानीतं निजकर्म निबंधनम् ॥**
**आनयस्व महाराज मच्छासनपुरस्कृतः ॥**

'तुझ्या दूतांनीं केलेलें कर्म योग्यच आहे, त्यांत त्यांची चूक नाहीं. त्याच्या कर्मानुसार तो आला आहे. परंतु माझ्या आज्ञेनें

सोडण्यांत तुला दोष लागणार नाहीं. अशी आज्ञा होतांच यमधर्मांनीं तत्काळ गुरुपुत्र कृष्णाच्या स्वाधीन केला. त्यास रथांत बसवून नंतर श्रीकृष्ण गुरूकडे गेले. व त्यांच्या स्वाधीन मुलाला केलें. गुरुजींनीं आशीर्वाद दिला.

प्रभास क्षेत्रांत भगवान् शंकराच्या कृपेनें आपणास गुरुदक्षिणा पुरी करितां आली, म्हणून गोपालकृष्णांनीं सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करून रौप्यमंदिर बांधिलें कांहीं ठिकाणीं त्रेतायुगांत रावणानें चांदीचें ( रौप्य ) मंदिर बांधिलें व द्वापारांत कृष्णानें चंदनी लांकडांनीं देऊळ बांधल्याच्या आख्यायिका आहेत. त्यापूर्वींचें सुवर्णमंदिर कधींच नाहींसें झालें होतें. अशा रीतीनें हा दुसऱ्यावेळीं श्री सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार झाला.

**टीप**–शंखासुर किंवा पांचजनासुर यासंबंधीं अलिकडे झालेल्या संशोधनावरून एक नवा तर्क करितात तो असा कीं, बाबीलोनची राजधानी निनिव्हे ही होती. तिचा अर्थ शोणितपुर. असीरियाचा सर्वांत प्रतापी राजा असुरबाणीपाद हाच बाणासुर असावा. यानेंच किंवा याच्या व्यापाऱ्यांनीं सांदिपनीच्या पुत्राला पळविलें असावें आणि मग श्रीकृष्णाच्या दबावामुळें त्याला परत दिलें असावें.

बाबीलोनीयाच्या व्यापाऱ्यांचा प्रभास तीर्थाशीं बराच व्यापारी संबंध समुद्रमार्गें किंवा खुष्कीच्या मार्गें सतत सुरूं होता. यावरून हें वरील अनुमान निघतें.

( आधार– वल्लभ विद्यानगर संशोधन पत्रिका )

## आख्यायिका २ – प्रभास व यादवी

प्रभास क्षेत्राहून सतरा मैलांवर ' यादवी ' झाली. मृत्युसूचक उत्पात होऊं लागले. गोपालकृष्णांनीं सर्व यादवांना द्वारका सोडावयास सांगितलें. स्त्रिया, वृद्ध, बाल यांनीं शंखोद्धार बेटांत जावें व इतरांनीं प्रभासला जावें असें ठरलें.

**वयं प्रभासं यास्यामो यत्र प्रत्यक् सरस्वती ॥** भाग. ११ स्कं.

त्याप्रमाणें प्रभासक्षेत्रीं जाऊन तीर्थविधि वगैरे शास्त्रोक्त कर्में व अरिष्टशांत्यर्थ उपोषणें, दानें वगैरे सत्कृत्यें करावीं असें श्रीकृष्णांचें

म्हणणें यादवांनीं मान्य केलें. समुद्र उल्लंघन करून ते प्रभासला गेले. तेथें धार्मिक विधि केले. पण त्यानंतर ते 'मैरेयक' मद्य यथेष्ट प्याले. मद्यानें यादवांची मति भ्रष्ट होऊन त्यांचा आपआपसांत कलह माजला. सारीं नातीं यादव विसरले. शस्त्रास्त्रें संपलीं. ब्रह्मशापानें ग्रासलेले ते यादव समुद्रतीरीं उत्पन्न झालेले लव्हाळे हातांत घेऊन परस्परांना मारूं लागले. श्रीरामकृष्णांना शत्रू समजून त्यांचेवर प्रहार करण्यापर्यंत त्यांची मजल पोंचली. शेवटीं क्रुद्ध झालेल्या श्रीकृष्णबलरामांच्या विलक्षण शक्तींनीं यादवांचा संहार झाला. उन्मत्तांचा भार भूमीला होत होता, तो नष्ट झाला. अशा सर्व यादवींचें ठिकाण प्रभासजवळच आहे. तेथें जवळच पूर्वीं समुद्र होता. पण आतां तो बराच हटलेला दिसतो.

## आख्यायिका ३ – प्रभास व बलरामाचें निर्याण

यादवांचा नाश झाल्यावर बलराम श्रीकृष्णांनीं प्रभास क्षेत्रांत आपला पार्थिव देह ठेविला. आतां आपलें अवतारकार्य संपलें असें समजून बलराम प्रभास क्षेत्राला आले. आणि समुद्रतीरावर परमपुरुषाचें ध्यान करून मानुषदेहाचा त्यांनीं त्याग केला.

**रामः समुद्रवेलायां योगमास्थाय पौरुषम् ॥**
**तत्याज्य लोकं मानुष्यं संयोज्यात्मानमात्मनि ॥**

भाग.११स्कं.३०-२६

बलराम अगोदर प्रभासला गेले. नंतर कृष्ण निघाले. समुद्रतीरीं बलराम योगासन घालून ध्यान करीत असतांना त्यांच्या मुखांतून श्वेत नाग बाहेर आला, तो आपल्या मूळच्या देहानें ( बलराम हे शेषाचे अवतार ) समुद्रमार्गें पाताळांत श्रीमुखविवरद्वारां स्वस्थानीं गेला. हें ठिकाण प्रभास क्षेत्रांत जवळ आहे.

**ततो गत्वा केशवः तं ददर्श । रामं वने स्थितमेकं विविक्ते ॥**
**अथापश्यद्योगयुक्तस्य तस्य । नागं मुखान्निश्चरन्तं महान्तम् ॥**

मौसल प.अ.४-१३

याप्रमाणें बलराम मूळ देह धारण करून स्वस्थानीं गेले. त्यांचा पार्थिव देह तेथेंच पडला. तें भगवंतांनीं पाहिलें व आपल्याहि अवतार समाप्तीची वेळ आल्याचें ओळखून श्रीकृष्णांनीं एकांत स्थान पाहिलें.

आख्यायिका ४ – श्रीकृष्णाचें महाप्रस्थान

**रामनिर्याणमालोक्य भगवान् देवकीसुतः ॥**
**निषसाद धरोपस्थे तूष्णीमासाद्य पिप्पलम् ॥**

भाग. ११ स्कं. ३०-२७

साऱ्या जगाला गीतेचा दिव्य संदेश देणारे भगवान् श्रीकृष्ण निजधामाला जाण्यासाठीं प्रभासजवळ एका पिंपळाखालीं बसले.

**ततो गते भर्तरि वासुदेवो । जानन्सर्वा गतयो दिव्यदृष्टिः ॥**
**वने शून्ये विचरंश्चिंतयानो । भूमौ चाथ संविवेशाग्र्य तेजाः ॥**

अश्वत्थवृक्षातळीं वीरासन घालून उजवा पाय खालीं, आरक्त असा डावा पाय वर ठेऊन बसलेले श्रीकृष्ण त्यावेळीं अत्यंत तेजस्वी दिसूं लागले, अंतकालचें तें श्रीकृष्णाचें ध्यान शुकाचार्यांनीं भागवतांत मोठ्या गौरवानें वर्णन केलें आहे. अशा अवस्थेंत जवळच्या जरा पारध्याला श्रीकृष्णांचा तळपाय हरिण मुखासारखा दिसला, म्हणून त्यानें त्या रोखानें बाण सोडला.

**मृगास्याकारं तच्चरणं विव्याध मृगशंकया ॥**

आणि तो बाण श्रीकृष्णाच्या डाव्या पायांत शिरला. व्याध विजयानें आनंदित होऊन शिकार घेण्यासाठीं जवळ येतांच त्याला अत्यंत दुःख झालें. आपण ज्याची शिकार केली, तो पाय जगच्चालक भगवान् श्रीकृष्णाचा हें पारध्याला समजलें. श्रीकृष्णांच्या त्या चतुर्भुज स्वरूपाला त्यानें नमस्कार केला. ‘ हें केवढें पाप माझ्या हांतून घडलें. ’ म्हणून त्याच्या शरीराला कंप सुटला. तो रडूं लागला. त्यानें भगवंताच्या चरणाला मिठी मारली. श्रीकृष्णांनीं त्याला अभय दिलें.

**स केशवं योगयुक्तं शयानं मृगासक्तो लुब्धकः सायकेन ॥**मो.प.४

श्रीकृष्ण म्हणाले–‘ ब्रह्मशापानें हें घडलें आहे. यांत तुझा कांहींच अपराध नाहीं. माझे मनोरथ तूं पूर्ण केल्यामुळें उत्तम लोक तुला प्राप्त होऊन सद्गति मिळेल. मनांतील विकल्प सोडून दे. ’ इतक्यांत शृंगारलेलें एक विमान खालीं उतरलें. श्रीकृष्णाच्या आज्ञेनें व्याध त्यांत बसून स्वर्लोकीं गेला. इकडे श्रीकृष्णाचा सारथी दारुक त्यांना हुडकण्याकरितां

आला असतां श्रीकृष्णाच्या ठिकाणीं त्यानें महातेज पाहिलें. भगवंताला साष्टांग नमस्कार घातला. तो देवाची स्तुति करूं लागला. इतक्यांत गरुडध्वजानें युक्त श्रीकृष्णाचा रथ घोडयासह ऊर्ध्व गतीनें आकाशांत दिसेनासा झाला. रथाबरोबर श्रीकृष्णाचें सारें ऐश्वर्य गेलें. दिव्य आयुधें गेलीं. भगवंतानीं दारुकाला घडलेलें वृत्त आपल्या आप्तमंडळींना सांगण्याची आज्ञा केली. व सर्व आप्तेष्टांना इंद्रप्रस्थाला घेऊन जावयास सांगितलें. दारुकाला दिव्य ज्ञान देऊन दु:खमुक्त केलें. नंतर तो प्रदक्षिणा घालून व नमस्कार करून तेथून कृष्णाज्ञेप्रमाणें परत निघाला.

इकडे सारे देव दर्शनाकरितां येऊं लागले. श्रीकृष्णांनीं डोळे मिटून समाधि लावली. ती योगसमाधि कायमचीच होती. अशा तऱ्हेनें श्रीकृष्ण निजधामाला गेले. तत्पूर्वीं त्यांनीं उद्धवाला व मैत्रेयाला ज्ञानोपदेश करून बद्रिनारायणास पाठविलें. अशा जगद्वंद्य अलौकिक पुरुषोत्तमाची शिकार याच प्रभास पट्टणांत झाली. नंतर हा वृत्तांत दारुकाकडून अर्जुनाला कळल्यावर अर्जुन त्यांचे पार्थिव देह हुडकण्याकरितां आला. त्यानें त्याचा तपास केल्यावर जवळच हिरण्या नदीच्या तीरावर बलराम व कृष्ण यांच्या पार्थिव देहाला अग्निसंस्कार केला.

**ततः शरीरे रामस्य वासुदेवस्य चोभयोः ॥**
**अन्विष्य दाहयामास पुरुषैराप्तकारिभिः ॥**

नंतर आप्तेष्टांनीं शास्त्रोक्त अंत्य संस्कार केले.

**स तेषां विधिवत् कृत्वा प्रेतकार्याणि पांडवः ॥**
**सप्तमे दिवसे प्रायात् रथमारुह्य सत्वरः ॥**
**अर्जुनोऽपि तदान्विष्य कृष्णरामकलेवरे ॥**
**संस्कारं लभयामास—**

उभयतांची रक्षा अर्जुनानें अनेक तीर्थांत विसर्जन केली. नंतर गोपालकृष्णाच्या कांहीं स्त्रियांनीं त्याच ठिकाणीं अग्निप्रवेश केला. व कांहीं स्त्रिया वनांत तपस्येसाठीं गेल्या.

**रुक्मिणी त्वथ गांधारी शैब्या हैमवतीत्यपि ।**
**देवी जांबवती चैव विविशुर्जातवेदसम् ॥ ७३ ॥**

**सत्यभामा तथैवान्या देव्यः कृष्णस्य संमताः ।**
**वनं प्रविविशू राजंस्तापस्ये कृतनिश्चयाः ॥७४॥** मौ. प. अ. ७

रुक्मिणी वगैरे स्त्रिया अग्निप्रवेश करून सती गेल्या, त्या ठिकाणाला देहोत्सर्ग म्हणतात. तेथेंच राम-कृष्णांच्या देहाला संस्कार झाला. तेथें पूर्वीं पादुका व मूर्ति होत्या. त्या कालांतरानें नष्ट झालेल्या दिसतात. येथें कीर्तिस्तंभ उभारून मोठें स्मारक व्हावें एतदर्थ कीर्तिस्तंभाचा पाया राष्ट्राध्यक्ष श्री. राजेंद्रप्रसादबाबूजींच्या हस्तें रचिला.

बलराम व कृष्ण यांच्या स्त्रियांनीं अग्निप्रवेश केल्याचा भागवतांत उल्लेख आहे.

**रामपत्न्यश्च तद्देहमुपगुह्याग्निमाविशन् ।**
**कृष्णपत्न्योऽविशन्नग्निं रुक्मिण्याद्यास्तदात्मिकाः ॥**

भाग. ११।३१।२०

अर्थः– बलरामस्त्रिया त्याच्या देहाला आलिंगन देऊन अग्निप्रवेश करित्या झाल्या. व रुक्मिणी आदिकरून तद्रूप झालेल्या कृष्णस्त्रियांनीं अग्निप्रवेश केला.

श्रीकृष्ण योगासन घालून बसलेल्या ठिकाणाला भल्लक किंवा भल्लाक क्षेत्र (भालक तीर्थ) म्हणतात. तेथें दोन कुंडे असून कुंडांत शिवलिंग आहे व अश्वत्थ वृक्ष आहे. तेथेंच कृष्णमूर्ति दाखवितात. जेथून बाण मारला तें ठिकाण दाखविणाऱ्या कृष्णमूर्तिसमोर एक खिडकी आहे. त्या खिडकींतून बाण मारलेली जागा व त्या ठिकाणीं बांधलेलें छोटेसें स्मारक आजहि दिसतें. या दोन ठिकाणीं जाण्याकरितां प्रशस्त सडक आहे. पूर्वींप्रमाणें सध्यां त्या जागेभोंवतीं अरण्य मात्र नाहीं. सोमनाथाच्या जवळच्या हिरण्या नदींत श्रीकृष्णांनीं जलसमाधि घेतल्याची दंतकथा स्थानिक लोक सांगतात. हा विदारक इतिहास घडलेलें हें स्थान पाहिलें म्हणजे मन थोडें विषण्ण झाल्याशिवाय राहात नाहीं.

## आख्यायिका ५ – **श्रीयोगीश्वर याज्ञवल्क्यांची तपोभूमि**

यजुर्वेदाचार्य योगीश्वर याज्ञवल्क्यमहर्षि यांचें प्रभास पट्टण हें कांहीं काल तपस्येचें स्थान होतें. यांनीं भगवान् सूर्य नारायणाची तपस्या करून यजुर्वेद मिळविला तो प्रभास क्षेत्रामध्यें. ती कथा अशी–

श्री याज्ञवल्क्य यांच्या वडिलांचें नांव देवरात किंवा यज्ञवल्क होय. ( यज्ञस्य वल्कः वक्ता–यज्ञवल्कः तस्य अपत्यं पुमान् याज्ञवल्क्यः) यज्ञवल्क हे सौराष्ट्रांतील म्हैसाणा जिल्ह्यांत बडनगरचे राहाणारे. याज्ञवल्क्यांचा काल म्हणजे जनमेजय राजाच्या वेळचा. कै. श्री. चिंतामणराव वैद्य यांच्या मतानुसार सहा हजार वर्षापूर्वीचा हा काळ असावा. भारत कालाचा शेवट आणि कलीचा प्रारंभ असा हा काळ आहे. हे याज्ञवल्क्य मुनी विश्वामित्रापासून पांचवे पुरुष होत. सूर्याच्या व अग्नीच्या प्रखर उपासनेनें याज्ञवल्क्यांचा जन्म झाला. श्रावण शुद्ध पौर्णिमा हा याज्ञवल्क्यांचा जन्मकाल मानितात.

याज्ञवल्क्यांचें उपनयन झाल्यावर देवरातांनीं आपल्या मुलास विदग्धशाकल्य ऋषीकडे वेदाध्ययनासाठीं ठेविलें. चमत्कार क्षेत्रांत (बडनगरला) चातुर्मास्याकरितां आनर्त देशाचा सुप्रिय राजा वास्तव्याकरितां एकदां येऊन राहिला होता. त्याच्या विनंतीवरून शाकल्य नित्य एक विद्यार्थी शांतिक-पौष्टिक कर्म करण्यासाठीं राजाकडे पाठवी. ऋषींचा आश्रम मोठा, विद्यार्थी गणहि बराच होता. तो आश्रम म्हणजे त्या काळचे प्रसिद्ध विद्यापीठच. विद्यार्थ्यानें राजाकडे जाऊन याज्ञिककर्म करून भोजनादिक उरकल्यानंतर राजाला आशीर्वाद द्यावा, व मंत्राक्षता देऊन आश्रमांत परतावें, असा नियम असे. एकदां पौरोहित्य करण्याची पाळी श्रीयाज्ञवल्क्यांचेवर आली. विद्यार्थी दशेंतहि ते अत्यंत तेजस्वी होते. सर्व कर्म आटोपल्यावर पंचागरुद्रानें पुष्पगंधमिश्रित अभिमंत्रित जलानें राजास अभिषेक करण्यास प्रवृत्त झाले असतां मंत्रोच्चारानें जलसिंचन करणार इतक्यांत राजास त्यांच्या वर्तनाबद्दल संशय येऊन राजानें विकट हास्य केलें. तो म्हणाला–'मी झोपेंतून उठलों आहे, तरी तूं या मंत्राक्षता अश्वशाळेसमोरच्या काष्ट स्तंभावर टाक.' ( कांहीं ठिकाणीं पलंगावर टाकण्यास सांगण्याचा उल्लेख आहे. ) राजाचें तें हास्य व मंत्रित जलाक्षतांचा उपमर्द याज्ञवल्क्यांना सहन झाला नाहीं. तरीहि न रागावतां परब्रह्माचें ध्यान करून त्यांनीं तें जल समोरच्या स्तंभावर टाकलें. दक्षिणा न घेतां याज्ञवल्क्य परत आश्रमाकडे जाऊं लागले.

**क्षिप्त्वा तत्र जलं विप्रः साक्षतं गृहमागतः ।**
**अगृह्य दाक्षिणां तस्य पार्थिवस्य यथा स्थिताम् ॥ १८ ॥**

स्कं. पु. ना. खं अ. १७

कांहीं वेळानें पल्लवांनीं व फळांनीं युक्त असा तो स्तंभ पहातांच राजाला पश्चात्ताप झाला. ऋषींची अवहेलना केल्याबद्दल वाईट वाटलें. इतक्यांत राजा कळवळ्यानें म्हणाला–' त्याच मंत्रानें मला अभिमंत्रण कर.'

याज्ञवल्क्य म्हणाले–' तूं अभिमंत्रणाला अयोग्य आहेस, तेव्हां मी परत जातो.' राजानें द्रव्याची लालूच दाखविली. पण याज्ञवल्क्य द्रव्याच्या लालचीनें विद्या विफल करणारे लोभी नव्हते. ते तडक निघून गेले. राजाला मोठी हळहळ वाटली. दुसरें दिवशीं त्यानें शाकल्याकडे कालचाच विद्यार्थी पाठविण्याविषयीं आपल्या दूताकरवीं निमंत्रण पाठविलें. म्हणून काल कोण राजाकडे गेले असें मुनीनीं विचारलें. तेव्हां याज्ञवल्क्य गेल्याचें कळलें. ऋषीनीं याज्ञवल्क्यांना पुन्हां राजाकडे जाण्याची आज्ञा केली. घडलेला सारा वृत्तांत याज्ञवल्क्यांनीं गुरुजींना सांगितला. " राजानें माझ्या मंत्राचा अपमान केल्यामुळें अशा गर्विष्ठ व दुर्मति राजाकडे मला कृपा करून पाठवूं नका." अशी विनंती केली.

**नाहं तात गमिष्यामि शान्त्यर्थं तस्य मंदिरे ।**
**अवलेपेन युक्तस्य शुद्धया विरहितस्य च ॥**

ऋषी म्हणाले–' आपण राजाचे देशांत राहातो, राजाचा आपणास मोठा आश्रय आहे. आपल्या आश्रमाला राजा सर्वस्वी मदत करीत असतो. अशा स्थितींत राजाच्या निमंत्रणाचा अव्हेर करणें बरें नाहीं. राज्यांत राहून राजाविरुद्ध वर्तन करणें यांत आपलें नुकसान आहे. आपण राजाची कृति मनावर न घेतां आपलें कार्य साधलें पाहिजे. मी गुरु, आज्ञा करितो ती तूं मान.' वगैरे. मुनींचें भाषण ऐकून याज्ञवल्क्य म्हणाले–' महाराज ! मला क्षमा करा. राजाकडे जाण्याची सक्ति करूं नका. मी राजाकडे गेल्यानें माझें मंत्रसामर्थ्य नष्ट होईल. तरी विपरीत आज्ञा मला आपण करूं नये, अशी प्रार्थना आहे.' राजानें विशेष आग्रह केल्यामुळें याज्ञवल्क्याला राजाकडे जाण्याची आज्ञा केली तरीहि ते जाईनात, म्हणून गुरुजी रागावले, ' गुर्वाज्ञा भंग करितोस, म्हणून ब्रह्मशापानें तुला नष्ट करीन' असें म्हणाले. याज्ञवल्क्य तितक्याच अभिनिवेशानें म्हणाले कीं,–' आपण जर अन्यायानें शाप देणार असाल तर त्याची प्रतिक्रिया मलाहि अनिच्छेनें करणें भाग पडेल. अशा क्षुल्लक

कारणांसाठीं वं राजांच्या लहरीकरितां शापाच्या निमित्तानें आपल्या तपस्येचा भंग करणार असाल तर आपण माझे गुरु नव्हे, असें मी समजतों.'

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ॥ २७८ ॥ स्कं. पु.

हें याज्ञवल्क्यांचें भाषण ऐकून गुरुजी संतापानें म्हणाले–' असें असेल तर माझें विद्याधन मला परत देऊन टाक.' शेवटीं 'क्षुरिका-मुंड कल्पानें' जल प्राशन केल्यावर शिथिल गात्र होऊन त्यांनीं वांती रूपानें ऋग्वेद विद्या बाहेर टाकिली. लगेच प्रभास क्षेत्रीं येऊन तेथें आपले मातामह श्रीवैशंपायन महर्षि यांचेकडे विद्याभ्यास चालविला.

वैशंपायनांच्या आश्रमांत याज्ञवल्क्य राहूं लागल्यानंतर थोड्याच कालांत त्यांचें तेज आश्रमीयांना कळूं लागलें. कांहीं दिवसांनीं वैशंपायन महर्षींकडून न कळत बालहत्या घडली. अंधारांतून घाईनें जात असतांना बाल अर्भकावर पाय पडून तें बालक मृत झालें. त्याचें प्रायश्चित म्हणून तीर्थयात्रेस जावें असें ठरलें. पण वृद्धपणामुळें त्यांना ही गोष्ट कठीण होती. त्यांनीं आपल्या शिष्यांना आपलें ऐवजीं प्रायश्चित घेण्याची आज्ञा केली. ते म्हणाले–' शिष्यानों ! मला या पापापासून मुक्त करा ' तेव्हां याज्ञवल्क्य गुरुजींना म्हणाले–' गुरुजी ! सगळ्या छात्रगणांना त्रास कशाला ? मी एकटा प्रायश्चित घेतों आणि आपणास पापमुक्त करितों.'

अहमेकः करिष्यामि तिष्ठंतु मुनयस्त्विमे ॥ वायु पुराण

याचा अर्थ वैशंपायन विपरीत समजले. ' तूं इतरांचा अवमान करून त्यांना निस्तेज समजतोस व आपली प्रौढी मिरवितोस, असा शिष्य मला नको, माझ्या अध्ययनाचा त्याग करून तूं येथून जा.' असें त्यांनीं याज्ञवल्क्यास बजावलें. गुरुजींची परोपरीनें विनवणी करून झालेला विपरीत ग्रह मनांतून काढून टाकण्याचा शिष्यवरानें बराच प्रयत्न केला. पण व्यर्थ ! तेव्हां याज्ञवल्क्य म्हणाले–' विपर्यास करणाराची ही विद्या मला नको ! ' म्हणून विद्येचा त्याग करून आतां कोणाहि गुरुकडे जावयाचें नाही, असा निर्धार करून तेथून त्यांनीं जवळच संगमावर प्रयाण केलें. प्रभास क्षेत्रानजिक हिरण्या, कपिला आणि

ग्रं. क्र. १०७९३

सरस्वति यांच्या त्रिवेणी संगमावर श्री सूर्यनारायणाच्या अर्धवर्तुळाकार द्वादशमूर्ति याज्ञवल्क्यांनीं स्थापिल्या. नंतर विश्वामित्र सरोवरांत स्नान करून मूर्तींच्या समोर उभे राहून तपस्या आरंभिली.

**टीप** – नांवें–१ धाता, २ मित्र, ३ अर्यमा, ४ शक्र, ५ वरुण, ६ सांब, ७ भग, ८ विवस्वत, ९ पूषा, १० सविता, ११ त्वष्टा, १२ विष्णु.

उपनयन प्रसंगीं वडिलांकडून मिळालेला गायत्री मंत्रच फक्त त्यांचेजवळ होता. त्या मंत्रानें याज्ञवल्क्यांनीं सूर्य मंडलगत परब्रह्माचें ध्यान कित्येक वर्षें केलें. शेवटीं श्रावण शु।। १४ युक्त पोर्णिमेस माध्यान्हीं श्रीसूर्यनारायण प्रसन्न होऊन वर देण्याकरितां सिद्ध पुरुष रूपानें प्रकट झाले. तो प्रसंग या प्रभास क्षेत्रांत संगमावर घडला. नंतर श्रीयाज्ञवल्क्यांनीं श्रीसूर्यनारायणाची स्तुति केली. त्यापैकीं कांहीं उत्कृष्ट श्लोक खालीं देत आहे.

**नमः सवित्रे जगदेकचक्षुषे । जगत्प्रसूतिस्थितिनाशहेतवे ॥**
**त्रयीमयाय त्रिगुणात्मधारिणे । विरिंचि नारायण शंकरात्मने ॥१॥**
**यस्योदयेनेह जगत्प्रबुध्यते । प्रवर्तते चाखिलकर्मसिद्धये ॥**
**ब्रह्मेंद्रनारायणरुद्रवंदितः । स नः सदा यच्छतु मंगलं रविः ॥२॥**
**नमोऽस्तु सूर्याय सहस्ररश्मये । सहस्रशाखान्वितसंभवात्मने ॥**
**सहस्रयागोद्भवभावभागिने । सहस्रसंख्यायुगधारिणे नमः ॥३॥**
**यन्मंडलं दीप्तिकरं विशालं । रत्नप्रभं तीव्रमनादिरूपम् ॥**
**दारिद्र्यदुःखक्षयकारिणंच । पुनातु मां तत्सवितुर्वरेण्यम् ॥४॥**
**यन्मंडलं वेदविदोपगीतम् । यद्योगिनां योयपथानुगम्यम् ।**
**तत्सर्ववेदं प्रणमामि सूर्यं । पुनातु मां तत्सवितुर्वरेण्यम् ॥५॥**
**यस्योदयास्तसमये सुरमुकुटनिघृष्टचरणकमलोऽपि ॥**
**कुरुतेऽजालिं त्रिनेत्रः सजयति धाम्नां निधिः सूर्यः ॥६॥**
**जयतिजनानंदकरः करनिकरनिरस्ततिमिरसंघातः ॥**
**लोकालोकालोकः कमलारुणमंडलः सूर्यः ॥ ७ ॥** श्रीसूर्यस्तोत्रम्

कडक तपस्येनंतर श्रीसूर्यनारायणाकडून श्रीयाज्ञवल्वयांना शुक्ल यजुर्वेद मिळाला, तें स्थान प्रभास क्षेत्र होय. मेरुप्रदक्षिणचेवेळीं सूर्य-

रथाच्या अश्वांच्या कानांत याज्ञवल्क्यांना 'लघिमा' विद्येनें श्रीसूर्यनारायणांनीं सूक्ष्म रूप धारण करावयास लावून बसण्यास सांगितलें. सारस्वत मंत्रानें एकपाठी शक्ति दिली. आपण स्वतः पृथ्वीला प्रदक्षिणा घालतेसमयीं वेद म्हणावयास सुरवात केली. याज्ञवल्क्यांनीं तो वेद तत्काळ ग्रहण केला. तोच शुक्ल यजुर्वेद होय. असें अनेक प्रसंग प्रभास क्षेत्रांत घडल्यानें त्या क्षेत्राला मोठें महत्व प्राप्त झालें आहे.

## आख्यायिका ६ – पांडवांचा संबंध

पांडव वनवासांत होते. अर्जुन पाशुपतास्त्रप्राप्तीसाठीं तपस्या करण्याकरितां गेला असतांना धर्मादिक पांडवांनीं या प्रभास क्षेत्रांत कांहीं काल वास्तव्य केलें. द्वारका जवळ असूनहि पांडव गोपालकृष्णांना भेटावयास जाऊं शकलें नाहींत. कारण वनवासाची प्रतिज्ञा ग्रामप्रवेशानें भंग पावेल, म्हणून ते प्रभास क्षेत्रांतच राहिले. क्षेत्राला शास्त्रानें ग्रामप्रवेशाचें बंधन सांगितलेलें नाहीं. क्षेत्रांत राहण्यास प्रत्यवाय नव्हता, म्हणूनच पांडवांना प्रभास क्षेत्रांत राहतां आले. हें वृत्त श्रीकृष्ण बलरामांना कळतांच ते उभयतां मुद्दाम प्रभास क्षेत्रीं पांडवांना भेटण्यासाठीं आले. व कृष्णांनीं धर्माची भेट घेतली. व पुढील भवितव्याची चर्चा केली. ही घटना प्रभासलाच घडली.

## आख्यायिका ७ – बलरामाची प्रभास यात्रा

श्रीकृष्णांची शिष्टाई व्यर्थ गेली. दुर्योधनाच्या हट्टाग्रहानें युद्ध होणार हें निश्चित झालें होतें. युद्धाच्या निमित्तानें ज्ञातिबांधवांचा संहार व्हावा हें बलरामांना संमत नव्हतें. युद्धानें होणाऱ्या संहाराला प्रतिबंध व्हावा, असेंच त्यांना वाटे. आणि तसा त्यांचेकडून प्रयत्नहि झाला. आपापसांतील दुही युद्धपिपासूंचा नाश करील, तटस्थांनाहि त्याची झळ लागेल. म्हणून युद्ध टळावें असा बलरामाचा मानस होता. त्यांचें कोणींच मानलें नाहीं म्हणून ते अगतिक झाले. होणारा संहार पहाण्याचा प्रसंग टळावा, एतदर्थ त्यांनीं तीर्थयात्रेस जाण्याचें ठरविलें. त्यांच्या यात्रेचा प्रारंभ प्रभास क्षेत्रांतून झाला. त्या यात्रेच्या प्रारंभीं पुष्य नक्षत्र होतें, असा भारतांत उल्लेख आहे.

चत्वारिंशत् अहान्यद्य द्वे च मे निसृतस्य वै ॥
पुष्येण संप्रयातोऽस्मि श्रवणेन समागतः ॥ म. भा. शौ. प.

## आख्यायिका ८ — प्रभास व सुभद्राहरण

सुभद्राहरणाचा प्रसंग प्रभास क्षेत्रांतच घडला. ही श्रीकृष्ण बलरामाची बहीण. बलरामाच्या मनांत सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशीं व्हावा असें होतें. परंतु श्रीकृष्णाचे मनांत अर्जुनाबरोबर व्हावा असें होतें. एकदां ठरविलेली गोष्ट घडलीच पाहिजे यावर बलरामाचा मोठा कटाक्ष असे. म्हणून दादाशीं विरोध होऊं नये, अर्जुनाला तर सुभद्रा मिळावी, यादृष्टीनें कृष्णांनीं अर्जुनाला युक्ति सुचविली. अर्जुनाला तेंच हवें होतें. त्याप्रमाणें अर्जुनाची स्वारी संन्याशी बनून प्रभासला गेली. इकडे त्यापूर्वी कृष्णांनी दादांना प्रभास तीर्थाला परिवारासह नेलें. पर्वकालानिमित्त अनेक आचार सुरूं झाले. त्या प्रभासांत अर्जुन संन्याशी वेषांत हजर होतांच संन्यासी मोठे अधिकारी असल्याची वार्ता गांवभर पसरली. ती दादांचे कानावर तत्काळ गेली. लगेच दादांनीं संन्याशी बुवांना आपल्या घरीं आणलें. त्यांचें तेजःपुंज शरीर पाहिल्यावर दादासह सारे आश्चर्यचकित झाले. त्यांची सत्कारादि सेवा सुरूं झाली. सुभद्रेच्या मनांत अर्जुनाला वरावयाचें असूनहि दादांच्या हट्टापुढें आपल्या भावना व्यक्त करितां येईनात. हें फक्त कृष्णाला माहित होतें. कृष्णानें तिला आश्वासनहि दिलें होतें. संन्याशीबुवांनीं एकांतांत आपली जाणीव करून दिली आणि कृष्णाची संमती असल्याची हकीकत सुभद्रेला सांगितली आणि एक दिवस सुभद्रेसह संन्याशीबुवांनीं पलायन केलें. दादा रागावतांच कृष्णांनीं त्यांची समजूत घातली. अर्जुन-सुभद्रा विवाह होणें कसें आवश्यक आहे, हें पटविलें. नंतर दादा शांत झाले. दुर्योधनाला मात्र निराश व्हावें लागलें. अशा या आख्यायिका आहेत.

★ ★ ★

# ऐतिहासिक काल

**वेदकाळीं** सोमराजानें सोमनाथाचा जीर्णोद्धार करून सुवर्ण-मंदिर बांधिलें. कांहीं वर्षांनीं त्याचा नाश झाला. नंतर त्रेतायुगांत रावणानें रौप्य मंदिर बांधलें. ( कांहींच्या मतें श्रीकृष्णांनीं रौप्यमंदिर बांधिलें असें आहे.)

भारतकाळीं श्रीगोपालकृष्णांनीं चंदनी लांकडाचें मंदिर बांधून सोमनाथाचा जीर्णोद्धार केला. कालांतरानें तेंहि नष्ट झालें. नंतर जनतेनें त्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. तो काळ उत्तरोत्तर अत्यंत भरभराटीचा होता.

**सौवर्ण सोमराजो रजतमयमथो रावणोदारवीर्यः**
**कृष्णः श्रीभीमदेवो रुचिरतर महाग्रावणीः ॥** भावबृहस्पति प्रशस्ति

भीमानें बांधलेलें दगडाचें देऊळ हें महंमदाच्या वेळचें होय. त्यावेळीं स्थापत्यशास्त्र पराकोटीला गेलें होतें. श्रीकृष्णांनीं बांधिलेल्या चंदनी मंदिराला दीर्घकाळ उपसर्ग होऊं लागला, म्हणून वल्लभीय वंशांतील शैव राजांनीं देवळाचा जीर्णोद्धार केला. त्यावेळीं त्या देवळाची लांकडी बांधणी होती. (संवत ५५९ इ. स. ५०३ ते ७६३ ते ८१९ ताम्रपट) या शिवपूजक राजापूर्वी सूर्यपूजक राजे होते. त्यांनीं सूर्यमंदिर बांधिलें होतें. त्याच मंदिराची मशीद होऊन सध्यां त्यास्थानीं मशिदीऐवजीं वस्तु संग्रहालय आहे. तें पूर्वीचें सूर्यमंदिरच होय. सोमनाथाचें पहिलें व दुसरें देऊळ पशुपति संस्कृतीचें केंद्र होतें. तसेंच प्रभासहि होतें.

इ. स. दुसऱ्या शतकाच्याहि बऱ्याच आधीं प्रभास हें या संस्कृतीचें शेवटचे अध्वर्यु सोमशर्मा व लकुलिश यांचें निवासस्थान होतें. सोमनाथ मंदिर इ. स. च्या सुरवातीलाच पहिल्यांदा बांधलें असावें. दुसरें देऊळ इ. स. ६४० मध्यें बांधलें गेलें. पहिल्या देवळाच्या जागींच दुसऱ्याचा गाभारा होता. त्याला उघडा सभामंडप होता. या सभामंडपापासून समुद्रापर्यंत जाणाऱ्या पायऱ्या सांपडल्या आहेत. दक्षिण बाजूला समुद्र-

कांठीं तट होता. प्रभास क्षेत्रांत सूर्यमंदिर प्रसिद्ध होतें. युवानच्वांग या चिनी प्रवाशानें सौराष्ट्राला इ. स. ६४१ तें ६४४ च्या दरम्यान भेट दिली. भारतांतील चालीरीतीशीं सौराष्ट्राचें त्याला बरेच साम्य आढळलें. तो म्हणतो, लोकसंख्या दाट, धार्मिक संस्था वैभवांत होत्या. इ. स. ७११ ला मीरकासीमनें सिंधप्रांत काबीज केला. नंतर खलिपानें नेमलेल्या सुभेदारानें सौराष्ट्रावर स्वारी करून वल्लभ राजधानी जमीनदोस्त केली. त्यानें त्यावेळीं सोमनाथाच्या दुसऱ्या देवळाचा नाश केला. तिसरें देऊळ इ. स. ७२० च्या सुमारास पहलन वंशांतील राजा कृष्ण यानें बांधिलें असावें. पण श्री मुनशीजी आपल्या ग्रंथांत तें इ. स. ८०० च्या सुमारास बांधलें असावें असें म्हणतात. इ. स. ८१५ मध्यें दुसरा नागभट्ट उत्तर हिंदुस्थानचा सम्राट झाला. त्याची राजधानी कनोज. हा नित्य प्रभासला सोमनाथ पूजेसाठीं जाई, रैवतक पिंडतारक (Pandataraka) शंखोद्धार नी द्वारका या मार्गानें येत असे. त्यावेळीं देवळाचा काळ भरभराटीचा होता.

इ. स. ८१५ च्या काळांत सोमनाथ हें काशी क्षेत्राइतकें प्रसिद्ध होतें. अर्थात् याला कारण कनोजचे शैवोपासक राज्यकर्ते होत. इ. स. ७५० ते ९५० या दोनशें वर्षांत प्रभास बंदर हें प्रसिद्ध होतें. आणि सोमनाथ ही सौराष्ट्राची देवता होती. इ. स. ९६० मध्यें चालुक्य बंशांतील अनहिलवाडचा अनंतदेव नांवाचा शिलाहार राजा सैन्यासह सोमनाथाची पूजा करण्यासाठीं प्रभासमध्यें आला होता.

इ. स. ९४२ मध्यें मूळराज यानें ग्रहरिपु या अभीर राजाचा पराभव केला व तो अनहिलवाडपट्टणच्या गादीवर बसला. त्यानें सोमनाथाची पूजा करून देवाचें वैभव परत वाढविलें. इ. स. ९९९ सालांत परमार वंशांतील भोजराज अनहिलवाडच्या सिंहासनावर आला. तो मोठा शंकर भक्त. त्यानें सारें राज्य पादाक्रांत केलें. त्यानें शंकराचीं देवळें ठिकठिकाणीं बरींच बांधलीं, तो सोमनाथाला वरचेवर येऊन पूजा करीत असे. यानें सोमनाथवैभवांत बरीच भर घातली. हा सोमनाथ देवस्थानचा फार उज्वल काल होता. त्यावेळीं राजे महाराजांच्या आगमनानें, पूजादि कर्मांनीं व दानांनीं वृद्धि पावलेलें सोमनाथाचें वैभव जगभर विख्यात झालें.

सोमनाथ दर्शनाला येणारा भाविक वर्ग सोडला तर अन्यधर्मीय वा बुद्धिवादी चिकित्सकांची मति देव नी देवस्थानचें वैभव पाहून कुंठित होत असे.

**स्मशानेष्वाक्रीडा स्मरहरपिशाचाः सहचराः ॥**
**चिताभस्मालेपः स्रगपि नृकरोटी परिकरः ॥**
**अमंगल्यं शीलं........** ( महिम्नस्तोत्र )

असें भगवान शंकराचें रूप पण त्यानेंच भक्तांना ऐश्वर्य व मांगल्य लाभतें, त्यांचें परमकल्याण होतें. स्वतः नित्य स्मशानस्थ. परंतु भक्तगणांनीं त्यांना ऐश्वर्याच्या पार शिखरावर नेऊन बसविलें. उत्तरोत्तर देवाचें वैभव वाढूं लागलें.

सोळंकीवंश संस्थापक मूळराज यानें अनहिलवाडपत्त येथें राजधानी स्थापन केली. तो श्री सोमनाथाचा उपासक होता. त्यानें तें देवालय नंतर वाढविलें. परंतु.... ........

देवस्थानच्या खर्चाची बाब डोळे दिपविण्याइतकी आश्चर्यकारक होती. जमेचा आंकडाहि जगांतील साऱ्या भक्तगणांच्या देणग्यांनीं सारखा फुगत होता. हिऱ्यामाणकांची, सोन्यामोत्यांची, मण्यारत्नांची रास देवासमोर नित्य पडत असे. ज्या देवाचें वैभव मोठें तो देव श्रेष्ठ अशी त्या काळची समजूत. ऐश्वर्यावरून देवाचें श्रेष्ठत्व व त्या प्रमाणांत भाव भोळा असल्यामुळें सोमनाथाचें वैभव पाहून जनता आश्चर्यचकित होत असे. देवदर्शनाचा खरा हेतु मागें पडला. दर्शनापेक्षां ऐश्वर्यानेंच जनता चकित होऊन अधिक भारली जाई.

सोमनाथाला जागतिक महत्त्व प्राप्त झालें होतें. इराणच्या आखातांतून जाणारे येणारे व्यापारी नी दर्यावर्दी आपल्याला व्यापारांत यश लाभावें एतदर्थ गलबतें नांगरून देवास नवस करीत. मग नवसाची फेड करून फायदा होईल त्याप्रमाणांत देवापुढें द्रव्य ठेवीत. म्हणून देवालयाच्या वैभवांत वरचेवर भर पडत होती. जगांतल्या निरनिराळ्या देशांतील अनेक व्यापाऱ्यांचा असा प्रत्यक्ष संबंध येऊं लागला, त्यामुळें देवाचें वैभववर्णन देशोदेशींच्या भाविक व्यापाऱ्यांचें मुखानें निरनिराळ्या देशांत अधिक भडक रीतीनें होऊं लागलें. सोमनाथचें वैभव काय होतें तें पुढील प्रकरणांत पाहूं.

★ ★ ★

कला ७ वी

# वै भ व शा ली दे व स्था न

**सोमनाथ** देवस्थानविषयीं पहिलें आश्चर्य म्हणजे शंकराची पिंडी ही जमिनीपासून अधांतरी असल्याचा उलेख ( हिस्ट्री ऑफ् इंडिया इलियट अँड् डाऊस व्हा. द. २२० ) या ग्रंथांत सांपडतो. तो ग्रंथकार म्हणतो ' सोमनाथ देवालयांतील लिंग हवेंत अधांतरीं होतें. तें लोहाकर्षणामुळें. पण तक्तपोशी फुटल्यानंतर फरशी खालीं पडतांच लिंग खालीं पडलें. ही १०२५ इ. स. मध्यें हकीकत घडली.'

झकेरिया कझीनी या इराणी गृहस्थानें इ स. १२६३ मध्यें लिहिलेली हकीकत उपलब्ध आहे. तो म्हणतो ' मूर्ति मनुष्याच्या आकाराची, हाताच्या मुठी वळवून गुढग्यावर टेकलेल्या रक्त व कृष्णवर्णी असून डोळ्यांत ( लाल काळसर ) हिरे बसविले होते. मूर्ति अधांतरी होती. अदृश्य आधार असला पाहिजे म्हणून आश्चर्यानें थक्क झालेला महंमद भाल्यानें सगळ्या बाजूस तपासून पाहूं लागला.'

दुसऱ्याची कल्पना अशी कीं–मूर्ति लोखंडाची असून डोक्यावरील मुकुटाच्या छत्रास लोहचुंबक बसविलेला असावा. त्याच्या आकर्षणानें ती अधांतरीं असावी. ऽ कांहींना पटलें व कांहींना खोटें वाटलें; म्हणून छत्राचे एकदोन तुकडे काढून तोल बिघडतो कीं काय ? हें पाहण्याची आज्ञा महंमदानें केली. वरचे दगड काढतांच मूर्ति डळमळूं लागली, जास्त दगड काढतांच ती हळूं हळूं जमिनीवर बसली. रियासतकार देसाई म्हणतात. ' मुसलमान लेखकांनीं या हकीकती केवळ कल्पनेनें सजविलेल्या आहेत. अशा तऱ्हेचा एकहि उल्लेख समकालीन हिंदी लेखकांत आढळत नाहीं.' लेनपूल नामक लेखकाचेंहि तेंच म्हणणें आहे. हें मात्र निश्चित कीं, शंकराची सर्वत्र पिंडि किंवा लिंगाची प्रथा असलेली आढळून येतें. त्याप्रमाणें सोमनाथ मंदिरांत लिंगच होतें. त्यांत शक्यता एवढीच कीं, प्रमुख लिंग आणि त्या भोंवतीं इतर अनेक मूर्ति असाव्या. क्वचित्

ऽ **टीप**– आधार– भारत बृहत् इतिहास द्वितीय विभाग–प्रथम खंड व मध्यकालीन भारत.

भैरवाची मूर्तिहि असण्याचा संभव आहे. किंवा मुखाकृति लिंग–लिंगोद्भव मूर्ति–लिंगहि असण्याचा संभव जास्त. लिंगांतच ब्रह्मा, शिव व विष्णु मुखें असतील. भारतांत अनेक ठिकाणीं मुख्य देवतेची उत्सवमूर्ति म्हणून निराळी असते. तिला अलंकारांनीं सजवितात. तिला पालखींतून मिरविलें जातें. तो रिवाज आजहि अस्तित्वांत आहे. त्यावरून सोमनाथाच्या वैभवाप्रमाणें एकादी उत्सवमूर्ति अनेक अलंकारांनीं नटलेली असण्याचा संभव आहे. आणि पिंडीहि अधांतरी असावी. (मॅग्नेटिक आकर्षणामुळें) त्या पिंडीखालीं विपुल द्रव्य आणि रत्नें होतीं. सोमनाथाचें गर्भगृह (गाभारा) अष्टकोनी समान होतें. व दगड एकाच मापाचे अष्टकोनी होते. प्राचीन काळच्या स्थापत्य शास्त्राचें पूर्ण प्रतिबिंब त्यांत दिसत होतें. गर्भगृहांत अंधार होता, पण रत्नदीपामुळें खूप प्रकाश पडत असे.

सोमनाथाचें अपूर्व वैभव होतें. पंचमहाभूतें सोमनाथाची नित्य पूजा करीत असत. महासागर स्वतः आपल्या लाटांनीं सोमनाथाचें नित्य चरणप्रक्षालन करीत असे. वायु मंद, सुगंध आणि सुशीतल असा नित्य वाहात होता सूर्याचें प्रतिबिंब सकाळीं नेमकें सोमनाथावर पडत होतें. म्हणजे निसर्गसुद्धां सोमनाथाचा पुजारी बनला होता. देवालयाच्या भोंवतीं भव्य तट होता. दक्षिणतटावर समुद्राचें पाणी सारखें आदळत होतें. मुख्य दरवाजा पूर्वाभिमुख होता. गाभाऱ्याबाहेरील सभामंडपांत असलेले छप्पन सागवानी खांब शिशानीं मढविले होते. सभामंडपांत दोन हजार माणसें सहज बसतील इतका आंतला प्राकार प्रशस्त होता. देऊळ जुन्या पद्धतीचें होतें. भव्य नी शिल्पकलेनें संपूर्ण प्रगत असें होतें. शिवाय ‘ न भूतो न भविष्यति ’ अशा सुंदर नक्षीनें व विविध कलाकृतीनें देऊळ शोभिवंत दिसत होतें.शिल्प व स्थापत्य शास्त्र पराकोटीला गेल्याचें सोमनाथ देवस्थान हें प्रतीक होतें. जणुं प्रत्यक्ष मयासुरानें आपले कारागीर आणून देवस्थानचें बांधकाम करून आपलें कौशल्य दाखविल्याचा भास होई. मंदिराकरितां वापरलेला दगड हा त्या प्रांतांतील असून इतका गुळगुळीत केला होता कीं, त्यांत पहाणाराचें प्रतिबिंब स्वच्छ दिसावें. खांब नक्षीदार असून रत्नजडीत होते, आणि त्यावर निरनिराळ्या राजांचीं सुंदर चित्रें काढलेलीं होतीं. असें म्हणतात कीं, सोमनाथ मंदिराचें गोपूर तेरा मजली होतें. आणि त्यावर चौदा सोनेरी कळस होते. लिंगाचा परीघ ४॥ फूट असून त्याचा

रुद्रभाग ( वर दिसणारें लिंग ) ७ फूट उंच होता. यावरून ब्रह्मभाग आणि विष्णुभाग आंत बराच असला पाहिजे. ( हें प्रमाण शैवाधिक लिंगाचें आहे. ७-७-८ ) लिंगाशेजारीं एक कोठीगृह ( कोशागार ) होतें. त्यांत मूर्तीचे सुवर्ण, रत्नाचे अलंकार ठेविलेले होते. शिवाय सुवर्णाचीं चांदीचीं आणि निरनिराळ्या रत्नांचीं निरनिराळ्या आकाराचीं लिंगें व मूर्ति होत्या. लिंगावर भोंवतीं गुंडाळावयाचें वस्त्र किनखाबी असून त्यावर अनेक रत्नें जडविलीं होतीं. सभामंडपांत सोडलेले किन-खाबी पडदे जवाहिरांनीं मढविलेले होते. देवालयाच्या गाभाऱ्यांत लावलेल्या समया आणि नंदादीप रत्नजडित असल्यानें त्याचा मंद प्रकाश देखील रत्नांच्या सहाय्यानें अधिक तेजस्वी होत असे. कांहीं समयांतून अत्तर वापरलें जाई.

मंदिरासमोर एक भारी सुवर्णशृंखला २०० मण वजनाची होती. घंटानाद करून ब्राह्मणांची बदली करण्यासाठीं सूचना म्हणून या साखळीनें घंटा वाजवीत असत. मंदिरांत पूजेसाठीं १००० ब्राह्मण नेमले होते. क्षौरकर्मासाठीं ३०० कारागीर असून त्यांच्या बसण्या-करितां ३०० गज जमीन तीर्थस्थानांत कायम केलेली होती. ती जागा अत्यंत पवित्र गणली गेली होती. अष्टौप्रहर गायन, वादन, नर्तन करण्यासाठीं ३५० गायिकांचा व नर्तकींचा संच होता. या सर्व नेमणुका मंदिराच्या उत्पन्नांतून चालू होत्या. आसपास १० हजार गांवचें उत्पन्न देवळांसाठीं लावून दिलें होतें. यामुळें देवस्थानचें उत्पन्नांत सारखी वाढती भर पडत असे.

भाविकांनीं अर्पण केलेल्या दागदागिन्यांचें, सुवर्णालंकारांचें आणि रत्नजडित विभूषणांचें उत्पन्न तर अगणित होतें. ही सर्व संपत्ति अनेक वर्षांत मिळून येथें सांचली होती. देवळांतील सभामंडपांत निर-निराळ्या रंगाचीं नी आकारांचीं रत्नजडित झुंबरें व हंड्या टांगलेल्या होत्या. डॉ. पी. सरन् ( दिल्ली ) म्हणतात– 'बहुतसे हिंदुराजा अपनी कन्याओंको मंदिरमें अर्पण करते थे.' ( पृ. सं. ३१९ मध्यकालीन भारत १५२६तक. (पुष्कळसे हिंदुराजे आपल्या कन्यांना मंदिरांत अर्पण करीत असत. )

सोमनाथ देवस्थानच्या उत्पन्नाचा अंदाज देतांना रियासतकार म्हणतात ' त्याकाळीं दोन कोटी पौंड म्हणजे आजचा अंदाज ( इ. स. १९२७ पर्यंत ) ३० कोटी असावा. आज इ. स. १९५८ मध्यें त्याच्या कितीतरी पट भरेल.

बाहेरील दरवाजे प्रशस्त, भव्य असून चंदनाचे होते. मंदिराच्या शिल्पकलेची कल्पना भग्न झालेल्या अवशेषावरून करिता येते.

कलकत्त्याजवळील श्रीरामकृष्णपरमहंसदेव यांचें वास्तव्य असलेल्या श्रीदक्षिणेश्वराच्या मंदिराच्या बांधकामाला त्याकाळीं सात वर्षें लागलीं. आणि आठ, नऊ लाख रुपये खर्च झाला. यावरून सोमनाथाचें भव्य मंदिर उभारण्यास त्या काळीं किती वर्षें व द्रव्य लागलें असेल, याची कल्पना केलेली बरी. मंदिराच्या शिखरावर सोन्याचा कळस होता. त्यावर कांहीं रत्नें बसविलीं होतीं. त्यावर दिवसा सूर्यप्रकाश व रात्रीं चंद्रप्रकाश पडला म्हणजे पाहणारा आनंदित होत असें. समुद्रांत कित्येक मैलाच्या अंतरावरून पाहाणाऱ्या व्यापाऱ्यांच्या चित्ताला कळस पाहून होणारा आनंद शब्दानें वर्णन करणें कठीण. कित्येक गलबतें व होड्या यांना तो कळस त्यावर पडलेल्या चंद्रकिरणामुळें गलबत व होडीवाल्यांना प्रकाशाचें रत्नांतून परिवर्तन होऊन दूरवर दिसणारा प्रकाश पाहून जणू दीपस्तंभ आहे असें वाटे. व त्या दृष्टीनें गलबतें हाकण्यांत येत. सूर्यकिरणांनीं तळपणाऱ्या कळसाचा प्रकाश फार दूरवर पोंचत असे. मंदिर असें भव्य प्रशस्त होतें.

सोमनाथ हें मंदिर असलें तरी त्याला एकाद्या संस्थानचें स्वरूप आलेलें होतें. देवस्थानच्या उत्पन्नाची देखरेख करणारे कार्यकारी विश्वस्त मोठे कुशल होते. देवस्थानला दहा हजार गांवचें उत्पन्न होतें. ( कांहीं ठिकाणीं हजार गांवचा उल्लेख आहे. श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं आपल्या मध्ययुगीन भारतांत दहा हजार गांवचा उल्लेख केला आहे. तें वर्णन शेवटीं आहे. )

वैभवशाली मंदिर नी देव एक. परंतु नित्य त्रिकाल पूजेकरितां चारी वेद व निरनिराळ्या शाखांचा पुरोहितवर्ग नी पुजारीवर्ग एक हजार होता. देवापुढें गाणाऱ्या गायक नी नर्तकी मिळून पांचशें सेविका असत. त्याकरितां त्यांना पगार असून शिवाय कांहीं गांवें इनाम म्हणून

स्थायी उत्पन्न असें. इतरहि किरकोळ सेवेकरी असत. त्या सर्वांचा प्रपंच या देवस्थान उत्पन्नावर चाले. यामुळें हजारों कुटुंबांचें देवस्थान हें आश्रयस्थान बनलें होतें. श्री. वैद्य मध्ययुगीन भारत प्रकरण १४ ' सोमनाथवरील स्वारी ' यांत वर्णन करितात. इब्न असीरनें केलेलें वर्णन– " सोमनाथाची मूर्ति अखिल हिंदुस्तानांत अत्यंत प्रसिद्ध होती. चंद्रग्रहणाचे वेळीं रात्रीं तेथें फार माणसें जमत. माणसें मेल्यावर त्यांचे आत्मे त्या ठिकाणीं जातात अशी समजूत होती. त्या देवालयाला दहा हजार गांवें इनाम होतीं. अभिषेकासाठीं गंगेचें पाणी येत असें व एक हजार ब्राह्मण देवाची पूजा करीत. यात्रेकरूंची स्मश्रु करण्याकरितां तीनशें नापित गुंतलेले असत. लाखांनीं यात्रा जमे. देवळाच्या प्रवेश-द्वारांत तीनशें स्त्रिया गाणीं गात, नाच करीत. ( आजहि ही प्रथा शंकराचें देवालयांत दक्षिणेला सुरू आहे. गोमांतकांतील मंगेश, रामनाथ कवळे वगैरे साऱ्या देवस्थानांत ही प्रथा आजहि आढळते. )

मूर्ति आंतल्या खोलींत होती. ती पांच हात उंच असून तिचा घेर तीन हातांचा होता. ती दोन हात तरी जमीनींत खोल गेलेली असावी. ती घडविलेली दिसत नव्हती. देवळांत अंधार होता. परंतु तेथें रत्नजडित रत्नांचा आणि झुंबरांचा प्रकाश पडला होता. मूर्ति जवळ सोन्याची साखळी होती. त्याला घंटा लावल्या होत्या. त्या ब्राह्मणांना वेळोवेळीं उठविण्यासाठीं त्या त्या वेळीं नित्य वाजविण्यांत येत. खजिना जवळच होता. त्यांत सोन्याचांदीच्या मूर्ति, मौल्यवान रत्नांनीं जडवलेले पडदे ठेविले होते. " वगैरे.

जलमार्गानें व्यापार करणारा वर्ग वेरावळ बंदरीं उतरल्यावर देवाची पूजा बांधून देवाचा कौल घ्यावयाचा, नंतर व्यापाराला जावयाचा. असा नित्याचा शिरस्ता असे. त्या व्यापाऱ्यांकडून मिळणारी देणगी अगणित होती. त्या व्यतिरिक्त येणारा श्रद्धावान्, गरीब, दर्शनेच्छु वर्ग देणगी म्हणून जो अगदीं किरकोळ पै, पैसा देवापुढें ठेवीत असे त्याचें उत्पन्न त्या कालांत आठ लक्षावर होतें.

शंकर योगी, विरक्त खरें परंतु भक्तांनीं त्यांना आपल्या कल्पने-प्रमाणें भरपूर श्रीमंत व विलासी बनविलें. हिरे, माणके, मोती, सोनें, चांदी याचा नित्य ढीग पडत असल्यानें तें द्रव्य तळघरांत सांठविलेलें

होतें. शिवाय देवाच्या गाभाऱ्यांत नित्याचें जडजवाहीर ठेवण्यासाठीं एक स्वतंत्र खोली होती. देवळांत सुवर्णाच्या समया होत्या. त्यामध्यें कनोजहून, काश्मीर वगैरे प्रांतांतून नित्य निरनिराळीं हीना, खस, केवडा, गुलाब, चमेली वगैरे अनेक प्रकारचीं अत्तरें येत असत. तसेंच पूजेकरितां नित्य प्रयाग, हरिद्वार, काशी येथील गंगाजल, रामेश्वराचा सेतु, केशर, म्हैसुरी चंदन, बेलफुलांचे पेटारे पोहोंचविण्याची सांडणीस्वार द्वारा व्यवस्था होती. सोमनाथाला १० हजार गाई दान मिळाल्या होत्या. त्यामुळें नैवेद्याकरितां गव्य पदार्थांची रेलचेल असे. राजेरजवाड्यांकडून प्रसादाकरितां नित्य मिठाईचे पेटारे येत. मानवी बुद्धीला चकित करणारें देवाचें वैभव होतें.

गाभाऱ्यांतील पिंडीवर मूल्यवान पोशाख घातल्यानंतर देवावर सुवर्णाचा रत्नजडित मुकुट चढविला जाई. दोनशें मणाची साखळी असलेल्या घंटेचा आवाज फार दूरवर पोंचत असे. इतर सुवर्णाच्या घंटा बऱ्याच होत्या. सोमनाथ देवस्थान भोंवतीं ३८ मनोरे होते.* हें डोळे दिपविणारें सोमनाथाचें वैभव महंमदाच्या आसुरीवृत्तीला वाढविण्यास कारण झालें. आणि त्याच्या तोंडाला पाणी सुटून त्याची हिंदुस्थानावर दृष्टी खिळून राहिली तो विदारक इतिहास पुढें........

* **टीप**—एन्सायक्लो. अमेरिकाना व्हा. २५.

★ ★ ★

कला ८ वी

# आ प त्का ल

## सर्वं यस्यवशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः

**जनतेकडून** ऐकलेल्या सोमनाथाच्या वैभव कथांनीं महंमदाचें डोकें फिरलें ! बाराशें मैलावरून महंमद आला. पण त्याला प्रतिकार झाला नाहीं. त्याचें येणें अचानक नव्हतें. आपल्या लुटीला सोमनाथ ठिकाणच योग्य आहे, असें त्यानें ठरविलें. त्यावेळीं राष्ट्रीय भावनेपासून विन्मुख झालेला भारतीय हिंदुसमाज स्वार्थाच्या गाढ निद्रेंत होता. आपल्या देशावर किंवा धर्मावर येणाऱ्या संकटाची जाणीव त्यावेळच्या राजेरजवाडे किंवा संस्थानिक, मांडलिक यांना झाली नाहीं. कोणी राजे पराक्रमाच्या घमेंडीत, तर कोणी स्वार्थाच्या कोंडींत. कोणी उदासीन, तर कोणी सुखासीन. तत्कालिन समाजाचा आढावा घेऊन हिंदुसमाजाची नाडी महंमदानें बरोबर ओळखली. फुटीर वृत्तीचा योग्य उपयोग त्यानें करून घेतला. धूर्त महत्त्वाकांक्षी महंमद लौकिक व वैभव दोन्ही साधीत होता.

स्वर्गीय महात्मा स्वामीश्रद्धानंदांनीं आपल्या ' हिंदु संघटन पुस्तकांत खालील माहिती प्रसिद्ध केली आहे.

महंमद गजनीच्या गादीवर इ. स. ९९७ सालीं आला. त्या पूर्वीं इ. स. ९९० मध्यें त्यानें हिंदुस्थानवर स्वारी करून लाहोरचा जयपाल, दिल्ली, अजमीरचे राजे, कनोजचा विजयपाल आणि इतर राजांशीं युद्ध केलें. नंतर तो गजनीच्या गादीवर आला. त्यानें भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या. सोमनाथाच्या वैभवाचें वर्णन ऐकून त्याच्या तोंडाला पाणी सुटलें. त्याची आसुरी वृत्ति त्याला कत्तल, लूट व धर्मांतरें घडवून आणण्यास प्रवृत्त करूं लागली.

त्याच्या स्वाऱ्याः--

(१) इ. स. १००१ आगष्ट महिना, पेशावरला स्वारी त्याच्या आक्रमणाला लाहोरच्या जयपाळानें तोंड दिलें, पण त्यांत जयपाळाचा दुर्दैवानें पराजय झाला. या लढाईंत पांच हजार लोकांचा संहार झाला

लक्षावधींचा ऐवज लुटला. अपमानामुळें जयपाळानें अग्निकाष्ठें भक्षण केलीं. आनंदपाळ गादीवर आला.

(२) इ. स. १००४ लाहोरवर-- त्यांत २८० हत्ती नेले. अनेकांचें धर्मांतर झालें. आनंदपाळाचा पराभव झाला व तो काश्मीर-कडे पळाला.

(३) इ. स. १००५ मुलतान काबीज करून वीस हजार दिनार प्रतिवर्षी खंडणी बसवून परत गेला.

( ४-५ ) इ. स. १००६ दोनदां स्वारी.

(६) इ. स. १००७ पेशावर वर स्वारी. तीस हजार हिंदु व घाकर लोकांनीं जोराचा प्रतिकार केला.

(७) इ. स. १००८ आनंदपालाचा संपूर्ण पराभव होऊन पंजाब-प्रांत महंमदाच्या ताब्यांत आला.

(८) इ. स. १००९ नागरकोट देवालय लुटलें.

(९) इ. स. १०११ स्थानेश्वराच्या चक्रस्वामींच्या देवालयाचा नाश केला.

(१०) त्रिलोचनपालावर स्वारी.

(११) इ. स. १०१३ काश्मीरवर स्वारी.

(१२) इ. स. १०१५ काश्मीरवर स्वारी. यावेळीं जोराचा प्रतिकार झाला. पराजय होऊन महंमद फिरला.

(१३) इ. स. १०१८ कनोजवर स्वारी. चैत्रमास. तेथील राजा राज्यपाल त्याचा सेनापती हरदत्त महंमदाला शरण गेला. राज्यपालाचा पराभव झाला. नंतर 'मेहवान' शहराला महंमदानें वेढा दिला. तेथील कुलचंद्र राजानें आपल्या मुलाबाळांची कत्तल करून आत्महत्या केली. मथुरेला त्यास प्रतिकार झाला. पण त्यानें त्यास न जुमानतां मूर्ति फोडल्या. व देवालयें जमीनदोस्त केली. व अपार द्रव्य संपादन करून कनोजमध्यें पंधरा दिवस वस्ति केली. या लढाईंत ५० हजार सैनिक गारद झाले. या वास्तव्यांत सैन्यानें कनोज शहराची जाळपोळ केली.

(१४) इ. स. १०१९ कनोजवर स्वारी.

(१५) इ. स. १०२१ लाहोरवर स्वारी. शहराचें नांव महंमदपूर ठेविलें.

(१६) इ. स. १०२२ कलिंजरवर स्वारी झाली.

(१७) इ. स. १०२३ या स्वारींत अनेक हिंदुराजे जिंकले.

(१८) इ. स. १०२४ सोमनाथवर स्वारी. वाटेंत अजमीर लुटलें, किल्ले सर केले. रजपुतांनीं सोमनाथ वांचविण्यासाठीं प्राण पणाला लावून शिकस्त केली. आपल्या समशेरीची चमक दाखविली. महंमद भ्याला, त्यानें घोडयावरून उडी मारली, देवाची करुणा भाकली. लढाईला सुरवात झाली. त्यांत यश आलें. यांत ५ हजार रजपूत कामाला आले. कित्येक नांवेंतून पळून जात असतांना त्यांच्या नांवा बुडविल्या. मंदिरांत शिरून मूर्तीवर घाव घातला. चार तुकडे केले. त्यांतले दोन महंमदानें गजनीस नेऊन मशिदीच्या व न्यायालयाच्या उंबऱ्यांत बसविले. व दोन तुकडे मक्का मदिनेला पाठविले. प्रतिमेंत सांठविलेलें जवाहिर गजनीस नेलें.

इ. स. १०२५, १८ आक्टोबरला महंमदानें ३० हजार घोडेस्वारासह गजनी सोडली. सामुग्री भरपूर जवळ बाळगिली. ३० हजार उंटावर पाणी होतें. प्रत्येक सैनिकाबरोबर दोन उंट स्वतंत्र पाणी देण्याकरितां होते. मुलतानला पहिला मुक्काम. २६ आक्टोबरला थर वाळवंटांत आला. डिसेंबर अखेर पालनपूरजवळ एक खिड काबीज केली. अनहिलवाडचा भीम बेसावध होता. महंमद सोमनाथाकडे वळला. इ. स. १०२६ जानेवारी ६ ला किल्यावर पोंचला. अभीर राजाचा वंशज गादीवर होता. ता. ८ ला लढाई झाली. ५० हजार हिंदु मारले. देवस्थान फोडलें. दगडी सुंदर देवालय नाश पावलें. परमदेव राजा युद्धाच्या तयारींत आहे हें कळतांच महंमद परतला. सिंधुमार्गानें गझनी गांठली.

(१९) इ. स. १०२७ जाट लोकांचेवर स्वारी. अनेकांचें धर्मांतर घडविलें. यांत सोमनाथपूर्वी बारा वेळां महंमद आला असें श्रीस्वामीजी म्हणतात, व नंतर १३ वी स्वारी सोमनाथवर झाली. मुनशीजींच्या लिखाणांत बरेंच संशोधन आहे. त्यांनीं म्हटलें कीं, सतरा स्वाऱ्यांनंतर अठरावी सोमनाथवर झाली. त्याचें सविस्तर वर्णन पुढील

प्रकरणांत करावयाचें आहे. त्रिपुरांतक, अंधकासुर, गजासुरहंता, असा अतुल शक्तिशाली शंकर आपल्या भैरवरूपानें म्लेंछांचा संहार करण्यास चुकणार नाहीं, अशी भोळी समजूत देवालयांतील आश्रितांची होती. महंमदानें इतर देवालयांचा नाश केला, कारण त्यांतील देव सोमनाथा-इतके तेजस्वीं, पराक्रमी आणि सामर्थ्यशाली नव्हते, अशी कारण-परंपरा भाविक लोक लावीत, महंमद प्रत्यक्ष चालून आला तेव्हां देखील ज्या लोकांचे डोळे उघडले नाहींत, किंवा ज्यांचा विश्वास ढळला नाहीं, त्यांच्या श्रद्धेचें कौतुक करावें कीं, त्यांच्या अव्यवहार्यतेबद्दल त्यांना दोष द्यावा हें कळत नाहीं.

★ ★ ★

कला ९ वी

# सं हा र

**सोरटी** सोमनाथ गजनीपासून १४०० मैल आहे. गजनीहून सोमनाथवर येण्यास दोन मार्ग आहेत. (१) सिंधमधून बोलन व खोजाक घाटांतून सोमनाथ हा एक. (२) खैबर घाटानें पेशावर, मुलतान, अजमीर या प्रांतांतून सोमनाथ हा दुसरा मार्ग होय. महंमद दि. १० सप्टेंबर १०२४ या सालीं गजनीहून निघाला. बरोबर तीस हजार घोडदळ आणि कांहीं बाजारबुणगे बरोबर घेतले. पाणी आणि शिधा-सामग्रीसाठीं तीस हजार उंटहि होते. तो रमजानच्या मध्यभागांत मुलतानला पोंचला. मुलतानहून ३०० मैलाचें रण दि. २६ ऑक्टोबर-पर्यंत ओलांडून थर वाळवंटांत आला. डिसेंबरअखेर पालनपूरजवळची खिंड काबीज करून बिकानेर, जेसलमेर रस्त्यावरून अजमीरला आला. अजमीरच्या राजानें शेजारच्या गुजरातची मदत मागितली, पण ती मिळू शकली नाहीं. अजमीरला आला त्यावेळीं त्याला शहर खालीं झालेलें दिसलें. म्हणून तारागडवर चढाई करावी असा त्यानें विचार केला. परंतु मुख्य कार्यास विलंब होत असल्यानें तारागडाचा नाद सोडून अबूला गेला. अजमीरला महंमदानें नवा सरंजाम एकत्र केला होता. नंतर बाजूच्या राजांनीं नजराणा देऊन आपला बचाव केला.

अबुहून तो अनहिलवाडपट्टणला जाण्याकरितां निघाला. अनहिलवाडपाटणला पहिला भीमदेव राज्य करीत होता. विजेसारख्या चढाईमुळें भीमदेवाला चढाई करणें अशक्य झालें. आणि तो कंथडकोटला पळाला. (कच्छ-मधील कंथड किल्ला ? ) महंमदानें त्याचा पाठलाग केला. कारण भीम परत सैन्य जमवून अवसर मिळाल्यानंतर चढाई करून आपल्या सोमनाथ स्वारींत विघ्न आणील, ही त्याची खात्री होती. पण पळण्याचें नक्की ठिकाण न कळल्यामुळें तो वढवाणवरून देलवाडा येथें आला. हें स्थल सोमनाथपासून दहा मुक्कामाच्या अंतरावर होतें. आपण आपल्या देशापासून दूर व शत्रुराज्यांत मध्यावर आहो हें महंमदानें ओळखलें. म्हणून भीमदेवानें लष्कर जमा करण्याच्या आधीं नजीकच्या रस्त्यानें तो देलवाड्यावर चाल करून गेला.

महंमदाचा नाश देव करील, अशा विश्वासानें तेथील लोक राहिले होते. परंतु महंमदानें तें शहर घेतलें. आणि लोकांची कत्तल केली. नंतर तो सोमनाथाकडे निघाला. येतांना प्रसिद्ध सूर्यमंदिर असलेलें संमृद्ध मोढेरा शहर त्यानें लुटलें. तो सोमनाथाला ३० जानेवारी इ. स. १०२५ला पोंचला. पाटण ते देलवाडा दरम्यान छोटे छोटे सामने झाले. पण महंमदापुढें कोणाचा टिकाव लागला नाहीं. लाटांनीं धुतलेल्या समुद्रावर त्यानें प्रबल किल्ला पाहिला. तटाभोंवतीं पहारा होता. किल्ल्यावरील तटाकडे पहात असतां तटावरील हिंदुलोक मुसलमानाकडे पाहून हांसत होते. आणि 'सोमनाथ तुमचा नाश करील' असें दिमाखानें सांगत होते. त्यानें प्रभासला बुधवारीं दुपारीं वस्ती केली. तेथील जनतेला प्रथम हा कोणीतरी बडा व्यापारी आहे असें वाटलें. पण किल्ल्यावर चढाई होणार असें कळतांच त्यांनीं दरवाजे बंद केले. विधर्मीयांची सोमनाथावर ही पहिलीच चढाई होती. सोमनाथाचें माहात्म्य फार थोर असल्यामुळें लोकांची खात्री होती कीं, देव आपलें रक्षण करील, शत्रूचा नाश करील, यामुळें जनता गाफील राहिली. महंमद मूर्ति फोडणार, मंदिर भ्रष्टविणार असें कळतांच जनता घाबरली. कांहीं प्रतिष्ठित व समंजस लोकांनीं आपलें एक शिष्टमंडळ त्याच्याकडे पाठविलें. महंमदाचे व शिष्टमंडळाचें बरेंच बोलणें झालें. 'आपण मागाल त्यापेक्षां अधिक द्रव्य देतों. परंतु देवाला धक्का लावून आमच्या भावना दुखवूं नका.' असें परोपरीनें सांगूनहि महंमदानें तें मान्य केलें नाहीं. तो चढाईच्या उद्योगाला लागला.

पहिल्या दिवशीं किल्यावर चढाई केली पण तींत त्याचें पुष्कळ सैन्य मारलें गेलें. दुसरे दिवशीं कोटावर चढण्याचाहि प्रयत्न फुकट गेला. येथें आपणास कोणाची मदत मिळणार नाहीं अशी त्याची खात्री होती. भीमदेब स्वस्थ बसला नव्हता. सोमनाथ प्रमुख व्यवस्थापक कुमारपाल होता. तो जयपाळाच्या मदतीची वाट पहात होता. पण महंमदाचें लष्कर मरणाच्या तयारीनें लढत होतें. भीमदेवाकडून किंवा इतरांकडून येणारी मदत रोखून ठेवण्याचे त्याचे प्रयत्न चालू होते. म्हणून त्यानें लष्कराचे लहान लहान भाग पाडून एक किल्याच्या बाजूला व बाकीचे चारी दिशांना सोडलें. मदत रोखून धरण्यासाठीं तो स्वत: भीमदेवाच्या येणाऱ्या बाजूला उत्तम लष्कर घेऊन गेला. यामुळें हिंदु फौजा एकत्र आल्या नाहींत. उभय सैन्यांची फार मोठी झुंज झाली. भीमदेवाला माघार घ्यावी लागली. महंमदाचेंहि सैन्य कमी झालें. उरलेलें दुर्बल झालें. नंतर राहिलेल्या सैन्यानिशी महंमद किल्ल्याजवळ पोंचला. किल्ल्यावरची सेना बाहेर आली ती मृत्युमुखीं पडली. नंतर महंमदाचें लष्कर किल्ल्यांत गेलें. तेथून तो देवस्थानकडे वळला. शुक्रवार उजाडला तो भारतांतील अत्यंत अशुभ दिवस ठरला. आमच्या अंत:करणाला खोलवर जखम करणारा तो अघोरी दिवस होता. प्रभासची जनता अत्यंत घाबरली. प्रतिकाराचें सामर्थ्य नसल्यानें काय करावें हें सुचेनासें झालें. गांवांत व भोंवतालच्या परिसरांत सर्वत्र जनतेला सात्विक संताप आला.पण तो दुबळा ठरला ! ! !

पुजाऱ्यांनीं प्रतिकार करण्याचें ठरविलें. पण त्यांना शस्त्रास्त्रांचें पाठबळ कुठचें असणार ? रियासतकार लिहितात :– " महंमदानें शुक्रवारीं किल्ल्यावर हल्ला केला. संरक्षकांशीं तीन दिवस युद्ध झालें. राणा भीमाची मदत मिळाल्यामुळें प्रतिकाराला रणांगणाचें स्वरूप आलें होतें. महंमदाचा पराभव होण्याची वेळ आली तेव्हां त्यानें गुढगे टेकून ईश्वराची प्रार्थना केली आणि जोराचा हल्ला चढविला. जबर प्रतिकार होतांच बाकीचे सैनिक पळाले, व ब्राह्मणांच्या गर्दीतून तो थेट देवालयांत गेला. गाभाऱ्यांत एक दिवा जळत होता. मूर्ति ९ फूट उंच होती. नंतर ब्राह्मणांची विनंति न मानतां त्यानें प्रहार केला वगैरे."

महंमद सर्व सैन्यासह शुक्रवारीं सकाळीं ९।। चे सुमारास मंदिराच्या परिसरांत आला. पुजारी प्रथम आडवे आले. कांहीं क्षत्रिय संतापानें तेथेंहि प्रतिकार करूं लागले. पण तें त्याचें कृत्य मृत्यूला

कवटाळण्याचेंच होतें. एकंदर तीनचारशें लोकांनीं जवळच्या हत्यारांचा उपयोग करून विरोध केला. पण त्यांचें कांहीं चाललें नाहीं. दरवाजाजवळ प्रेतांचा खच पडला. जिकडे तिकडे आपल्या आराध्य देवतेकरितां रक्ताचे सडे पडले. आपल्या धर्माकरितां व देवाकरितां प्राणार्पण करणारांची धन्य ! ते खरे भगवंताचे पाईक झाले. आजपर्यंतच्या पूर्णाहुतीचीं श्रीफळें होती. कांहीं पुजारी देवळांत शिरून त्यांनीं देवापुढें लोटांगणें घातलीं. प्रार्थना केली. पण महंमदानें त्यांची डोकीं उडविलीं. अशा तऱ्हेनें पुजाऱ्यांनीं आपल्या रक्ताचे सडे शिंपल्यावर असुरानें गदेनें सोमनाथ लिंगावर प्रहार केला.

गुजराथचा राजा भीम याला सोमनाथाबाहेर शत्रूचा बराच प्रतिकार करतां आला असता. त्याच्याजवळ फार मोठें सैन्य होतें. पण महंमदाला भिऊन त्यानें कच्छमधील कंदन किल्ल्याचा आश्रय केला. नंतर तेथेंहि हल्ला करून महंमदानें भीमास पळावयास लावलें.

## महंमदाची अघोर द्रव्यतृष्णा

महंमदानें आपल्या अमानुष क्रौर्यानें पुजाऱ्यांना मारून सोमनाथ प्रतिमेवर प्रहार केल्यावर मूर्तींत असलेल्या नी पिंडीखालच्या भुयारांत ठेवलेल्या साऱ्या द्रव्यराशी बाहेर काढल्या. होतें नव्हतें तें सारें द्रव्य, अलंकार, हिरेमाणकें, रत्नजडित सुवर्णाच्या समया, भिंतींत बसविलेलीं रत्नें, मोत्यांच्या झालरी, हिऱ्या रत्नांचे कांठ असलेले पडदे, सुवर्णघंटा, सोन्याची दोनशें मणाची सांखळी, पूजेची उपकरणीं, सुवर्ण-प्रतिमा, पाट, चौरंग वगैरे सारें द्रव्य त्यानें उंटावर लादलें, तो सारा दिवस लुटालुट करण्यांत गेला.

सोमनाथ देव श्रीमंत खरा. महंमदानें लूट नेली, तिचा अंदाज २० लक्ष सुवर्ण दिनार म्हणजे १५कोटी तरी असावा. ऽ हिरे, माणकें, मोती, रत्नें, यांनीं नऊ उंट, सोन्याचांदीकरितां आणि द्रव्याकरितां सात उंट लादले होते. शिवाय सैन्यानें गांव लुटलें तें निराळें. किरकोळ लुटीची तर गणतीच नाहीं. आपण लवकर परत गेलों नाहीं तर भीमदेव येईल. शिवाय लष्करहि दुबळें झालें होतें, याची अधिक जाणीव महंमदाला होती. स्वदेश सोडून बराच काळ लांबवर आल्यानें सैन्यहि कंटाळलें

ऽ **टीप**—दिल्लीसल्तनत-पृष्टसंख्या ५५ आशीर्वादीलाल श्रीवास्तव १९५२

होतें. परंतु महंमदाचें मनांत या समृद्ध देशांत वस्ती करून पूर्वेकडील आणखी देश जिंकावे असें होतें. खलाशांचा एक ताफा ठेवावा असें त्याच्या मनानें घेतलें. साहसानें मिळालेला हा विजय. त्याच्या मनांत हें विचार असणें स्वाभाविक, पण त्याचे सरदार, अमीर यांना तें पसंत नव्हतें. लूट हातची जाईल, श्रम व्यर्थ जातील, म्हणून एक हुद्देदार जिंकलेल्या प्रदेशावर नेमावा असें त्यानें ठरविलें.

महंमद कच्छच्या रणांतून परत फिरला. सोमनाथ स्वारी महंमदाला बरीच महागांत पडली. सिंधमार्गानें भीमदेव लढाईसाठीं तयारींत होता, ही बातमी त्याला हेरांकडून कळली होती. त्याला तोंड देण्यापेक्षां परत फिरावें असें त्याला जास्त पसंत पडलें. कच्छ रणांतील रस्ता कांहीं लोकांनीं मुद्दाम त्याची फजिती व्हावी म्हणून दाखविला, व सूड उगवून घेतला. त्या रणांतून जात असतां पाण्यावांचून त्याच्या सैन्याचें फार हाल झाले, सैन्याचाहि नाश झाला. सोमनाथ स्वारी त्याला अत्यंत जाचक झाली. तो मुलतानवरून वाळवंटांतून सिंधूनदी ओलांडून गजनीला गेला. तरी त्याला फार त्रास झाला. लुटीचा माल लुटींत जाईल ही चिंता होतीच. त्याप्रमाणें व्रजदेव राजानें त्याला लुटलें, आणि इतरांनीं बरेंच हैराण केलें.

महंमद निघून गेल्यावर भग्न झालेलें देवालय पाहून लोकांना हळहळ वाटली, पण उपयोग काय ? 'कालाय तस्मै नमः' म्हणावयाचें! मनुष्य विश्वाचें रूप बदलूं शकतो, इतर प्राणी त्याचा उपभोग घेतात, त्यांना स्वरूप बदलतां येत नाहीं, अशी शक्ति ईश्वरानें मानवांत दिली असतां उत्कृष्ट कलाकारांनीं प्रामाणिकपणें निर्माण केलेली कलाकृति अशा तऱ्हेनें भंग पावलेली पाहिल्यानंतर भाविकांच्या हृदयाला पाझर फुटल्याशिवाय कसा राहील ? अंतःकरणाचें पाणी व्हावें असा हा प्रसंग ! काय करणार बिचारे ! मंदिर पहावें, हताश व्हावें, परत जावें, असें होऊं लागलें.

नंतर १०२५ इ. स. मध्यें महंमदानें पुन्हां हल्ला करून लूट नेली. आपली आसुरी लालसा तृप्त करून सारें धुवून नेलें, पण त्याला मारहि खावा लागला. व पळून जावें लागलें. परत त्यानें स्वारीचें नांव काढलें नाहीं.

महंमदानें लिंगाचें चार तुकडे करून दोन मदिना मक्केला, दोन गजनीला नेले व जुम्मामशीदींत द्वारापुढें ठेविलें, असें वर्णन आहे. परंतु ज्याच्या लुटीचा माल मागच्यामागें लुटला जाऊं लागला तो दगड उगीच बरोबर कशाला नेणार ? ही केवळ मुसलमान ग्रंथकारांची थापेबाजी असावी. तसेंच चंदनी दरवाजे गजनीस नेले ही गोष्ट सुद्धा बनावट आहे. पुढील प्रकरणांत त्याचा खुलासा आहे.

## लष्कर व शिस्त याबाबत हिंदुसमाज

महत्वाची गोष्ट अशी कीं, मागाहून भीमदेवानें महंमदाचा पराजय करण्याचा व त्याला पळवून लावण्याचा प्रयत्न केला. पण गझनीहून येथें सोमनाथवर येईपर्यंत इतर राजांनीं काय केलें ? ही शरमेची गोष्ट आहे. राज्याची वस्ती हिंदु, चौदाशें मैल प्रदेश तुडवून एवढें लष्कर घेऊन येणें साधी गोष्ट नव्हती, व गुप्तहि नव्हती. अशा वेळीं गुजरात आणि रजपूत राजांचे गुप्तचर काय करीत होते ? महंमद एकदम आला असता तर खरें होतें. पण देश जिंकीत, लढाया करीत येत असतांना हे सारे राजे झोपीं गेले होतें कीं काय ? महंमदाचा अन्नधान्य पुरवठाहि तोडण्याचें सामर्थ्य लोकांना कसें नव्हतें ? कां बुद्धि नव्हती ? कांहीं राजे मारले, कांहींनीं नजराणे दिले, या गोष्टी काय सुचवितात ? हें विचारच बुद्धीला त्रस्त करतात.

यावरून इतकें निश्चित कीं, हिंदु बहादूर असतील पण त्यांच्यांत मानसिक, सामाजिक आणि राजकीय मनोदौर्बल्य विशेष जाणवलें. राष्ट्रीय वृत्तीचा अभाव आणि आपल्यापुरते पहाण्याची स्वार्थी वृत्ति राष्ट्रनाशाला कशी कारण होते, याचें हें उत्तम उदाहरण होय. लढण्याची रीति सुद्धां एका दिलाची नव्हती. भाडोत्रीपणा त्यांत अधिक होता. निश्चय, करारीपणा नव्हता. मारण मरणाचा प्रश्न आल्यास पळून जाण्याची म्हणजेच कातडी बचावण्याची वृत्ति होती. सैन्यांत बाजारबुणगे जास्त. शत्रूपक्षांत ऐक्य, धर्मासाठीं मरण्याची तयारी असून दांडगी चिकाटी होती. आपापसांतल्या कलहानें शूर रजपूत सुद्धां सामान्य परकी शत्रूकरितां एकत्र होत नसत. इतकेंच नव्हे तर समाजाची रीति अशी होती कीं- गुजराथी म्हण ‘**एकनी दाढी सळगे**

त्यारे बीजाने तापणी थाय ! एकाची दाढी शिलगली कीं दुसऱ्याला ती शेकोटी होते. म्हणजे दुसऱ्याच्या प्रेतावर आपली पोळी भाजून घेण्याची प्रवृत्ति होती.

मागाहून एकत्र झाले, ते देवाच्या प्रेमामुळें. भीमदेवाला सहाय्य देण्यासाठीं नव्हे. भीमदेवाचा पहिला पराभव याचें कारण राष्ट्रीय वृत्तीचा अभाव. त्याला मदत मिळती तर त्याचा नाश होता ना. शिवाय भीमदेवाला महंमदाच्या त्वरेनें येण्यानें अवसर मिळाला नाहीं. त्याला कल्पना नव्हती, आपणास इतकी तांतडी करावी लागेल.

महंमदाचें लढाईचें धोरण पद्धतशीर होते. एक तुकडी थकली म्हणजे तो दुसरी पाठवी. यामुळें त्याच्या सैन्यांत उत्साह कायम. पण हिंदुलष्करांत याच्या उलट प्रकार. भीमदेवाला वाटलें, महंमद अजमेर-हून परत जाईल. महंमद लढाऊ सैन्यानें समृद्ध होता. भीमाजवळ तसें सैन्य नव्हतें. महंमदाजवळ हिंदु सरदारहि होते. समृद्ध देश सौराष्ट्र लढाऊ वृत्ति कमी. यामुळें हत्यारांचा साठा बेताचाच. पूर्वीच्या स्वाऱ्यांनीं हिंदुबरोबर लढून हिंदुलष्कराची कुवत पूर्णपणें ओळखल्या-मुळें तो निर्धास्त होता. जिंकू हा आत्मविश्वास त्याला वाटत होता. भीमाला लवकर तयारी करतां आली नाहीं.

महंमदाची चढाई हा भारताच्या पराधीनतेचा सूत्रपात आहे. हें हिंदूंचें दौर्बल्य असें एका कवीनें वर्णन केलें आहे.

शंकराकरितां लोकांनीं प्राण दिले म्हणून शंकर ही संहारक देवता नसून लढाईची देवता म्हणून मानूं लागले. 'हर हर महादेव' तेव्हांपासून लढाईत शब्द रूढ झाला.

(सोमनाथ–मुनशीजी )

गजनीच्या महंमदाची सोमनाथवर स्वारी हा प्रसंग अनेक लेखकांनीं कादंबरीसारखा रंगविलेला दिसतो. तत्कालिन किंवा तद-नंतरच्या इस्लामी तवारीखांचा आधार घेऊन लिहिलेलीं वर्णनें विसंगत वाटतात. हल्ला करणाराचें रौद्र स्वरूप अतिरंजित केल्यानें स्वतःच्या पराभवाची किंवा हानीची थोडीबहुत भरपाई झाल्यासारखी वाटते. आणि आपली असहायता तितकीशी निंद्य ठरत नाहीं, असा स्वाभाविक

प्रयत्न अनेकांचा कळत नकळत झालेला आहे. थोडासा अधिक विचार केल्यास त्यां वर्णनांतील वैयर्थ्य व अतिशयोक्ति स्पष्ट होते.

महंमद गजनीहून निघाला तेव्हां त्याजबरोबर २५ ते ३० हजार स्वार आणि ३० हजार उंट पाण्यासाठीं होते. असें सांगून लगेच म्हटलें आहे कीं, प्रत्येक स्वारामागें नुसत्या पाण्यासाठीं दोन उंट होते. यांतील कोणतें विधान ग्राह्य धरावयाचें ? तीस हजार उंटांच्या काफि-ल्याला छावणी करण्यास जागा किती लागेल ? रोजचा दाणा वैरण त्यांना कोठून मिळावयाचा ? इत्यादि आवश्यक बाबींचा विचार केल्यास ही अतिशयोक्ति स्पष्ट दिसते.

दुसरी गोष्ट मूर्तिभंजनाबद्दलची. सोमनाथ मंदिरांत लिंग होतें कीं, मूर्ति होती ? याबद्दलहि वर्णनाची एकवाक्यता नाहीं. अयस्कांत मण्याचें अधांतरीं लिंग असावें, असेंहि एक वर्णन आहे. मूर्तीच्या किंवा लिंगाच्या आंत रत्न, सुवर्ण भरलेलें होतें, अशीं बहुतेकांचीं वर्णनें आहेत. कांचेचा गोळा फोडावा इतक्या सहजतेनें तें लिंग किंवा ती मूर्ति फुटली अशीं वर्णनें आहेत.

मूर्तिशास्त्राप्रमाणें सोमनाथाचें लिंग तयार केलेलें असल्यास त्याचा भाग जेवढा बाहेर दिसत होता, त्याच्या दुप्पट तरी पीठांत बसविलेला असला पाहिजे. शिवाय लिंगाची रचना पाहिल्यास ती पिंडी सहजा-सहजीं स्वस्थानावरून हलणार नाहीं, अशीच तिची रचना असते. मंदिराभोंवतींचें दगडी आवार पहातां, समुद्रकिनारीं त्याची रचना आहे हें लक्षांत घेतां, आणि मूर्तिबद्दलच्या शास्त्रकारांच्या निर्बंधाची दखल घेतां तें लिंग काय किंवा मूर्ति काय पोकळ किंवा सहजासहजीं भंग पावणारी वा स्वस्थानावरून च्युत होणारी असेल असें वाटत नाहीं.

महंमद मूर्तिभंजक खरा पण याचा अर्थ तो सदैव काखोटीस छिनी हातोडी घेऊन जात होता असें वाटत नाहीं. आणि त्याजवळ हातोडा सदा सिद्ध असला तरी सहजासहजीं नेता येणाऱ्या त्या हातोड्यांनीं सोम-नाथासारख्या मंदिरांतील लिंग इतक्या सहजासहजीं फोडतां येईल, असेंहि वाटत नाहीं. हें महंमदाचें बाजूनें समर्थन करणें नव्हे. लिंग फोडतांना त्याला त्याच्या कल्पनेबाहेर शक्तिसर्वस्व खर्च करावें लागलें असेल, हें

नक्की. तात्पर्य इतकेंच कीं, मूर्ति भंजनाचा आणि महंमदाच्या स्वारीचा तपशील कसोशीनें तपासला पाहिजे, त्याची छाननीहि झाली पाहिजे.

हिंदुस्थानवर झालेल्या स्वाऱ्यांची माहिती सांगतांना इतर लेखकांच्या वर्णनांत नजरचुका किंवा अपुरेपणामुळें दोष राहिले आहेत. संशोधनाचा व्याप वाढल्यामुळें अनेक तपशील नंतर उपलब्ध झाले आहेत. आणि महंमदाच्या स्वाऱ्यांचे कालहि आतां बहुधा नक्की ठरले आहेत. श्री. चिंतामणराव वैद्य अथवा स्वामी श्रद्धानंद आणि त्यावेळचे इतर लेखक यांना उपलब्ध नसलेली माहिती आतां मिळाली आहे. तिच्या आधारानें पूर्वीच्या ऐकीव किंवा तवारिखांच्या आधारानें लिहिलेलें तपासणें सोपें झालें आहे. महंमदानें एकंदर स्वाऱ्या केल्या किती ? त्याची क्रमवार माहिती व सालवार तपशील पाहिल्यास श्री. चिंतामणराव वैद्य अथवा स्वामी श्रद्धानंद यांना नसलेली माहिती आम्हास आज उपलब्ध आहे हें स्पष्ट होतें.

★ ★ ★

कला १० वी

# म ध्यं त र

**सोमनाथ** मंदिराचा विध्वंस अशा प्रकारें झाला खरा. पण त्याच्या फेरबांधणीचा जीर्णोद्धाराचाहि इतिहास आहे. यवनांनीं त्याचा विध्वंस केला. आणि आमच्या राजांनीं तें प्राचीन प्रसिद्ध मंदिर पुनः पुनः बांधविलें. परंतु कुणीं पाडलें-विध्वंसलें नसतांहि, सोमानें सोन्याचें, रावणानें चांदीचें, श्रीकृष्णांनीं चंदनी लांकडाचें, आणि भीमानें दगडी मंदिर बांधिलें अशी पारंपरिक कथा रूढ आहे. भीमदेवाच्यावेळीं स्थापत्यशास्त्र प्रगत झाले असल्यामुळें दगडी मंदिर बांधलें.

भीमदेवानंतर पाशुपत संप्रदायाच्या आचार्यांचें प्रभास हें प्रमुख पीठ होतें. त्यावेळीं सोमनाथाला फार महत्त्व आलें होतें. भारतांतील सारे शैव संप्रदायी येथें दर्शनाला येण्यांत आपलें भाग्य समजत. भीमदेव, कर्णदेव, सिद्धराज जयसिंह यांचे वेळीं सोमनाथाचा महिमा अत्यंत पराकोटीला गेला होता.

अनहिलवाडच्या सिद्धराज जयसिंहानें सोमनाथ मंदिर बांधण्यास प्रारंभ केला. इ. स. ११४३ ते ७६ या त्याच्या कारकीर्दीत बांधकाम सुरूं झालें. सिद्धराज मोठा धार्मिक वृत्तीचा होता. त्याची माता मीनलादेवी ही कर्नाटक राजकुमारी आणि कर्णदेव सोळंकीची पट्टराणी होती. त्या कर्णदेवाचा मुलगा सिद्धराज होय. या राणीनें सोमनाथ यात्रा केली. सिद्धराजानें पुत्रप्राप्तीसाठीं सोमनाथाची पायीं यात्रा केली होती.

**पुत्रार्थं चरणप्रचारविधिना श्रीसोमनाथं ययौ ॥**

जयसिंहानें देऊळ बांधण्यास सुरवात केली. मालवाधिप कुमारपालानें तें इ. स. ११६९ सालीं संपूर्ण बांधून पुरें केलें. त्याला माळव्यांतील भोज परमारानें बरेंच साह्य करून अधिक भर टाकली. व दुसऱ्या भीमानें सोमनाथाच्या पुढें मेघनाद मंडप बांधिला. कुमारपालाच्या दरबारीं अनेक पंडित होते. त्यांत हेमचंद्र हाहि गाढा जैन पंडित होता. त्यावर कुमारपालाची जास्त भक्ति होती. राजानें त्याला विचारलें " मी कोणतें पुण्यकर्म करूं ? " हेमचंद्र म्हणाला ' सोमनाथ मंदिर बांध. ' त्याप्रमाणें कुमारपाळानें दगडी देऊळ बांधिलें. देऊळ बांधित असतां त्याला शिवलिंगाचें मोठें सिंहासन पूर्वीच्या लांकडी देवळाच्या जागीं सांपडलें होतें. कुमारपाळाचे वेळीं देहोत्सर्गाच्या ठिकाणीं घाट व पायऱ्या बांधिल्या आणि कुमारपालानें जवळच त्रिगुणात्मक मूर्तीची स्थापना करून निराळें मंदिर उभारिलें.

सोमनाथ देऊळ बांधण्यास गुजराथच्या कुमारपाल राजास प्रवृत्त करण्याचें श्रेय ' भावबृहस्पतीस ' ( लकुलिश पंथीयास ) आहे. परंतु जैनांनीं तें श्रेय हेमचंद्रास दिलें आहे. आपण तें श्रेय दोघांना देऊं. कारण कुमारपाळ हा आपलें दरबारीं सर्व पंडितांचा सारखाच आदर करीत होता.

तो भावबृहस्पतीचा वृत्तांत पुढील प्रमाणें आहे— इ. स. ११४४ मध्यें कुमारपाळ गुजरातचा सम्राट राजा होता. त्याचा आश्रित लकुलिश पंथीय भावबृहस्पति. त्याच्या मनांत जीर्णोद्धार करावा असें आलें. त्याप्रमाणें त्यानें मंदिर वाढविलें आणि नव्या भागाला ' मेरुप्रासाद ' म्हणूं लागला, त्याचें वर्णन असें— ' मंदिर कैलास पर्वतासारखें उंच,

रमणीय व मजबूत होतें. देवळाच्या उद्‌घाटन समारंभास राजा स्वतः हजर होता. त्यानें स्वतः पूजा केली. तो गांव देवस्थानला दान दिला. त्यानें प्रभास शहराचाहि पुनरुद्धार केला. देऊळ सोन्याच्या पत्र्यानें मढवून काढलें. नंतर गौरी, भीमेश्वर वगैरे देवालयें बांधून पत्र्यानें मढविलीं. राजसभेकरितां मोठा मंडप बांधिला. शिवाय सभागृह स्वतंत्र बनविलें. हें पांचवें देऊळ शेवटपर्यंत होतें. याचेच अवशेष अलिकडे सांपडले आहेत.

सोमनाथाच्या आवारांत असलेल्या भद्रकालीच्या देवळांत इ. स. ११८९ चा शिलालेख आहे., त्यांत निराळी हकीकत आहे. इ. स. ११६९ सालीं वाराणशीचा कनोजी ब्राह्मण मोठा तपस्वी. त्यानें भारतांतील साऱ्या देवळांच्या जीर्णोद्धाराचें कंकण बांधलें होतें. भारत-भर हिंडून त्या त्या ठिकाणच्या जनतेच्या सहाय्यानें द्रव्य जमवून त्यानें अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. त्याला सोमनाथ उध्वस्त झालेचें कळतांच तो तडक माळव्यांतून उज्जयनीमार्गें सोमनाथला आला. त्यानें जयसिंहाला देऊळ बांधण्यास प्रवृत्त केलें. त्याच्या अपेक्षेप्रमाणें सारें घडून आलें. आणि जयसिंहानें सुरू केलेलें कार्य कुमारपाळ व त्यानंतर क्रमानें भीम, भोज यांनीं पुरें केलें."

देवस्थानची चालुक्याचें अमदानींत व अनहिलवाडच्या वाघेले यांच्या कारकीर्दींत भरभराट होती.

इ. स. ११७८ मध्यें दुसरा भीमदेव ( भोळा भीम ) हा पट्टणचा राजा झाला. त्याच्या अमदानींत मुझुद्दीन घोरी यानें गुजरातवर स्वारी केली. त्या लढाईंत त्याचा भीमानें पराभव केला. त्यामुळें सोमनाथ स्वारीचा त्याचा बेत फसला. या भीमाचे वेळीं लकुलिश पंथीय आचा-र्यांचा प्रमुख वेदगर्भराशी होता. तो इ. स. १२१९ ते २३ च्या दरम्यान सोमनाथ देवस्थान व्यवस्थापक होता. त्यानें प्रभास क्षेत्रांत इ. स. १२२१ मध्यें सारस्वत विद्यालय काढिलें होतें.

त्रिपुरांतक नांवाचा ( लकुलिश पाशुपतापैकीं एक आचार्य ) शिल्पकार होता. त्यानें प्रभासमध्यें सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करून शिवाय आपल्या कुटुंबियांच्या नांवानें सोमनाथ देवळाभोंवतीं पांच शिवालयें बांधलीं. हीं सोमनाथ मंडपाच्या उत्तर दिशेला होतीं. त्यांचीं

नांवें– १ मल्लारेश्वर, २ उमापति, ३ उमेश्वर, ४ त्रिपुरांतकेश्वर, ५ रामेश्वर हीं होत. या पांचहि देवळांच्या आंतील गाभाऱ्यांत गोरखनाथ, भैरव, अंजनेय, सरस्वति, गणपती या पांच मूर्ति स्थापन केल्या होत्या.

या त्रिपुरांतकानें सोमनाथ प्रतिष्ठा महोत्सव केल्याचा उल्लेख आहे. वि. सं. १३४३ माघ शुद्ध ५ (इ. स. १२८७) '**सोमे लिंग प्रतिष्ठा महोत्सवः समजनि**' असा उल्लेख आहे. त्रिपुरांतकानें देवळांच्या व्यवस्थेकरितां नियम घातले होते. कोणी कोणी काय काय कामें करावयाचीं त्याची नोंद होती. शिवाय कोणाला काय द्यावयाचें त्याचीहि यादी दिलेली आहे. माळ्यानें २०० कमळें व दोन हजार सुगंधित पुष्पें द्यावीं असें म्हटलें आहे.

स्वतःला मिळालेलें द्रव्य त्रिपुरांतकानें देवाला देणगी म्हणून द्यावें. तसेंच तीन दुकानांची कमाई सोमनाथाला त्यानें लावून दिली होती. देवळाभोंवतीं कमानींना त्यानें तोरणें बांधलीं. फुलांच्या खर्चाकरितां जमीनींचें उत्पन्न बक्षिस म्हणून दिलेलें होतें. त्रिपुरांतकाच्या कालानंतर सोमनाथाला अनेक भारतीय राजांनीं देणग्या दिल्या. इ. सन १३०० पर्यंत देवस्थानची भरभराट होती. पण इ.सन १३०० नंतर देवस्थानची सद्दी कमी होऊं लागली.

इ. स. १२९६ मध्यें अल्लाउद्दीन दिल्लीच्या गादीवर आला. अनहिलवाडपट्टणचा राजा कर्णदेव इ. स. १२९४ ते इ. स. १३०४ पर्यंत गादीवर होता. कर्णाचा प्रधान माधवी याचें राजाशीं वैर होतें. म्हणून सूड घेण्यासाठीं त्यानें अल्लाउद्दीनाला बोलाविलें. ही राष्ट्रद्रोहाची सुरवात होय. अल्लाउद्दीन आपला सरदार उलुगखान ( अलफखान ) यासह ससैन्य दिल्लीहून वाटेंत जाळपोळ करीत निघाला. झालेरचा राजा कान्हडदेव यानें रस्ता देण्याचें नाकारलें, मग तो मेवाड रस्त्यानें आला. मेवाडच्या राजानें दंड भरून लष्कराला जाऊं दिलें. मोडशाच्या नाना ठाकूर यानें त्याच्याशीं सामना दिला. तो धारातीर्थीं मरण पावला. नंतर म्हैसाणा, पालनपूर, डांगरवा आणि त्याजवळचा मुलूख उध्वस्त करून पाटणचें भांडार लुटलें व पाटणहून सौराष्ट्रांत अल्लाउद्दीनचें लष्कर आलें. सौराष्ट्रांत त्याला विरोधी कोणी भेटला नाहीं. म्हंमदाच्या मागील स्वाऱ्यानंतर

तरी जागे होऊन सर्व राजे महाराजांनीं संघटित व्हावयास पाहिजे होतें. पण उदासीन, स्वार्थी वृत्ति नडली. लष्कर येतांच गांवांतील लोकांनीं पळून जावें. रस्त्याच्या कांठचीं गांवें लुटून, जाळीत लष्कर चाललें. जळती गांवें पाहून लोकांत कोलाहल माजला. अल्लाउद्दीन येतांच कर्णदेव पळाला. सोमनाथाचें रक्षण करण्यासाठीं प्रभासच्या भोंवतालीं असलेल्या रजपुतांनीं सर्व सामर्थ्य एकवटून प्रतिकार केला. पण शेवटीं त्यांचा पराजय झाला. ते सारे सोमनाथापुढें आडवे पडले. त्यांची कत्तल होऊन त्यांत माधवीहि मारला गेला. मंदिर पुन्हां उध्वस्त झालें,

अशा रीतीनें कुमारपालापासून भरभराटीस आलेल्या या मंदिराचा इ. स. १२९८ मध्यें संपूर्ण नाश झाला. महंमदाचा लौकिक अल्लाउद्दीनाचे कानावर गेला होता. आपल्या चुलत्यास मारून तो गादीवर आलेला, सैन्यास संतुष्ट ठेवण्यासाठीं त्याला द्रव्याची अत्यंत गरज होती. हें देवस्थान चांगलें भरभराटीस आलेलें म्हणून अल्लाउद्दीन सोमनाथवर चढाई करून आला खरा पण फारशी प्राप्ति झाली नाहीं. कारण महंमदानें दोन वेळां सारें धुवून नेल्यानंतर त्या अनुभवानें शहाणी झालेली व्यवस्थापक मंडळी व जनता यांनीं सोमनाथाला आतां अगदीं साध्या रीतीनें सजविलें, आणि स्मशानस्थ शंकर फक्त संततधार, बेलफुलांनीं युक्त राहिला. यामुळें लुटींत फारसें कांहींच सांपडले नाहीं. त्याचा राग त्यानें लिंगावर व मंदिराच्या शिल्पकलेवर काढला, आणि मंदिर उध्वस्त केलें.

नंतर जुनागडचा चुडासामा राजा महिपालदेव यानें इ. स. १३०८ ते १३२५ च्या दरम्यान देवालयाचा जीर्णोद्धार केला. मंदिरावर सोन्याचा कळस होता. नंतर इ. स. १३२५ ते १३५१ पर्यंत महिपालदेव पुत्र खंगार हा जुनागडच्या गादीवर आला. त्याचे नांव चुसस्मराय होतें. यानें पुन्हां लिंग प्रतिष्ठा केली, साधेंच मंदिर बांधलें.

नंतर इ. स. १३७५ मध्यें गुजरातचा पहिला सुलतान मुझफरशहा यानें हल्ला केला. आतांपर्यंत मंदिराचा नाश झाला नंतर दिल्लीचा सुभेदार झाफरखान हा गुजराथचा स्वतंत्र सुभेदार झाला. त्यानें इ. स. १३९५ मध्यें सोमनाथवर पुन्हां हल्ला केला. आणि मंदिराची मशीद केली. काझींच्या नेमणुका केल्या. हे हल्ले अल्लाउद्दीनानंतर शंभर वर्षांत झाले,

मूर्ति फोडणें हें एक प्रत्येकाला वेडच लागलें होतें. अल्लाउद्दीनानंतर अंदाजें शंभर वर्षें पूजाअर्चा सुरक्षित चालू होती. त्यावेळीं मक्केला जाणें येणें वेरावळ बंदरांतून सुरू झालें. त्याचा परिणाम म्हणून वरचेवर दिल्ली-हून येणाऱ्या सुभेदार सरदारांनीं सोमनाथावर हल्ला करण्याचा उपक्रम सुरूं ठेवावा. जणुं मक्केच्या यात्रेंतील सोमनाथ नाश हा भागच होता कीं काय? नंतर मुजफरशहाच्या नातवानें सोमनाथ स्वारी करून देऊळ फोडलें. पुढें अहमदाबाद शहर वसविणारा अहमदशहा याला लहर आली व त्यानें सोमनाथावर हल्ला केला. त्यानंतर इ. स. १४७१ मध्यें जुनागड जिंकणारा महंमद बेगडा यानें मंदिराचा नाश केला. देवळाची मशीद बनविली. बांधणें व पाडणें असें हें चक्र सतत सुरू होतें. येथून इ. स. १५०० पासून २०० वर्षें साधारण पूजाअर्चा चालू होती.

इ. स. १५९० मध्यें तिसरा मुझफरशहा यानें पुन्हां मंदिराची मशीद बनविण्याचा प्रयत्न केला. पण तो व्यर्थ गेला. पुढें कांहीं काळ मंदिराचें पावित्र्य कायम राहिलें, पण देऊळ सुस्थितींत आहे हें दिल्लीश्वर अवरंगजेबला सहन झालें नाहीं. निरनिराळीं क्षेत्रें त्यानें भ्रष्टविण्याचा सपाटा चालविलाच होता. वास्तविक इस्लाम धर्माचा अभिमानी असतांना इतर धर्माबद्दल असे अनुदार वर्तन इस्लाम संस्कृतीला कसें खपलें ? हा प्रश्न आहे. इ. स. १७०१ मध्यें गुजरातचा सुभेदार महंमद आझम याला अवरंगजेबाचें आज्ञापत्र गेलें तें असें– " सोमनाथ देवालय पुन्हां दुरुस्त करूं नये, या दृष्टीनें संपूर्ण नाश करून टाकावा. "

यापूर्वीं इ. स. १६६९ सालीं असेंच फर्मान त्यानें काढलें होतें. यावेळीं दक्षिणेंतील राजे जोरांत होतें. त्यामुळें कांहीं चाललें नाहीं. अनुकूल वेळ येतांच इ. स. १७०१ मध्यें वरील फर्मान काढलें, त्याप्रमाणें सोमनाथ देवस्थान नको म्हणून त्यानें इ. स. १७०२ मध्यें प्रथम गोवध करून या देवालयाचा महंमद आझम कडून संपूर्ण नाश करविला. ( श्री. मुनशीजी १७०६ साल लिहितात. ) त्या ठिकाणीं दगडा विटांचा कसलाच अवशेष त्यानें शिल्लक ठेविला नाहीं. अक्षरशः गाढवाचे नांगर मंदिराच्या जागेवरून फिरविलें. भारतीय शिल्पकलेचें व धर्मभावनेचें प्रतीक नष्ट करून मशीद बांधून पुरी केली. यामुळें सोमनाथाची पूजा गांवाबाहेरील एका छोटया देवळांत होई. याच वेळीं मराठावीर धनाजी

जाधव यानें इ. स. १७०५ मध्यें रतनपूरच्या लढाईंत मुस्लीम सैन्याचा पराभव केला. आणि लवकरच दमाजी गायकवाड यानेंहि वरचेवर हल्ले केले. सौराष्ट्रावर संपूर्ण ताबा मिळविला, त्यामुळें मुसलमानी राजांचा जोर कमी झाला.

नंतरच्या काळांत देऊळ बांधलें पण जुनागडच्या नबाबानें इ. स. १७८२ मध्यें फिरून उध्वस्त केलें. तेथें जवळच मशीद बांधली. मंदिर उध्वस्त झाल्यावर समुद्राची वाळू त्या ठिकाणीं सारखी लाटांनीं वर येऊं लागली. यानंतर त्या मूळ स्थानावर मंदिर बांधण्याचा नाद जनतेनें सोडला असावा. फक्त जवळ एक मशीद तेवढी राहिली. जनता उदासीन त्राणहीन बनली. पण इकडे प्रभासचे सोमनाथ पुण्यश्लोक देवीच्या स्वप्नांत आले, आणि त्या साध्वीला जीर्णोद्धाराची प्रेरणा झाली. ती देवी म्हणजेः--

**देवि ! अहिल्याबाई ! झालीस जगत्रयांत तूं धन्या ॥**
**न न्याय धर्मनिरता, अन्या, कलिमाजिं ऐकिली कन्या ॥**

मोरोपंत

इ. स. १७८३ मध्यें देवी अहिल्याबाईनें नवीन देऊळ बांधिलें आणि लिंगाचा नाश टाळण्यासाठीं भुयारांत ठेविलें. तो इतिहास पुढें.

★ ★ ★

कला ११ वी

# जगन्नय धन्या अहिल्यादेवी

**अवरंगजेबानें** सोमनाथ देवस्थान नष्ट केलें. त्याकाळीं भारतांत व महाराष्ट्रांत सतत सत्तेसाठीं युद्धें सुरू होतीं. श्रीछत्रपति शिवाजी महाराजानंतर महाराष्ट्रांत यावनीसत्तेला तोंड देण्यासाठीं फार शक्ति खर्च पडली. मराठेशाहीला आपली सत्ता स्थिर करण्यास फार मोल द्यावें लागलें. तीच अवस्था इतरत्र होती. यामुळें सोमनाथ देवस्थानचा विचार जनतेपुढें येऊनहि त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं.

साऱ्या भारतांत मंदिरें, धर्मशाळा, विहिरी, घाट, अन्नसत्रें, पाणपोया या प्रीत्यर्थ दानधर्म करणारी महाभागा पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर हिला अद्याप जगांत तोड नाहीं. ती पतिनिधनानंतर वैधव्यांत राज्यधुरा वहात असतांना भगवान् शंकराच्या प्रेरणेनें इ. स. १७८३ मध्यें सोमनाथाचें भव्य मंदिर बांधून तिनें देवालयाचा जीर्णोद्धार केला. वरचेवर होणाऱ्या आघातामुळें देवींनीं मूळची मंदिराची जागा बदलली. तिला वाटलें कीं, मंदिराचें स्थान अशुभ आहे. म्हणून वरचेवर घातक आघात त्यावर होतात. यास्तव तें बदललेलें बरें. असा विचार करून पूर्वस्थलासमीप नवीन मंदिर बांधलें. शंकराच्या पिंडीची स्थापना केली. यात्रेकरूंकरितां एक प्रशस्त धर्मशाळा बांधिली. मंदिराची रचना मात्र थोडी निराळी केली. मुख्य देवस्थान तळघरांत असून त्यांत प्रशस्त पिंडी आहे. तसेंच तेथें नित्य नंदादीप, पूजा, अर्चा, नैवेद्य, अभिषेक व्हावा अशी देवीनें व्यवस्था करून ठेविली आहे. वीस पंचवीस माणसें सहज आंत मावतील असा गाभारा आहे. वरचे बाजूस दर्शनीं महादेवाची साधी पिंडी आहे. प्रसंग आला तर खालच्या शिवलिंगास त्रास न होतां भुयारबंद करितां यावें व हानी झाली तर ती वरचेवर व्हावी. प्राणप्रतिष्ठा झालेल्या मूळच्या देवतेस धक्का पोंचूं नये म्हणून देवी अहिल्याबाईनें अशी व्यवस्था केली.

एका भारतीय स्त्रीरत्नानें सोमनाथाचा जीर्णोद्धार करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें, त्या देवीला शतशः प्रणाम ! पुण्यश्लोक

अहिल्याबाईनें बांधलेल्या देवाचें दर्शन, पूजन वगैरे सारे उपचार आज तागायत सुरू आहेत. परंतु मूळच्या मंदिराचें स्वरूप त्या जागेवर कांहींच उरलें नाहीं. कारण त्या जागेवर वाळूची भर आली. व मंदिराचें मूळ स्वरूप नष्ट झालें. थोडे अवशेष सांपडले. आजूबाजूला विखुरलेले होते. पैकीं कांहीं इंग्रजी राज्यांत सौराष्ट्र सरकारनें पुराणवस्तु संग्रहालयांत ठेविले. ते आजहि तेथें पाहावयास मिळतात. त्यांत कांहीं जुन्या देवळाचे मोठमोठे भागहि आहेत. सोरटी सोमनाथाचा हा इतिहास अत्यंत विदारक व हृदयाला खोलवर जखम करणारा आहे. इंग्रजी राज्यांत मात्र सोमनाथाच्या वाटेला कोणी गेलें नाहीं. उलट सोमनाथाच्या विध्वंसामुळें भारतीय प्रजाजनांना नितांत दुःख झालें. तेव्हां त्या दुःखाची अंशतः भरपाई करण्यासाठीं कांहीं तरी करावें म्हणून इंग्रज अधिकारी कसे धडपडत होते, याचें प्रत्यंतर पहिल्या अँग्लो–अफगाणच्या युद्धाच्या (१८४१–४२) शेवटच्या अंकांत आढळतें.

पहिल्या अफगाण युद्धांत जनरल् नॉट् गजनी मार्गें, आणि जनरल् पोलक जलालाबादेहून काबूलच्या रोखानें निघाले. काबूलला पोंचल्यानंतर त्यांनीं तेथील मोठा बाजार लुटला. जाळून पोळून उध्वस्त केला. इंग्रजांची फौज काबूलमध्यें हिंडत होती. आपली गमावलेली इभ्रत आतां पुन्हां सांवरली असें त्यांचें समाधान होतांच त्यांनीं माघार घेण्याचें ठरविलें. माघार घेतांना मात्र महंमदानें गजनीस नेलेले चंदनी दरवाजे आणण्यास ते विसरले नाहींत. एलनबरो हा त्यावेळीं गव्हर्नर जनरल् होता. त्यानें जनरल् नॉटला ४ जुलै इ. स. १८४२ रोजीं मुद्दाम खलिता धाडला होता कीं––

"महंमदाच्या कबरीला असलेले सोमनाथाचे दरवाजे तुम्ही अवश्य घेऊन यावे. त्याच्या कबरीवर त्याचा एक सोटा टांगून ठेविला आहे, तोहि आणावा. हे सोमनाथाचे दरवाजे म्हणजे तुमच्या यशस्वी हल्ल्याची संस्मृति म्हणून हिंदुस्थानांत राहतील."

त्याप्रमाणें नॉट्नें गझनीच्या महंमदाची कबर हुडकून काढून तेथील दोन प्रचंड दरवाजे "हिंदु जनतेच्या अपमानाचें स्मारक होऊन इतकीं वर्षें परदेशांत पडून राहिलेले पण आतां त्यांच्या राष्ट्रीय अभिमानाचें प्रदर्शन करणारे," मोठ्या डौलानें मिरवीत आणले.

फिरोझपूर येथें गव्हर्नर जनरलनें एक मोठा समारंभ घडवून आणला. आणि हिंदु राष्ट्रास ते दरवाजे मोठ्या अभिमानानें नजर केले.

परंतु अफसोस ! तपासाअन्ति कळलें कीं, ते दरवाजे चंदनी नसून पाईन लाकडाचे होते. लष्करी खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून बेसुमार झाला होता. त्यावरील टीका सौम्य करण्यासाठीं, लोकांना भुल-विण्यासाठीं तर हा सोमनाथाच्या दरवाजाचा फार्स घडवून आणला नसावा ?

ब्रिटिशांचे सद्धेतु मानले तरी त्या दरवाज्यावर सबक्तगीनाचा अरबी लेख सांपडल्यामुळें सगळेंच मुसळ केरांत गेलें ! ! लष्करी व सरकारी गोटांत ती सोमनाथ द्वारकथा एक थट्टेचा विषय बनून राहिली.

( आधार – सिंहाला शह- श्री. श्री. रा. टिकेकर पृ. २३–२४ पार्लमेंटरी कागद-अफगाणिस्तान नं. ४०४ )

★ ★ ★

# श्री सोमनाथ – उत्तरार्ध

कला १२ वी

## औ दा सि न्य

**सुमारें** इ. स. १८०० मध्यें बडोद्याच्या गायकवाडांनीं सौराष्ट्र प्रदेश ताब्यांत आणला. तो फिरून इ. स. १८११ मध्यें जुनागडच्या नबाबानें ताब्यांत घेतला. त्याचें नांव बहादूरखान होते. त्यावेळीं गायकवाडांनीं सोमनाथाची व्यवस्था करण्याचें काम आपल्याकडे घेतलें. जुनागडच्या राजानें योग्य दक्षता घेतली. व इनाम करून दिलें. तसेंच वर्षासनहि सुरूं केलें. दडपणामुळें गायकवाडाला करून दिलेला करार म्हणून त्याला ' कलमबंदी ' अशी संज्ञा पडली. ती इ. स. १८१३ मध्यें झाली. इ. स. १८२० पर्यंत व्यवस्था सुरळीत होती. काठेवाडावर ब्रिटिशांनीं ताबा मिळविला. त्यांनीं जुनागडच्या नबाबाला यात्रेकरूंवर कर बसविण्याची परवानगी दिली. जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यावरहि कर बसविला. इ. स. १८३० मध्यें बडोदे सरकारनें हरकत घेतली आणि कराचा पैसा सर्व परत मिळविला. व तो बडोदेसरकारनें यात्रेकरूंना परत दिला.

इ. स. १८३८, इ. स. १८४१, इ. स. १८६५ या तीन सालांत कर बसविण्याचे जोरांत प्रयत्न झाले. पण ते सारे असफल झाले. पण पुढे नबाबाची बाजू इंग्रजांनीं उचलून धरली. गायकवाडांचें सामर्थ्य कमी केलें. नबाबाचें धोरण देवालयाचा नाश करण्याचें होतें. हळूहळू अहिल्यादेवीचें देऊळहि वैभवानें कमी करण्याचें प्रयत्न चालू झाले. त्यामुळें वरचेवर दंगेधोपे होऊं लागले. हिंदूनीं देऊळ बांधण्याचा किंवा

दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला कीं, नबाबानें विरोध करावा. सरकारी दडपण आणि जीवाची भीति तसेंच जातीय दंगलीचा त्रास यामुळें जनतेला क्वचित् दडपण पत्करावें लागलें.

यामुळें सोमनाथाची स्थिति खालावली. जनतेला देवाची दुर्दशा उघड्या डोळ्यांनीं पहावी लागली. आणि दंगे थांबविण्याच्या मिषानें हिंदूंना त्रास होऊन परावृत्त व्हावें लागे. मंदिराची साधी दुरुस्ती करण्यासाठीं परवानगीची फार कटकट होऊं लागली.

इ.स. १९२१ सालीं व्हाईसराय लॉर्ड कर्झन यांनीं जुनागडला भेट दिली त्यावेळीं हें प्राचीन स्मारक कायम ठेवण्याचा आदेश दिला होता.

## सोमनाथावर अखेरचें गंडांतर

भारतावर इंग्रजांचें राज्य झाल्यावर जुनागडच्या नबाबाचें संस्थानांत प्रभास पट्टण व सोमनाथ देवस्थान मोडूं लागले. संस्थानची प्रजा बहुसंख्य हिंदु असल्यानें नबाबाच्या कारकीर्दीमुळें प्रजेला त्रास होऊं लागला. प्रजेला संस्थानांत धार्मिक स्वातंत्र्य बेताचेंच होते. जुलूम असह्य होत होता. अशी अवस्था होती. भारताचे दोन तुकडे झाले आणि भारत स्वतंत्र झाला. त्यामुळें पुन्हां सोमनाथ देवस्थान बद्दल भीति वाटण्यासारखा प्रसंग ओढवला.

स्वराज्याच्या सुरवातीस त्याबद्दल बरीच चिंताजनक परिस्थिति उद्भवली. कारण नबाब पाकिस्तानशीं लगट करीत होता. ही गोष्ट जामनगरच्या महाराजांनीं सरदारांच्या कानावर घातली. श्री. सामळदास गांधी आणि श्री. ढेबर इत्यादि कॉंग्रेस पुढाऱ्यांनींहि ही गोष्ट ओळखली. आणि कांहींतरी हालचाल केली पाहिजे, म्हणून दिल्लीस कळविलें. भारतीय सरकारचे प्रतिनिधि जुनागडास गेले. तेव्हां त्यांना या भावी संकटाची यथार्थ कल्पना आली.

वेरावळ हें बंदर कराचीपासून फार नजीक असल्यानें नबाबानें पाकिस्तानांत सामील होण्याचे बेत चालविले. खेदाची गोष्ट ही कीं, पत्रव्यवहार, तारा आणि टेलिफोन ही सर्व खातीं आमच्या हातांत असतांनाहि त्यावर देखरेख ठेवण्याची सुबुद्धि कोणाहि सरकारी

अधिकाऱ्याला सुचली नाहीं. नबाब पाकिस्तानांत पळून गेल्यावर म्हणे हा सारा पुरावा सरकारचें हातीं सापडला.

जुनागडला वळविण्याचा हा पाकिस्तानी प्रयत्न गुप्तपणें चालू असला तरी त्याची वाच्यता होत होती. सोमनाथ मंदिर पाकिस्तानांत जाणार ही कल्पनाच राजे महाराजांना दुःसह होती. आणि शक्यतों प्रयत्न करून जुनागड पाकिस्तानांत सामील होऊं नये, अशी खटपट त्यांना करावयाची होती. म्हणून जामसाहेबांनीं दिल्लीस जाऊन आपलें सर्व वजन खर्च करून सरकारी अधिकाऱ्यांना जागृत केलें. कारण काठियावाडांत राहाणारांना त्या दुःखाची जितकी तीव्र जाणीव होती. तितकी दूरस्थ दिल्लीकरांना आली नसती.

शिवाय सुधारणावाद्यांच्या आहारीं गेल्यामुळें देवाधर्माचें किंवा मंदिरा–देवळांचें एवढें काय महत्त्व, असा संदेहवादी विचार आधुनिक आंग्ल विद्या विभूषित अधिकाऱ्यांच्या आंगवळणी पडला होता. परंतु श्री. सरदार आणि श्री. काका गाडगीळ हे दोघे असें खंबीर होते. आणि त्यांना या सोमनाथाबद्दल नितांत आदर असल्यानें त्यांनीं एतत् संबंधीं प्रथमपासून कडक वृत्ति धारण केली. आणि बहुधा त्यांचा मनाशीं निश्चय असला पाहिजे कीं, सोमनाथ मंदिर हें पाकिस्तानांत कांहीं झाले तरी जाऊं द्यावयाचें नाहीं.

राजकीय वाटाघाटींत लार्ड मौंटबॅटन यांचे राजकीय सल्लागार व जुनागडचे दिवाण आणि नबाब, यांचे परस्पर सल्लामसलतीचे डावपेंच चालू असले तरी कालहरण करून पाकिस्तानशीं संबंध जुळविण्याबाबत नबाबी कारवाया चालू होत्या. पाकिस्तानी पोलीस पाठवून आणि पाकिस्तानी पैसा जुनागडीं ओतून नबाबाला वश करण्याचें प्रयत्न जोरांत सुरू होते. अखेरीस सरदारांच्या खंबीरपणाचा विजय झाला. आणि काठियावाडांत आमचें सैन्य जाऊन पोंचलें. त्यांनीं जुनागडचा ताबा घेतला. इकडे काठियावाडी कॉंग्रेसनें हंगामी राज्य ( अरझी हुकमत ) स्थापिलें. आणि सर्व कारभार हातीं घेण्याचें ठरविलें. पुढें यथासमय सर्व कांहीं हवें तसेंच घडून आलें. पण मध्यंतरीं परिस्थिति अत्यंत चिंताजनक नी स्फोटक होती, हें निःसंशय. केवळ सोमनाथाच्याच कृपेनें हें गंडांतर

टळलें. आणि जुनागडचा नबाब पळून गेला. पाकिस्ताननें पुष्कळशी ओरड केली. तरी देखील तें संस्थान भारतांत विलीन झालें. तो इतिहास असा.

इ. स. १९४७ च्या २४ आक्टोबरला विजयादशमीचें सुमुहूर्तावर श्री. वल्लभभाईनीं जुनागड आपल्या ताब्यांत घेतलें. श्री. वल्लभभाई पटेल श्री. काकासाहेब गाडगीळ, व श्री जामसाहेब हे तिघे १२ नोव्हेंबर इ. स. १९४७ ला दिपवाळीस जुनागडला गेले. तेथून वेरावळला जाऊन कार्तिक शु.' १ संवत २००४ च्या पाडव्याला सोमनाथ दर्शन घेतलें. जामसाहेबांनीं पटेलांना उद्धार करण्याचें सुचविलें,आणि त्याप्रमाणें देवळा-पुढील प्रचंड सभेंत सरदार पटेलांनीं घोषणा केली. " आम्ही या प्रसिद्ध नववर्षीं देवस्थानचा पुनरुद्धार करणार तरी जनतेनें या सत्कार्याला मदत करावी. " त्यावेळीं जामसाहेबांनीं एक लाख रुपये आणि सामळदास गांधी यांनीं अरझी हुकमतीतर्फे ५१ हजार रुपये देणगी दिली.

इ. स. १९४८ जानेवारींत श्री मुनशीजी सोमनाथला गेले. पूर्वींच्या देवळाच्या सभामंडपाचा प्रदक्षिणेच्या मार्गावरील अंतराळचा भाग शिल्लक होता. देवळाच्या खांबावरील कमानीहि होत्या. आणि कांहीं मोडलेल्या कमानी होत्या. ३५ फूट अंतरावर एक एक असे आठ खांब सभामंडपांत होते. शिखराचे अवशेष पश्चिमेस पडले होते. कांहीं मूर्ति सांपडल्या. उत्तरेकडे दगडाचें महापीठ बनविलें असून त्याला हत्ती, घोडे यांचा आधार असल्यासारखे कोरले होते. खांबाचे अवशेष शिल्लक होते. मेघनाद मंडपाची फरशी बाहेर दिसत होती. या फरशीखालीं पूर्वींच्या देवळाचे पाये व अवशेष सांपडले. खालीं अगदीं शिखराकरितां तयार केलेले दगड सांपडले. पूर्वींच्या देवळाचे दगड नंतरच्या देवळाकरितां वापरल्याचें दिसत होतें.

शिल्पकला अशी पराकोटीला गेलेली होती कीं, दोन दगडांत सिमेंट, किंवा चुना वगैरे कांहीं जाऊंच शकत नव्हतें. कांहीं ठिकाणीं सिमेंटहि सांपडलें. जुना पाया अत्यंत मजबूत होता. तो जमीनीखालीं तेरा फूट खोल होता. त्यावर सारी वाळू आलेली. जुन्या अवशेषांचा उपयोग न करितां नवीन सामग्रीनें देऊळ बांधावयाचें ठरलें.

इ. स. १९४९, २३ जानेवारीला जामनगरला एक परिषद भरली. त्यांत श्री. सरदार पटेल, श्री. काकासाहेब गाडगीळ,

श्रीमान् जामसाहेब, श्री. ढेबर, श्री. सामळदास गांधी हजर होते. सोमनाथ योजनेकरितां विश्वस्त मंडळ नेमलें. विश्वस्त मंडळांत देणगीदारांतून दोन प्रतिनिधि, भारत सरकारतर्फे दोन, लोकनियुक्त पुढारी दोन, सौराष्ट्र सरकारचे दोन ( त्यांत एक जुनागडचा ) अशा या विश्वस्त मंडळाला भारत सरकारनें सल्लागार मंडळ (मदतीकरितां) नेमावें असें ठरलें. या मंडळाचा उद्देश पुढीलप्रमाणें:–

१ श्री सोमनाथ देवस्थान बांधणें. २ देहोत्सर्गस्थानावर स्मारक व त्याची व्यवस्था करणें. ३ देवस्थानची सारी व्यवस्था कायम करणें. ४ भोंवतालच्या देवस्थानचा जीर्णोद्धार करणें. ५ आसपास बागबगीचा इत्यादि मनाला प्रसन्न वाटणाऱ्या गोष्टींची योजना करणें इत्यादि. घटनेप्रमाणें ट्रस्ट् डीड् करण्याचें काम श्री. मुनशीजींकडे सोपविलें.

सोमनाथ मंदिराबरोबर संस्कृत विद्यापीठ असावें, अभ्यासाकरितां एकांत स्थळें व उत्कृष्ट गोशाळा वगैरे गोष्टी असाव्या, अशी श्री. मुनशीजींची कल्पना होती.

संस्कृत विद्यापीठाच्या कल्पनेचें कारण असें कीं, देशांत दहा हजारावर प्राचीन संस्कृत पाठशाला आहेत. त्या केवळ धर्माच्या नांवावर चालतात. त्यांनीं ही संस्कृत भाषा जिवंत ठेविली. अशी विद्यापीठें भारतांत काशीचें क्वीन्स् कॉलेज, कलकत्ता संस्कृत कॉलेज, भारतीय विद्याभवन (मुंबई) हीं विद्यापीठें असून काशी येथील सांगवेद विद्यालयासारख्या मोठ्या संस्थाहि आहेत. आणि त्यांतून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी शास्त्री, आचार्य, तीर्थ, रत्न या पदव्या घेऊन बाहेर पडतात. दक्षिणेंत तिरुपति येथें मोठें विद्यापीठ आहे. सोमनाथ विद्यापीठ हें भारतीय विद्यापीठ झालें तर या साऱ्या संस्था या विद्यापीठाला जोडतां येऊन संस्कृत भाषा जिवंत राहून तिचें पुनरुज्जीवन होईल. याकरितां सोमनाथ विद्यापीठाच्या आवश्यकतेची कल्पना सत्यसृष्टींत उतरली.

सोमनाथ विद्यापीठ कां ? याला श्री मुनशीजींनीं दिलेलीं कारणें–

१ प्राचीन काळीं सोमनाथ हें संस्कृत विद्येचें भव्य केंद्र होतें. यामुळें देशांतील वा परदेशांतील विद्यार्थी शिक्षणाकरितां व विविध ज्ञानार्जनाकरितां येत असत.

२ सोमनाथ जागतिक देव असल्यानें मुसलमानादि सर्व पंथाचे व्यापारी दर्शनास येत.

३ आजसुद्धां अनेक परदेशस्थ लोक अभ्यासार्थ येत असतात.

४ संस्कृत विद्या व आधुनिक विद्या यांचा सोमनाथला समन्वय होऊन समन्वयाचें ठिकाण म्हणून जागतिक महत्त्व प्राप्त होण्याचा संभव आहे.

५ संशोधन कार्य सुरू राहील.

या करितां सोमनाथ विद्यापीठ असावें. या विद्यापीठाकरितां पन्नास लाख भांडवल पाहिजे. दरवर्षी पांच लाखाचा खर्च होईल. कारण तें विद्यापीठ भारतीय होणार. यामुळें भारतांतील साऱ्या पाठशालांचा त्याच्याशीं संबंध पोंहोचेल. विद्यापीठाला जमीन घ्यावयाचा इरादा असून सौराष्ट्र सरकार ती देणार आहे.

ही कल्पना सरदारांना पसंत पडून ट्रस्ट्मध्यें घातली. भारत सरकारनें १५ फेब्रुवारी १९४९ ला देवालयासकट भोंवतालची जागा विश्वस्तांच्या ताब्यांत देऊन सारे हक्क देऊन टाकले. व त्यावरील अधिकारहि दिले.

## भारत सरकारनें नेमलेलें सल्लागार मंडळ

१) श्री. सी. एम्. मास्तर ( आर्किटेक्ट् )
२) श्री. जे. सी. घोष.
३) श्री. प्रभाशंकर आ. सोमपुरा. ( परंपरागत शिल्पकार )
४) श्री. यु. जे. भट्ट ( चीफ् इंजिनियर-सौराष्ट्र सरकार )
५) श्री. बी. एस्. व्यास. सभासद.
६) श्री. जी. बी. देवळालीकर (सेंट्रल पी. ड. डी. आर्किटेक्ट्)
७) श्री. एस्. के. जोगळेकर.
( सेंट्रल. पी. ड. डी. चें टाऊन प्लॅनिंग ऑफिसर )
८) श्री. के. एम्. मुनशी. अध्यक्ष.
९) श्री. एन्. पी. चक्रवर्ती. ( पुराणवस्तु संशो. प्रमुख )
हे निमंत्रक होते.

जून ३० इ. स. १९४९ मध्यें या मंडळानें कामाला सुरवात केली. मंडळाच्या सूचनेप्रमाणें श्री. प्रभाशंकर सोमपुरा यांनीं जुन्या देवळाच्या पद्धतीवर नवीन योजना तयार केली.

आक्टोबर १८ ला श्री. पटेलांनीं विश्वस्तांची नांवें जाहीर केली.

१ श्री. जामसाहेब ( अध्यक्ष ), २ श्री. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ, ३ श्री. डी. व्ही. रेगे, ४ श्री. सामळदास गांधी, ५ श्री. ब्रिजमोहन बिर्ला, ६ श्री. कन्हयालाल मुनशी. श्री. ढेबर यांनीं विश्वस्त नसूनहि फार मोठी मदत केली. इ. स. १९४९ अखेर पंचवीस लाख रुपये देणगीरूपानें जमा झाले. इ. स. १९५० मार्च दि. १५ ला ट्रस्ट् डीड् रजिस्टर झाले. त्यामध्यें हेतु दिले आहेत तेः—

१) सोमनाथ देऊळ ( सल्लागार मंडळाच्या सल्ल्यानें ) बांधणें.

२) देवालयांत मूर्तीची स्थापना.

३) देवळाकरितां धर्मकृत्यांची योजना.

४) हिंदुधर्माच्या सर्व लोकांना दर्शनाची परवानगी देणें.

५) धर्मशाळा, व विश्रांतीगृह बांधणें, व्यवस्था करणें.

६) विद्यापीठ व इतर संस्था स्थापन करणें.
( संस्कृत विद्यापीठ स्थापण्याची कारणेंः— १ हिंदुधर्म शिक्षण प्रचार. २ संस्कृत ज्ञानाचा प्रसार ३ संस्कृत विद्येचें संशोधन व अभ्यास ४ संस्कृत विद्येचा प्रसार व संस्कृतीचें उत्तेजन वगैरे. )

७) देहोत्सर्ग, कीर्तिमंदिर स्मारक करणें.

८) अहिंदुना इच्छा असल्यास दर्शनाची परवानगी देणें. फक्त पूजा करितां येणार नाहीं.

९) भोंवतालची जागा सुशोभित करणें. तसेंच त्या ठिकाणीं शांत वातावरण निर्माण करणें.

१०) इतर देवालयांची डागडुजी व कायम व्यवस्था करणें. पवित्र स्थानें निर्माण करणें व व्यवस्था करणें.

११) गोशाळा तयार करून खर्चाची व व्यवस्थेची योजना करणें. गोचर भूमि व चराऊ कुरण मिळविणें.

१२) ट्रस्टच्या मनाप्रमाणें नवीन धार्मिक संस्था स्थापणें वा दुसऱ्या असतील त्या चालविणें.

दि. ३ जुलै १९५० ला झालेल्या भारतीय वनमहोत्सव प्रसंगीं प्रथम झाड लावण्यासाठीं श्री. मुनशीजी देहोत्सर्ग या ठिकाणीं गेले. आणि तेथें त्यांनीं वृक्ष लाविला. कृष्णांनीं देहत्याग केल्याची ती जागा आहे.

या देहोत्सर्गाच्या ठिकाणीं प्रथम झाड लावण्याचा हेतु असा:– " कृष्ण ही वनमहोत्सवाची देवता आहे. कृष्णाच्या वेळीं गिरीपूजा ही त्यावेळची संस्कृति होती. गोवर्धन महोत्सव, रैवतक पर्वत हीं कृष्णाचीं पूजेचीं व वास्तव्याचीं आणि विहाराचीं स्थानें होतीं. कृष्णांनीं पारिजात, व वैजयंति तुळस स्वर्गांतून पृथ्वीवर आणून द्वारकेंत लावली. वृंदावनाच्या गोचर भूमींत कृष्णांनीं गुराखी होऊन गाई चारल्या वगैरे. " अशा अनेक कारणांनीं वनमहोत्सवाची देवता कृष्ण असल्यानें प्रथम तेथें झाड लावलें.

दि. ८-५-१९५० रोजीं जामसाहेब याचें हस्ते सोमनाथाच्या या सातव्या देवाची कोनशिला बसविण्यांत आली. त्यावेळीं श्री. सरदारांनीं सोमनाथ देवस्थानबाबत असें समर्थन केलें कीं, ' सोमनाथाचा जीर्णोद्धार झाल्याशिवाय आपण स्वतंत्र झालों असें जनतेला वाटणार नाहीं. यास्तव हें घडणें इष्ट होतें. ' ( सोमनाथ दि श्राइन इटर्नल्. चिरंतनचें देवालय.–मुनशी. )

संकल्पाची पूर्तता दि. ११-५-५१ ला पूर्ण झाली. पण ही पूर्तता झालेली पाहण्यास दुर्दैवानें श्री. सरदार वल्लभभाई मात्र आमच्यांत राहिले नाहींत. त्यांना काळानें फार तडाख्यानें ओढून नेलें. यामुळें भारताची फार मोठी हानि झाली.

★ ★ ★

# स्व रा ज्यां ती ल  जा गृ ति

## सोमनाथ मंदिराचें मूळ संशोधन

**सरदार** वल्लभभाईनीं सोमनाथ जीर्णोद्धाराचा व प्राणप्रतिष्ठेचा बिगुल साऱ्या भारतांत आपल्या पोलादी नी कणखर वृत्तीनें वाजविला. त्यावेळीं आपल्या बरोबरीचे केंद्रिय सहकारी याबाबत काय विधान करितील, याचा यत्किंचितहि त्यांनीं विचार केला नाहीं. उलट हें एक पवित्र, धार्मिक कार्य असून राष्ट्रीय कृत्य आहे, अशीच वृत्ति त्यांनीं ठेविली. त्याप्रमाणें साऱ्या सहकाऱ्यांसह श्री. वल्लभभाईंचीं त्या दिशेनें चक्रें फिरूं लागलीं. स्वराज्य प्राप्तीनंतर भारतांत सोमनाथ प्रतिष्ठा व जीर्णोद्धार होणार हा मोठा शुभ शकून ठरला. जनतेंत तऱ्हतऱ्हेचे विचारतरंग सुरू झाले. कांहीं दिवाभीतांना हें कृत्य कसेसेंच वाटलें.

निधर्मी राज्याचें ध्येय डोळयांसमोर ठेवणाऱ्या कांहीं केंद्रीय राज्यकर्त्यांनीं सोमनाथ प्रतिष्ठा हें कृत्य स्वागतार्ह नी आवश्यक मानलें, याचें कित्येक संकुचित भावनेच्या पण विचारवंतांना विपरीत वाटलें. सर्वसाधारण बहुसंख्य हिंदु जनतेला मात्र सोमनाथ प्रतिष्ठेबाबत परमावधीचा आनंद झाला यांत शंका नाहीं. सोमराजा ज्याप्रमाणें सोमनाथ मंदिर बांधून शापमुक्त झाला. त्याप्रमाणें भारतहि गुलामगिरीच्या शापांतून मुक्त होऊन सोमनाथ मंदिर बांधण्यास सिद्ध झाला.


### वास्तुसंशोधन

शेंकडों वर्षांनंतर मूळ जागेवर मशीद व वाळूचे अनेक थर आल्यामुळें मूळचें सोमनाथ मंदिर कुठें होतें हें शोधण्यास संशोधकास बराच त्रास घ्यावा लागला. मोठमोठ्या भूगर्भशास्त्रज्ञांकडून व स्थापत्य विशारदांकडून (इंजिनीयर्स) मूळ जागा निश्चित करविली. ती निश्चित करतांना तेथील मशीद काढावी लागली. व वाळूंतील जागा ३६ ते ४० फूट खोल खणावी लागली. त्या जागेंत खणल्यानंतर तेथें एक प्रशस्त चौथरा असलेला मूळ पाया लागला. त्याच्या खालीं आणखी

भोंवतालीं खणल्यानंतर एकावर एक असे चार पाये लागले. चार पाये ओळखण्याचें चिन्ह म्हणजे पायाच्या प्रत्येक चौथऱ्याला एक एक अशीं चार गोमुखें सांपडलीं. यावरून त्याच पायावर वरचेवर मंदिर बांधिलें हें निश्चित ठरलें.

जुन्या देवळाचे कांहीं अवशेषहि सांपडले. अशा तऱ्हेनें मंदिराची पूर्वींची जागा निश्चित झाल्यावर त्याच पूर्वींच्या पायावर इमारत बांधावयाचें ठरलें. व त्याच जागेवर मंदिराचा कोनशीला समारंभ सरदार वल्लभभाई पटेल यांच्या हस्तें झाला. गजनीच्या महंमदानें देऊळ फोडण्यापूर्वीं ज्या कलाकारानें मंदिर बांधून शिखरावर कळस चढविला, त्याच कलाकाराच्या वंशजाकडे, त्याचा मागील इतिहास पाहून मंदिराचें कामीं कळस चढविण्याची व इतर कामगिरी दिली. आपल्या पूर्वजाकडून आलेला पिढ्यान् पिढ्याचा धंदा त्यानें जिवंत ठेविल्यामुळें ह्या प्रतिष्ठाप्रसंगीं त्या कलाकाराचें नांवहि अजरामर राहिलें. धन्य तो कलाकार !

याप्रमाणें मंदिराच्या बांधकामास झपाट्यानें सुरवात झाली. शेंकडों कारागीर त्याठिकाणीं बांधकामाकरितां नी कलाकौशल्य आणि शिल्पकलेसाठीं आणविले. मंदिरासाठीं त्याच प्रांतांतील उत्कृष्ट टिकाऊ असा पांढरा दगड वापरला. व मूर्तीकरितां त्याच प्रांतांतील उत्कृष्ट काळ्यानिळ्या बहु रंगाची रघुवीरशीला वापरली. आणि त्या शिळेची शाळुंकेसह शंकराची पिंडी बनविली. पिंडी भोंवतालच्या शाळुंकेचा घेर जवळ जवळ एका खणाइतका प्रशस्त असून पिंडी अत्यंत गुळगुळीत बनविली आहे. शाळुंकेच्या आंतील शिवलिंग जवळ जवळ पुरुषभर उंचीचें म्हणजे पांच फूट उंचीचें असावें. त्याचा परीघ अंदाजें आठ ते दहा फूट असावा. मंदिराबाहेरील चौथऱ्याच्या पायऱ्यापासून गाभाऱ्या-पर्यंत व गाभाऱ्यांत शिवलिंग व शाळुंका नेण्यास सतत दोन दिवस ७५ कारागीर व कामगार आणि चार इंजिनीयर्स अहोरात्र झटत होते. त्यांत मूर्तिभंग होता कामा नये याची फार दक्षता बाळगावी लागली. शिवलिंगापुढें असणाऱ्या चौथऱ्यावरील नंदी सुंदर, भव्य आणि उत्कृष्ट नक्षीनें सुशोभित, गुळगुळीत बनविला आहे. इ. स. १९५० च्या मे ८ तारखेस सातव्या नव्या मंदिराचा पाया घातला आणि कामाला भराभर



मंदिराचें बांधकाम

सुरवात झाली. साधारणपणें बाहेरचा चौथरा व आंतला गाभारा एवढें तयार झालें. नंतर प्राणप्रतिष्ठा लवकर व्हावी अशी सरदारांची इच्छा होती, त्याप्रमाणें इ. स. १९५१ ला साधारणपणें एप्रीलच्या १६ तारखे-पर्यंत स्थापना करण्याइतपत पूर्वतयारी झाली होती.

मूळ जागेच्या जवळ जुनाट मशीदीच्या रूपानें असलेला घुमट पाडून टाकला. पूर्वीं तेथें सूर्यमंदिर होतें. कारण तो पाडीत असतांना सूर्याची मूर्ति त्या जागेवर सांपडली होती. यावरून त्याठिकाणीं श्री मारुतीरायाची स्थापना करण्याची योजना ठरली.

याप्रमाणें मंदिराच्या भोंवतालच्या परिसरांत इतर कांहींच अवशेष शिल्लक ठेविले नाहींत. आणि अशा तऱ्हेनें ठरल्याप्रमाणें काम उरकल्यानंतर प्राणप्रतिष्ठा मोठ्या प्रमाणांत करण्याचें योजिलें. त्याप्रमाणें पुढारी वर्ग, व मंदिर विश्वस्त पुढील योजनेला लागले.

पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, मध्येंच श्री सरदार वल्लभभाई दिवंगत झाले. प्रतिष्ठेच्या आनंदाला थोडें गालबोट लागलें. देह सोड-ण्यापूर्वीं सरदारजींनीं सारी व्यवस्था विश्वस्तांवर सोपविली होती. त्यांना आपल्या प्रकृतीची शाश्वती वाटत नसल्यानें या आजारांतून आपण बरें होणें कठीण आहे, हें जाणूनच त्यांनीं सारी योजना करून आपला देह ठेविला. आणि भारत एका महान् कर्तृत्ववान् पुरुषाला व पुढाऱ्याला मुकला. सोमनाथाकरितांच नव्हे तर भारताच्या पुढील उज्वल भवितव्या-करितां तरी सरदार वल्लभभाईची भारताला आवश्यकता होती. अस्तु.

श्री. सरदारजी नंतर सोमनाथ विश्वस्त प्रमुख श्री. जामसाहेब, श्री. कन्हयालाल मुनशी, श्री. काकासाहेब गाडगीळ इत्यादींनीं व इतरांनीं पुढील अर्चेची जबाबदारी आपणावर घेतली. त्यांच्या खर्चाच्या योजनाहि निश्चित झाल्या होत्या. प्राणप्रतिष्ठेसंबंधीच्या कार्यांत आचार्यत्वाचा मान एकाद्या प्रांतांतील विद्वानाला मिळणें हें त्या प्रांताचें मोठें भाग्यच होतें. त्यासंबंधींचीं सूत्रें हालूं लागलीं. आचार्यत्वाचा मान कोणाकडे असावा, या संबंधीं कांहीं प्रांतीयवाद उपस्थित झाले. परंतु स्थापने-संबंधींचा शास्त्रीयवाद व कांहीं शास्त्रार्थाचें विवेचन भारतांतील कांहीं पंडितांकडून करविलें. आणि शेवटीं मंत्रिमहाशय श्री. मुनशीजींच्या सल्ल्यानें सौराष्ट्र राजप्रमुखांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या सोमनाथ

प्राणप्रतिष्ठा स्वागत समितीनें प. प. गु. केवलानंद सरस्वति स्वामीजी व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, अध्यक्ष प्रा. पा. शाळा वांई, या गुरु-शिष्यांना पाचारण केलें. प्रतिष्ठेच्या धार्मिक कार्याची सारी जबाबदारी त्यांचेवर टाकिली. श्री. तर्कतीर्थांनींहि सान्या प्रश्नांचें निराकरण करवून घेऊन जबाबदारी पत्करली. दि. १५।४।५१ ला या सर्व गोष्टी निश्चित ठरल्यावर अवघ्या एका महिन्याच्या अवधींत तर्कतीर्थांना प्रतिष्ठेची तयारी करावी लागली.

श्री तर्कतीर्थांचेकडे आचार्यत्वाचा मान आला हें मोठेंच आश्चर्य वाटलें. कारण अशा मोठ्या प्रतिष्ठेचें किंवा यज्ञयागाचें आचार्यपद पत्करण्यांत साधारणतः काशी, नाशीक, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, तिरुपती आदि क्षेत्रांचा मान असतो. असें असतां काशी नाशीक सोडून प्रतिष्ठेचें भाग्य वांई क्षेत्राला लाभलें, हें योग्यच होतें.

इ. स. १९३० सालापासून श्री तर्कतीर्थांचा राजकीय क्षेत्रांत व चळवळीशीं बराच संबंध होता. शिवाय भारतांतील प्रसिद्ध पुढान्यांशीं त्यांचा निरनिराळ्या तन्हेनें सारखा संबंध येत होता. शिवाय तर्कतीर्थांची गाढ विद्वत्ता, वक्तृत्व, ग्रंथनिर्मिति, विद्याव्यासंग, शास्त्रांचा तौलनिक दृष्टचा अभ्यास, पाश्चात्य तत्वज्ञानाशीं दृढ परिचय, वाद कौशल्य या गोष्टींचा परिचय असल्यानें व विश्वस्तांचा शास्त्रीबुवांचेवर नितांत विश्वास असल्यानें, अर्चेकडे पाहण्याचा राष्ट्रीय दृष्टीकोन हा इतर पंडितांच्या पेक्षा शास्त्रीबुवांचा भिन्न आणि व्यापक असल्यानें, शिवाय कार्यकर्तृत्वाविषयींची श्रद्धा असल्यानें स्वाभाविकच आचार्यत्वाचा मान श्री शास्त्रीजींना मिळाला.

शिवाय याज्ञिकीच्या दृष्टीनें विचार केला तर तर्कतीर्थ आपल्या जन्मभूमि असलेल्या पिंपळनेर (प. खानदेश.) गांवीं असतांना वयाच्या अकराव्या वर्षीं समग्र यजुर्वेद संहितेचे चाळीस अध्याय त्यांना मुखोद्गत होते. शिवाय ते पू. महात्मा गांधी यांचे पुरोहित होते.

प्राणप्रतिष्ठेचें आचार्यत्व तर्कतीर्थांच्या निमित्तानें महाराष्ट्राकडे येणें हें महाराष्ट्रांतील विद्वानांच्या परंपरेला धरून झालें. तसेंच मार्ग-दर्शक अधिपति म्हणून श्री. प. पू. गु. स्वामी केवलानंद सरस्वति यांना नेमल्यानें पू. स्वामीजींच्या नेतृत्वाखालींच कुंडमंडपादि प्रतिष्ठेच्या कार्याला

सुरवात झाली. अशा तऱ्हेनें ऋषितुल्य आचारवान् गुरुजींच्या पट्टशिष्याला आचार्यत्व लाभलें, हा महाराष्ट्राला मोठा अभिमानाचा व अभूतपूर्व लाभ आहे.

वांई हें क्षेत्र प्राचीन काळापासून विद्येचें व विद्वानांचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे. काशी, पैठण, नाशिक, त्र्यंबकेश्वर, मुल्हेर, राजापूर सांगली, पंढरपूर, कराड, कोल्हापूर, नरसोबावाडी, बडोदे, पुणें ही स्थानें ज्याप्रमाणें संस्कृत व वेद विद्येचें आगर म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांत वांई हें महाराष्ट्रांत प्रसिद्ध क्षेत्र आहे. सिंहस्थांत नाशिक क्षेत्रीं गंगेच्या निमित्तानें जें स्नानाचें महत्त्व आहे, तसेंच कन्यागतांत कृष्णाकाठीं वांई कराडला तीर्थक्षेत्र म्हणून आहे. वाईला थोर विद्वानांच्या परंपरेप्रमाणें त्यागी, विरक्त, संन्यासी, ब्रह्मनिष्ठ व महर्षितुल्य आचार विचारांचे थोर पुरुषहि होऊन गेले. वांई गांवीं विद्वानांचा परामर्ष घेण्याची परंपरा फार वर्षांची जुनी आहे. इतरत्र क्षेत्रांत आढळून येणारी क्षेत्रस्थ वृत्ति वांई क्षेत्रांत दिसून येत नाहीं.

अशा वांई क्षेत्रांत नैष्ठिक ब्रह्मचर्यानें राहून आयुष्यभर अध्ययन अध्यापनांत काळ घालविणारे व शेवटचा काळ सन्यस्त वृत्तीनें ब्रह्मचिंतनांत घालविणाऱ्या व त्याहि अवस्थेंत सतत ग्रंथ लेखनाचें कार्य अप्रतिहत चालूं ठेवणाऱ्या थोर ऋषितुल्य आचारांचे गु. प. केवलानंद सरस्वति स्वामींचें थोर नेतृत्व प्राणप्रतिष्ठेच्या कामीं लाभलें, हाहि योग अपूर्वच होय.

एक महिन्याच्या अवधींत सर्व तयारी करावयाची असल्यामुळें कार्यक्रमापूर्वीं वांई व पुण्याचे मिळून अकरा याज्ञिक ब्राह्मण दहा दिवस अगोदर दि. २७-४-५१ ते ७-५-५१ पर्यंत प्रभासला नेले होते. पूज्य स्वामीजींनीं त्यांच्याकरवी कुंडमंडपादि सर्व व्यवस्था आपापल्या देखरेखीखालीं करवून घेतली. प्राणप्रतिष्ठेचा मुहूर्त दि. ११-५-५१ शुक्रवार रोजीं सकाळीं ९ वाजून ४५ मिनिटें हा होता. आणि श्री. राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसादजी यांचे हस्तें प्राणप्रतिष्ठेचा समारंभ पार पडणार होता. कार्यक्रमाचा आरंभ दिवस दि. ८-५-५१ मंगळवार वैशाख शु. २ शके १८७३ हा होता. व अनुष्ठान ५ दिवसांचें होतें. अहोरात्र साऱ्या व्यवस्थेचें कार्य चालूं होतें. यज्ञ सामग्री तयार ठेवणें, निरनिराळ्या

ठिकाणाहून ती मागविणें, वगैरे व्यवस्थेचीं कामें प्रा. पा. शालेय व्यवस्थापक व शिक्षकवर्ग यांनीं मोठ्या काळजीनें पार पाडलीं. स्वतः तर्कतीर्थांनीं महाराष्ट्रांत व भारतांतील बऱ्याच ऋत्विजांची निवड करण्याची व त्यांच्या जाण्यायेण्याच्या प्रवासखर्चाची सारी कामगिरी पत्करल्यामुळें त्यांना महाराष्ट्र, सौराष्ट्र असा सारखा प्रवास करावा लागे.

श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री हे सुधारणावादी असल्यानें हें महत्पद त्यांचेकडे गेलेलें कांहींना आवडलें नाहीं. या मंदिरांत अस्पृश्यादिकांसहि प्रवेश मिळेल या भीतीनें कित्येक सनातन्यांनीं पाचारिलें असतांहि अर्चेला येण्याचें टाळलें. येणाऱ्यांत काशी, नाशिक, पुणें, बडोदे, मुंबई वगैरे ठिकाणची बरीच सनातनी विद्वान मंडळी होती. त्यांत प्रामुख्यानें नाशिकचे वे. मू. पुरुषोत्तमशास्त्री दीक्षित, वे. शा. सं. गोविंदशास्त्री वारे ( अध्यक्ष नाशिक रा. रा. परिषद व माजी म्यु. कौन्सीलर ), वे. बाळशास्त्री फडके, वे. तात्याशास्त्री गर्गे, वे. सखारामशास्त्री खेडकर, वे. नागनाथ महाशब्दे, वे. धोंडुशास्त्री भंडारी ( मुल्हेर ), वे. दिनानाथशास्त्री जोशी ( पिंपळनेर ), वे. निळंभटजी लेले ( वांई ), वे. दत्तंभट मेणवळीकर, वे. वामनभट ओक, वे.काशीनाथभट महाबळेश्वरकर, वे. दत्तंभट महाबळेश्वरकर, वे. शेंडेशास्त्री इत्यादि सनातनी विद्वानांनीं अत्यंत सहानुभूति दाखविली व राष्ट्रीयभावनेनें धर्माचें प्रचंड कार्य कर्तव्य समजून तर्कतीर्थांशीं सहकार्य केलें. हें स्थापनेचें कार्य साऱ्या भारताचें असल्यानें या कार्याला तितक्याच आत्मीयतेनें सहानुभूति दाखविणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्यच होतें. अस्तु.

याप्रमाणें तर्कतीर्थांनीं ऋत्विजांची योजना ठरवून त्यांत प्रांतीयवादाचा प्रश्न येऊं दिला नाहीं. " सारी दक्षिणा तुम्ही घ्या. आम्ही कर्म करून कांहीं न घेतां महाराष्ट्रांत परत जातों; पण कर्म कसें करितों तें पहा तर खरें ! " हा तर्कतीर्थांचा मुद्दा बिनतोड होता. द्रव्याविषयीं निस्पृह वृत्ति विश्वस्तांच्या विशेष अनुभवास आल्याकारणानें विश्वस्तांना तर्कतीर्थांबद्दल जास्त आदर वाटला.

गुजराथ, काठेवाड, राजस्थान यांतील ऋत्विजांनाहि वादाचे मतभेद बाजूला सारून यज्ञकर्मांत ऋत्विज म्हणून मुद्दाम वाव दिला. ती विद्वान मंडळीहि आपलें मतभेद बाजूला सारून प्राणप्रतिष्ठेच्या कार्यांत सामील झाली.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ....... वि: .......
क्रमांक ....... नों: दि: .......

कला १४ वी

# प्राणप्रतिष्ठेची योजना

**श्री. तर्कतीर्थ** लक्ष्मणशास्त्री जोशी यांना आचार्यत्वाचा मान मिळाला, तो योग्यच होता. अधिकारपदाची योजना अशी होती. प्राणप्रतिष्ठेकरितां प्रधानाचार्य म्हणून प. पू. गु. केवलानंद सरस्वति स्वामी. प्रमुख ऋत्विजाचार्य श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. ऋत्विज प्रमुख ( उपाचार्य ) वे. मू. काशिनाथभट महाबळेश्वरकर व सहाय्यक वे. मू. दत्तंभट महाबळेश्वरकर.

त्यावेळचे सौराष्ट्राचे कमिशनर श्री. द. वि. रेगे यांना यजमान म्हणून मान मिळाला होता. काशी, नाशिक, वांई, भावनगर, जामनगर, द्वारका, मुंबई, पुणें, पिंपळनेर, मुल्हेर, जुनागड, राजकोट, त्र्यंबकेश्वर, रत्नागिरी, पाली, अमदाबाद, सुरत, बडोदें वगैरे ठिकाणचे वेदपाठी व निरनिराळ्या शाखांचे मिळून एकंदर १६० ऋत्विज; आणि चार अग्निहोत्री होते. मीमांसक वे. शा. सं. तांबेशास्त्री, श्रौताचार्य धुंडिराज-शास्त्री बापट (सोमयाजी), वे. शा. सं. गणेशशास्त्री जोशी, नाशिकचे प्रा. वि. ब. आठवले इत्यादि थोरथोर समारंभास उपस्थित होते.

ही सारी मंडळी ठराविक वेळीं मुंबईस जमून यज्ञसमारंभाकरितां प्रभासपट्टणला एकदम येऊन पोचली. त्याकरितां प्रशस्त धर्मशाळेंत जेवण्या-उतरण्याची व्यवस्था होती. मंदिराला लागूनच प्रशस्त पटांगणांत कार्यक्रमाचे मंडप होते. निरनिराळ्या प्रांतांतील विद्वान एकत्र आल्या-मुळें सर्वांना अत्यंत आनंद वाटला. पूज्य स्वामीजी स्वतः साऱ्या ऋत्विजांना यज्ञकुंडाची माहिती देत, व अनेकांच्या शंकांचें निरसन करीत. कर्माचा प्रारंभ होण्यापूर्वी कार्यक्रमाची संपूर्ण माहिती ऋत्विजांना सांगितली. प्रत्येक ब्राह्मणाचा ‘ कर्मकांडी पुरोहित ’ म्हणून मंडपांत प्रवेश होत असे. कार्यक्रमास वेळेवर राहणें, शांतता राखणें, अंतःकरण-पूर्वक कर्म पार पाडणें, ( गप्पागोष्टी न करणें ) वगैरे सूचना पू. स्वामीजी स्वतः देत असत. त्यांचा सर्वांचेवर मोठा वचक होता. कुणाला नासापुडी किंवा तत्सम व्यसनाची तलफ आलीच, तर त्यांना मंडपाबाहेर

जावें लागे. त्यांतहि पानतंबाखू इत्यादिकांना कार्यक्रमांत संपूर्ण मज्जाव होता. यामुळें कांहीं ब्राह्मणांची बरीच कुचंबणा होत असे. पण पू. स्वामीजींच्या तेजस्वी मूर्तीपुढें सारे गडबडत.

समारंभासाठीं पांच प्रशस्त मंडपांची योजना मंदिरासमीप होती. सोबत त्याबाबत नकाशा जोडला आहे. १ प्रतिष्ठा मंडप, २ अघोर मंडप ( मधुपर्क मंडप ), ३ अतिरुद्र मंडप, ४ नवग्रह मंडप ( जपजाप्याकरितां ), ५ सभामंडप. ह्या पांच मंडपांतील सोय अशी होती —


१ प्रतिष्ठा मंडपः— एक हात उंचीचा २४×२४ हातांचा एक ओटा—सविधि मंडप, त्यावर २४×२४ हातांचा मंडप, मंडपाच्या मध्यभागीं ६×६ हातांची एक हात उंचीची वेदी लिंगतोभद्राकरितां होती. प्रतिष्ठानुष्ठानाकरितां पंचकुंडी विधान केलें होतें. चारी दिशांना चार व एक ईशान्येला अशीं पांच कुंडें केलीं. मंडपाचें प्रमाण कुंडार्कोक्त होतें. (कुंडार्क ग्रंथांत सांगिल्याप्रमाणें.) प्रतिष्ठा मंडपांत निरनिराळ्या रंगाचे ध्वज आणि पताका शास्त्रीय पद्धतीनुसार प्रत्येकीं एकवीस एकवीस उभारल्या होत्या. रंगीत कापडाची झालर लावून प्रतिष्ठा मंडप सुशोभित केला. मंडपांत नवग्रह देवता स्थापना, द्वादश लिंगतोभद्र वगैरे गोष्टींचा अंतर्भाव होता. नाशिकच्या वे. मू. पुरुषोत्तमशास्त्री दीक्षित, वे. सखारामशास्त्री खेडकर वगैरे मंडळींनीं द्वादश लिंगतोभद्रवेदी उत्कृष्ट सजविली होती.

या मंडपांत पन्नास पुरोहितांची योजना होती. या मंडपाभोंवतीं ठिकठिकाणचीं तीर्थें, नद्या, सागर, सेतु, मृत्तिका, वनस्पति इत्यादि, देवतांच्या स्नानविधीकरितां लागणाऱ्या वस्तूंचें प्रदर्शन निरनिराळ्या कलशांतून मांडलें होतें. प्रतिष्ठा मंडपाच्या पश्चिमेस अघोर मंडप आणि उत्तरेस भव्य असा अतिरुद्र मंडप उभारला होता.

२ अघोर मंडप ( मधुपर्क मंडप ):— या मंडपांत एक कुंड होमाकरितां होतें. प्रथम उदकशांति, संकल्प, श्रीगणपति पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदिश्राद्ध, आचार्यवरण, ऋत्विक्‌वरण, व ऋत्विजांची मधुपर्क पूजा इतके विधि या मंडपांत झाले.

३ अतिरुद्र मंडपः— या मंडपांत दहा लहान लहान व एक मोठें अशीं अकरा कुंडें होतीं. प्रत्येक कुंडांवर अकरा असे एकशें एकवीस व

## श्री सोमनाथ प्रतिष्ठेच्या नकाशा.




१ वेरावळ स्टेशन पासून प्रभासपट्टण तीन मैल.

२ गांवाभोंवतीं तट.

३ तटाच्या बाहेर. सोमनाथ मंदिर.

४ जुनें अहिल्याबाईचें मंदिर.

५ स्टेशन व गांवाच्या मध्यावर, भल्लाक क्षेत्र व प्राची स्टेशन.

इतर चार मिळून १२५ ब्राह्मण अनुष्ठानाकरितां बसविले होते. जप-जाप्य व हवन या ठिकाणीं केलें.

४ नवग्रह मंडपः– या मंडपांत नवग्रहादि देवतांचा जप वगैरे कर्माकरितां कांहीं पुरोहितांची योजना होती.

५ सभामंडपः– यांत विद्वत् परिषद भरली. समारंभ पाहण्यासाठीं देशोदेशींचे निमंत्रित राजे, महाराजे व विद्वान पंडित आणि निमंत्रित पाहुणे नी इतरेजन यांच्यासाठीं प्रशस्त बैठकीची व्यवस्था होती. रुद्रमंडपाला लागूनच श्री मारुतिरायांच्या मंदिराजवळ हवनीय वस्तूंचें कोठीघर होतें. प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम एकूण पांच दिवसांचा होता. अनुष्ठान प्रतिष्ठामयूख या ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें पार पाडलें.

★ ★ ★

**कला १५ वी**

# स मा रं भ

## प्रतिष्ठानुष्ठानाचें स्वरूप

**श्री सोमनाथाच्या** प्राणप्रतिष्ठा कार्यारंभास शके १८७३ वैशाख शुद्ध २ अक्षय्य तृतीया मंगळवार दिनांक ८।५।५१ या दिवशीं सकाळीं आठ वाजतां मंगल वाद्यांच्या गजरांत प्रारंभ झाला.

सकाळीं आपापलें संध्यावंदनादि प्रातःकर्म आटोपून सारे ऋत्विज रुद्रमंडपांत आल्यावर सर्वत्रांना कर्माची रूपरेषा सांगितली. त्यावेळीं सौराष्ट्राचे प्रधानमंत्रि व सध्यांचे रा. सभेचे अध्यक्ष श्री. उच्छंगराय ढेबर हे कांहीं वेळ रुद्रमंडपांत ब्राह्मणांचे जवळ कर्मासंबंधाची औपचारिक चर्चा करीत होते. नंतर मधुपर्क मंडपांत (अघोरमंडपांत) त्यांचें भाषण झालें.

उदकशांति केल्यावर पुण्याहवाचनास प्रारंभ झाला. या अनुष्ठानाचे यजमान श्री. दत्तात्रय वामन रेगे (सौराष्ट्र रीजनल् कमिशनर) हे सपत्निक पीतांबर नेसून पुण्याहवाचनास बसले होते. उपाचार्य वे. मू. काशिनाथभट महाबळेश्वरकर यांनीं यजमानास तिलक लावून कर्मास प्रारंभ केला. प्रतिष्ठाकर्म, अघोर होम, अतिरुद्र जप, महारुद्र

हवन, इत्यादि कर्मांचा संकल्प झाला. नंतर श्री महागणपति पूजन, स्वस्ति पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदिश्राद्ध हीं कर्में करण्यांत आलीं. त्यानंतर प. प. पूज्य स्वामीजींचें पूजन झालें. आचार्यवरण, ऋत्विक्‌वरण व ऋत्विजांची पूजा केली. तदनंतर मुख्याचार्य श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांची पूजा झाली. उभयतां गुरु-शिष्यांना महावस्त्रें मिळालीं. नंतर सर्व ऋत्विजांना धोतरजोडी, शाल, तांब्याभांडे, ताम्हनपळी, दर्भासन अर्पण करून रौप्यपंचक दक्षिणा दिली. नंतर श्री. दत्तोपंत रेगे व त्यांच्या पत्नी सौ. कमलाबाई यांना प्रसाद म्हणून शाल व वस्त्र दिलें.

या सर्व कार्यारंभास चारी वेदांतील मंत्र व शेवटीं स्वस्तिवचनें अनुक्रमानें ( ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद ) खडया आवाजांत, सावकाश, गांभीर्य ठेऊन सर्व ऋत्विजांनीं म्हटलीं. अशा पवित्र व गंभीर वातावरणांत उपस्थितांच्या मनांत पवित्र भावना जागृत होऊन त्या कार्याचें गांभीर्य व महत्त्व त्यांना पटलेलें दिसलें. महाराष्ट्रीय ब्राह्मणांनीं चारी वेदांचे म्हटलेले मंत्र सर्व तद्देशीय तज्ञांना मोठे आकर्षक वाटले. असली उत्कृष्ट मंत्र म्हणण्याची पद्धत फक्त महाराष्ट्रीय ब्राह्मणांत असल्यामुळें सोमनाथ विश्वस्तांनीं व स्वागत समितीनें समाधानाचे उद्‌गार काढले. योग्य ब्राह्मणवर्ग आणल्याबद्दल शास्त्रीबुवांना धन्यवाद मिळाले.

पुण्याहवाचनादि कर्में पार पडल्यानंतर ऋत्विज निरनिराळ्या कार्यांत विभागले. प्रथम अघोर मंडपांतील मधुपर्कादि कर्म अकरा वाजेपर्यंत चाललें. नंतर अघोर मंडपांत 'अघोरेभ्योऽथ घोरेभ्यो....' या मंत्रानें १००८ अघोर होम केला. अकरानंतर अतिरुद्र जप करण्याकरितां सवाशेंवर ऋत्विज अतिरुद्र मंडपांत गेले. जप सायंकाळीं साडेचार वाजेपर्यंत चालला. त्याचवेळीं प्रतिष्ठा मंडपांत पन्नास ब्राह्मणांनीं मंडपस्थापनेपासूनच्या कर्मास प्रारंभ केला. प्रतिष्ठा मंडपांतील वेदीवर मध्यें सर्वतोभद्र व भोंवतालीं द्वादश लिंगतोभद्र अशी स्थापना केली. त्या भोंवतीं पांच कुंडें होतीं. रुद्र मंडपांत द्वादश लिंगतोभद्राची स्थापना केली. तसेंच आदित्यादि नवग्रह देवता स्थापना व मातृका स्थापना इतकें कर्म प्रथम दिवशीं झालें.

द्वितीय दिन बुधवार वै. शु. ३ दिनांक ९।५।५१ नवग्रह जप, नवग्रह हवनाकरितां अग्निमंथन, (अग्निमंथन म्हणजे पिंपळाच्या उत्तरेकडील फांदीच्या अरणीनें समंत्रक घर्षणानें अग्नि उत्पन्न करणें.) अग्निस्थापना, ग्रहयज्ञ इतके कार्यक्रम प्रतिष्ठा मंडपांत झाले. शिवाय मंडपपूजांदि देवतापूजनपूर्वक मंडप, ध्वज, पताका यांची सिद्धि केली. इकडे रुद्रमंडपांत महारुद्र हवन होत होतें. अकराहि कुंडांत हवनीय द्रव्यानें अग्निज्वाला प्रज्वलित होत होत्या. तो देखावा पहाण्याकरितां उपस्थित असलेल्या जनतेला मोठें आश्चर्य वाटलें. इतका मोठा समारंभ होण्याचें सौराष्ट्राला भाग्य लाभलें हा त्या भूमीचा भाग्यदिन होता.

तृतीय दिन गुरुवार वैशाख शु. ४ दि. १०।५।५१ देवता स्थापन, संस्कार स्नपन, अथर्वशीर्ष जप, अष्टदिक्पाल हवन, शांतिसूक्त, पूर्णाहुति, मंत्रजागर हे कार्यक्रम झाले. प्रथम प्रतिष्ठामंडपांत निरनिराळ्या तऱ्हेचें हवन झालें. देवतेचा स्नपनविधि झाला. स्नपनविधीच्या वेळीं सर्व भारतीय पवित्र नद्यांचीं तीर्थें, सरोवरें व जगांतल्या सर्व ठिकाणाहून नद्या, समुद्र, सरोवरें यांतील जल, भारतीय राजदूतांकरवीं आणविलें. पवित्र ठिकाणच्या मृत्तिका, वनस्पति, सेतु आणि रत्नें यांनीं युक्त अशा जलानें तें स्नपन केलें. या स्नपनविधीच्या वेळीं यजमान श्री. रेगे (सपत्नीक), श्री. काका गाडगीळ, श्री. टंडनबाबू व इतर बारा ऋत्विज होते. लेखकालाहि देवतेला स्नान घालावयाचें भाग्य लाभलें.

स्नपनाकरितां प्रत्येक कलशांत निरनिराळ्या नद्यांचें जल भरून ठेविलेलें शंभरावर कलश होते. प्रथम श्री. रेगे, श्री. गाडगीळ, श्री. टंडनजी यांनीं स्नानें घातलीं. नंतर ऋत्विजांनीं कलशांतील जलांनीं देवतेला स्नान घातलें. स्नपनाचें वेळीं ठिकठिकाणच्या जलाबरोबर महानद्या, सरोवरें, महासागर, सेतु, मृत्तिका, वनस्पति, पंचामृत (गव्य पदार्थांचे), उंचीं उंचीं अत्तरें इत्यादि अनेक द्रव्यें होतीं. सकाळीं ९ वाजतां देवतेला स्नान घालण्यास सुरवात झाली. कांहीं पुरोहित वेदघोष करीत होते. त्यावेळीं अत्तर हें पाण्याइतकें विपुल वापरल्यानें सर्वत्र सुगंध दरवळला होता. स्नपनानंतर देवतेचे अधिवासन केलें. अधिवासनाचें अनेक प्रकार आहेत. धान्याधिवास, जलाधिवास, वस्त्राधिवास, शय्याधिवास हे सर्व प्रकार करावे लागतात. धान्याधिवासाचें प्रसंगीं धान्य वाढल्याचें अनेकांना अनुभवाचें आहे. सारीं कर्मे झालीं.

दिनांक ११।५।५१ शुक्रवारला वेळ थोडा असल्यामुळें याच दिवशीं साक्षात् प्रतिष्ठेपूर्वींचें बहुतेक अनुष्ठान संपविलें.

## नाशिककरांचें वैशिष्ट्य

प्रतिष्ठा मंडपांतील पांच कुंडें आणि द्वादश लिंगतोभद्रं, नवग्रह देवता नाशिककर वे. मू. पुरुषोत्तमशास्त्री दीक्षित, वे. सखारामशास्त्री खेडकर, वे. शा. सं. तात्याशास्त्री गर्गे, वे. नागनाथ महाशब्दे वगैरे मंडळींनीं वेदीवर अशा कांहीं कौशल्यानें व निरनिराळ्या रंगांत कलाकृतिपूर्ण मांडल्या होत्या कीं, पाहणारा आश्चर्यानें थक्क व्हावा. कित्येक छायाचित्रकारांनीं त्याचीं चित्रें काढून नेलीं. स्वागत समितीला धन्यता वाटली. नाशिककरांत वरील ऋत्विजांच्या जोडीस वे. शा. सं. गोविंदशास्त्री वारे, वे. पाटणकर आदि मंडळी होती.

कुंडाच्या शास्त्रीय चर्चेंत पिंपळनेरकर वे. दिनानाथशास्त्री जोशी व मुल्हेरकर वे. शा. सं. धोंडुशास्त्री भंडारी ( वेदान्ततीर्थ ) यांनीं आपल्या बुद्धीची व ज्ञानाची चुणुक दाखवून कुंडाच्या योनीचें प्रमाण कसें चुकलें आहे, व ते किती असावें, योनींच्या आकाराचें प्रमाण काय ? इत्यादि गोष्टी समजावून सांगितल्यावर हें सारें पूज्य स्वामीजींनीं मान्य केलें. आणि त्यांनीं तसा कुंड व योनींत फरक करावयास लावला.

चतुर्थ दिन शुक्रवार वै. शु. ५ शके १८७३ दि. ११।५।५१

## भारताच्या इतिहासांतील सुवर्णदिन

शुक्रवारीं सकाळीं ९ वाजून ४६ मिनिटांनीं भारताध्यक्ष श्री. डॉ. राजेंद्रप्रसादजी यांचे हस्तें सोमनाथ प्राणप्रतिष्ठा व्हावयाची होती. त्याप्रमाणें श्री. बाबूजी बरोबर ८॥ वाजतां सभामंडपांत हजर झाले. ' राजेंद्र राह ' या खास मार्गानें मोटारींतून येऊन उतरल्यानंतर राजे लोकांनीं श्री. बाबूजींचा सत्कार केला. त्यांचा अगदीं साधा वेष होता. प्रथम श्री. काकासाहेब गाडगीळासह बाबूजींना प्रतिष्ठामंडपांत आणलें. त्यांनीं यज्ञनारायणाला तीन प्रदक्षिणा घातल्या. श्री. तर्कतीर्थांनीं श्री. बाबूजींच्या भाळीं केशरी तिलक लावला. यज्ञकर्माची सारी माहिती शास्त्रीबुवांनीं बाबूजींना सांगितल्यावर नवग्रह मंडपांतून देवळाच्या गाभाऱ्यांत त्यांना नेलें. त्याबरोबर त्यांचेसह प्रमुख कार्यकर्ते, संस्थानिक,

व बारा ब्राह्मण गाभाऱ्यांत गेले. सहाय्य करण्याच्या निमित्तानें लेखकालाहि आंत प्रवेश मिळाला. आणि या साऱ्या घटना अगदीं जवळ राहून लेखकास पाहावयास मिळाल्या. गर्दी अतोनात होती. समाज सागरासारखा दिसत होता. स्थापना झाल्यानंतरच्या प्रार्थनेचा कार्यक्रम माझेकडे असल्यामुळें मीहि श्री.बाबूजी व शास्त्रीबुवा यांचेबरोबर गाभाऱ्यांत गेलो.

कांहीं संस्थानिक रेशमी पादत्राणें घालून गाभाऱ्यांत आले. पण पू. स्वामीजींनीं त्यांना तीं बाहेर काढून ठेवण्यास सांगितलें. संस्थानिकांच्या आयुष्यांत एका तेजस्वी संन्याशानें पादत्राणें बाहेर काढावयास सांगण्याचा व तो नम्रपणानें मान्य करण्याचा पहिलाच प्रसंग असावा.

नंतर पू. स्वामीजींनीं प्रत्येक थोर व्यक्तींचा व संस्थानिकांचा सत्कार करून प्रत्येकाच्या गळयांत पुष्पमाला घातल्या. पू. स्वामीजींचे चरणीं सारे नम्र झाले. वातावरण आनंदानें फुलून गेलें होतें.

श्री सोमनाथाच्या पिंडीखालीं शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें कांहीं हिरेमाणके, रत्नें घातलीं. शांतिसूक्ताला प्रारंभ झाला. श्री. बाबूजी बरोबर त्यांच्या पत्नी स्वतः पूजा-साहित्य घेऊन आल्या होत्या. श्री. बाबूजींच्या पत्नीचा थोरपणा असा कीं, राष्ट्राध्यक्षांची पत्नी असूनहि पूजा-साहित्य नोकराजवळ न देतां त्या स्वतः आपल्या हातांतून घेऊन आल्या. वेदघोष सुरू झाला. ध्वनीक्षेपक यंत्र गाभाऱ्यांत असल्यानें वेदघोषानें भोंवतालचे सारें वातावरण दुमदुमून गेलें होते. समारंभास आलेला लक्षावधि जनसमूह उन्हाची वेळ असूनहि मोठ्या उत्सुकतेनें सारें पहात व ऐकत होता. श्री. राजेंद्रबाबूंनीं बरोबर ९ वाजून ४६ मिनिटांनीं ज्योतिषशास्त्राप्रमाणें काढलेल्या शुभमुहूर्ताला सुवर्ण शलाकेचें उद्धरण केलें. ( सुवर्ण शलाका—सोन्याची तीन किंवा चार इंचाची बारीक काडी. ती पिंडीबरोबर बसवीत असतांना लिंगाचे खालचा तळ व शाळूंका यांच्यामध्यें लिंगालगत बारीक छिद्रांत रोवून ठेविलेली असते. आणि स्थापनेचे मंत्र सुरू होतांच ती बाहेर काढावयाची म्हणजे मूर्तींत देवत्व स्थिर झालें समजून पुढील मंत्र म्हणण्याला प्रारंभ करावयाचा. ) आणि 'सुस्थिरोभव' असें ऋत्विजांनीं म्हटल्यावर निरनिराळ्या वैदिक मंत्रांनीं घोष झाला. नंतर ध्वनिक्षेपक यंत्रावर महिम्नस्तोत्रांतील कांहीं ठराविक श्लोक व प्रतिष्ठामयूखांतील प्रतिष्ठेचे श्लोक लेखकानें म्हटले. श्री. बाबूजींच्या निकट.सान्निध्यांत प्रार्थना सुरू होतांच,

ते अत्यंत श्रद्धेनें प्रार्थना ऐकू लागले. व त्यांत तन्मय झालेल्या राष्ट्रपतींच्या नेत्रांना आनंदाश्रु आले. आणि याप्रमाणें प्रतिष्ठा झाल्याचें घोषित होतांच ' जय सोमनाथ ' असा जयजयकार सर्वत्र बराच वेळ दुमदुमत राहिला होता. त्याचवेळीं भारतांतील सर्व मंदिरांतून घंटा वाजविण्यासंबंधींची आज्ञा असल्यामुळें भारतभर घंटेचा आवाज घुमत राहिला.

नंतर राष्ट्रपतींनीं षोडशोपचारें पूजा केली. त्यानंतर प्रतिष्ठेचें उत्तरांग इत्यादि अनुष्ठान झालें. लोकांनीं देवावर अधेल्या, रुपये, पावल्या, चवल्या यांचा वर्षाव चालविला होता. ' जय सोमनाथ ' ' जय भारत ' असा निनाद सर्वत्र होत असतांना त्याचवेळीं सागरावर सुशोभित पुष्पांनीं नटलेल्या व अर्धचंद्राकृति असलेल्या एकशें एकवीस नौकांवर ठेविलेल्या तोफांचे धाड् धाड् आवाज होऊं लागले. जणू साऱ्या भारतवर्षात द्रुतगतीनें ही घटना कळावी याकरितांच ही योजना होती कीं काय ? असें वाटलें.

आरती, मंत्रपुष्प होऊन नमस्कार करून राष्ट्रपति बाहेर आले तेव्हां नाना तऱ्हेचीं वाद्यें वाजत होतीं तीं बंद केलीं. कारण श्री. राष्ट्रपति, श्री. टंडनजी, श्री. जामसाहेब यांचीं भाषणें व्हावयाचीं होतीं. राष्ट्रपति म्हणाले–' आपण सामर्थ्यसंपन्न होऊन इतर सर्व धर्माबद्दल सहिष्णुता धारण केली पाहिजे. भारताच्या दौर्बल्यामुळेंच पूर्वी अनेकवार सोमनाथाचा विध्वंस झाला ही गोष्ट लक्षांत घेऊन सर्वत्रांनीं आपलें बळ व तेज वाढविलें पाहिजे.' या प्रमाणें इतरांचीही भाषणें झालीं. प्रत्येक मंडपांत आणि भोंवतीं स्वयंसेवक नी स्वयंसेविका यांचा बंदोबस्त होता. कर्मकांडी पुरोहित म्हणून ' बिल्ले ' असणारांनाच तेवढें मंडपांत जातां येई, इतरांना तेथें मज्जाव होता. समारंभ पाहणाराकरितां मंडपाभोंवतीं स्वतंत्र रस्ता केला होता. समारंभासाठीं भारतांतून अनेक विद्वान मंडळी आली होती. खेरीज भावनगर, कोचीन, जामनगर, नवानगर, त्रावणकोर, धांगध्रा, राजकोट वगैरे ठिकाणचे संस्थानिक व प्रतिष्ठित पाहुणेहि बरेच होते. प्रेक्षक म्हणूनहि बरीच मंडळी होती.

प्रतिष्ठा समारंभ पार पडल्यानंतर त्या दिवशीं प्रत्येक दोन तासाला अकरा याप्रमाणें ब्राह्मण रात्रभर शिवपंचाक्षरी मंत्राचा जप करण्यासाठीं गाभाऱ्यांत नियुक्त केलें.

सौ. राजवन्सीदेवी डॉ. राजेंद्रबाबू; सौ. कमलाबाई रेगे; श्री. दत्तोपंत रेगे; उभे- (छत्रींत) तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री (पिंडीजवळ) श्री. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ



– प्राणप्रतिष्ठा –

– ११ मे १९५१

[illegible]

अनुक्रम ......

क्रमांक ......

पंचम दिन शनिवार वै. शु. ६ दिनांक १२।५।५१ या दिवशीं लघुरुद्र, महापूजा, नैवेद्य याप्रमाणें होऊन सोमनाथ प्रतिष्ठेचें अनुष्ठान पूर्ण झालें. शेवटीं संतर्पण होऊन सांगता झाली.

## मोठें आश्चर्य

आश्चर्याची गोष्ट अशी कीं, गिजनीच्या महंमदानें ज्या वारीं व ज्या वेळीं सोमनाथ मूर्तीचा विध्वंस केला. त्याच वारीं व त्याच वेळीं म्हणजे शुक्रवारीं ९ वाजून ४६ मिनिटांनीं सोमनाथाची स्थापना झाली. ही कल्पना कै. वल्लभभाई पटेल यांच्या डोक्यांत कशी आली देव जाणें. पण त्या दिवशीं त्यांच्या आत्म्याला आपण ठरविल्याप्रमाणें सर्व सोहळा यथासांग पार पडल्याबद्दल खात्रीनें शांति मिळाली असेल. आजपर्यंत खोलवर गेलेली भारताच्या हृदयांतील जखम सोमनाथ प्रतिष्ठेच्या निमित्तानें अंशत: भरून निघाली. यामुळें भारतीयांना अत्यानंद व्हावा यांत शंका नाहीं. अस्तु.

या दिवसापासून सोमनाथाच्या पूजेअर्चेला प्रारंभ झाला. देवी अहिल्याबाईच्या मंदिराचे पुजारी हे परंपरेनें पूजा करीत आलेले मोढे नांवाचे महाराष्ट्रीय असून तेच नव्या देवळाचे पुजारी आहेत. त्यांचे जोडीला दुसरे महाराष्ट्रीय श्री. कळमकर गृहस्थ असून देवळांत पुराण, प्रवचन, कीर्तन करीत असतात. शिवाय चारहि वेदांचे ब्राह्मण त्रिकाळ पूजेकरितां ठेविलेले आहेत.

देवस्थानच्या व्यवस्थेकरितां फंड असून एक विश्वस्त मंडळ ( ट्रस्टी ) नेमलें आहे. त्यांत श्री. जामसाहेब अध्यक्ष, श्रीमान् विडला शेटजी, श्री. कन्हयालाल मुनशीजी, श्री. ढेबर, दे. भ. काकासाहेब गाडगीळ, श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. शांतीभाई देसाई इत्यादि मंडळी आहेत. त्यांनीं केलेल्या निधिमधून ( ट्रस्ट ) सोमनाथ संस्कृत विद्यापीठ निघण्याची योजना आहे.

## श्री सोमनाथ पीठाधिपति

श्री सोमनाथ देवता पीठाचे मुख्य मार्गदर्शक अधिपति म्हणून पू. केवलानंद स्वामीजींना सोमनाथ निधि विश्वस्तांनीं स्वीकारलें आहे. राजा कुमारपाळाचे वेळीं अकराव्या शतकांत असें लिहिलेलें आढळतें

कीं, ' गंढ बृहस्पति संज्ञक सर्वज्ञ आचार्यांच्या आधिपत्याखालीं सोमनाथ क्षेत्राचा सर्व कारभार चालत असे.' त्यावरून ही परंपरा पुन्हां अमलांत आणण्याचें सोमनाथ निधि विश्वस्तांनीं ठरविलेलें आहे.

## कलाकाराचा गौरव

ज्या कलाकारानें परंपरेची कलाकृति जिवंत ठेऊन देवळावर कळस चढविण्याचें काम केलें. तो कलाकार स्थापनेपर्यंत त्यांच्या कांहीं नियमांनीं बद्ध होऊन व्रतस्थ राहिला होता. त्याचा पू. स्वामीजींच्या हस्तें गौरव करून त्यास एक महावस्त्र दिलें.

## जनतेसाठीं केलेल्या सोयी

समारंभासाठीं आलेल्या आम जनतेसाठीं सौराष्ट्र सरकारनें प्राचीरोड नांवाचें नवीन स्टेशन उभारून त्या स्टेशन लगतच विश्रांती-स्थानें, आराम स्थानें, झोपड्या बांधल्या होत्या. अंतरा अंतरावर पाण्याच्या नळाची सोय केली होती. रस्ते मुद्दाम तयार केले होते. रेशनचा काल असल्यामुळें रेशनव्यतिरिक्त धान्याच्या पदार्थांचा सर-सहा उपयोग करण्यांत आला होता. त्या प्रांतांत हरभऱ्याच्या डाळीच्या पदार्थांची आवड असल्यानें त्याचाच वापर केला. गरीब जनतेची खास सोय झाली. वर्तमानपत्रीं वर्णनांत विश्रांतिगृहवाल्यांना तशा तऱ्हेची आज्ञा होती. अठराशे मण लाडू, शेव, चिवडा वगैरे पदार्थ भरपूर होते. यांत समारंभास येणाऱ्या भाविक जनतेची थोडक्यांत भोजनाची सोय व्हावी असा सरकारचा हेतु होता.

सगळ्या ब्राह्मणांना दुपारीं चार वाजतां फक्त एक वेळ भोजन होतें. कार्यक्रम सुरू असतांना एक वाजतां मात्र द्रोणांतून अल्पाहार मिळे. जेवण महाराष्ट्रीय पद्धतीचें होतें. संतर्पणाचें दिवशीं महानैवेद्य झाला. त्या दिवशीं पक्वान्नाचें भोजन होतें. या सर्व व्यवस्थेंत व यज्ञ-कर्मांत उत्कृष्ट गाईचें तूप वापरलें होतें. सोन्याच्या रंगासारखें उत्कृष्ट-पिवळें धमक तूप इतकें बिपुल महाराष्ट्रांत कधींच मिळत नाहीं. सौराष्ट्रांत खरें गोरक्षण दृष्टीस पडतें. मुबलक गव्य मिळतें.

सौराष्ट्रांत गोड पाण्याचा जरा अभावच आहे. आमच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था खास मोटारींतून केलेली होती. गोडे पाणी दूर

ठिकाणाहून नदीचें आणीत असत. पुरोहित वर्गाला पहाटे स्नानाकरितां दोन अडीच मैल जावे लागे, वेळ जाऊं नये म्हणून मोटारीची व्यवस्था होती. त्यांत आळीपाळीनें चाळीसपन्नास माणसें जात येत असत. अशा तीनचार खेपा होत. सरकारनें एकंदर जनतेच्या सुखसोयींकडे विशेष लक्ष पुरविलें होतें. अन्नधान्याशीं संबद्ध असा होमहवनाचा प्रकार शास्त्राच्याच आधारें वगळला. आणि अत्यंत अल्पप्रमाणांत म्हणून सरासरी पंधरा शेर इतकाच धान्याचा वापर केला. बराचसा विधि जपात्मकच केला. भगवद्गीतेंत 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' जप यज्ञ हा साऱ्या यज्ञांत श्रेष्ठ असा यज्ञ आहे, असें सांगितले आहे.

## प्रतिष्ठेसाठीं आलेल्या ऋत्विजांची दिनचर्या

प्रतिष्ठेचा कार्यक्रम पांच दिवसांचा असला तरी त्यापूर्वी दोन किंवा अधिक दिवस पुरोहित वर्ग उपस्थित होता. प्राणप्रतिष्ठा कालांत नित्याचा कार्यक्रम असा–

प्रभातीं ४ वाजतां उठून प्रातर्विधीपासून तो स्नानासाठीं प्रभासहून २॥ मैल असलेल्या हिरण्या नदीच्या विशिष्ठ प्रवाहस्थलीं जावे लागे. तेथें स्नान, धुण्याची वगैरे उत्कृष्ट सोय होती. जाण्यायेण्यासाठीं मुद्दाम मोटारची सोय होती. स्नानसंध्या, पूजापोथी वगैरे आटोपतांना ७॥ वाजवयाचे. बरोबर ८ वाजतां अनुष्ठानाला सुरवात व्हावयाची. १२ वाजेपर्यंत अनुष्ठान चालावयाचें. नंतर अल्पोपहार व्हावयाचा. १॥ तासाच्या विश्रांतीनंतर पुन्हां दोन वाजतां अनुष्ठानाला सुरवात होऊन तें ४॥ वाजतां संपावयाचे. नंतर ५ वाजतां सायंकाळीं भोजन होत असे. भोजनोत्तर विश्रांती, सागरतीरीं भ्रमण, अनुष्ठानाची विविध माहिती घेणें वगैरे झालें कीं, रात्रीं पुढील दिवसाच्या अनुष्ठानाची रूपरेषा समजून घेतल्यानंतर विश्रांती–निद्रा. याप्रमाणें सतत पांच दिवस याप्रमाणें दिनचर्या होती.

★ ★ ★

कला १६ वी

# समारोप

## दक्षिणा व राष्ट्रीय दान

**सोमनाथ** प्रतिष्ठेसाठीं आलेला ऋत्विज वर्ग संतुष्ट होऊन परत गेला. प्रतिष्ठेच्या शेवटच्या दिवशीं १५१ रु. पासून तो अधिकारपरत्वें ५०० रुपयापर्यंत दक्षिणा वाटली. आणि जाण्यायेण्याच्या प्रवासासाठीं परतीचे रेल्वेचे पास दिले. ते प्रत्येकाला आपल्या वास्तव्य स्थानींच पोस्टानें व्यवस्थापक मंडळाकडून नांवनिशीवार पाठविले. ही व्यवस्था श्री. म. शं. साठे, मॅनेजर प्राज्ञ प्रेस वांई यांनीं मोठ्या दक्षतेनें प्रथम-पासून केली. दक्षिणेबावत ब्राह्मण संतुष्ट होतेच, पण आपणास सोमनाथ अर्चाप्रसंग प्रत्यक्ष पाहावयास मिळाला याबद्दलहि त्यांना धन्यता वाटली. आयुष्यांतील तो एकमेव अपूर्व प्रसंग होता ! याहिपेक्षां ऋत्विजांना आणि इतरांनाहि कौतुकास्पद उदाहरण पहावयास मिळालें. तें म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या अपूर्व त्यागाचें. आचार्यत्वाचा मान म्हणून मिळालेल्या सर्व यज्ञाची सामग्री व दक्षिणा त्यांनीं 'शिवस्व' म्हणून तेथल्या तेथें अर्पण केली. यज्ञाची सामग्री व दक्षिणा मिळून आठ ते दहा हजारापर्यंतची प्राप्ति होती. ती सोमनाथ विश्वस्ताजवळ सोमनाथ संस्कृत विद्यापीठाकरितां देण्याचा संकल्प करून तो तत्काळ पार पाडला. फक्त शालजोडी व जाण्यायेण्याचा भाडेंखर्च एवढेंच तर्कतीर्थांनीं घेतलें. सर्व दान 'शिवस्व' समजून सोमनाथाकडे विनियोग करण्यास विश्वस्तांच्या ताब्यांत देतांना विश्वस्तांना 'आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव' या महाकवि कालीदासाच्या उक्तीची आठवण झाली.

मधुकरी मागून विद्या संपादन करून उच्च पदाला पोंचलेल्या तर्कतीर्थांनीं असा ऐश्वर्याचा त्याग करून ती रक्कम विद्यार्जनासाठीं खर्च केली या त्यांच्या त्यागाबद्दल भारतीय जनता तर्कतीर्थांना धन्य-वादच देईल. महाराष्ट्राच्या गेल्या शंभरदीडशें किंवा त्यापूर्वीच्या काळांत अनेक यज्ञ झाले. पण त्या कर्मांत वा इतरत्र शास्त्री पंडितांच्या

एवढ्या मोठ्या त्यागाचें उदाहरण नाहीं. कित्येक पंडितांनीं व विद्वान याज्ञिकांनीं हजारो रुपये यज्ञकर्मांत मिळविलें असतील परंतु द्रव्याचा विद्यार्जनासाठीं उपयोग वा त्याग अशी गोष्ट अर्वाचीन कालांत अशक्य कोटींतील म्हणावयास हरकत नाहीं. भविष्यकाळाचा निर्वाळा देणें ईश्वर जाणें. या अर्चा समारंभासाठीं एकूण ८० हजार रुपये खर्च झाला.

## समारंभाची व्यवस्था

समारंभाच्या व्यवस्थेकरितां प्रा. पा. शाळेंतील व्यवस्थापक वर्ग अगोदरच प्रभासला गेला होता. श्री. साठे यांनीं प्रथमपासूनच अर्चे-संबंधींच्या महत्त्वाच्या पत्रव्यवहाराचें काम पाहिलें. त्यांत समारंभ योजना, निमंत्रणाच्या याद्या, पासांची व्यवस्था, पत्रांची उत्तरें आणि खर्चाचा हिशेब या गोष्टी केल्या. वस्त्र, पात्र, मूल्यवान वस्तूंचें संरक्षण व्यव-स्थित केलें. श्री. रंगनाथ शास्त्री व श्री. कोनकर शास्त्री यांनीं हवनीय द्रव्याची कोठी संभाळली. श्री. काकासाहेब तांबे व विठ्ठलशास्त्री जोशी यांनीं भोजन व्यवस्था पत्करली. नित्य तीनशें पानांच्या स्वयंपाकाची व्यवस्था, इतर बाजारहाट असे त्यांचेकडे होते.

श्री. काकासाहेब तांबे (तांबे आरोग्य भुवनचे मालक) यांनीं मुंबईहून मुद्दाम चार आचारी व इतर वाढपी वगैरे सहकारी मंडळी आणून साऱ्या ऋत्विजांची भोजनाची व्यवस्था खास महाराष्ट्रीय पद्धतीनें करण्याची जबाबदारी उत्कृष्ट पार पाडली. यामुळें भोजन व्यवस्थेंत कसलीच उणीव भासली नाहीं.

वांईच्या कृष्णाबाईच्या उत्सवाचा अनुभव याठिकाणीं व्यवस्था-पकांना बराच उपयोगी पडला. वांईकर, पुणेकर, नाशिककर यांचे व्यवस्थेच्या कामांत बरेंच सहाय्य झालें. तसेंच श्री. तर्कतीर्थांच्या पत्नी सौ. सत्यवतीबाई, सौ. कृष्णाबाई जोशी, सौ. साठे वगैरे भगिनींनीहि व्यवस्थेच्या कामांत बरेंच सहाय्य केलें. त्याचप्रमाणें सोमनाथ ट्रस्टचें व्यवस्थापक श्री. गोस्वामीजी व उपव्यवस्थापक श्री. विनोद व त्यांचे सहकारी यांना अर्चाप्रसंगीं कष्ट पडले. येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था, दक्षिणेचे वाटप, वगैरे गोष्टी त्यांनीं मोठ्या आस्थेनें केल्या. पंधरा दिवस अक्षरशः चोवीस तास सारी मंडळी राबत होती. त्यांच्या चेह-ऱ्यावर कंटाळा, त्रास, आळस कधींच दिसला नाहीं. प्रेमळ व मोकळ्या

मनाचे व विनयशील विनोद व त्यांच्या पत्नी यांचें सर्वांना कौतुक वाटलें. विनोदांचें घर उतारकरूंना व यात्रेकरूंना सदा मोकळें असावयाचें. कोणीहि जाऊन त्यांना कांहींहि मागावें, ' नाहीं ' हा शब्द त्या माऊलीच्या तोंडून कधींच आला नाहीं. सौ. विनोद मोठ्या आस्थेनें कोणाचीहि अडीअडचण, गरज भागवीत. त्यांचे बिऱ्हाड अहिल्याबाईच्या मंदिराच्या धर्मशाळेंत होतें.

असा हा समारंभ इ. स. १९५१ च्या मे महिन्यांत पार पडला. आणि सोमनाथाचा जीर्णोद्धार झाला. हें सत्कृत्य घडून आणण्याचें सारें श्रेय सरदार वल्लभभाई पटेल, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. जामसाहेब, श्री. मुनशीजी, श्री. ढेबर वगैरे थोर थोर सद्गृहस्थांना आहे. अर्चेच्या कार्यांत ज्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला, हें कार्य तडीस नेलें, त्यांत सौराष्ट्राचें मंत्रीमंडळ, सरकारी अधिकारी व तेथील सर्व व्यवस्था पहाणारे स्वयंसेवक, स्थानिक कार्यकर्ते अशा सर्वांनीं अत्यंत मेहनत घेतली. याबद्दल त्यांना धन्यवाद. या पुण्यकर्माचें श्रेय त्यांनाच अधिक आहे.

## भिन्नभिन्न आक्षेप

प्राणप्रतिष्ठेविषयीं भारतांत बराच गैरसमज पसरलेला होता. समग्र धर्मकर्म हें वैदिक पद्धतीचें होतें. कांहीं नामवंत वैदिक व याज्ञिक प्रतिष्ठेसाठीं आले होते. यामुळें दोष देण्यास कोठेंहि जागा नव्हती. सनातनी वैदिकांच्या भावनेला व वृत्तीला धक्का बसेल असें कांहींहि घडलें नाहीं. तर्कतीर्थ सुधारणावादी असल्यानें या धर्मकृत्यांतहि संक्षेप किंवा विकल्प कांहीं येतो कीं काय ? अशी भीति कित्येकांस वाटली. पण ती निराधार ठरली. वांईहून आलेल्या ऋत्विजापैकीं कित्येकजण तर्कतीर्थांना नांवें ठेवीत असत. तरी देखील त्यांना पाचारण करून त्यांचा योग्य तो सन्मान करून संतुष्ट राखण्यांत तर्कतीर्थांची संग्राहकवृत्ति आणि अंगीकृत कार्यावरील लक्ष दिसून येतें. समारंभाहून परतल्यावर ठिकठिकाणच्या ऋत्विजांनीं प्रतिष्ठा-समारंभ वृत्तांत सांगितल्यावर इच्छा असूनहि न गेलेल्या बऱ्याच वैदिक व याज्ञिकांना हळहळ वाटली.

आपले सरकार निधर्मी असतां स्वतः राष्ट्रपति आणि त्यांचे मंत्री, तसेच सौराष्ट्र राज्यांतील मंत्री व अधिकारी यांनीं सोमनाथ

प्रतिष्ठापनेशीं इतका घनिष्ठ संबंध ठेवावा याचें कित्येकांना आश्चर्य वाटलें. आमचें राज्य निधर्मी आहे या निधर्मीपणाची यथार्थ कल्पना नसल्यानें त्यांचा हा अपसमज वाढला. वास्तविक आमच्या राज्यांत सर्व धर्मांना स्वातंत्र्य व समानता आहे. आणि ज्याला त्याला स्वच्छेनुसार इष्ट त्या देवदेवतांची प्रार्थना, पूजा करण्याची मुभा आहे. युरोपांतील बरीचशीं राज्यें हीं ख्रिश्चन आहेत. किंवा अनेक मुसलमान राष्ट्रें धर्मानें इस्लामी आहेत. तशा अर्थानें आमचें गणतंत्रराज्य हें कोणत्याहि धर्माचें (अभिमानी) नाहीं.

व्यक्तीला आत्मविकास करून घेण्याचा अधिकार आहे. आपल्या भावना व्यक्त करण्याची सुसंधि कोणास लाभली तर त्याच्या राज्य–कर्तेपणाला बाध येण्याचें कारण नाहीं. कारण त्या व्यक्तीलाहि धर्म आहे.

सोमनाथ प्रतिष्ठेकरितां केलेला खर्च हा अनाठायी होता तो गरीबांच्या सेवेकरितां किंवा हरिजन कार्याकरितां झाला असता तर बरें झालें असतें, असेंहि कित्येक म्हणाले. कोणत्याहि यज्ञीय कर्माला यज्ञ कर्मासाठीं झालेला खर्च हा अनाठायी नसतो. तेथें वित्तशाठ्य करून चालत नाहीं. कर्म करणाराच्या भावना या कर्म करितांना व तदनंतर पवित्र नी शुद्ध व सात्विक राहावयास पाहिजेत, यादृष्टीनें एक उपे–क्षिलेला दरिद्री पण विद्वान याज्ञिक वर्ग हा यज्ञामुळें संतुष्ट जाहला यांत काय बिघडलें ? हजारों वर्षांची वेदविद्या ज्यांनीं कंठगत करून जपून ठेविली, त्यांची कदर राष्ट्रानें करूं नये तर कोणीं करावी ? आज छापखान्यामुळें वेदसंहिता जरी सुलभतेनें मिळूं लागली, तरी ती म्हणण्याची पद्धति कुठल्याहि ग्रंथांत छापतां येत नाहीं. ती ब्राह्मणांनींच जतन करून ठेविली आहे. या ब्राह्मणांच्या कर्तबगारीला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. पांच हजार वर्षें वेदसंहितेचें संरक्षण केवळ तें कंठगत करूनच केलेलें आहे. मानवी बुद्धीचा हा अजब चमत्कार आहे. अशा ब्राह्मणांना कितीहि दक्षिणा मिळाली तरी ती कमीच आहे. या कर्तबगारीचें मोल ठरवितां येणार नाहीं.

ज्या देशांत बुद्धिमानांची बुद्धिमत्ता, विरक्तांचा त्याग, योग्यांचें तप, वेदांत्याचें तत्वज्ञान, कार्यकर्त्यांचें कर्तृत्व, संतांची जनसेवा व

परोपकारबुद्धि, बलवानांचें बळ राष्ट्राच्या उपयोगी न पडतां फुकट वाया जातें तें राष्ट्र दुर्दैवी असून शापभ्रष्ट समजावें. म्हणून मान्यांचा मान, विद्वानांचा गौरव, सद्‌गुणांची पूजा, सद्‌वृत्तींची वाढ, अध्यात्म विद्येचा आदर, उद्योगाची लालसा, हेंच खरें राष्ट्राचें वैभव आहे. तेव्हां वैदिक ब्राह्मणांचा गौरव झाला, हें योग्यच झालें.

हरीजन कार्याला ही रक्कम कां दिली नाहीं ? हा खुळचट प्रश्न आहे. हरीजन कार्याकरितां पैसा उभारावा हें ठीक आहे. आहे. पण तें कार्य प्रत्येकांनीं आपलें जीवित कार्य मानावें असें जर ठरलें तर मानवी जीवन रुक्ष होईल. आणि त्याकरितां दैनंदिन जीवनक्रम बदलावा लागेल. उत्सव, समारंभ, धार्मिक कृत्यें करतां येणार नाहींत. इतकेंच काय पण त्या कार्यासाठीं पैसा पाहिजे म्हणून नित्याचें जेवणखाण यांत जो सणावारी बदल होतो तो सुद्धां बंद ठेऊन नुसत्या चुरमुऱ्या फुटाण्यांवर राहावें लागेल. कारण जेवणाखाणासारख्या किरकोळ बाबतींत तरी खर्च करून चवचालपणा कशासाठीं ? उठलें सुटलें हरीजन फंड, हरीजन कार्य ! इतकी तयारी प्रश्न करणाऱ्याची सुद्धां होईल कीं नाहीं शंका आहे. म्हणून विशाल वृत्तीच्या भारतांत असलें ‘ खूळ ’ माजवून डोक्यांत विकृत वेड ठेवण्याचें धाष्टर्य कोणीं सुबुद्ध माणूस करील असें आम्हांस वाटत नाहीं. राष्ट्राच्या अशा अनेक गरजा आहेत कीं त्या भागणें अत्यंत आवश्यक आहे. म्हणून त्याकरितां नित्याच्या जीवनाचे व्यवहार कोणीं सोडलें आहेत काय ? पण अलिकडे येनकेन प्रकारेण असलीं खुळें पिकविण्याचा व्यवसायच होऊन बसला आहे. हरिजन कार्य जसें कित्येकांना इष्ट वाटतें तसेंच कित्येकांना नष्ट होत चाललेली वैदिक परंपरा रक्षण करणें हेंहि आवश्यक वाटतें. यांत त्यांना दोष देण्याचा प्रश्नच उरत नाहीं. या दृष्टीनें सोमनाथ प्रतिष्ठेसाठीं खर्च झालेली रक्कम योग्य स्थानीं व सत्पात्रीं खर्च झाली, आणखीहि होणें इष्टच होतें. अशा स्वरूपाचे अनेकांनीं अनेक आक्षेप घेतले. त्याचें निराकरण करणें सहज शक्य आहे. परंतु अशा बाकीच्या किरकोळ आक्षेपांना उत्तर देण्याइतके ते महत्वाचे नाहींत. आणि त्याचें प्रयोजनहि नाहीं.

## विविध

१ वेदकाल– सोमराजानें सुवर्ण मंदिर बांधिलें.

२ रामायणकाल– रावणानें रौप्य मंदिर बांधिलें.

३ भारतकाल– गोपालकृष्णांनीं रजत मंदिर बांधिलें. कांहींच्या मतें लाकडी ( चंदनी ) मंदिर बांधिलें असें आहे.

४ पुराणकाल– स्कंद पुराण ९ व्या शतकांतील. त्यांत सविस्तर वर्णन आहे. या कालानंतर मधल्या काळांत जनतेनें मंदिर बांधिलें.

५ इतिहासकाल– इ. स. ७२० पहलन वंशांतील राजा कृष्ण यानें मंदिर बांधिलें. सोळंकी वंश प्रस्थापक मूळराज यानें तें वाढविलें.

६ इ. स. १०२४ गजनीच्या महंमदानें सोमनाथाचा विध्वंस केला.

७ अनहिलवाडच्या सिद्धराज जयसिंहानें मंदिर बांधण्यास काढलें. कुमारपाळानें तें पुरें केलें.

८ इ. स. १०२५ महंमदानें परत हल्ला केला.

९ पुन्हां कुमारपाळानें तें बांधिलें. त्याला माळव्यांतील भोज परमार राजानें मदत केली. इ. स. ११४४.

१० इ. स. ११६९ राजा भीमदेव ( किंवा कर्ण ) यानें मंदिराचा जीर्णोद्धार केला.

११ भाव बृहस्पतीनें देऊळ बांधलें. व भोळ्या भीमानें त्याला मंडप जोडला.

१२ इ. स. १२९७ मध्यें अल्लाउद्दीनानें मंदिरावर दोन वेळां हल्ला करविला.

१३ इ. स. १३०८ ते १३२५ राजा महिपालानें देवालयाचा जीर्णोद्धार केला. सोन्याचा कळस चढविला.

१४ इ. स. १३७५ दुसरा मुझफरशहा यानें हल्ला केला.

१५ स्थानिकच्या ब्राह्मणांनीं व जनतेनें मंदिर बांधिलें.

१६ मुझफरशहाचा नातू झफारखान यानें इ. स. १३९३ मध्यें सोमनाथवर हल्ला केला.

१७ जुनागडच्या महिपाळाचा मुलगा खंगार राजानें मंदिर बांधिलें.

१८ इ. स. १४७१ मध्यें महंमद बेगडा यानें सोमनाथ देवस्थानाचें ठिकाणीं मशीद बांधिली.

१९ पुन्हां जीर्णोद्धार झाला.

२० इ. स. १५९० तिसरा मुझफरशहा यानें मंदिराची मशीद करण्याचा पुन्हां प्रयत्न केला.

२१ इ. स. १७०२ मध्यें अवरंगजेबानें मंदिराचा विध्वंस करविला.

२२ जनतेकडून वर्गणीनें मंदिर बांधिलें.

२३ इ. स. १७८३ सालीं देवी अहिल्याबाईनें दुसऱ्या जागेवर देऊळ बांधिलें.

२४ इ. स. १७८८ (हा सन १७८२ असावा) जुनागडच्या नबाबानें मंदिर उध्वस्त केलें.

२५ स्वातंत्र्यकाल-- इसवी सन १९५१ स्वातंत्र्य कालांत- सरदार वल्लभभाई पटेल, श्री. न. वि. गाडगीळ, श्री. पुरुषोत्तमदास टंडनजी, श्री. उच्छंगराय ढेबर, श्री. जामसाहेब, श्री. मुनशीजी इत्यादि प्रमुखांनीं भव्य मंदिर बांधून मागचें सारें औदासिन्याचें पाप धुवून काढलें. म्हणजे वेदकालापासून विसाव्या शतकापर्यंत एकंदर १० वेळां देवळाचा विध्वंस झाला, व १५ वेळां मंदिराचा जीर्णोद्धार केला. हा सोमनाथ देवस्थानाचा इतिहास आहे.

## अर्चेनंतरची प्रार्थना

प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर प्रार्थनेचें महत्त्वाचें काम लेखकाकडे आलें. अर्चाप्रसंगीं सुवर्ण शलाकेचें श्री. राष्ट्रपतींनीं उद्धरण करतांच ध्वनीक्षेपक यंत्रावर महिम्नस्तोत्रांतील सहा श्लोक व प्रतिष्ठा मयुख ग्रंथांतील पुढील श्लोक म्हटलें तें---

### प्रार्थना श्लोक

नमस्ते त्यक्त संगाय संतोष परमात्मने ॥
ज्ञानविज्ञानरूपाय ब्रह्मतेजोनुशालिने ॥ १ ॥
गुणातिक्रांतवेगाय पुरुषाय महात्मने ॥
अव्यक्ताय पुराणाय शिवसन्निहितो भव ॥ २ ॥
भगवन् देवदेवेश त्वं पिता सर्व देहिनाम् ॥
त्वया व्याप्तमिदं सर्व जगत्स्थावरजंगमम् ॥ ३ ॥
त्वमिंद्रः पावकश्चैव यमो निर्ऋतिरेव च ॥
वरुणो मारुतः सोम ईशानः प्रभुरव्ययः ॥ ४ ॥
येन रूपेण भगवन् त्वया व्याप्तं चराचरम् ॥
तेन रूपेण देवेश अर्चायां सन्निधो भव ॥ ५ ॥
सर्व मंत्रादि संयुक्तो लोकानुग्रहकाम्यया ॥
अत्रार्चायां महादेव भव संनिहितः सदा ॥ ६ ॥
सूर्याचंद्रमसौ यावद्यावत्तिष्ठति मेदिनी ॥
तावत्त्वयाऽत्र देवेश स्थातव्यं स्वेच्छया प्रभो ॥ ७ ॥

ॐ नमः शिवाय ! ॐ नमः शिवाय ! ! ॐ नमः शिवाय ! ! !

याप्रमाणें प्रार्थना झाली.

## श्री सोमनाथाच्या स्नानविधिकरितां आणलेलीं भारतीय तीर्थं व जगांतलें जल

| अनुक्रम | प्रांत | संख्या | नद्यांचीं नांवें |
|---|---|---|---|
| १ | सोरट | ८ | मधुमति, ओझाद, वज्रा, हिरण्या, भोगावति, कपिला, सरस्वति, शीघ्रवरदा. |
| २ | गोहिलवाड | ५ | शेटरुञ्जी, तलाजा, शत्रुज्जयी, पालीनन, काळुभार. |
| ३ | हलार | ४ | उद, नागमति, सिन्हन, वर्तु. |
| ४ | झालावाड | २ | ब्राह्मणी, भोगावा. |
| ५ | मध्य सौराष्ट्र | ३ | मच्छू, भादर, घेला. |
| ६ | मुंबई राज्य | १२ | नर्मदा, तापी, साबरमति, गोमति, सरस्वति, कृष्णा, गोदावरी, पंचगंगा, वेण्णा, कोयना, भीमा, चंद्रभागा. |
| ७ | मद्रास राज्य | ५ | कृष्णा, पाताळगंगा, कावेरी, ताम्रपर्णी, पूर्णा. |
| ८ | पंजाब राज्य | ६ | ब्रह्मपुत्रा, तुंगभद्रा, त्रिवेणी-संगम, गंगोत्री, जम्नोत्री, सतलज. |
| ९ | संयुक्तप्रांत (अयोध्या) | ४ | गंगा, क्षिप्रा, शरयू, मंदाकिनी. |
| १० | यू. पी. मध्यभारत | २ | गंडकी, चंबळा. |
| ११ | नेपाळ | १ | वाग्मति. |
| १२ | ओरिसा | ४ | महानदी, वैतरणी, भगवति, नीला. |

एकूण (५५) संख्या आहे. भारतांतील इतक्या नद्यांचें जल आणिलें होतें.

## परदेशांतील नद्या व सागर.

१ मिसिसिपी. २ मिसोरी. ३ कालोरोडो. ४ मेक्सिको. ५ कांगो. ६ नाईल. ७ डान्यूब. ८ चुकियांग. ९ मोस्खा. (मास्को–रशिया) १० झांबेसी. ११ सीन. १२ मिलांग (इंडोचायना) १३ ॲमॅझोन (ब्राझील) १४ ग्रँड्डलनोट. १५ यांगत्सी (चीन) १६ लाप्लाटा. १७ ऱ्हाईन. १८ लुनी. १९ युफ्राटीस (इराक) २० थेम्स. २१ टायग्रीस. २२ मेनाचाप्सा (थायलंड) २३ जार्डेन. २४ लारेन्सी (कानडा–कैरो) २५ मेनन (कानडा) २६ ऱ्हाईन (पॅरिस) २७ गार्डेन नील. २८ मेकोंझ (युगांडा).

## सागर–महासागर–सरोवरें.

१ सुवेझ (तांबडा समुद्र). २ सदर्न ओशन केपटाऊन. ३ पुरी (ओरिसा) ४ भावनगर सागर. ५ प्रशांत महासागर. ६ केपकामोरीन ७ शंखोदर बेटें. ८ प्रशांत महासागर (चीन) ९ अटलांटिक महासागर १० अर्जेंटिना. ११ जोदिया. १२ मियानी (सोरट) १३ प्रभास महासागर. १४ जॉली (सिलोन) १५ मानस सरोवर.

या शिवाय हरद्वार, महाबळेश्वर, रामेश्वर, जगन्नाथ, द्वारका, नाशिक, प्रयाग, काशी इत्यादि क्षेत्रांतील तीर्थेंहि आणिलीं होतीं. तसेंच रामेश्वरचा सेतु व ठिकठिकाणच्या पवित्र मृत्तिका व वनस्पति आणविल्या होत्या. परदेशांतील नद्यांचें व महासागरांचें जल परराष्ट्रीय वकिलातीमार्फत आणलें व भारतांतील प्रांतीय सरकारांनीं आपापल्या प्रांतांतील तीर्थें पाठविलीं. या कामीं सहा हजार रुपये खर्च आला. यावरून सोमनाथ प्रतिष्ठेच्या भव्यतेची कल्पना येईल. सोमनाथ हा देव जगाला सुसंस्कृत बनवून सनाथ करणारा देव आहे. भविष्यकालींहि जगाला अध्यात्मप्रवणता, पवित्र संस्कृति व शांति देण्याचें भाग्य या निमित्तानें भारताला लाभेल हें निश्चित.

## समारंभाशीं संबंध येणाऱ्या ठळक व्यक्ति.

राष्ट्रपति – श्री. डॉ. राजेंद्रप्रसादजी.

मंत्रीमंडळ – ,, कन्हैयालाल मुनशी. (अन्नमंत्री)
,, उच्छंगराय ढेबर (सौराष्ट्र मंत्री व रा. सभाध्यक्ष.)
,, न. वि. गाडगीळ (केंद्रीय मंत्री.)
,, रसिकलाल पारेख (गृहमंत्री सौराष्ट्र)

श्री. पुरुषोत्तमदासजी टंडन. (लोकसभा सदस्य, नाशिक काँग्रेस अध्यक्ष)

श्री. हिजहायनेस् महाराजा जामसाहेब श्री दिग्विजयसिंहजी नवानगर
( अध्यक्ष सोमनाथ विश्वस्त मंडळ. )

कोचीन, त्रावणकोर, धांगध्रा, नवानगर – संस्थानाधिप

श्री. सामळदास गांधी (सौराष्ट्र).

अधिकारी वर्ग– श्री. द. वा. रेगे. (सौराष्ट्र रीजनल् कमिशनर);
श्री. गोस्वामीजी, श्री. विनोद.

पाहुणे – श्री. प्रा. वि. ब. आठवले (नासिक.)
श्री. वि. ब. काकडे व अध्यापक वर्ग (तळोदे प. खा.)
श्री. केळकर व ग्रामस्थ मंडळी वांई

श्री. सोमनाथ देवता पीठाधिपति श्री. केवलानंद सरस्वति स्वामी, वांई.

आचार्यः– श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वांई.

उपाचार्यः– श्री. वेदमूर्ति काशीनाथभट महाबळेश्वरकर वांई.

उपउपाचार्यः– श्री. वे. मू. दत्तंभट महाबळेश्वरकर. वांई.

पुरोहितवर्गः–(वांई) वे. वासुदेवशास्त्री कोनकर, वे. शंकरभट ताटके वे. गणेशभट शेंडे, वे. वामनभट ओक, वे. कृष्णंभट पुराणीक, वे. पांडुरंगभट कानडे, वे. दत्तंभट मेणवलीकर, वे. निळंभट लेले, वे. वामनभट गोखले, वे. हरभट रानडे, वे. धुंडिराजशास्त्री रानडे, वे. दत्तंभट ओक, वे. वामनभट मारुलकर, वे. रामभट खरे, वे. नारायण-भट गोडबोले, वे. नानुभट खरे, वे. आप्पाभट वैद्य, वे. त्र्यंबकबुवा रामदासी, वे. काकाभट देवधर, वे. वासुदेवभट करंदीकर, वे. बगाराम-भट मेहेंदळे, वे. धुंडिराजभट घैसास, वे. वासुदेवभट मोने, वे. दत्तं-भट देशपांडे, ना. ग. केळकर, वे. भा. शा. वीरकर, वे. पांडुरंगभट बापट,

वे. शं. वि. लेले, वे. ना. शं. खरे, वे.शंकरभट अभ्यंकर, वे. विनायकभट महाबळेश्वरकर, वे. महादेवभट गोखले, म. आ. देवधर, के. श्री. वैशंपायन, वे. वा. ग. पुरोहित, वे. गो. गं. केळकर, वे. पां. गो. आपटे, वे. गोपाळबुवा जोशी, वे. बापूबुवा बापट, वे. बंडुभट बेडेकर, वे. पुरुषोत्तमभट पाटणकर, वे. अण्णुभट गोडबोले.

(कराड) वे. वि. वा. आठल्ये.

( पुणें ) वे. शंकरभट साधले, वे. गोविंदभट सुरत्राण, वे. विश्वनाथभट पराडकर, वे. भाऊशास्त्री शेंडे, वे. शिवरामभट फडके, वे. गणेशभट साने, वे. बाळुकाका भिडे, वे. ग. स. जोशी, वे. द.पां.किंजवडेकर, श्री. ना देवधर, वे. वामनभट दीक्षित (अथणीकर ) वे. द. कृ. तांबेशास्त्री, वे. प.म. गद्रे, वे. रामभाऊ उपाध्ये, वे. गं.गो. कानगांवकर, वे. द. त्र्यं. श्रीगोंदेकर, वे. धुंडिराजशास्त्री बापट, वे. चिंतामणशास्त्री दातार, वे. भालचंद्रशास्त्री नेने, वे. बाळकृष्णभट जोशी, वे. भा. वा. करंबेळकर, वे. ह. मु. जोशी, वे. रा. अ. जोशी, वे. भास्करभट भिडे, वे. विद्याधरभट भिडे, वे. बाळकृष्णभट गोगटे, वे. शं. प. गोखले, वे.म. शं. साठे, वे. वि. ल. आपटे, वे. ज. रा. देवधर, वे. चिं. वि. पुरोहित, वे. य. बा. मोडक, वे. अं. ग. पराडकर, वे. ना. बा. मराठे, वे. रा. शं. भट, वे. मो. शि. साठे, वे. भि. स. गाडगीळ, वे. शं. द. घाटे.

( नाशिक ) वे. गोविंदशास्त्री वारे, वे. पुरुषोत्तमशास्त्री दीक्षित शौचे, वे. तात्याशास्त्री गर्गे, .वे. बाळशास्त्री फडके, वे. बाळशास्त्री पाटणकर, वे. रामभट दीक्षित, वे. नागनाथभट महाशब्दे, वे. परशुरामभट दांडेकर, वे. केशवभट मराठे, वे. महादेवभट दीक्षित, वे. मुकुंदशास्त्री बापट, वे. चिंतामणभट गर्गे, वे. सखारामभट खेडकर, वे. वसंतभट दुगल.

( मुंबई व दादर )—वे. गणेशशास्त्री जोशी, वे. आबाशास्त्री कोनकर, वे. त्र्यंबकशास्त्री कोनकर, शं. ग. जोशी, वा. वि. अग्निहोत्री, वे. वसंतभट पुरंदरे, वे. मधुसूदनभट पंडित,वे. नारायणभट शेंडे, वे. हिरालाल ठाकर, वे. नारायणभट शुक्ल, वे. रतिलालशास्त्री गौर, वे. बा. म. गौर, वे. गौरीशंकरभट, वे. प्रेमशंकर शुक्ल, वे. गौतमशास्त्री ज्योतिषी, वे. आप्पाशास्त्री कोनकर.

( पिंपळनेर प. खान्देश ) श्री. गौतमबुवा पाठक, वे. दीनानाथशास्त्री जोशी.

( मुल्हेर जि. नाशिक ) वे. धोंडूशास्त्री भंडारी.

(काशीक्षेत्र) वे. नारायणभट पाळंदे, वे. नारायणभट रटाटे.

(दिल्ली) वे. भास्करशास्त्री. (लखनौ) वे. ब्रिजनाथशास्त्री.

(सौराष्ट्र-गुजराथ) वे. आचार्य रतिलाल मणिशंकर, वे. विश्वनाथ हरीकृष्णभट, वे. कन्हैयालाल दवे, वे. केसरभाई सामवेदी, वे. अमृतलाल सुंदरजी, वे. दुर्गाशंकर शुक्ल, वे. बेचरदास त्रिवेदी, वे. वासुदेव बा. मोंढे, वे. हरीप्रसाद व्यास, वे. अंबालाल रावळ, वे. सोमेश्वर जैनी, वे. रणछोडलाल जोशी. वे. जटाशंकर शुक्ल, वे. हरीलाल मणिशंकर, वे. अमृतलाल दुर्गाशंकर, वे. महाशंकर नवलशंकर, वे.दोलाराय भगवानजी, वे. वेणीराम अथर्ववेदी, वे. लालाशंकर पाठक, वे. पोपटलाल रेवाशंकर, वे. वल्लभभाई सामवेदी, वे. विठ्ठलभाई बाळकृष्ण, वे. उमाशंकर लक्ष्मीनारायण, वे. नर्मदाशंकर रेवाशंकर, वे. बाबु वधेकर, वे. जयंतीलालशास्त्री, वे.जगदीश गिरिजाशंकर, वे. गिरिजाशंकर कानजी, वे. त्रिपुराशंकर जटाशंकर, वे. महिपतराय मोहनलाल, वे. भानुशंकर प्रभाशंकर, वे. रविशंकर कानजी, वे. जगन्नाथ त्रिभुवन अग्निहोत्री.

( इंदोर ) वे. दिगंबरशास्त्री नेने.

( रामेश्वर ) वे. रामचंद्रभट रानडे.


या प्रमाणें पुरोहित वर्ग अर्चेला होता.

अर्चेसाठीं एकूण दीडशेंच्यावर ऋत्विज आले होते. त्यांत महाराष्ट्राखेरीज गुजराथ, सौराष्ट्र व उत्तर प्रदेशांतील पन्नासच्यावर ब्राह्मणपुरोहित होते. यापेक्षां अधिक वैदिक वर्गाला पाचारण करतां आलें असतें, परंतु एक महिन्याच्या अवधींत सारा पत्रव्यवहार करून शक्य तो करावयाचा प्रयत्न व्यवस्थापकवर्गानें केला.

या पुरोहित वर्गांत चार अग्निहोत्री आपलें अग्निहोत्राचें साहित्य (अग्निदेवता) बरोबर घेऊन आले होते. त्यांचाहि शेवटीं गौरव झाला.

# लेखकाचें भाग्य

मी स्वत: प्रा. पा. शाळेचा विद्यार्थी असल्यानें पं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या सौजन्यानें मला पुरोहित म्हणून अर्चा समारंभास जाण्याचा सुयोग आला. माझेकडे प्रार्थना म्हणावयाचें कामहि आलें. त्यामुळें कांहीं काल अनेक थोरांचें सान्निध्य लाभलें. व सर्व प्रतिष्ठाविधि जवळून पहावयास मिळाले. श्री. लक्ष्मणशास्त्रीबुवा हे पश्चिम खान्देशांतील पिंपळनेरचे. त्यांचें बालपण तेथेंच गेलेलें. पिंपळनेर ही संतभूमि आहे. मीहि त्याच गांवचा. शिवाय शास्त्रीबुवांचा आप्तसंबंधी असल्यानें मला हा सुयोग लाभला. स्वाभाविकच महाराष्ट्रांतील वांई क्षेत्राला अर्चेचा मान मिळाला. महाराष्ट्राचें नांव उज्वल राहिलें. आणि पिंपळनेरला मात्र तर्कतीर्थांच्या मुळें महत्त्व प्राप्त झालें. जन्मभूमीचें ऋण आपल्या विशाल कर्तृत्वानें त्यांनीं फेडलें व पिंपळनेरच्या परंपरेच्या लौकिकांत त्यांनीं भर टाकली. त्यांच्या मार्गाचा अवलंब करून मला जीं सुसंधि मिळाली, तिचा योग्य उपयोग करून ग्रंथरूपानें सारा इतिहास लिहावयास मिळाला आणि माझ्या गांवच्या लौकिकांत अल्पस्वल्प भर टाकण्यास मिळाली तर त्याचा आनंद कां न मानावा? ‘ नभः पतन्त्यात्मसमं पतत्रिणः ’ या महाकवींच्या उक्तीप्रमाणें मीहि माझी अल्प कृति जनतेपुढें ठेऊन माझ्या परमपूज्य गुरुवर्यांच्या ऋणांतून (स्वाध्यायेन ऋषिभ्यः) अंशतः मुक्त होण्याचा प्रयत्न करून हा ग्रंथ जनताजनार्दनाचे चरणीं अर्पण करितो.



# प रि शि ष्ट १

## भारतीय मूर्तीची पृथ्वीप्रदक्षिणा

चक्रवर्ति म्हणून सध्यां गोकर्ण मठांत स्थापलेलें शिवलिंग खानापुरास स्थापन व्हावयाचे होते, पण चक्रवर्ति कां ठरलें किंवा पृथ्वी प्रदक्षिणा त्याला कशी घडली याचा वृत्तांत असाः- श्री. जार्ज बर्डवुड यांनीं श्री. घ. नी. नाडकर्णी मुंबई यांना लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात. 'प्राणप्रतिष्ठा न केलेलें व माझ्या खोलींत इतके दिवस ठेवलेलें शिवलिंग आज ' पी आणि ओ ' कंपनीच्या ' ब्रिटानिआ ' आगबोटीनें तुमचेकडे पाठवीत आहे. सप्तसागराचा प्रवास करून ते परत जन्मभूमींत स्थापिलें जाणार आहे. त्याची हकीगत अशी–

हें शिवलिंग प्रथमतः अमेरिकेतील संयुक्त संस्थानापैकीं ' फिलाडेल्फिया ' त कांहीं वर्षांपूर्वी प्रदर्शन झालें त्यांत ठेवण्यासाठीं हिंदुस्थानांतून पाठविलें होतें. पण ' लिंग ' म्हणजे जननेंद्रिय द्योतक चिन्ह आहे या सबबीवर त्याचा प्रदर्शनांत प्रवेश झाला नाहीं. नंतर सन १८८६मध्यें इंग्लंडांत ' साउथ केनसिंगटन ' या लंडनच्या भागांत हिंदुस्थानांतील व इतर ठिकाणच्या वस्तूंचें प्रदर्शन झालें त्यावेळीं हें शिवलिंग अमेरिकेहून इकडे पाठविलें पण येथेंहि रेवडी करण्यासाठीं याचा उपयोग झाला असता! ! तें माझ्या दृष्टीस पडतांच मी माझ्या खोलींत आणून ठेविलें. ' ऑक्सफर्ड ' येथील सर्व पदार्थ संग्रहालयांत तें ठेविलें जाणार होतें, पण पूर्वीचेंच कारण त्यास आड आलें. तें आतां तुमच्याकडे पाठवीत आहे. ही पवित्र वस्तु आतां तुम्हास पोंचली म्हणजे तिनें पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केली असें होईल! चार खंडें फिरून सप्तसागर उल्लंघन करून पुनः तें शिवलिंग आपल्या मातृभूमीकडे गेल्यासारखें होईल. या शिवलिंगासंबंधीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ' चक्रवर्ति लिंग ' हें नांव यालाच देतां येईल.'

हें चक्रवर्ति लिंग कृष्णपाषाणाचें आहे. त्याचें वजन ४४ शेर असून तळापाशीं घेर ६।। फूट आहे. ह्या शिवलिंगावर चार नाग भूषणे आहेत. पिंडिका १० इंच वर दिसते. पण तिचा घेर २।। फुटांचा आहे. तिजवर भस्माचा त्रिपुंड्र दिसतो. तो स्वाभाविक आहे म्हणतात.

सारस्वत भूषण– २०१–०४

पुरुषार्थ सप्टेंबर१९५८ लेखकः– **श्री. श्री. रा. टिकेकर.**

## जागतिक शिवलिंगोपासना.

शिवलिंगोपासना या ग्रंथांत शिवलिंगाचें व शिवमूर्तीचें व्यापक स्वरूप वर्णन केल्यानंतर शिवाची उपासना जागतिक स्वरूप धारण करणारी कशी होती, याचा विचार केला आहे.

शिवलिंगोपासना ही अनादिकालापासून पृथ्वीवर रूढ होती. असा हजारों वर्षांचा इतिहास आहे. अमेरिका, इजिप्त, तुर्कस्तान, आस्ट्रीया, इराण, चीन, ब्राझील, हंगेरी, ग्रीस, आफ्रिका, स्कॉटलंड, इटली, आफ्रिडिस्तान, अरबस्तान, अफगाणिस्तान, पेरु, फ्रान्स, जपान इत्यादि देशांत शिवलिंगें व कांहीं ठिकाणीं शिवमूर्तींची उपासना होती. आजहि त्या त्या ठिकाणीं लिंगें, मूर्ति असलेलीं पण निरनिराळीं नांवें धारण केलेलीं मंदिरें आढळतात.

शिवाय जावा, सुमात्रा इत्यादि बेटांत अनेक शिवलिंगें आहेत. आजहि इराणांत बंदर आबास या गांवांत मुसलमान वस्तींत मध्यभागीं शिवमंदिर उत्तम स्थितींत असून अर्चनादि निर्वेधपणें सुरू आहे.

इंडोचायनांतहि विशाल देवळें व प्राचीन शिलालेख आहेत. ते सारे संस्कृत भाषेंत आहेत. लेखाचे प्रारंभीं 'ॐ नमः शिवाय' असें मंगल असतें.

या विषयींचा आणखीहि विस्तार करतां येईल. यावरून शिव-देवता जागतिक कशी आहे हें कळेल. प्रभास क्षेत्रांतील सोमनाथ देवस्थानालाहि जागतिक स्वरूप होतें. त्याचें विवरण मागें आलेंच आहे.

जगांत एकच धर्म नांदावा असें ज्यांना वाटतें त्यांना विश्व-धर्मासाठीं उपासना रूढ करावयाची असल्यास व्यापक देवता म्हणून शिव हीच देवता मानावी लागेल. शिवाइतकी व्यापकता आणि त्या देवतेमागें असलेला इतिहास जगांतील इतर देवतेच्या वा उपास्याच्या बाबतींत आज तरी उपलब्ध नाहीं. शिवाय शिव या देवतेंत पार्शी भक्तांचा सूर्य, मुसलमानांचा चंद्र, ज्योतिर्विदांचीं ग्रहनक्षत्रें, भौतिक शास्त्रज्ञांची विद्युतादि शक्ति त्यांत आहे. इतकेंच काय ? पण चारहि भूतांचें व चतुर्दश भुवनांचें लयस्थान शिवच आहे. या विषयीं श्री विवेकानंदांनीं आपल्या ग्रंथांत उत्कृष्ट माहिती दिली आहे.

विस्तार भयास्तव येथेंच थांबतों. यावरून शिवदेवता व शिव-लिंगोपासना कशी व्यापक होती हें समजेल.

## कांहीं ठळक व्यक्तिविशेष.

### १ प. पू. गु. पंडित नारायणशास्त्री मराठे

(श्री. प. पू. केवलानंद सरस्वति स्वामी.)

अल्पपरिचयः– नांव श्री. नारायण सदाशिव मराठे. जन्मस्थान सुडकोली, कुलाबा जिल्हा ता. रोहे. जन्म दि. ८ सप्टेंबर १८७७ शनिवार मार्गशीर्ष शु. ४ शके १७९९. वडील सदाशिवपंत. व्यवसाय उपाध्येपणा व गांवचे धर्माधिकारी. शिवाय जोडव्यवसाय म्हणून कांहीं दिवस कारकुनी, नंतर शेती करीत.

मातुःश्रीचें नांव सौ. पार्वतीबाई, अत्यंत साध्वी, शेतीच्या व्यवसायांत पतिदेवांना मदत करीत. घरीं वेद, सूर्य उपासना अखंड चालू होती. अशा पवित्र, सच्छील दांपत्याच्या पोटीं जन्म झाला. ते हे (नाना) पंडित नारायणशास्त्री होत. लहानपणीं संस्कृत अध्ययन थोडें झाल्यावर वांईस शास्त्राभ्यासासाठीं आले. वे. शा. सं. विष्णुशास्त्री मेणवलीकर यांचेकडे आणि वे. शा. सं. बाळशास्त्री डेग्वेकर यांचेकडे न्यायादि इतर शास्त्राध्ययन झाले. नंतर गु. प. प. प्रज्ञानंद सरस्वति स्वामींचेकडे वेदांत, शारीरभाष्य अभ्यास होऊन तेच त्यांचे मोक्षगुरु झाले.

पू. स्वामीजी समाधिस्थ झाले त्याच दिवशीं गु. पंडित नारायण शास्त्रीबुवा यांनीं नैष्ठिक ब्रह्मचर्यानें आयुष्य कंठण्याची व अध्ययन अध्यापनांत उर्वरीत आयुष्य घालण्याची शपथ घेतली. नंतर शास्त्रीबुवांनीं मधुकरीवर निर्वाह चालवून, ते अयाचित वृत्तीनें राहूं लागले. प्राज्ञमठांत अनेक विद्यार्थी शास्त्रीबुवांचा लौकिक ऐकून येऊं लागले. त्या विद्यार्थ्यांत पू. विनोबाजी भावे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. गंगाधरशास्त्री नेने, श्री. आठल्येशास्त्री, श्री. पंडित कानडेशास्त्री, पं. गंगाधरशास्त्री सोहनी वगैरे थोर थोर मंडळी होती. संख्या वाढतांच त्या मठाचें रूपांतर प्राज्ञ पाठ-शाळेंत झालें. आणि संस्थेच्या व पू. शास्त्रीबुवांच्या लौकिकाप्रमाणें भारतांतून विद्यार्थीवर्ग अध्ययनासाठीं येऊं लागला. याच कालांत कै. लो. टिळकांनीं संस्थेला भेट दिली. धन्योद्गार काढले. संस्कृत बरोबर इंग्रजीहि शिक्षण मिळूं लागले.

इ. स. १९२६ सालीं, सोनगीर परिषद, अकोला ब्राह्मण परिषद या परिषदा गाजविल्या. बरोबर तर्कतीर्थ होते. पुढें कांहीं मतभेदावरून संस्थेचा त्याग करण्याचा प्रसंग शास्त्रीबुवांचे वर येऊन इ. स. १९३१ दि. २२ आक्टोबरला कराड जवळ टेंभू गांवीं अचानकपणें संन्यास घेतल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें. अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. तो कटु इतिहास आहे. प. प. पू. केवलानंद सरस्वति नांव धारण केलें. नंतर अव्याहत धर्म-कोशाचें काम केलें. त्यांना रक्तदाबाचा विकार होता. तरीहि अठरा अठरा तास काम करीत. ऋषितुल्य आचार, करारी वृत्ति, निर्मळ आणि उज्वल चारित्र्य असें जीवन क्वचितच पहावयास मिळतें. सोमनाथ प्राणप्रतिष्ठा समारंभ पू. स्वामीजींच्याच नेतृत्वाखालीं पार पडला.

इ. १९५२ सालीं वयाच्या ७५ व्या वर्षीं पू. स्वामीजींचा अपूर्व गौरव समारंभ झाला. बरेंच माजी विद्यार्थी तीस वर्षांनीं एकत्र जमले होते. पुढें आजार वाढला. त्यांचा काल त्यांना कळला होता. ' मी आतां जातो ' म्हणून ओंकाराच्या जपांत पू. स्वामीजी समाधिस्थ झाले. त्यांच्या स्मारकाची भव्य योजना सध्यां चालू आहे.

पू. स्वामीजींचे अनेक संस्कृत ग्रंथ अप्रकाशित आहेत. त्यांचा शिष्यवर्ग फार मोठ्या प्रमाणांत भारतभर पसरलेला आहे.

---

**टीपः**– सोनगीर परीषद इ. स. १९२३ सालीं झाली. परिषदेचें संयोजक श्री.ह.भ.प. संतोजी महाराज कुकुरमुंडेकर (पश्चिम खानदेश.)

उद्देश– धर्म सुधारणेच्या चळवळीला शास्त्राधारें किती पायबंद घालतां येईल, याचा विचार करणें.

या परिषदेंत पुढें दोन पक्ष पडले. परिवर्तनवादी व अपरिवर्तनवादी.

सुधारणेच्या विरुद्ध अनेक पंडितांचें बहुमत झालें व परिषद समाप्त झाली.

**टीपः**– अकोला ब्राह्मण परिषद– अध्यक्ष–पं. नारायणशास्त्री मराठे (वांई.)

चर्चेचा विषय– ब्राह्मण पोट जातीचें एकीकरण.

यांत सारे परिवर्तनवादी पंडित होते.

## श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अध्यक्ष प्राज्ञपाठशाळा वाई

अल्पपरिचय–जन्म स्थान– पिंपळनेर, ता. साक्री, जि. पश्चिम खान्देश.

गांवचें वैशिष्ठ्यः–पार्वती (पांझरा) नदीचें कांठीं पिंपळनेर या गांवांत व गांवांभोंवतीं बरींच प्रसिद्ध शिवस्थानें ( शिवलिंगें ) आहेत. पिंपळेश्वर, लोणेश्वर, गांगेश्वर, कडेश्वर, दमडकेश्वर ही स्थानें असून इतर देवताहि प्रसिद्ध आहेत. गांगेश्वर शिवलिंग पाण्यांत आहे. देवस्थानाप्रमाणेंच ही संत भूमीहि आहे. अनेक थोर संतांनीं आपल्या पदधूलींनीं ही भूमि पवित्र केली आहे.

अशा पुण्यभूमींत शास्त्रीबुवांचा जन्म झाला. माघ शु. ७ (रथसप्तमी) शके १८२४. वडिलांचे नांव वे. बाळाभाऊ जोशी (बाप्पा)– सतत प्रातःशीत स्नान, वेद व सूर्योपासना कडक असे. मातोश्री लहानपणींच वारल्या. बहिणीनें संगोपन केलें. लहानपणींच धार्मिक ग्रंथ वाचनाचा नाद. प्राथमिक शिक्षण फक्त मराठी तीन इयत्तेपर्यंत. लेखकाचें वडील र. भी. पाठक व वि. ज. पंडित हे शिक्षक होते.

उपनयनानंतर वयाचे ११ वे वर्षापर्यंत शुक्ल यजुर्वेद संहिता चाळीस अध्याय पाठ करवून घेतले. नंतर वाईस प्रा. मठांत शिकविण्यासाठीं वडिलांनीं नेलें. जुन्या पद्धतीनें जटा राखलेले बालब्रह्मचारी नित्य अग्निकार्य करीत गु. पं. नारायणशास्त्री यांचेकडे अध्ययन करूं लागले. न्यायशास्त्रापर्यंत अध्ययन झालें. व उच्च शिक्षणासाठीं काशीक्षेत्रांत पं. वामाचरण भट्टाचार्य यांचेकडे गेले. त्याच विद्यार्थी दशेंत गुरुवर्यांचें बरोबर सोनगीर अकोला परिषद गाजवून काशीचे ब्राह्मण संमेलनांत आपल्या बुद्धीचें प्रभुत्व दाखविलें.

नंतर बडोद्याचें राजपंडित पदाचा मान झिडकारून प्रा. पा. शाळेसाठीं त्यांनीं आपलें जीवन घालविण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें सध्यां ते अध्यक्ष म्हणून काम करीत आहेत.

भारतीय घटनेचें संस्कृत भाषांतर त्यांनीं भारत सरकारसाठीं केलें. देशाच्या चळवळींत त्यांचा फार मोठा भाग होता. नागपूर विद्यापीठ, पुणें विद्यापीठ या ठिकाणीं अनेक व्याख्यानें देण्याचा त्यांना योग आला. विषयः– हिंदुधर्म समीक्षा, भारतीय तर्कशास्त्र (इंग्रजी.)
वैदिक संस्कृतीचा विकास, वैदिक तत्वज्ञान, शांकर तत्वज्ञान, इतिहास

व पुराणें असें होतें. बडोदें, मुंबई, इंदूर, गोमांतक, दिल्ली साहित्य संमेलनांचे ते अध्यक्ष होते.

धर्मकोश ७भागांत प्रकाशित करून 'शुद्धिसर्वस्वम्, मंत्र ब्राह्मणोपनिषद् विमर्शः, वैदिक संस्कृतीचा विकास, हिंदुधर्म समीक्षा, पू.स्वामीजींचा चरित्र गौरव ग्रंथ,' इत्यादि ग्रंथ निर्मितीहि शास्त्रीबुवांची आहे. प्रमोद (मुंबई), युगांतर (पुणें) या वृत्तपत्रांचे तीन वर्षे संपादक होते.

सध्यां– १ साहित्य अकादेमी दिल्ली या संस्थेच्या मराठी सल्लागार समितीचे सभासद.

२ प्रा. पा. शाळेचे अध्यक्ष.

३ मुंबई राज्य संस्कृत पाठशाळा समितीचे सभासद.

४ भारतीय संस्कृति कोश (पुणें) संपादन समितीचे अध्यक्ष आहेत.

पू. महात्मा गांधींचें शास्त्रीबुवा उपाध्याय होते.

## राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद्

बिहार प्रांतांत सारण जिल्हा जिरादेई गांव. या गांवीं शके १८०७ मार्गशीर्ष शु. १५ (३-१२-१८८४) जन्म. वडिलांचें नांव मुनशी महादेव सहाय (कायस्थ) श्रीवास्तव. छपरा हायस्कूलमध्यें शिक्षण. अत्यंत हुशार विद्यार्थी. कलकत्ता विद्यापीठांत प्रथम क्रमांकानें आल्यानें लौकिक वाढला. वकीलीची परीक्षा देऊन एल्. एल्. एम्. च्या परीक्षेंत प्रथम क्रमांक मिळविला. अनेक शिष्यवृत्त्या मिळविल्या. नंतर कलकत्त्यास अर्थशास्त्राचे प्रोफेसर झाले. पुढें हायकोर्टांत वकीली केली. आणि कलकत्त्याहून पाटणा हायकोर्टांत आले.

---

**टीपः**– काशी ब्राह्मण महासंमेलन. इ. स. १९२९ मार्च

अध्यक्ष– पंचानन तर्करत्न भट्टाचार्य.

चर्चेचे विषय– शुद्धिकरण, अस्पृश्य--मंदिरप्रवेश, पोटजातीचें एकीकरण, कन्या विवाहमर्यादा वगैरे.

या परिषदेवर परिवर्तनवाद्यांनीं बहिष्कार घातला होता. फक्त एकटे शास्त्रीबुवा होते.

इ. स. १९२० असहकाराच्या चळवळींत वकीली सोडली.आणि पू. महात्माजींच्या चळवळींत चंपारण्याचा सत्याग्रह, शेतकऱ्यांची चळवळ वगैरे मोहिमेंत भाग घेतला. आणि अत्यंत त्यागी देशभक्त म्हणून सारा भारत त्यांना मानूं लागला. पुढें कॉंग्रेसच्या स्वयंसेवकापासून तो अध्यक्षपदापर्यंत त्यांनीं देशाची सेवा केली, व तुरुंगवास पत्करला. इ. स. १९३४ सालच्या बिहारच्या भूकंपाचे वेळीं आजारी असतांनाहि दुःखितांची अत्यंत सेवा केली. सरकारला जनतेसाठीं त्यांना मुक्त करावें लागलें. राजेंद्रबाबू म्हणजे सेवा हें समीकरण प्रत्येकाच्या मुखांत सतत वावरे. ते भावनाप्रधान व धार्मिक मनोवृत्तीचे गृहस्थ आहेत. परदेश गमनहि त्यांनीं केलें. इ. स. १९४६ ला ते केंद्र सरकारचे अन्नमंत्री होते. आणि घटना-परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं देशाची उत्कृष्ट सेवा केली. नंतर इ. स. १९५० सालीं ते स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपति झाले. हिंदी भाषेचीहि त्यांनीं उत्तम सेवा केली आहे. राष्ट्रपति झाल्यानंतर त्यांनीं काशींत शास्त्रीपंडितांचा बराच गौरव केला.

श्री सोरटी सोमनाथ प्राणप्रतिष्ठा समारंभ श्री. बाबूजींच्याच हस्तें पार पडला.

प्रमुख ग्रंथ– आत्मकथा, २ इंडिया डिव्हाइडेड्, ३ पाकिस्तान, ४ महात्मा गांधी आणि बिहार, ५ बापू के कदमोंमें. ६ चंपारनमें सत्याग्रह. ७ बिहारमें महात्माजी. ८ मेरी युरोप यात्रा, ९ गांधीजीकी देन, १० गांधी मार्ग, ११ भारतीय शिक्षा, १२ साहित्य, शिक्षा और संस्कृति, १३ संस्कृतका अध्ययन, १४ रचनात्मक कार्य.

**श्री. द. वा. रेगे.** I. C. S. (कमिशनर सौराष्ट्र.)

श्री सोमनाथ प्राणप्रतिष्ठेचे यजमान.

नांवः–श्री. दत्तात्रेय वामन रेगे व सौ. कमलाबाई रेगे. यजमान व यजमान पत्नी म्हणूनप्राण प्रतिष्ठासमयीं अर्चेचा लाभ यांना लाभला.

बेळगांव जिल्ह्यांत तोरगळ जहागिरीचा गांव. येथें शके १८१९ आषाढ वद्य ३ (संकष्टि चतुर्थी) जन्म झाला. प्राथमिक शिक्षणानंतर पुणे डेक्कन कॉलेजचे बी. ए. झाले. तेथील ते दक्षिणा फेलो होते. इ. स. १९२१ सालीं विलायतेंत केंब्रीज यु. सी. चे बी. ए. होऊन

बॅरिस्टर झाले. व त्याच वेळीं आय्. सी. एस्. होऊन स्वदेशी परतले. मध्यवर्ति सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतून त्यांना सेवेचा योग आला. सध्यां ते मध्यप्रदेशच्या प. स. कमिशनचें अध्यक्ष आहेत. यांना यजमानपद भाग्यानें लाभलें.

सौ. कमलाबाई या ( तेलंग ) कारवारच्या राहणाऱ्या. यांचें अत्यंत सात्विक घराणें आहे. सौ. कमलाबाई या सुविद्य गृहिणी आहेत. यांना यजमान पत्नी म्हणून प्राणप्रतिष्ठा अर्चेचा सुयोग प्राप्त झाला.

**वे. काशीनाथभट महाबळेश्वरकर** वांई, जि. उत्तर सातारा.

वांई व काशीक्षेत्रांत वेदाध्ययन झालें. वडील वेदशास्त्रसंपन्न वैदिक ब्राह्मण. आवाज अत्यंत गोड. वेदघोष सतत ऐकावासा वाटे. आजोबांचें काशींत पंचगंगा–घाटीं वास्तव्य. घरीं अग्निहोत्र होतें. काशीनाथभट विद्यार्थ्यांना विनामूल्य विद्यादान करीत असतात. प्रा. पा. शाळा वांई या संस्थेंत बारा वर्षे वैदिक शिक्षक म्हणून काम केलें. शिरगांवकर राममंदिर सांगली येथेंहि वैदिक शिक्षक होते. सध्यां चिंचवड देवस्थानांत अध्यापक म्हणून काम करीत आहेत. जटा, घनांत अध्ययन, आवाज गोड, वेद म्हणण्यांत माधूर्य, कर्मठ सात्विक आचार-संपन्न वैदिक. त्यांना मुलें दोन. पैकीं एक वेद विद्येसाठीं व दुसरा इंग्रजीचें अध्ययन करीत असतो. हे सोमनाथ प्राणप्रतिष्ठा समयीं उपाचार्य म्हणून प्रधानकर्म करीत होते.

**वे. दत्तंभटजी महाबळेश्वरकर** वांई, जि. उत्तर सातारा.


वे. काशीनाथभटजी यांचे कनिष्ठ बंधु. यांचे अध्ययन वांई व काशींत झालें. उत्तम आचार संपन्न, तेजस्वी, सत्यनिष्ठ कर्मठ ब्राह्मण. अध्ययनांत ऋग्वेद व सामवेद प्राधान्य. सामगायनानें जनतेला संतुष्ट ठेवण्याची उत्कृष्ट कला यांचेजवळ आहे. कोटी लिंगार्चनें, महारुद्र स्वाहाकार, विष्णुयाग वगैरे यज्ञ कर्मांत यांचें नेहमींच प्रमुख स्थान असतें. निस्पृह, निरपेक्ष कार्यकर्ते असून घरटी तीन मुलांत एक मुलगा तरी वेदविद्येकडे द्यावा असा त्यांचा सतत जनतेंत प्रचार चालू असतो. वांईत वेदशाळेंत विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देत असतात.

श्रीमत् प. प. शंकराचार्य ( संकेश्वर ) श्री. भगवान् पू. श्रीधरस्वामी सारख्या महान् थोरांच्या सान्निध्यांत वैदिक कर्मासाठीं दत्तंभटांना नेहमींच राहावें लागतें. हे सोमनाथ प्राणप्रतिष्ठा समयीं उपउपाचार्य होते. वेदविद्या-दानाची यांना मोठी हौस. असे थोर धर्म-प्रेमी वैदिक आहेत.

सोरटी सोमनाथ प्राणप्रतिष्ठेसाठीं प्रामुख्यानें असणाऱ्या जबाबदार प्रमुख व्यक्तींत वरील ठळक व्यक्तींचा अल्पपरिचय या ठिकाणीं दिला आहे. त्यांत आणखीहि या समारंभाशीं संबद्ध असलेल्या थोर थोर व्यक्ति आहेत. त्यांत श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. कन्हयालाल मुनशीजी, श्री. पुरुषोत्तमदास टंडनजी, श्री. रसिकलाल पारेख, श्री. जामसाहेब महाराज दिग्विजयसिंहजी, श्री. उच्छंगराय ढेबर वगैरे थोर थोर व्यक्ति आहेत. आणि त्यांच्याबरोबर अनेक धार्मिक वृत्तीच्या सज्जनांनीं आणि कार्यकर्त्यांनीं सहाय्य केलें आहे. त्या सर्वांना धन्यवाद.



श्री सोमनाथ



नवी बांधणी (इ. स. १९५८)

[illegible]

अनुदान ......

[illegible] ........

# शिव स्तोत्रं

## १ शिवनामावल्यष्टकम् ।

श्रीगणेशायनमः । हे चंद्रचूड मदनांतक शूलपाणे स्थाणो गिरीश गिरिजेश महेश शंभो । भूतेश भीतभयसूदन मामनाथं संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। १ ।। हे पार्वतीहृदयवल्लभ चंद्रमौले भूताधिप प्रमथनाथ गिरीशचाप । हे वामदेव भव रुद्र पिनाकपाणे संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। २ ।। हे नीलकंठ वृषभध्वज पंचवक्त्र लोकेश शेषवलय प्रमथेश शर्व । हे धूर्जटे पशुपते गिरिजापते मां संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। ३ हे विश्वनाथ शिव शंकर देवदेव गंगाधर प्रमथनायक नंदिकेश । बाणेश्वरांधकरिपो हर लोकनाथ संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। ४ ।। वाराणसीपुरपते मणिकर्णिकेश वीरेश दक्षमखकाल विभो गणेश । सर्वज्ञ सर्वहृदयैकनिवास नाथ संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। ५ ।। श्रीमन्महेश्वर कृपामय हे दयालो हे व्योमकेश शितिकंठ गणाधिनाथ । भस्मांगराग नृकपालकलापमाल संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। ६ ।। कैलासशैल विनिवास वृषाकपे हे मृत्युंजय त्रिनयन त्रिजगन्निवास । नारायणप्रिय मदापह शक्तिनाथ संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। ७ ।। विश्वेश विश्वभवनाशितविश्वरूप विश्वात्मक त्रिभुवनैकगुणाभिवेश । हे **विश्वबंधु करुणामय** दीनबंधो संसारदुःखगहनाज्जगदीश रक्ष ।। ८ ।। गौरीविलासभुवनाय महेश्वराय पंचाननाय शरणागतरक्षकाय । शर्वाय सर्वजगतामधिपाय तस्मै दारिद्र्यदुःखदहनाय नमःशिवाय ।। ९ ।।

इति श्रीमच्छंकराचार्यविरचितं शिवनामावल्यष्टकम् संपूर्णम् ।।

## २ प्रदोषस्तोत्राष्टकम् ।

श्रीगणेशायनमः । सत्य ब्रवीमि परलोकहितं ब्रवीमि सारं ब्रवीम्युपनिषद्धृदय ब्रवीमि । संसारमुल्बणमसारमवाप्य जंतोः सारोऽय-मीश्वरपदांबुरुहस्य सेवा ।। १ ।। ये नार्चयंति गिरिशं समये प्रदोषे ये नार्चितं शिवमपि प्रणमंति चान्ये । एतत्कथां श्रुतिपुटैर्न पिबंति मूढास्ते जन्मजन्मसु भवंति नरा दरिद्राः ।। २ ।। ये वै प्रदोषसमये परमेश्वरस्य

कुर्वन्त्यनन्यमनसोऽंघ्रिसरोज पूजाम् । नित्यं प्रवृद्धधनधान्यकलत्रपुत्र-सौभाग्यसंपदधिकास्त इहैव लोके ॥ ३ ॥ कैलासशैलभुवने त्रिजगज्जनित्रीं गौरीं निवेश्य कनकाचितरत्नपीठे । नृत्यं विधातुमभिवांछति शूलपाणौ देवाः प्रदोषसमये नु भजंति सर्वे ॥ ४ ॥ वाग्देवी धृतवल्लकी शतमखो वेणुं दधत्पद्मजस्तालोन्निद्रकरो रमा भगवती गेयप्रयोगान्विता । विष्णुः सांद्रमृदंगवादनपटुर्देवाः समंतात्स्थिताः । सेवंते तमनु प्रदोषसमये देवं मृडानीपतिम् ॥ ५ ॥ गंधर्वयक्षपतगोरगसिद्धसाध्यविद्याधरामरवराप्सरसां गणाश्च । येऽन्ये त्रिलोकनिलयाः सहभूतवर्गाः प्राप्ते प्रदोषसमये हरपार्श्वसंस्थाः ॥ ६ ॥ अतः प्रदोषे शिव एक एव पूज्योऽथ नान्ये हरीपद्मजाद्याः । तस्मिन्महेशे विधिनेज्यमाने सर्वे प्रसीदंति सुराधिनाथाः ॥ ७ ॥ एप ते तनयः पूर्वजन्मनि ब्राह्मणोत्तमः । प्रतिग्रहैर्वयो निन्ये न दानाद्यैः सुकर्मभिः ॥ ८ ॥ अतो दारिद्र्यमापन्नः पुत्रस्ते द्विजभामिनि । तद्दोषपरिहारार्थं शरणं यातु शंकरम् ॥ ९ ॥

इति स्कांदोक्त प्रदोप स्तोत्राष्टकम् संपूर्णम् ॥

* * *

## २ शिवरक्षास्तोत्रम् ।

श्रीगणेशायनमः । अस्य श्रीशिवरक्षास्तोत्रमंत्रस्य याज्ञवल्क्यऋषिः श्रीसदाशिवो देवता, अनुष्टुप छंदः श्रीसदाशिवप्रीत्यर्थं शिवरक्षास्तोत्रजपे विनियोगः । चरितं देवदेवस्य महादेवस्य पावनम् । अपारं परमोदारं चतुर्वर्गस्य साधनम् ॥ १ ॥ गौरी विनायकोपेतं पञ्चवक्त्रं त्रिनेत्रकम् । शिवं ध्यात्वा दशभुजं शिवरक्षां पठेन्नरः ॥ २ ॥ गंगाधरः शिरः पातु भालमर्धेंदुशेखरः । नयने मदनध्वंसी कर्णौ सर्पविभूषणः ॥ ३ ॥ घ्राणं पातु पुराराातिर्मुखं पातु जगत्पतिः । जिव्हां वागीश्वरः पातु कन्धरं शितिकन्धरः ॥ ४ ॥ श्रीकण्ठः पातु मे कण्ठं स्कंधौ विश्वधुरन्धरः । भुजौ भूभारसंहर्ता करौ पातु पिनाकधृक् ॥ ५ ॥ हृदयं शंकरः पातु जठरं गिरिजापतिः । नाभिं मृत्युंजयः पातु कटी व्याघ्राजिनांबरः ॥ ६ ॥ सक्थिनी पातु दीनार्तशरणागतवत्सलः । ऊरू महेश्वरः पातु जानुनी जगदीश्वरः ॥ ७ ॥ जङ्घे पातु जगत्कर्ता गुल्फौ पातु गणाधिपः । चरणौ करुणासिंधुः सर्वांगानि सदाशिवः ॥ ८ ॥ एतां शिवबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् । स भुक्त्वा सकलान्कामान् शिवसायुज्यमाप्नुयात् ॥ ९ ॥

ग्रहभूतपिशाचाद्यास्त्रैलोक्ये विचरन्ति ये । दूरादाशु पलायन्ते शिवनामाभिरक्षणात् ।। १० ।। अभयंकरनामेदं कवचं पार्वतीपते: । भक्त्या बिभर्ति य: कण्ठे तस्य वश्यं जगत्रयम् ।। ११ ।। इमां नारायण: स्वप्ने शिवरक्षां यथादिशत् । प्रातरुत्थाय योगीन्द्रो: याज्ञवल्क्यस्तथाऽलिखत् ।। १२ ।।

इति याज्ञवल्क्यप्रोक्तं शिवरक्षास्तोत्रं संपूर्णम् ।।

* * *

## ४ महामृत्युञ्जय स्तोत्रम् ।

श्रीगणेशायनम: । ॐ अस्य श्रीमहामृत्युंजयस्तोत्रमंत्रस्य श्रीमार्कंडेय ऋषि: अनुष्टुप छंद: श्री मृत्युंजयो देवता, गौरीशक्ति:, मम सर्वारिष्ट-समस्तमृत्युशान्त्यर्थ सकलैश्वर्यप्राप्त्यर्थ जपे विनियोग: । अथ ध्यानम् । चन्द्रार्काग्निविलोचनं स्मितमुखं पद्मद्वयान्त: स्थितं मुद्रापाशमृगाक्षसत्र-विलसत् पाणि हिमांशुप्रभुम् । कोटीन्दुप्रगलत्सुधाप्लुततनुं हारादिभूषोज्वलं कान्तं विश्वविमोहनं पशुपतिं मृत्युञ्जयं भावयेत् । ॐरुद्रं पशुपतिं स्थाणुं नीलकंठमुमापतिम् । नमामि शिरसा देवं किं नो मृत्यु करिष्यति ।। १ ।। नीलकण्ठं कालमूर्तिं कालज्ञं कालनाशनम् । नमामि शिरसा देवं किं नो मृत्यु: करिष्यति ।। २ ।। नीलकण्ठं विरूपाक्षं निर्मलं निलयप्रभम् । नमामि शिरसा देवं० ।। ३ ।। वामदेवं महादेवं लोकनाथं जगद्गुरुम् । नमामि शिरसा देवं० ।। ४ ।। देवदेवं जगन्नाथं देवेशं वृषभध्वजम् । नमामि शिरसा देवं० ।। ५ ।। गङ्गाधरं महादेवं सर्वाभरणभूषितम् । नमामि शिरसा देवं० ।। ६ ।। अनाथ: परमानन्दं कैवल्यपदगामिनि । नमामि शिरसा० ।। ७ ।। स्वर्गापवर्गदातारं सृष्टि-स्थितिविनाशकम् । नमामि शिरसा० ।। ८ ।। उपत्तिस्थितिसंहार कर्तारमीश्वरं गुरुम् । नमामि शिरसा० ।। ९ ।। मार्कण्डेयकृतं स्तोत्रं य: पठेच्छिवसन्निधौ तस्य मृत्युभयं नास्ति नाग्निचौरभयं क्वचित् ।। १० ।। शतावर्तं प्रवर्तव्यं संकटे कष्टनाशनम् । शूचिर्भूत्वा पठेत्स्तोत्रं सर्वसिद्धि प्रदायकम् ।। ११ ।। मृत्युंजय महादेव त्राहि मां शरणागतम् । जन्ममृत्यु-जरारोगै: पीडितं कर्मबंधनै: ।। १२ ।। तावतस्त्वद्गतप्राणस्त्वच्चित्तोऽहं सदा मृड । इति विज्ञाप्य देवेशं त्र्यंबकाख्यं मनुं जपेत् ।।१३ ।। नम: शिवाय सांबाय हरये परमात्मने ।। प्रणतक्लेशनाशाय योगिनां पतये नम: ।।१४।। शताङ्गायुर्मंत्र: ।। ॐ ह्रीं श्रीं ह्रीं ह्रैं ह्र: हन हन दह दह पच पच

गृहाण गृहाण मारय मारय मर्दय मर्दय महा महा भैरव भैरव रूपेण धुनय धुनय कम्पय कम्पय विघ्नय विघ्नय विश्वेश्वर क्षोभय क्षोभय कटु कटु मोहय मोहय हुं फट् स्वाहा ।। इतिमन्त्रमात्रेण समाभीष्टो भवति ।। १५

इति श्रीमार्कण्डेय पुराणे मार्कण्डेयकृतं महामृत्युंजयस्तोत्रं संपूर्णम् ।।

* * *

## ५ शिवाष्टोत्तरनामशतकम् ।

श्रीगणेशायनमः । देवाऊचुः । जय शम्भो विभो रुद्र स्वयंभो जय शंकर । जयेश्वर जयेशान जय सर्वज्ञ कामद ।। १ ।। नीलकण्ठ जय श्रीद श्रीकण्ठ जय धूर्जटे । अष्टमूर्तेऽनन्तमूर्ते महामूर्ते जयानघ ।। २ ।। जयपापहरानङ्गनिःसङ्गाभङ्गनाशन । जय त्वं त्रिदशाधार त्रिलोकेश त्रिलोचन ।। ३ ।। जय त्वं त्रिपथाधार त्रिमार्ग त्रिभिरूर्जित । त्रिपुरारे त्रिधामूर्ते जयैक त्रिजटात्मक ।। ४ ।। शशिशेखर शूलेश पशुपाल शिवाप्रिय । शिवात्मक शिव श्रीद सुहृच्छ्रीशतनो जय ।। ५ ।। सर्व सर्वेश भूतेश गिरिश त्वं गिरीश्वर । जयोग्र रूप भीमेश भव भर्ग जय प्रभो ।। ६ ।। जय दक्षाध्वरध्वंसिन्नन्धक ध्वंसकारक । रुण्डमालिन्कपालिस्त्वं भुजङ्गाजिनभूषण ।। ७ ।। दिगम्बर दिशांनाथ व्योमकेश चितांपते । जयाधार निराधार भस्माधार धराधर ।। ८ ।। देवदेव महादेव देवतेशादिदैवत । वन्हिवीर्य जयस्थाणो जयायोनिजसंभव ।। ९ ।। भव शर्व महाकाल भस्माङ्ग सर्पभूषण । त्र्यम्बक स्थपते वाचांपते भो जगतांपते ।। १० ।। शिपिविष्ट विरूपाक्ष जय लिंग वृषध्वज । नीललोहित पिङ्गाक्ष जय खट्वाङ्गमण्डन ।। ११ ।। कृत्तिवास अहिर्बुध्न्य मृडानीश जटाम्बुभृत् । जगभ्रातर्जगन्मातर्जगत्तात जगद्गुरो ।। १२ पञ्चवक्त्रं महावक्त्रं कालवक्त्रं गजास्यभृत् । दशबाहो महाबाहो महावीर्य महाबल ।। १३ ।। अघोरघोरवक्त्रं त्वं सद्योजात उमापते । सदानन्द महानन्द नन्दमूर्ते जयेश्वर ।। १४ ।। एवमष्टोत्तरशतं नाम्नां देवकृतं तु ये । शम्भोर्भक्त्या स्मरन्तीह शृण्वन्ति च पठन्ति च ।।१५।।न तापास्त्रिविधास्तेषां न शोको न रुजादयः । ग्रहगोचरपीडा च तेषां क्वापि न विद्यते ।। १६ ।। श्रीःप्रज्ञाऽऽरोग्यमायुष्यं सौभाग्यं भाग्यमुन्नतिम् ।। विद्याधर्मे मतिः शम्भोर्भक्तिस्तेषां न संशयः ।। १७ ।।

इति श्री स्कन्द पुराणे सह्याद्रिखण्डे शिवाष्टोत्तरनामशतकस्तोत्रं संपूर्णम् ।।

* * *

## ६ अपराधभंजनस्तोत्रम् ।

श्रीगणेशायनमः । शांतं पद्मासनस्थं शशधरमुकुटं पञ्चवक्त्रं त्रिनेत्रं शूलं वज्रं च खड्गं परशुमपि वरं दक्षिणाङ्गे वहंतम् । नागं पाशं च घण्टां डमरुकसहितं चांकुशं वामभागे । नानालंकारदीप्तं स्फटिकमणिनिभं पार्वतीशं भजामि ।। १ ।। वंदे देवमुमापतिं सुरगुरुं वंदे जगत्कारणं वन्दे पन्नगभूषणं मृगधरं वंदे पशूनांपतिम् । वंदे-सूर्यशशांकवन्हिनयनं वंदे मुकुंदप्रियं वंदे भक्तजनाश्रयं च वरदं वंदे शिवं शंकरम् ।। २ ।। आदौ कर्मप्रसङ्गात्कलयति कलुषं मातृकुक्षौ स्थितः सन् विण्मूत्रामेध्यमध्ये व्यथयति नितरां जाठरो जातवेदः । यद्यद्वा सांब दुःखं विषयति विषमं शक्यते केन वक्तुं क्षन्तव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भोः श्री महादेव शंभो ।। ३ ।। बाल्ये दुःखातिरेको मललुलितवपुः स्तन्यपाने पिपासा । नो शक्यं चेंद्रियेभ्यो भवगुणजनिता जन्तवो मां तुदन्ति । नानारोगोत्थदुःखादुदरपरिवंशः शंकरं न स्मरामि । क्षन्तव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भोः श्री महादेव शंभो ।।४।। प्रौढोऽहं यौवनस्थो विषयविषधरैः पञ्चभिर्मर्मसन्धौ । दष्टो नष्टो विवेकः सुतधनयुवतिस्वादुसौख्ये निषण्णाः । शैवे चिन्ताविहीनं मम हृदयमहो मानगर्वाधिरूढं । क्षन्तव्यो.... ।। ५ ।। वार्धक्ये चेंद्रियाणां विगतगतनतैराधिदैवादि तापैः । पापै रोगैर्वियोगैरसदृशवपुषं प्रौढहीनंच दीनम् । मिथ्यामोहाभिलाषैर्भ्रमति मम मनो धूर्जटेर्ध्यानशून्यं । क्षन्तव्यो .... ।। ६ ।। नो शक्यं स्मार्तकर्म प्रतिपदगहनप्रत्यवायाकुलाख्यं । श्रौतं वार्ता कथं मे द्विजकुलविहिते ब्रह्ममार्गे च सारे । नष्टो धर्म्यो विचारः श्रवणमननयोः को निदिध्यासितव्यः क्षन्तव्यो....।। ७ ।। स्नात्वा प्रत्यूषकाले स्नपनविधिविधौ नाहृतं गाङ्गतोयं । पूजार्थं वा कदाचिद्बहुतरुगहनात् खण्डबिल्वैकपत्रम् । नानीता पद्ममाला सरसि विकसिता गंधपुष्पे त्वदर्थं । क्षन्तव्यो .... ।। ८ ।। दुग्धैर्मध्वाज्ययुक्तैर्घटशतसहितैः स्नापितं नैव लिंगं । नो लिप्तं चंदनाद्यैः कनकविरचितैः पूजितं न प्रसूनैः । धूपैः कर्पूरदीपैः विविधरसयुतैर्नैव-भक्ष्योपहारैः । क्षन्तव्यो मेऽपराधः ....।। ९ ।। नग्नो निःसङ्गशुद्धस्त्रि-

गुणविरहितो ध्वस्तमोहांधकारो नासाग्रे न्यस्त दृष्टिर्विहरभवगुणैर्नैव दृष्टं कदाचित् । उन्मत्तावस्थया त्वां विगतकलिमलं शंकरं न स्मरामि । क्षन्तव्यो:...।१०।ध्यानं चित्ते शिवाख्यं प्रचुरतरधनं नैव दत्तं द्विजेभ्यो । हव्यं ते लक्षसंख्यं हुतवहवदने नार्पितं बीजमंत्रैः।। नो जप्तं गांगतीरे व्रतपरिचरणैः रुद्रजप्यैर्न वेदैः । क्षन्तव्यो मेऽपराधःशिव शिव शिव भोःश्री महादेव शंभो ११ स्थित्वा स्थाने सरोजे प्रणवमयमरुत्कुंभके सूक्ष्ममार्गे । शांत स्वांते प्रलीने प्रकटितगहने ज्योतिरूपे पराख्ये । लिंगं तद्ब्रह्मवाच्यं सकलमभिमतं नैव दृष्टं कदाचित् । क्षंतव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भोःश्री महादेव शंभो १२ आयुर्नश्यति पश्यतां प्रतिदिनं याति क्षयं यौवनं । प्रत्यायांति गताः पुनर्न दिवसाः कालो जगद्भक्षकः । लक्ष्मीस्तोयतरंगभंगचपला विद्युच्चलं जीवनम् तस्मान्मां शरणागतं शरणद त्वं रक्ष रक्षाधुना ।। १३ ।। चंद्रोद्भासित-शेखरे स्मरहरे गंगाधरे शंकरे । सर्पैर्भूषित कण्ठकर्णविवरे नेत्रोत्थवैश्वानरे दंतित्वक्कृतिसुंदरांबरधरे त्रैलोक्यसारे हरे । मोक्षार्थं कुरु चित्तवृत्तिममला-मन्यैस्तु किं कर्मभिः ।। १४ ।। किं दानेन धनेन वाजिकरिभिः प्राप्तेन राज्येन किं । किं वा पुत्रकलत्रमित्रपशुभिर्देहेन गेहेन किम् । ज्ञात्वैतत्क्षण-भंगुरं सपदि रे त्याज्यं मनो दूरतः । स्वात्मार्थं गुरुवाक्यतो भज भज श्री पार्वतीवल्लभम् ।। १५ ।। करचरणकृतं वा क्कायजं कर्मजं वा श्रवण नयनजं वा मानसं वाऽपराधम् । विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व जयजय करुणाब्धे श्रीमहादेव शंभो ।। १६ ।। गात्रं भस्मसितं स्मितं च हसितं हस्ते कपालं सितं खट्वांगं च सितं सितश्च वृषभः कर्णे सिते कुंडले । गंगाफेन-सितं जटावलयकं चंद्रः सितो मूर्धनि । सोऽयं सर्वसितो ददातु विभवं पापक्षयं शंकरः ।।१७ ।। इत्यपराधभंजनस्तोत्रं समाप्तम् ।

## ७ निर्वाणषट्कम् ।

श्रीगणेशायनमः ।। मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं न च श्रोत्र-जिव्हे न च घ्राण नेत्रे । न च व्योम भूमिर्न तेजो न वायुश्चिदानंद-रूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।। १ ।। न च प्राणसंज्ञो न वै पंचवायुर्न वा सप्तधातुर्न वा पंचकोशः । न वाक्पाणिपादं न चोपस्थपायू चिदानंद-रूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।। २ ।। न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ मदो

नैव मे नैव मात्सर्यभाव: । न धर्मो न चार्थो न कामो न मोक्षश्चिदानंदरूपः....॥ ३ ॥ न पुण्यं न पापं न सौख्यं न दुःखं न मंत्रो न तीर्थं न वेदा न यज्ञाः । अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता चिदा....॥ ४ ॥ न मृत्युर्न शंका न मे जातिभेदः पिता नैव मे नैव माता च जन्म। न बंधुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यश्चिदानंद.... ॥ ५ ॥ अहं निर्विकल्पी निराकाररूपी विभुत्वाच्च सर्वत्र सर्वेंद्रियाणाम् । न चासंगतं नैव मुक्तिर्न मेयश्चिदा.... ॥ ६ ॥ इति श्रीमच्छंकराचार्यविरचितं निर्वाणषट्कं संपूर्णम् ॥

## ८ दारिद्र्यदहनशिवस्तोत्रम् ।

श्रीगणेशायनमः ॥ विश्वेश्वराय नरकार्णवतारणाय कर्णामृताय शशिशेखरधारणाय । कर्पूरकांतिधवलाय जटाधराय दारिद्र्यदुःखदहनाय नमः शिवाय ॥ १ ॥ गौरीप्रियाय रजनीशकलाधराय कालांतकाय भुजगाधिपकंकणाय । गंगाधराय गजराजविमर्दनाय दारिद्र्य० ॥ २ ॥ भक्तिप्रियाय भवरोगभयापहाय उग्राय दुर्गभवसागरतारणाय । ज्योतिर्मयाय गुणनामसुनृत्यकाय दारिद्र्य० ॥ ३ ॥ चर्मांबराय शवभस्मविलेपनाय भालेक्षणाय मणिकुंडलमंडिताय । मंजीरपादयुगलाय जटाधराय दारिद्र्य० ॥ ४ ॥ पंचाननाय फणिराजविभूषणाय हेमांशुकाय भुवनत्रयमंडिताय । आनंदभूमिवरदाय तमोमयाय दारिद्र्य० ॥ ५ ॥ भानुप्रियाय भवसागरतारणाय कालांतकाय कमलासनपूजिताय । नेत्रत्रयाय शुभलक्षणलक्षिताय दारिद्र्य० ॥ ६ ॥ रामप्रियाय रघुनाथवरप्रदाय नागप्रियाय नरकार्णवतारणाय । पुण्येषु पुण्यभरिताय सुरार्चिताय दारिद्र्य० ॥ ७ ॥ मुक्तेश्वराय फलदाय गणेश्वराय गीतप्रियाय वृषभेश्वरवाहनाय । मातंगचर्मवसनाय महेश्वराय दारिद्र्य० ॥ ८ ॥ वशिष्ठेन कृतं स्तोत्रं सर्वरोगनिवारणम् । सर्व संपत्करं शीघ्रं पुत्रपौत्रादिवर्धनम् । त्रिसंध्यं यः पठेन्नित्यं स हि स्वर्गमवाप्नुयात् ॥ ९ ॥

इति श्रीवशिष्ठविरचितं दारिद्र्यदहनशिवस्तोत्रं संपूर्णम् ॥

## ९ शिवमहिम्नः स्तोत्रम् ।

श्रीगणेशायनमः । पुष्पदंत उवाच । महिम्नः पारं ते परमविदुषो यद्यसदृशी स्तुतिर्ब्रह्मादीनामपि तदवसन्नास्त्वयि गिरः । अथावाच्यः सर्वः स्वमतिपरिणामावधि गृणन् ममाप्येष स्तोत्रे हर निरपवादः परिकरः॥१ अतीतः पंथानं तव च महिमा वाङ्मनसयोरतद्व्यावृत्त्या यं चकितमभिधत्ते श्रुतिरपि। स कस्य स्तोतव्यः कतिविधगुणः कस्य विषयः पदे त्ववर्वाचीने पतति न मनः कस्य न वचः ॥२ ॥ मधुस्फीता वाचः परमममृतं निर्मितवतस्तव ब्रह्मन्किवागपि सुरगुरोर्विस्मयपदम् । मम त्वेतां वाणीं गुणकथनपुण्येन भवतः पुनामीत्यर्थेऽस्मिन् पुरमथन बुधिर्व्यवसिता ॥ ३ ॥ तवैश्वर्यं यत्तज्जगदुदयरक्षाप्रलयकृत्त्रयीवस्तु व्यस्तं तिसृषु गुणभिन्नासु तनुषु । अभव्यानामस्मिन्वरद रमणीयामरमणीं विहंतुं व्याक्रोशीं विदधत इहैके जडधियः ॥ ४ ॥ किमीहः किंकायः स खलु किमुपायस्त्रिभुवनं किमाधारो धाता सृजति किमुपादान इति च। अतर्क्यैश्वर्ये त्वय्यनवसरदुःस्थो हतधियः कुतर्कोऽयं कांश्चिन्मुखरयति मोहाय जगतः ॥५॥ अजन्मानो लोकाः किमवयववन्तोऽपि जगतामधिष्ठातारं किं भवविधिरनादृत्य भवति।अनीशो वा कुर्याद्भुवनजनने कः परिकरो यतो मंदास्त्वां प्रत्यमरवर संशेरत इमे ।६ त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च । रुचीनां वैचित्र्यात् ऋजुकुटिलनानापथजुषां नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥ ७ ॥ महोक्षः खट्वांगं परशुरजिनं भस्म फणिनः कपालं चेतीयत्तव वरद तंत्रोपकरणम् । सुरास्तां तामृद्धिं दधति तु भवद्भ्रूप्रणिहितां न हि स्वात्मारामं विषयमृगतृष्णा भ्रमयति ॥ ८ ॥ ध्रुवं कश्चित्सर्वं सकलमपरस्त्वध्रुवमिदं परो ध्रौव्याध्रौव्ये जगति गदति व्यस्त विषये । समस्तेऽप्येतस्मिन्पुरमथन तैर्विस्मित इव स्तुवञ्जिह्रेमि त्वां न खलु ननु धृष्टा मुखरता ॥ ९ ॥ तवैश्वर्यं यत्नाद्यदुपरि विरिंचो हरिरधः परिच्छेत्तुं यातावनलमनलस्कंधवपुषः । ततो भक्तिश्रद्धाभरगुरुगृणभ्द्यां गिरिश यत् स्वयं तस्थे ताभ्यां तव किमनुवृत्तिर्न फलति ॥ १० ॥ अयत्नादापाद्य त्रिभुवनमवैरव्यतिकरं दशास्यो यद्बाहूनभृत रणकंडूपरवशान् । शिरः पद्मश्रेणीरचितचरणांभोरुहबलेः

स्थिरायास्त्वभक्तेस्त्रिपुरहर विस्फूर्जितमिदम् ॥ ११ ॥ अमुष्य त्वत्सेवा-समधिगतसारं भुजवनं बलात्कैलासेऽपि त्वदधिवसतौ विक्रमयतः । अलभ्या पातालेऽप्यलसचलितांगुष्ठशिरसि प्रतिष्ठा त्वय्यासीद्ध्रुवमुपचितो मुह्यति खलः ॥ १२ ॥ यदृद्धिं सुत्राम्णो वरद परमोच्चैरपि । सतीमधश्चक्रे बाणः परिजनविधेयत्रिभुवनः । न तच्चित्रं तस्मिन्वरिवसितरि त्वच्चरणोर्न कस्याऽप्युन्नत्यै भवति शिरसस्त्वय्यवनतिः ॥ १३ ॥ अकांडब्रह्मांडक्षयचकितदेवासुरकृपाविधेयस्याऽऽसीद्यस्त्रिनयन विषं संहृतवतः । स कल्माषः कण्ठे तव न कुरुते न श्रियमहो विकारोऽपि श्लाघ्यो भुवनभयभंगव्यसनिनः ॥ १४ ॥ असिद्धार्था नैव क्वचिदपि स देवासुरनरे निवर्तते नित्यं जगति जयिनो यस्य विशिखाः । स पश्यन्नीश त्वामितरसुरसाधारणमभूत् स्मरः स्मर्तव्यात्मा न हि वशिषु पथ्यः परिभवः ॥ १५ ॥ महीपादाघाताद्व्रजति सहसा संशयपदं पदं विष्णोर्भ्राम्यद्भुजपरिघरुग्णग्रहगणम् । मुहुर्द्यौर्दौस्थ्यं यात्यनिभृतजटाताडिततटा जगद्रक्षायै त्वं नटसि ननु वामैव विभुता ॥ १६ ॥ वियद्व्यापी तारागणगुणितफेनोद्गमरुचिः प्रवाहो वारायः पृषतलघुदृष्टः शिरसि ते । जगद्वीपाकारं जलधिवलयं तेन कृतमित्यनेनैवोन्नेयं धृतमहिम दिव्यं तव वपुः ॥ १७ ॥ रथः क्षोणी यंता शतधृतिरगेंद्रो धनुरथो रथांगे चंद्रार्कौ रथचरणपाणिः शर इति । दिधक्षोस्ते कोऽयं त्रिपुरतृणमाडंबरविधिर्विधेयैः क्रीडन्त्यो न खलु परतंत्राः प्रभुधियः ॥ १८ ॥ हरिस्ते साहस्रं कमलबलिमाधाय पदयोर्यदेकोने तस्मिन्निज मुदहरन्नेत्रकमलम् । गतोभक्त्युद्रेकः परिणतिमसौ चक्रवपुषा त्रयाणां रक्षायै त्रिपुरहर जागर्ति जगताम् ॥ १९ ॥ कृतौ सुप्ते जाग्रत्त्वमसि फलयोगे क्रतुमतां क्व कर्म प्रध्वस्तं फलति पुरुषाराधनमृते । अतस्त्वां संप्रेक्ष्य क्रतुषु फलदानप्रतिभुवं श्रुतौश्रध्दां बद्ध्वा कृतपरिकरः कर्मसु जनः ॥ २० ॥ क्रियादक्षोदक्षः क्रतुपतिरधीशस्तनुभृतामृषीणामार्त्विज्यं शरणद सदस्याः सुरगणाः । क्रतुभ्रेषस्त्वत्तः क्रतुफल विधानव्यसनिनो ध्रुवं कर्तुः श्रद्धाविधुरमभिचाराय हि मखाः ॥ २१ ॥ प्रजानाथं नाथ प्रसमभिकं स्वां दुहितरं गतं रोहिद्भूतां रिरमयिषुमृष्यस्य वपुषा । धनुःपाणेर्यातं दिवमपि सपत्राकृतममुं त्रसंतं तेऽद्यापि त्यजति न मृगव्याधरभसः ॥ २२ ॥ स्वलावण्याशंसा धृतधनुषमन्हायतृणवत्पुरःप्लुष्टं-

दृष्ट्वा पुरमथन पुष्पायुधमपि । यदि स्त्रैणं देवी यमनिरतदेहार्धघटना-
दवैति त्वामद्धा बत वरद मुग्धा युवतयः ।। २३ ।। श्मशानेष्वाक्रीडा स्मरहर
पिशाचाःसहचराश्चिताभस्मालेपः स्रगपिनृकरोटीपरिकरः । अमंगल्यं शीलं
तव भवतु नामैवमखिलं तथापि स्मर्तृणां वरद परमं मंगलमसि ।।२४।। मनः
प्रत्यक्चित्ते सविधमवधायात्तमरुतः । प्रहृष्यद्रोमाणः प्रमदसलिलोत्सं-
गितदृशः। यदालोक्याल्हादं ह्रद इव निमज्जामृतमये दधत्यंतस्तत्त्वं किमपि
यमिनस्तत्किल भवान् ।।२५।। त्वमर्कस्त्वं सोमस्त्वमसि पवनस्त्वं हुतवह-
स्त्वमापस्त्वं व्योम त्वमु धरणीरात्मा त्वमिति च । परिच्छिन्नामेवं त्वयि
परिणता बिभ्रति गिरं न विद्मस्तत्तत्त्वं वयमिह तु यत्त्वं न भवसि ।। २६ ।।
त्रयीं तिस्त्रो वृत्तीस्त्रिभुवनमथो त्रीनपि सुरानकाराद्यैर्वर्णैस्त्रिभिरभि-
दधत्तीर्णविकृति । तुरीयं ते धाम ध्वनिभिरविरुंधानमणुभिः । समस्तं
व्यस्तं त्वां शरण गृणात्योमिति पदम् ।। २७ ।। भवः शर्वो रुद्रः पशु-
पतिरथोग्रःसहमहांस्तथा भीमेशानाविति यदभिधानाष्टकमिदम् । अमुष्मि-
न्प्रत्येकं प्रविचरति देव श्रुतिरपि प्रियायास्मै धाम्ने प्रविहितनमस्योऽस्मि
भवते ।। २८ ।। नमो नेदिष्ठाय प्रियदव दविष्ठायच नमो नमः क्षोदिष्ठाय
स्मरहर महिष्ठाय च नमः । नमो वर्षिष्ठाय त्रिनयन यविष्ठाय च नमो
नमः सर्वस्मै ते तदिदमिति शर्वाय च नमः ।। २९ ।। बहलरजसे विश्वोपत्तौ
भवाय नमो नमः प्रबलतमसे तत्संहारे हराय नमो नमः। जनसुखकृते सत्वो-
द्रिक्तौ मृडाय नमो नमः प्रमहसि पदे निस्त्रैगुण्ये शिवाय नमो नमः ।। ३० ।।
कृशपरिणति चेतः क्लेशवश्यं क्व चेदं क्व च तव गुणसीमोल्लंघिनी शश्व-
दृद्धिः । इति चकितममंदीकृत्य मां भक्तिराधाद्वरद चरणयोस्ते वाक्य-
पुष्पोपहारम् ।। ३१ ।। असितगिरिसमं स्यात्कज्जलं सिंधुपात्रे सुरतरुवर-
शाखा लेखनी पत्रमूर्वी । लिखति यदि गृहीत्वा शारदा सार्वकालं तदपि
तव गुणानामीश पारं न याति ।। ३२ ।। असुरसुरमुनींद्रैरर्चितस्येंदुमौले-
र्ग्रथितगुणमहिम्नो निर्गुणस्येश्वरस्य । सकलगणवरिष्ठः पुष्पदंताभिधानो
